म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ६३९
REFBK-0024056
REFBK-0024056

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ६३९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३९
वा. क्र. [illegible]
भू.प्र. [illegible]
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

६३९
२४०५६
११७२।८३

# सूर्यपुत्रांचा देश – जपान

रमेश मंत्री

REFBK-0024056
REFBK-0024056

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४

प्रकाशक
सौ. सविता जोशी
रेणुका अपार्टमेन्टस्
शिवाजीनगर
पुणे ४११००४

२७३, ओंकारदर्शन
शनवार पेठ
पुणे ४११ ०३०.

© रमेश मंत्री

प्रथमावृत्ती : गणेश चतुर्थी १९८३

मूल्य : ३० रुपये

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

जपानच्या सम्राटांकडून
' उगवत्या सूर्याचे पदक '
हा सन्मान मिळविणारे माझे स्नेही
**श्री. गोपाळ पोहेकर**
यांना—

# अनुक्रमणिका


१. आधुनिक जगातील चमत्कार / ५
२. जपानच्या सांस्कृतिक बहराचा कालखंड / १४
३. पाश्चात्यांच्या वर्चस्वाला जपानचा शह / २५
४. इतिहासाला कलाटणी देणारा पर्लहार्बरवरील जपानचा हल्ला / ३३
५. पराभूत जपानवर अमेरिकेचे कडक निर्बंध / ४२
६. जगातील सर्वांत प्रगट राष्ट्र म्हणून जपानचा सन्मान / ५२
७. पाश्चात्यांवर जपानचे आर्थिक आक्रमण / ६२
८. व्यवस्थापन क्षेत्रात जपानने केलेली क्रांती / ७३
९. जपानमधील राजकारण, नभोवाणी व दूरचित्रवाणी / ८३
१०. नाट्यसृष्टी आणि वृत्तपत्रसृष्टी / ९३
११. जाहिराती, ग्राहक, भाषा आणि साहित्य / १०३
१२. समाजकल्याण आणि कला / ११४
१३. क्रीडा क्षेत्र आणि दैनंदिन जीवन / १२४
१४. महिला, शिक्षण आणि शेती / १३५
१५. वर्षाला ३५५ सण व उत्सव ! / १४६
१६. प्रेक्षणीय जपान / १५३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३२
दा. क्र. २०७५-६
प्रवास ९१०।१५ / ठ
मुंब्रा शाखा (स्थळ प्रत)

9

# आधुनिक जगातील चमत्कार

पॅरिस, न्यूयॉर्क, रोम, लंडन, ही जगप्रसिद्ध शहरे. ती सारी मी अनेकवार पाहिली, पण त्या सर्वांना मागे टाकणारे शहर आणि त्या त्या देशांना हरवणारा देश आता पूर्वेत उदयाला आला आहे. या देशाचे नावच आहे उगवत्या सूर्याचा देश– जपान. त्या शहराचे नाव आहे टोकिओ. ज्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही, असे ब्रिटिश साम्राज्याचे एकेकाळी वर्णन केले जात असे. आज हेच वर्णन जपानला यथार्थतेने लागू पडते. फरक एवढाच की जपानच्या ताब्यात परकीय प्रदेशाचा एकही चौरस मैल नाही आणि तरीही जपानच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही.

भौगोलिक परिस्थिती सर्वस्वी प्रतिकूल असूनही जपानने अनेक क्षेत्रांत जगातील क्रमांक एकचे स्थान पटकावले आहे, हे लक्षात घेतले तर या लोकांचे विशेषच कौतुक वाटते. अमेरिकेने पन्नासावर वर्षे जगात क्रमांक एकचे संपन्न राष्ट्र म्हणून दिमाख दाखवला, पण भौगोलिक परिस्थिती अमेरिकेला इतकी अनुकूल आहे की अमेरिकेच्या या कर्तबगारीचे तसे आश्चर्य वाटत नाही. भरपूर जमीन, कमी लोकसंख्या, पेट्रोलसारख्या अत्यावश्यक वस्तूंची विपुलता, भरपूर जंगले, नद्या, पर्वत, सागरकिनारा अशी सर्व भौगोलिक साधने निसर्गतःच अमेरिकेपुढे हात जोडून उभी आहेत.

जपानजवळ तसे काय आहे ? विस्तार पाहावा तर अमेरिकेतील कॅलिफोर्निया या एका राज्याच्या विस्ताराहूनही कमी. अमेरिकेच्या एका पंचवीसांश आणि भारताच्या एक नवमांश एवढेच क्षेत्रफळ. ते तरी सपाट, शेतीला अनुकूल असे आहे का ? मुळीच नाही. चार मोठी बेटे आणि त्याजवळ पसरलेली हजारो चिमुकली बेटे यांचा मिळून धनुष्याकृती असा हा पॅसिफिक महासागरातील देश.

या देशाची ऐंशी टक्के जमीन पर्वतांनी व्यापली आहे. एवढयाशा देशात हजारावर पर्वत आहेत. त्यांपैकी सर्वांत उंच माऊंट फुजी हा बारा हजार फूट उंचीचा पर्वत ज्वालामुखी आहे. जपानमध्ये १९६ ज्वालामुखी आहेत आणि अद्यापही दरसाल चारशे लहान-मोठे भूकंप या देशात होतात ! पावसाचे प्रमाणही विषम आहे. म्हणजे या लहान देशात एकीकडे चाळीस इंच तर दुसरीकडे शंभर इंच पाऊस पडतो.

पर्वत, दऱ्याखोरी, ज्वालामुखी आणि हजारो बेटांत विभागलेला भूभाग अशी सर्व नैसर्गिक अंगे विरोधी असतानाही या देशाने गेल्या पन्नास वर्षांत जी विलक्षण प्रगती केली आहे, तिला जगाच्या इतिहासात तोड नाही. केवळ भौगोलिक परिस्थितीनेच जपानला हैराण केले असे नाही, तर दोन महायुद्धांनी दोनदा हा देश उद्ध्वस्त केला. मानवजातीच्या लक्षावधी वर्षांच्या इतिहासात सर्वांत मोठा आणि एकदम संहार झाला तो गेल्या महायुद्धात. अमेरिकेने टाकलेल्या दोन अणुबाँबमुळे हे अणुबाँब हिरोशिमा आणि नागासाकी या दोन जपानी शहरांवर पडले.

पण या सर्व आपत्तींतून या छोटया देशातील आकाराने छोटया पण कर्तृत्वाने विशाल असलेल्या लोकांनी अचाट उद्योगाने आणि अफाट कल्पकतेने इतकी प्रगती केली की आज अतिशय गतिमान देश म्हणून जपानचा पहिला क्रमांक आहे. जगातील एकंदर आगबोट बांधणीपैकी निम्म्या आगबोटी जपानमध्ये तयार होतात. मोटारी, घडयाळे, पोलाद, टी. व्ही, रेडिओ, गणकयंत्रे इत्यादींच्या उत्पादनात जपान आघाडीवर आहे. दरसाल जास्तीत जास्त बचत करणारा देश म्हणून जपानचा पहिला क्रमांक आहे. वृत्तपत्रांच्या खपातही जपानच पहिला आहे. जगात कमीत कमी संप होतात ते जपानमध्ये आणि दर माणशी जास्तीत जास्त उत्पादन आणि उत्पन्न आहे ते जपानचे.

जपानी उद्योगधंदे आणि व्यापार यांचे जाळे जगभर पसरले आहे. म्हणूनच जपानच्या साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नाही, अशी नवी म्हण प्रचारात आली आहे. जपानचे औद्योगिक उत्पादन गेल्या महायुद्धानंतरच्या छत्तीस वर्षांत २८ पटीने वाढले आहे ! एवढी विजेच्या वेगाने प्रगती इतर कोणत्याही देशाने केलेली नाही. सर्व परदेशांत आज जर कोणती एक परकीय भाषा शिकण्याची, उद्योग, व्यापार, बँकिंग क्षेत्रात अहमहमिका लागली असेल तर ती जपानी भाषा. कारण पैशाच्या आणि उद्योगाच्या नाडया जपानच्या हाती आल्या आहेत, हे अरब राष्ट्रांपासून उत्तर ध्रुवापर्यंत सर्वांनाच कळून आले आहे.

ज्यूडो आणि कराटे या जपानी युद्धकलांचे शिक्षण देणारे वर्ग पाश्चात्य देशातही मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहेत. एन्. एच्. के. मध्ये (रेडिओ जपान) ३५ हजार लोक काम करतात. इतकी मोठी रेडिओ संघटना इतर कोणत्याही

देशात नाही. ३७ देशांसाठी हे केंद्र कार्यक्रम करते. भारतासाठीही हिंदी, बंगाली, उर्दू, आणि इंग्रजीत एन. एच. के. चे कार्यक्रम होतात. जपानी वृत्तपत्रांनी परदेशात जितके वार्ताहर नेमले आहेत, तेवढे इतर कोणत्याही देशाने नेमलेले नाहीत. गेल्या आठ वर्षांत जपानचे राष्ट्रीय उत्पन्न पाचपट झाले आहे. आणि प्रत्येक नागरिकाचे वैयक्तिक उत्पन्न चौपट झाले आहे. गरिबीचे संपूर्ण उच्चाटन झाले आहे, एवढेच नव्हे तर समृद्धी आली आहे. या देशातील लोकसंख्यावाढीचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे एक टक्का आहे.

जपानी लिपी उभी असते. जगातील इतर बहुतेक लिप्या आडव्या लिहिल्या जातात. त्यांपैकी उर्दूसारखी लिपी उजवीकडून डावीकडे लिहिली व वाचली जाते; पण जपानी ही चित्रलिपी आहे. ' जपान ' शब्दाचा अर्थ सोर्स ऑफ द सन किंवा सूर्याचा उगम असा आहे. जपानी लोक आपल्या देशाचा उच्चारही नियॉन असाच करतात. त्याचाच इंग्रजी अपभ्रंश होऊन जपान हा शब्द रूढ झाला आहे.

एवढी प्रचंड आणि वेगाने प्रगती करणाऱ्या जपानचे क्षेत्रफळ आहे फक्त १ लक्ष ४५ हजार चौरस मैल आणि लोकसंख्या आहे १० कोटी २० लक्ष. त्यांपैकी एक-दशांश लोक टोकिओ या राजधानीत राहतात. त्यामुळे टोकिओ हे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे शहर झाले आहे.

जपानी लोक बोलण्यात अतिशय मृदु. वागण्यात अत्यंत नम्र आणि कृती करण्यात सर्वांत तत्पर असतात. हे लोक आपापल्या उद्योगात, व्यापारात, कारखान्यात काम करताना पाहिले तर करारीपणा, चिवटपणा आणि उद्योगप्रियता या त्यांच्या गुणांची आपल्यावर अधिक छाप पडते. ते अत्यंत कडक शिस्तीचे आणि नियमितपणाचे भोक्ते आहेत. अमेरिकन आणि जर्मन तज्ज्ञांनी व्यवस्थापनाचे (मॅनेजमेंट) जे तत्त्व मांडले आहे ते सर्व गुंडाळून ठेवून जपान्यांनी स्वतःचे अर्थशास्त्र आणि त्याला अनुरूप असे स्वतःचे व्यवस्थापनशास्त्र तयार केले. ते परखडपणे आचरणात आणले आणि जगाला औद्योगिक चमत्कार करून दाखविले.

अलीकडेच जपानने फिल्मशिवाय फोटो काढणारा कॅमेरा तयार केला आहे. छायाचित्रणातील हा अत्यंत महत्त्वाचा शोध असून, कॅमेऱ्यासाठी फिल्म तयार करणाऱ्या उद्योगात त्यामुळे प्रचंड उलथापालथ होईल. ' माविका ' असे या नव्या कॅमेऱ्याचे नाव असून, सोनी या जगप्रसिद्ध इलेक्ट्रॉनिक्स कंपनीने तो शोधून काढला आहे. याच कंपनीने पहिला ट्रान्झिस्टर तयार केला होता आणि खिशात ठेवण्यासारखा टी. व्ही. ही याच सोनी कंपनीने तयार केला आहे. १८३९ मध्ये लुई डुगारे यांनी कॅमेऱ्यासाठी सिल्व्हर प्लेट शोधून काढली. त्यानंतरचा या क्षेत्रातील हा सर्वांत मोठा शोध आहे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. कृत्रिम रक्त तयार करण्यातही जपानने यश मिळविले आहे. अजून त्याचा शंभर टक्के हमखास म्हणून

मानवी रक्ताऐवजी वापर करता येत नाही, पण काही कालावधीत तोही चमत्कार जपान करून दाखवील.

सूर्याच्या देशाच्या या पराक्रमी सूर्यपुत्रांचा परिचय सर्वांनाच उद्‌बोधक आणि मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. जुने आणि नवे यांचा मनोहर संगम या देशात झाला आहे. मी नुकताच जपानला जाऊन आलो. तेथील सांस्कृतिक संस्था, प्राध्यापक, लेखक, पत्रकार यांना भेटलो आणि या गतिमान देशाच्या यशाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. जुन्याची टिंगल न करता केवळ ते जुने आहे म्हणून त्याची उपेक्षा न करता त्यातील उत्तम गुण जपानने आपल्याकडे ठेवले आहेत. तसेच नव्या युगातील नव्या वाऱ्यांना सामोरे जाऊन त्यातील दोष वगळून नेमके गुण तेवढे जपानने उचलले. अमेरिकेची उद्योगप्रधानता घेतली, इंग्लंडची चिकाटी घेतली, फ्रान्सची रसिकता जपानमध्ये पूर्वीपासूनच आहे, आधुनिक कलात्मकताही घेतली. जपानी घरात अजूनही देवांच्या मूर्तींबरोबर आजोबा आणि आजी यांचे फोटो ठेवलेले असतात. घरातील वडीलधाऱ्यांना अत्यंत नम्रतेने, सौजन्याने आणि आदराने वागविण्यात येते. त्यांची रवानगी वृद्धाश्रमात करण्यात येत नाही.

उद्योगधंदे, संशोधन, शास्त्र, कला या सर्वांत आपणच सर्वश्रेष्ठ आहोत, असे गेली पन्नास वर्षे पाश्चात्य राष्ट्रे समजत होती, पण आता पूर्वेकडील या उगवत्या सूर्याने त्यांचे गर्वहरण केले आहे. पौर्वात्य लोक हे मागासलेले, आळशी, समृद्ध पाश्चात्य राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून राहणारे असे जे चित्र पाश्चात्य राष्ट्रे जगापुढे ठेवीत असत, त्यांना जपानने हादरा दिला आहे. आजच्या यंत्रयुगाचा जपानमध्ये उदय झाला नव्हता, तेव्हाही अनेक गुणांत या देशाने पाश्चात्यांना हरवले आहे. उदाहरणार्थ– जपानमध्ये शेकडो वर्षे वापरले जाणारे गणित करण्याचे एक साधन असते. अनेक दोऱ्यांच्या मालिकात मणी ओवलेले हे साधन एक फूटभर उंच आणि आठदहा इंच रुंद असते. आजही अनेक दुकानांत आणि पोस्ट ऑफिसांत याचा वापर करतात. गेल्या महायुद्धाच्या वेळी अमेरिकन लष्करी तज्ज्ञांनी आकडेमोड करण्याची आधुनिक अमेरिकन यंत्रे आणि जपानची ही अबॅकस नावाची साधी साधने यांच्यात चढाओढ लावली. ती शर्यत जपानने जिंकली आणि केवळ मण्यांनी अमेरिकन यंत्रांना हरवले ! आजही जपानी दुकानात आठदहा वस्तू घेतल्यावर अमेरिकन प्रवासी आपला कॉम्प्युटर काढून गणित करीत बसतो पण त्याच्या रकमा मांडून बेरीज होण्यापूर्वीच जपानी मुलगी अचूक किंमत साध्या मण्यांच्या साहाय्याने सांगते. तत्परता हा गुण जपानमध्ये पराकोटीला गेला आहे.

या तत्परतेचा प्रत्यय मला टोकियोला उतरल्यावर काही क्षणांतच आला. मी 'पॅन अमेरिकन' विमानाने टोकिओला नव्या हाकोझाकी विमानतळावर उतरलो. इतर सर्व विमानतळांवर निदान वीस–पंचवीस मिनिटे आपले सामान विमानातून

येण्यासाठी वाट पाहावी लागते. पण इथे आश्चर्य म्हणजे मी सामानाच्या काऊंटर-वर येण्यापूर्वीच तिथे माझ्या बॅगा तयार होत्या. त्या घेऊन मी पासपोर्ट दाखवला. तो तपासणाऱ्या अधिकाऱ्याने माझा व्हिसा पाहिला तेव्हा तो चुकून उलटा छापलेला त्याला दिसला. पण मी त्याचे स्पष्टीकरण करण्यापूर्वीच तो अधिकारी म्हणाला, "आमच्या मुंबईच्या कॉन्सुलेटच्या यंत्रात पॉसपोर्ट घालताना नजरचुकीने उलटा घातला गेला असावा, त्याबद्दल मी दिलगीर आहे. जपानमध्ये आपले स्वागत असो." हजारो मैलांवरच्या त्याच्या कॉन्सुलेटची लहानशी नजरचूक झाली, तर टोकिओचा हा अधिकारी आपणहोऊन क्षमा मागतो.

मी सामान घेऊन टॅक्सी, बस काही मिळते का ते पाहायला गेलो. चौकशी काउन्टरवरची जपानी तरुणी म्हणाली, "आपल्याला कुठं जायचं आहे ?" मी "मैदा ई माय" भागातील माझा पत्ता दाखवला. ती म्हणाली, "टॅक्सीनं जाणं फार खर्चाचं होईल. आपण निम्म्या वाटेपर्यंत बसनं जा. तिथून टॅक्सी करा." तिथून माझ्या मुक्कामापर्यंत टॅक्सीला साधारण किती पैसे पडतील हेही तिनं न विचारता सांगितलं आणि शेजारच्या काउन्टरवर बसचं तिकीट घेण्याची सूचना केली. पुन्हा स्मितवदनाने 'वेलकम टू जपान.' बसचं तिकीट देणाऱ्या मुलीनं माझ्या बॅगा घेऊन तिकीट आणि बॅगांची टोकन्स दिली व तिनंही 'जपानमध्ये स्वागत असो'चा घोष केला. अशा नम्र आणि प्रसन्न वातावरणात मी जगातील या अतिशय प्रगतीशील राष्ट्रात प्रवेश केला.

धनुष्याकृती आकाराचा जपान आशिया खंडाच्या पूर्वेला आहे. त्यात चार प्रमुख बेटे आणि हजारो छोटी बेटे समाविष्ट आहेत. चार प्रमुख बेटे म्हणजे हाकाइडो (क्षेत्रफळ ७८००० चौरस किलोमीटर्स), होन्शू (दोन लाख तीस हजार ७०० चौरस किलोमीटर्स), शिकोकू (१८,७७० चौरस किलोमीटर) आणि कियुशू (४२,००० चौरस किलोमीटर्स) जगाच्या एकंदर क्षेत्रफळापैकी फक्त ०.३ टक्के क्षेत्र जपानच्या वाट्याला आले आहे. पावसाचे प्रमाण ४० ते १०० इंच आहे.

जपानचे हवामान काहीसे भारतासारखेच आहे. ऋतूंचे कालखंड मात्र भारतापेक्षा वेगळे आहेत. जुलैच्या अखेरीस उन्हाळा सुरू होतो आणि त्यानंतर महिनाभराने पावसाळा सुरू होतो. सप्टेंबर हा पावसाळ्याचा उच्चांकाचा महिना असतो. पावसाबरोबरच चक्री वादळांनी ही बेटे झोडपली जातात. जपानच्या उत्तर भागात हिवाळ्यात जोराची बर्फवृष्टी होते. टोकियोच्या आसपास मात्र हिवाळा एवढा कडक नसतो. मार्चनंतरचे तीन–चार महिने जपानला भेट देण्यासाठी उत्कृष्ट असतात. या वेळी हवामान सुखद असते. जपानमध्ये आधीच झाडे, वेली व जंगले मुबलक, त्यातच उत्तम सौंदर्यदृष्टीच्या जपानी लोकांनी लक्षावधी फुल-

झाडांची जाणीवपूर्वक केलेली लागवड आणि खास जपानी धर्तीची उद्याने, यामुळे हा देश अतिशय लोभसवाणा दिसतो. जंगलांप्रमाणेच भरपूर पर्वत या देशाला मिळाले आहेत. जपानमध्ये दोन हजार फुटांपेक्षा अधिक उंच असलेले ५८० पर्वत आहेत. भरपूर पावसामुळे या पर्वतांच्या दऱ्याखोऱ्यांतून शेकडो नद्या, नाले, धबधबे वाहत असतात. देश लहान असला तरी त्याच्या विशिष्ट आकारामुळे जपानला खूपच मोठा समुद्रकिनारा मिळाला आहे. या इवल्याशा देशात शेकडो ज्वालामुखी असले, तरी त्यांचे स्वरूप उग्र नाही.

भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते जपानी बेटे एकेकाळी पाण्याखाली होती. भूकंपाचे उद्रेक आणि पृथ्वीच्या पोटातील चलनवलन यामुळे हजारो वर्षांपूर्वी ही बेटे पाण्यावर आली. ओसाका विभागात अजूनही दररोज वीस लहान भूकंप होतात. बऱ्याच वेळा ते इतके सूक्ष्म असतात की सर्वसामान्य जनतेला ते जाणवत नाहीत. पण भूकंपमापन यंत्रात त्यांची नोंद होते. १८५५ नंतर टोकियो येथे मोठा भूकंप झाला नाही. याकोहामा येथे मात्र अलीकडे म्हणजे १९२३ मध्ये मोठा भूकंप झाला होता. भूकंप, चक्रीवादळे, जंगलांना लागणाऱ्या आगी, अतिवृष्टी अशा नैसर्गिक आपत्ती सतत कोसळत असतानाही त्या सर्वांना धैर्याने तोंड देऊन जपानी लोकांनी प्रत्येक वेळी या आपत्तीवर मात केली आहे.

जपान हा देश अशा रीतीने भौगोलिकदृष्ट्या अगदी वेगळा आहे.

शरीरशास्त्रदृष्ट्या जपानी माणूस हा पाश्चिमात्य माणसापेक्षा खूपच वेगळा आहे. उंचीने पाश्चात्य माणसापेक्षा जपानी माणूस खूपच कमी आहे. पण त्यातही त्याचा विशेष म्हणजे त्याचे पाय मात्र आखूड असतात. जबडा थोडा पुढे आलेला असतो. पाश्चात्य माणसाच्या कवटीपेक्षा जपानी माणसाची कवटी आणि मेंदू मोठे असतात. मेंदू मोठा असणे हे अधिक बुद्धिमत्तेचे लक्षण असते. जपानी माणसाचे हात आखूड आणि अधिक चपळ असतात. अशा हातांचा हस्तकला व्यवसायात फार उपयोग होतो. प्राचीन काळापासून जपानी लोक मातकाम आणि लाकडाच्या कोरीव कामांत अग्रेसर असण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

जपानच्या इतिहासाचा उगम काहीसा अस्पष्टच आहे. जपानचा सम्राटांच्या विषयीचा आत्यंतिक आदर हे याचे एक कारण आहे. सम्राट हे सूर्यासमान असल्याने त्यांचे मूळ आणि कूळ पाहणे हे अयोग्य आहे, असे अनेक श्रेष्ठ जपानी इतिहासकारांचेही अगदी अलीकडेपर्यंत मत होते. मात्र दुसऱ्या महायुद्धानंतर या मतात फरक पडला.

जपानमध्ये केलेले जाणीवपूर्वक उत्खनन, संशोधन याबरोबरच तेथे सतत होणाऱ्या भूकंपामुळेही प्राचीन इतिहासातील अनेक पुरावे हाती लागत गेले. त्यावरून असा निष्कर्ष काढला आहे की इ. स. सुरू होण्याच्या अडीच हजार वर्षांपूर्वी

जपानमधील यामॅटो भागात त्या काळच्या राजाची राजधानी होती. त्या काळचे जपानी लोक शेतीही करीत नव्हते. जंगलात राहणारे ते लोक शिकार करून उदर-निर्वाह करीत. तेव्हाच्या राजाला एका आदिवासी जमातीचा नायक म्हणणे अधिक संयुक्तिक होईल. इ. स. पूर्वी २५०० ते ५०० पर्यंत जपानमध्ये जोमीन संस्कृती होती. नंतर शेतीला सुरुवात झाल्याचा पुरावा मिळाला आहे. सुरुवातीला जपानी लोक भातशेती करीत होते.

जपानमधील मातकाम हे प्राचीन असून इ. स. २५० मध्येही चाकाच्या सहाय्याने तेथे मडकी व इतर मातकाम केले जात असे. या काळात प्रवास, शिकार आणि लढाई यासाठी घोडयांचा उपयोग केला जात असे. राजांची प्रचंड स्मारके बांधणे हे या काळातील एक वैशिष्टच होते. (इजिप्तमधील प्राचीन पिरॅमिडस्सुद्धा अशीच थडगी आहेत.) जपानमधील सम्राट निंटोकूचे थडगे हे जगातील अवाढव्य थडग्यांपैकी एक आहे. ते बांधण्यासाठी पाच हजार लोक वर्षभर खपत होते. या थडग्यांची लांबी दीड हजार फूट आणि उंची एकशेपाच फूट आहे.

सहाव्या शतकात जपानमध्ये दोन महत्त्वाचे फरक झाले. त्यांचा खोल परिणाम अजूनही या देशावर दिसतो. बौद्ध धर्माचा प्रवेश ही पहिली महत्त्वाची घटना आणि चिनी लिपीचे आगमन ही दुसरी. त्यापूर्वी तिसऱ्या शतकात जपान 'पीपल ऑफ वॉ' म्हणजे 'वॉ जमातीचे लोक' म्हणून ओळखला जात होता. त्यात वेगवेगळया शंभर पंथांच्या लोकांचा समावेश होता. मात्र जपानचा त्या काळीही चीनशी संबंध होता.

चौथ्या शतकात जपानी सैन्याने कोरियात प्रवेश केल्याचा इतिहासात उल्लेख आहे. उत्तर कोरियातील काही भागांवर जपानची सत्ता चीनने मान्य केल्याचे उल्लेख पाचव्या शतकातील पुराव्यात आढळतात. त्या वेळचे जपानी सम्राट समर्थ आणि प्रजादक्षही होते. अवर्षणाच्या वेळी त्यांनी जनतेवरील कर रद्द केले आणि आपल्या राजवाडयांची दुरुस्तीही पुढे ढकलली, असे चिनी इतिहास-कारांनी म्हटले आहे.

सातव्या शतकात चीनच्या राज्यपद्धतीचे आणि कारभाराचेही अनुकरण जपानमध्ये होऊ लागले. कोरियातही बौद्ध धर्माचा प्रसार असल्याने तेथे गेलेल्या जपानी सैनिकांवर त्याचा प्रभाव पडला. जपानचे प्रमुख शोटोकू यांनी सन ५९६ मध्ये ओसाका येथे बुद्ध मंदिर बांधले. त्या काळापासून जपानमध्ये बौद्ध धर्माल-राजाश्रय आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली. नारा येथेही बुद्ध मंदिर झाले. चीनमधील सुई आणि तांग राजांच्या कारकीर्दीत तर जपानमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर झाला. त्याच वेळी चिनी चित्रकला आणि चित्रलिपी यांनीही जपानमध्ये मूळ धरले. आजची जपानी लिपीही मूळ चिनी चित्रलिपीवरून

विकसित झाली आहे. शोटोकूच्या कारकीर्दीत चीनमधील सरदार-दरकदारांची पद्धत आणि नोकरशाही यांचा जपानवरील प्रभाव दृढ झाला. कन्फ्युशियसचा या सुमाराला सुरू झालेला प्रभाव अजूनही जपानी तत्त्वज्ञानात दृग्गोचर होतो. सांस्कृतिकदृष्ट्या चीनने जपानवर सर्वांत मोठी छाप ठेवली आहे. चीनमधून आणि कोरियातून जपानमध्ये चिनी भाषेतील बौद्ध सूत्रे आणि हस्तलिखिते इतर ग्रंथ आले. सन ६०७ मध्ये चीनमध्ये जपानची पहिली वकिलात स्थापन झाली. नंतर जपानी व चिनी पंडित आणि धर्मोपदेशक एकमेकांच्या देशांना भेटी देऊ लागले. चीनची वकिलातही जपानमध्ये सुरू झाली. चीनचे वैभव, सांस्कृतिक बहर आणि राज्यव्यवस्था यांच्याकडे जपान कौतुकाने आणि आदराने पाहत होता आणि शक्य तेथे चीनचे अनुकरणही करीत होता. उदाहरणार्थ, शेती आणि व्यापार यांच्यावर कर बसविण्याची चीनची पद्धत जपाननेही उचलली. बड्या जमीनदारांना सरकारी जमिनी देऊन त्यांच्याकडून कर वसूल करणे हे हजारो छोट्या जमीनधारकांकडून कर वसूल करण्यापेक्षा सोपे असते. चीनच्या याच तत्त्वावर जपाननेही आपल्या शेतीची उभारणी केली आणि तीतूनच मध्ययुगीन जमीनदारी पद्धतीचा उदय झाला. मात्र जपानमधील बराच प्रदेश पर्वतांनी व्यापल्यामुळे सलग जमिनीचे मोठे तुकडे करणे हे चीनइतके सोपे नव्हते. चीनमध्ये कालमापनाची जी पद्धत होती, तीच जपाननेही सातव्या शतकाच्या सुरवातीला उचलली.

सहाव्यापासून आठव्या शतकापर्यंत जपानचे सरकार एकाच राजधानीत स्थिर नव्हते. कारण एकाच ठिकाणी दीर्घकाल राहिल्यास राजाला मृत्यू येईल असा एक भ्रम होता ! पण आठव्या शतकात मात्र या लोकभ्रमाची छाप कमी होऊन नारा या गावी स्थिर अशी राजधानी करण्यात आली. त्यापूर्वी राजधानीचे ठिकाण वारंवार बदलण्यात येई आणि त्यामुळे नोकरवर्गाप्रमाणेच जनतेलाही बराच त्रास होई. नारा येथे राजधानी स्थिरावल्यावर जपानच्या सांस्कृतिक चळवळीलाही बहर आला. निसर्ग आणि प्रेम यांच्यावरील काव्ये पूर्वीपेक्षा खूपच अधिक प्रमाणावर लिहिली जाऊ लागली. चित्रकलेची भरभराट झाली. नारा येथे राजधानी झाल्यावर चार वेळा राजवट बदलली.

त्या काळात जपानला अनेक लढायांना तोंड द्यावे लागले. सैन्यभरती करण्यासाठी प्रत्येक कुटुंबातील तीन पुरुषांमागे एकाला सक्तीची लष्करी सेवा करावी लागली. शेतकऱ्यांच्यावर अन्याय झाले. याचा परिणाम म्हणून हजारो नागरिक शेजारच्या देशात पळून गेले. किंवा लढाईवर जाणे टाळण्यासाठी बौद्ध मठात जाऊन धर्माला त्यांनी वाहून घेतले. बौद्ध भिक्षूंना लष्करी सेवेची सक्ती नव्हती, त्याचा फायदा घेतला जाऊ लागला. खुद्द जपानी सम्राटांनीही बौद्ध धर्माला एवढे उत्तेजन दिले की प्रत्येक जिल्ह्यात सात मजली पॅगोडा– बुद्ध मंदिर असावे असा

त्यांनी हुकूम काढला.

सन ७८४ मध्ये जपानची राजधानी नाराहून वीस मैलांवरच्या नागाओका येथे हलविण्यात आली. तेथून ती उडा येथे नेण्यात आली आणि पुन्हा राजधानीचे स्थलांतर क्योटो येथे करण्यात आले. क्योटो या शब्दाचा अर्थच राजधानी असा आहे. या वेळी कमाऊ सम्राटांची सत्ता होती. राजकारणावर बौद्ध धर्माचा वरचष्मा असता कामा नये, असे त्याचे मत होते, पण वैयक्तिक जीवनात मात्र तो कडवा बौद्ध धर्मीय होता. त्याने लष्करातील आणि नोकरशाहीतील भ्रष्टाचारांना आळा घालून लढायांत अनेक विजय मिळविले. नवव्या शतकात फुजीवारा राजघराण्याकडे सुधारणा करून सरकारी दप्तर, न्यायसंस्था, पोलिस व्यवस्था अशा अनेक विभागांनी पुनर्रचना केली. सन ८५८ पासून १०६८ पर्यंत फुजिवारा घराण्यातील पंधरा सम्राटांनी जपानवर राज्य केले. या काळात जपानने केलेली आर्थिक व सांस्कृतिक प्रगती, शेकडो इतिहास, दैनंदिनी आणि कादंबऱ्यांतून प्रतीत झाली आहे. याच कारकीर्दीत शिंटो धर्माचा उदय झाला. बौद्धधर्मात निसर्गभक्तीचे मिश्रण करून शिन्टोचे तत्त्वज्ञान मांडले गेले. अजूनही जपानवर शिन्टोचा खोल प्रभाव आहे. पाऊस, सूर्य, झाडे, नद्या, शेती इत्यादींना या धर्मात देव मानून त्यांची प्रार्थना करण्यात येते. हा धर्म अतिशय सोज्ज्वळ आणि सौंदर्याचे अधिष्ठान मानणारा आहे. जात्याच कोमल मनाच्या सौंदर्यवादी जपानी लोकांनी शिन्टोचा मुक्त हस्ताने स्वीकार केला. आजही जपानमध्ये बहुसंख्य लोक बौद्ध आणि शिन्टो या दोन्ही धर्मांचे उपासक आहेत. शिन्गुन या चिनी शब्दाचा अर्थ सत्य असा आहे. परमार्थ आणि इहलोकीचे सौंदर्य यांचा उत्तम मिलाफ करण्यात शिन्टो धर्माने यश मिळवल्यामुळे त्या वेळच्या सरदार-उमरावांना त्याचे आकर्षण वाटू लागले व कालांतराने सर्वसामान्य जनतेनेही या खानदानी वर्गाचे अनुकरण केले.

सरदार-दरकदार वर्गातील अतिसंपन्न लोकांनी चित्रकला, संगीत आणि साहित्य विशेषतः काव्य यांची उपासना केली. कवितांची समस्यापूर्ती हा या वर्गाचा खास छंद होता. त्यांनी केलेल्या कलेच्या जोपासनेचा जपानच्या जीवनात फार दूरगामी व सखोल परिणाम होऊन तीतूनच आजचा सुसंस्कृत व सदभिरुचीचा जपानी समाज निर्माण झाला.

२

# जपानच्या सांस्कृतिक बहराचा कालखंड

जपानच्या सम्राटांची राजधानी क्योटो येथे होती, तेव्हाच शोगुनांचा उदय झाला. ११८३ ते १३३३ या काळात सम्राट हतबल झाले आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणारे शोगुन ऊर्फ दिवाण हे बलिष्ठ झाले. शोगुनांनी कामाकुरा या शहरातून जपानचा राज्यकारभार करायला सुरुवात केली आणि सम्राटांच्या हाती नाममात्रच सत्ता राहिली. हे शोगुन अत्यंत पराक्रमी आणि कर्तबगार होते. त्यांच्या या दीडश वर्षांच्या राजवटीला जपानच्या इतिहासात कामाकुरा खंड असे नाव आहे. या काळातच जपानमध्ये झेन बुद्धिझमचा उदय आणि प्रसार झाला. शोगुनांच्या पराक्रमाची स्तुती गाणाऱ्या कादंबऱ्या आणि दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमाची नवी लाट अगदी अलीकडे म्हणजे १९८१ मध्ये मी जपानमध्ये होतो तेव्हा झाली होती. जपानच्याच नव्हे तर इंग्लंड-अमेरिकेतीलही दूरचित्रवाणीवर शोगुनच्या जीवनावरील अनेक भागांच्या मालिकेने लोकप्रियतेचे उच्चांक मोडले होते. मी कामाकुरा येथे गेलो होतो तेव्हा तेथे शोगुन राजवटीच्या पराक्रमाचे दर्शन देणारे संग्रहालय आणि इतर अनेक अवशेष पाहिले. जपानच्या इतिहासातील प्रसिद्ध योद्धे म्हणून मिनेमोटो योरिटोमो आणि त्याचा सावत्र भाऊ योशित्सुन यांचा उल्लेख आवश्यक आहे. कारण या दोघांच्या शौर्यकथेवर शेकडो कवने, कथा आणि नाटके रचली गेली आहेत. योरिटोमोने मोठा प्रांत काबीज करून आपला दरारा बसवला, त्या वेळी योशित्सुन हाच त्याचा सैन्यप्रमुख होता, पण या सरसेनानीपासून आपल्याला धोका आहे, असे योरिटोमो याला वाटले आणि त्याने आपल्याच सैन्यप्रमुखाचा पाठलाग सुरू केला. योशित्सुने पळून जाण्याचा खूप प्रयत्न केला आणि अखेर आपण योरिटोमोच्या तावडीत सापडणार हे कळून चुकले तेव्हा आत्महत्या केली. जपानमध्ये अद्यापही शौर्य आणि आत्महत्या यांचे अतूट नाते आहे. इतके की आत्महत्या करणे

तेथे दुबळेपणाचे मानले जात नसून शौर्याचाच एक प्रकार मानला जातो.

जपानच्या सम्राटाने योरिटोमो याला ' शोगुन ' म्हणजे दिवाण किंवा पेशवे हा किताब दिला. शोगुनांच्या कारकीर्दीत जपानमध्ये अनेक महत्त्वाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक घडामोडी झाल्या. झेन बुद्धिझम हा पंथ चीनच्या दक्षिण विभागात सुंग कारकीर्दीत दहाव्या शतकात उदयाला आला. परिशीलन, चिंतन या आत्म-विकासाबरोबर युद्धकला हेही झेन बुद्धिझमचे व्यवच्छेदक लक्षण असल्याने जपानच्या कामाकुरा कारकीर्दीत, लष्करात आणि पर्यायाने इतर नागरिकांतही त्याचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला.

याच सुमारास चीनमधून जपानमध्ये चहा पिण्याची प्रथाही आली. ती अद्याप चालू आहे. केवळ चहा पिण्याला जपानने स्वतंत्र कलेचा दर्जा दिला. साहित्यात या वेळी महान जपानी योद्धयांच्या कथा आणि त्यांच्या जीवनावरील नाटके व काव्ये रचली गेली. अशा साहित्यांत अखेर त्या लढवय्यांचा पाडाव दाखवून भौतिक वैभव कसे क्षणभंगुर आहे याचा ठसा वाचकांच्या व प्रेक्षकांच्या मनावर ठसवून त्यांना चिरंतन अशा धार्मिक व आध्यात्मिक कार्याकडे वळविण्याचाही अनेकदा उद्देश आहे.

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात कुबलाई खान या मोगल बादशहाने चीन-मधील सुंग राजवट उलथवून तिथे आपला अंमल बसवला. त्याने कोरियावर स्वारी करून जपानकडे आपले नौदल नेले. पण त्याच सुमाराला सागरावर प्रचंड वादळ होऊन कुबलाई खानाच्या जहाजांची वाताहत झाली. मार्कोपोलो हा जगप्रसिद्ध प्रवासी व अधिकारी कुबलाई खानाच्या सेवेत होता. त्याने जपानचे वर्णन सुवर्णाने समृद्ध असलेला देश असे केले आहे. त्यानंतर कुबलाई खानने पुन्हा जपानवर स्वारी केली. पण जपानी सैन्याने अपूर्व शौर्याने लढून त्याला पिटाळून लावले. याच लढाईच्या वेळी पुन्हा अचानक वादळाने मोगलांच्या सैन्याची दैना केली. बड्या मोगलांच्या विरुद्धचा छोट्या जपानचा यशस्वी लढा हा जपानच्या इतिहासातील अनेक स्फूर्तिदायक प्रसंगांपैकी एक आहे. सम्राट गोरिओगाला स्वतंत्र राजपद स्थापण्याची संधी मिळाली. काही काळ जपानमध्ये कामाकुरा आणि क्योटो येथे दोन वेगळ्या राजवटीही चालू होत्या.

पण मुरोमाची शोगुननी देशाची संघटना करून क्योटो येथे एकच राजवट केली. १३३३ ते १५६८ पर्यंतचा काळ जपानच्या इतिहासात मरोमाची कारकीर्द म्हणून ओळखला जातो. या काळातील पहिली जवळजवळ शंभर वर्षे यादवी युद्धातच गेली. पण या दुर्धर काळातून जपान हे अत्यंत काटक, कोणत्याही प्रतिकूल परि-स्थितीला तोंड देणारे, शूर आणि कल्पक राष्ट्र म्हणून उदयाला आले. व्यापार-उद्योगातही जपानने प्रगती करण्यास सुरुवात केली. जपानी व्यापाऱ्यांनी दक्षिण

आशिया, फिलिपाईन्स, कोरिया इतकेच नव्हे तर सैबेरियापर्यंत जाऊन आपली उपक्रमशीलता सिद्ध केली. अनम, कंबोडिया, सयाम (थायलंड) अशा भागांत जपानी व्यापारी, उद्योजक आणि नोकरवर्ग जाऊ लागला. सतराव्या शतकात जपानने आपला इतका दबदबा या भागांत निर्माण केला होता की सयामचा व्हाइसरॉय म्हणून एक जपानी अधिकारी काम करीत होता.

मुरोमाच्या कारकीर्दीत जपानमध्ये भव्य आणि कलात्मक इमारती उभ्या राहिल्या. शिल्पकला आणि वास्तुशिल्पकला यांची भरभराट झाली. त्या काळातील झन बौद्धांची देवालये आणि चांदीचे नक्षीकाम असलेली भांडी व इतर वस्तू हा जपानी कलेचा अमोल ठेवा आहे. नो नावाच्या जपानी नाट्यप्रकाराचा प्रारंभ आणि सेंट फ्रॅन्सिस झेवियर यांनी केलेला ख्रिश्चन धर्माचा प्रसार ही या मुरोमांच्या कारकीर्दीची आणखी दोन वैशिष्ट्ये. १५४३ मध्ये एक पोर्तुगीज जहाज समुद्रातून जात असता वादळात सापडले आणि जपानचे किनाऱ्याला अनपेक्षितपणे लागले. जपानचा आणि युरोपियनांचा हा पहिला संबंध. या प्रवाशांचे जपानी लोकांनी चांगले स्वागत केले.

पोर्तुगीजांच्याकडे तेव्हा बंदुका होत्या. जपानला हा प्रकार अगदी नवीन होता. त्यांनी बंदुकांना ' लोखंडाच्या काठ्या ' असे नाव दिले. पण बंदुका पाहूनच जपानी लोक थांबले नाहीत. त्यांनी लगेच त्या बंदुकांची प्रतिकृती करून स्वतः बंदुकांचे व बंदुकीच्या दारूचे उत्पादनही करण्यास सुरुवात केली. जपान नावाचा समृद्ध देश पॅसिफिक महासागरात आहे याची वार्ता युरोपमध्ये पसरल्यावर अधिक जहाजे येऊ लागली. १५४९ मध्ये सेंट झेवियर यांनी दोन ख्रिश्चन धर्मोपदेशक आणि दोन जपानी अनुयायी यांच्यासह जपानमध्ये प्रवेश केला. जपानला येताना वाटेतल्या बंदरात त्यांनी हे दोन अनुयायी मिळविले. "जपानी लोक अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू आणि इतरांचा आदर ठेवणारे आहेत, त्यांच्यासारखे राष्ट्र दुर्मिळच आहे" असे सेंट झेवियर यांनी युरोपमध्ये पाठविलेल्या पत्रात लिहिले आहे. मात्र बुद्ध आणि झेन बुद्ध यांचा जपानवर एवढा पगडा होता की तेथे ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे कठीण आहे, असेही मत त्यांनी व्यक्त केले. आधी चीनमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार केला तर जपानमध्ये ख्रिश्चन धर्माचे कार्य करणे सुलभ होईल असेही सेंट झेवियर यांनी म्हटले आहे. दोन वर्षांत फक्त हजारच जपान्यांचे धर्मांतर ते करू शकले. पण नंतरच्या पन्नास वर्षांत ख्रिश्चन धर्मोपदेकांनी जपानमध्ये चिकाटीने कार्य केले.

टोयोटोमी हिदेयोशी या युद्धकुशल व मुत्सद्दी सेनानीकडे १५३६ ते १५९८ या प्रदीर्घ काळात जपानचे नेतृत्व होते. त्याने बहुतेक जपानचे एकीकरण पूर्ण करून एकसंध राष्ट्र स्थापन केले. त्याने मनिला, फोर्मोसा आणि कोरिया यांच्या प्रमुखांना

कडक खलिते पाठवून स्वारी करण्याचा मनोदय व्यक्त केला. त्याने कोरिया आणि चीनवर स्वारीही केली. त्यात त्याला यश आले नाही, तरी संरक्षक फळीचा जपान-ऐवजी आक्रमक जपान अशी त्याने देशाची निर्माण केलेली प्रतिमा लोकांना अतिशय स्फूर्तिदायक वाटली.

जपान हे अधिकाधिक भरभराटीला येत असलेले राष्ट्र आहे, संपन्न होत आहे हे पाहून कलात्मक मातकाम करणारे शेकडो कलाकार जपानमध्ये आले आणि त्यांनी जपानची मातकामातील परंपरा समृद्ध केली. या वेळी पोर्तुगीज आणि इटालियन धर्मोपदेशक ख्रिश्चन धर्माचा प्रसार जपानमध्ये करीत होते. पण हिदे-योशीने त्यांना कडक समज देऊन रोमला परत जाण्याचा हुकूम दिला. काही धर्मोपदेशकांनी तो पाळला तर काही जण कोरियात आश्रयासाठी गेले. टोयोटोमी हिदेयोशीच्या या हुकमामुळे जपानी लोकांना त्याच्याविषयी अधिकच आदर वाटू लागला. पण धर्माचा आणि जन्माच्या उच्च-नीचतेच्या कल्पनांचा त्यावेळी समाजा-वर इतका पगडा होता की, हिदेयोशीचा जन्म उच्च कुळात न झाल्याने त्याला शोगून हा किताब मिळाला नाही. त्याच्या मृत्यूनंतर ख्रिश्चनविरोधी चळवळीची धारही कमी झाली. पण १६१७ मध्ये पोर्तुगीज, डच व स्पॅनिश यांच्यातील वैमनस्यामुळे एकमेकांनी कागाळ्या करून ख्रिश्चन धर्म प्रसाराविरुद्ध शोगुनांचे मत इतके कलुषित केले की शोगुनांनी अनेक ख्रिश्चन धर्मोपदेशकांचे बळी घेतले व शेकडोंना हद्दपार केले. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने जपानमध्ये बस्तान बसविण्याचा प्रयत्न केला, पण तिला यश न आल्याने १६२३ मध्ये त्या कंपनीने जपानमधून काढता पाय घेतला.

या काळापर्यंत जपानला परकीयांचा एवढा उपद्रव होऊ लागला की जपानचा इतर देशांशी सबंध येऊ नये, याबद्दल सत्ताधारी दक्ष राहू लागले. टोकुगवा कार-कीर्दीत (इ. स. १६०० ते १८६८) जपानचा इतर जगाशी फटकून वागण्याचा (आयसोलेशन) काळ सुरू झाला. टोकुगवा आयेसूने जपानची राजधानी इडो येथे हलवली. त्या वेळचे इडो गाव हेच आजचे जगप्रसिद्ध टोकियो शहर. टोकुगवा कार-किर्दीने जपानच्या नागरी जीवनावर दूरगामी परिणाम केला. उदाहरणार्थ, निष्ठा हा नागरिकांचा सर्वांत महत्त्वाचा गुण मानला जाऊ लागला. आजही जपानी नागरिकाची त्याच्या घराशी, व्यवसायाशी आणि राष्ट्राशी असलेली निष्ठा हा त्याचा सर्वांत महत्त्वाचा गुण मानला जातो. देवाकडे पाहावे त्याप्रमाणे नागरिकाने आपल्या वरिष्ठांकडे पाहावे अशी या वेळची पद्धत बऱ्याच प्रमाणात जपानमध्ये चालू आहे.

उदाहरणार्थ, जपानच्या सम्राटाच्या नजरेला नजर न देता नागरिकांनी व अधिकाऱ्यांनी मान लववून त्याच्यापुढे उभे राहावे अशी आजही जपानमध्ये प्रथा

आहे.

पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत सम्राटाचे छायाचित्र छापणे हेही अनादराचे लक्षण मानले जाई, ‘ टाईम ’ या विख्यात साप्ताहिकाने आपल्या मुखपृष्ठावर जपानचे सम्राट हिरो हिटो यांचे रंगीत छायाचित्र छापण्याची परवानगी मागितली, तेव्हा जपानच्या सरकारने अशा सूचना दिल्या होत्या : ‘ हे चित्र ज्या अंकावर छापून येईल त्या अंकाची घडी करू नये, गुंडाळी करू नये, तो अंक उलटा धरू नये अगर इतर कोणत्याही प्रकारे सम्राटांच्या छायाचित्राचा अनादर होईल अशा रीतीने तो अंक हाताळू नये. अशी विनंती संपादकांच्यातर्फे वाचकांना करण्यात यावी.’

जपानचे सम्राट हे राष्ट्राचेच नव्हेत, तर व्यक्तिशः प्रत्येक जपानी कुटुंबाचेही प्रमुख आहेत. ही भावना टोकुगवा शोगुनांच्या कारकीर्दीत रुजविली गेली. याचा एक परिणाम असा झाला की, जपानी सरकारने आपले धोरण अचानक बदलले, तरी ते राष्ट्रहितासाठीच असणार या खात्रीने नागरिकांनी त्याचा स्वीकार केला. टोकुगवा शोगुनांनी जपानी समाजाला स्थैर्य दिले. स्थैर्यामुळे साहित्य, संगीत, नाट्य, चित्र इत्यादी कलांनाही भरपूर वाव मिळाला. या स्थैर्यासाठी कन्फ्युशियसच्या तत्त्वज्ञानाचा फार उपयोग झाला. या कारकीर्दीत जपानने दीर्घकाळ परराष्ट्राशी किमान संपर्क ठेवला. बहुतेक परकीयांची जपानमधून हकालपट्टी झाली. डच लोकांचा त्याला अपवाद होता. त्यांना नागासाकी बंदराजवळ स्वतंत्र वसाहत करण्यास परवानगी दिली, पण त्यांच्या हालचालीवर कडक नजर ठेवण्यात आली.

मोठ्या शहरांचा विकास याच कालखंडात झाला. ओसाका आणि इडो (आताचे टोकियो) या शहरी पाच ते सात लाखांची लोकसंख्या सतराव्या शतकाच्या अखेरीस होती. या शहरात नाटक, नृत्य, साहित्य, चित्रकला यांना अमाप आश्रय मिळत गेला. पूर्वीच्या जमीनदारी उमरावांच्या ऐवजी आता धनिक, सुसंस्कृत व्यापारी वर्गाचा उदय झाला. हा वर्ग कलांचा भोक्ता होता. कबुकी या जगप्रसिद्ध जपानी नृत्यनाट्यांच्या प्रकाराचा उगम याच कालखंडात झाला. युद्ध, नृत्य, संगीत अशा प्रकारच्या सर्व आवडी असणाऱ्या सुसंस्कृत प्रेक्षकांना कबुकीची मोहिनी पडली. त्यात भाग घेणाऱ्या कलावंतांनी समाजात अतिशय लोकप्रियता मिळविली. कबुकीची नाटके दीर्घकाळ चालत. आजही सात तासांची कबुकी नाटके टोकियोच्या खास नाट्यगृहात चालतात. आणि त्यांना तुडुंब प्रेक्षकवर्ग लाभतो. पपेट थिएटर किंवा कळसूत्री बाहुल्यांचे खेळही अत्यंत लोकप्रिय झाले. जपानी चित्रकला मूळच्या चिनी धर्तीवर होती, पण हळूहळू तिच्यावर जपानी जीवनपद्धतीचा परिणाम होऊन स्वतंत्र अशी जपानी चित्रकला विकसित झाली. काव्य आणि साहित्याचे इतर प्रकारही या काळात भरभराटीला आले. टोकुगवा कारकीर्द ही अशा रीतीने

जपानच्या सांस्कृतिक बहराची पर्वणी ठरली.

टोकुगवा कारकीर्दीच्या दीर्घ शांततेच्या काळात चिनी व जपानी संस्कृतीचा जपानमध्ये विकास झाला, तसेच डचांच्या वस्तीमुळे पाश्चात्य ज्ञानही पसरले. विशेषतः पाश्चात्य वैद्यक आणि युद्धशास्त्र यांचे महत्त्व जपानला पटले. सुमारे दोनशे वर्षांच्या अलिप्ततेनंतर जपानचा पुन्हा परराष्ट्रांशी संबंध येऊ लागला. १८४६ मध्ये अमेरिकेचा कमोडोर जेम्स बिडल याने चीनबरोबर व्यापारी करार केला व जपाननेही तसाच करार करावा असे सुचविले. जपानने ही विनंती धुडकावून लावली. पण अमेरिकेने चिकाटी सोडली नाही. १८५३ मध्ये कमोडोर गॅलब्रेथ पेरी याने जपानला भेट दिली. त्यानंतर रशियन प्रतिनिधीनेही जपानी सरकारकडे व्यापारी कराराची विनंती केली. बऱ्याच विचारानंतर जपानने हिकोडारे आणि शिमोडा ही बंदरे अमेरिकन जहाजांना खुली केली.

१८५६ मध्ये अमेरिकेचा पहिला कॉन्सल जनरल म्हणून टाऊनसेन्ड हॅरिस जपानला आला. १८६९ मध्ये डच मंत्री जपानला आला. त्याने खुद्द सम्राट मेईजी याची भेट घेतली. परकीय प्रतिनिधीची जपानच्या सम्राटाने घेतलेली ही पहिलीच भेट होती. त्यापूर्वी इतर सरकारी अधिकारीच परकीय प्रतिनिधींचे स्वागत करीत असत.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जपानचा समाज मुख्यतः शेतीवर अवलंबून होता. देशातील ७५ ते ८० टक्के लोक शेतीच्या कामावर असत आणि एकंदर उत्पन्नापैकी ६५ टक्के उत्पन्न शेतीपासून मिळत असे. जपानचे दरडोई उत्पन्न त्या वेळी सुमारे ४०० रुपये एवढेच होते. शोगुनांच्या ऱ्हासाचा हा काळ होता. शोगुनांच्या सरदारांच्या अंतर्गत कलहामुळे पुन्हा सम्राटांच्या भोवती लोक गोळा होऊ लागले. तेव्हा मेईजी हे सम्राट होते.

१८६६ मध्ये चोसूविरुद्धच्या लढाईत शोगुनाच्या सैन्याचे अपरिमित नुकसान झाले. त्याच वर्षी शोगुन अयेनाचीचे निधन झाले आणि सोशिनोबु शोगुनपदी आला. दुबळ्या झालेल्या त्याच्या सैन्याला फ्रेंचांची मदत घ्यावी अशा सूचना त्याच्या सल्लागारांनी केल्या. पण तसे केल्यास विजयाची आशा तर नाहीच पण सम्राटाच्या बलिष्ठ सैन्याकडून आपले पारिपत्य होईल असे योशिनोबू यास वाटले. त्याचेशी तह करून पूर्व जपान आपल्याकडे तोडून घ्यावा असा त्याचा बेत होता. पण सम्राट मेईजीच्या लष्करी सल्लागारांनी तो हाणून पाडला. 'सत्तात्याग करा नाहीतर युद्धाला तयार व्हा' असा निर्वाणीचा संदेश त्यांनी शोगुनाला पाठवला. तेव्हा सत्तात्यागाशिवाय शोगुनाला गत्यंतर राहिले नाही. सात नोव्हेंबर १८६७ रोजी पंधरावा आणि शेवटचा शोगुन रोशिनोबा टोकुगवा याने क्योटो येथे दरबार भरवून सत्तात्यागाची अधिकृत घोषणा केली. त्या आधीच परकीय राज्य प्रतिनिधी

शोगुनांना डावलून थेट सम्राटांच्याकडे व्यवहार करीत असत. पण शोगुनांनी सत्तात्याग केल्यानंतर त्यांचे तांत्रिक महत्त्वही उरले नाही.

मेईजींची कारकीर्द हा जपानच्या इतिहासातील उत्कर्षाचा काळ आहे. या काळात जपानने पाश्चात्यांच्या अनेक आधुनिक तंत्रांचा स्वीकार करून मुख्यतः शेतीप्रधान असलेल्या जपानमध्ये यंत्रयुगाचा पाया घातला. कष्टाळूपणा आणि निष्ठा हे आवश्यक गुण जपानमध्ये आधीच खोलवर रुजले होते. मेईजी यांच्या कारकीर्दीत (१८६८ ते १९१२) या गुणांचा नव्या यंत्रयुगासाठी उत्कृष्ट उपयोग करून घेऊन आजच्या उन्नत जपानची मुहूर्तमेढच रोवली गेली. सम्राट मेईजी यांनी क्योटोहून राजधानी इडो (टोकियो) येथे हलविली. टोकियो म्हणजे पूर्वेकडची राजधानी. त्या वेळी पश्चिमेकडून पूर्वेला राजधानी हलवली गेली म्हणून पडलेले हे नाव नंतर कायम झाले.

मेईजी सिंहासनावर आले तेव्हा त्यांचे वय फक्त पंधरा वर्षांचे होते. पण त्यांचे सेनानी आणि सल्लागार हे अतिशय कर्तबगार होते. त्यांच्यामुळे चीन आणि रशिया अशा जबरदस्त राष्ट्रांचा जपानसारख्या चिमुकल्या देशाने पराभव केला. आणि पूर्वेकडील हे छोटे राष्ट्र एक जागतिक अधिसत्ता म्हणून मान्यता पावले. टोकुगवा शोगुनांच्यापेक्षा मेईजी हे अधिक उदारमतवादी होते. ते स्वतः जनतेत क्वचितच मिसळत. जपानी सम्राटांची ती पद्धतच होती. पण त्यांनी लोकांना अधिकाधिक अधिकार देऊन राज्यकारभारात सामील करून घेतले. घटनात्मक राज्यकारभार व औद्योगीकरण हे पाश्चात्य राष्ट्रांचे सामर्थ्य आहे याची जाणीव मेईजींच्या सल्लागारांना होती. 'रिच कंट्री, स्ट्राँग आर्म्स' (संपन्नता आणि सामर्थ्य) या घोषणा त्यांनी राष्ट्राला दिल्या. पाश्चात्य राष्ट्रांना भेटी देऊन त्यांचे जीवन व राज्यकारभार स्वतः पाहण्यासाठी जपानने शिष्टमंडळे युरोप व अमेरिकेला पाठविली. राजघराण्यातील इवाकुरा यांच्या नेतृत्वाखाली जपानने पहिले शिष्टमंडळ याकोहामा बंदरातून १८७१ मध्ये अमेरिकेकडे रवाना केले. अमेरिकेने त्यांना 'अम्बॅसडर एक्स्ट्रॉऑर्डिनरी' हा किताब दिला.

औद्योगीकरणापासून आणि परराष्ट्रांपासून दोनशे वर्षे दूर राहिलेल्या जपानने अशा रीतीने राजघराण्याची प्रतिष्ठा इरेला घालून परराष्ट्राशी संबंध दृढ करण्यास झपाट्याने पावले टाकली. मेईजी कारकीर्दीच्या सुरुवातीस जपानमधील चलनवाढीस विलक्षण जोर आल्याने आर्थिक क्षेत्रातही तातडीची व कडक उपाय-योजना करून चलनफुगवटा रोखला गेला.

टोकियो आणि याकोहोमा यांच्या दरम्यान १८७२ मध्ये जपानमधील पहिली रेल्वे सुरू झाली. आज रेल्वेवाहतुकीत जपान जगात पहिल्या क्रमांकावर आहे. जपानमध्ये तार व टपाल पद्धत याच कारकीर्दीत स्थापन करण्यात आली. वृत्त-

पत्रांना नाममात्र टपालखर्च आकारण्यात येऊन वृत्तपत्रांकडे पाठविण्यात येणारे लेख तर मोफत टपालाने पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. ज्ञानाच्या प्रसारासाठी विद्यापीठांची स्थापना झाली. जपानी भाषेतील किचकटपणा कमी करून ती सुटसुटीत आणि वापरात सुलभ करण्यात आली. १८७० मध्येही जपानमधील साक्षरतेचे प्रमाण ४० टक्के होते ही विशेष कौतुकाची गोष्ट आहे.

देशात एकच वजन व मापे करण्यात येऊन व्यपारातील गोंधळ कमी करण्यात आला. जमिनीचे मोजमाप आधुनिक पद्धतीने करण्यात आले आणि जमीन सारा आकारण्याची सरंजामशाही पद्धत बदलण्यात आली. १८९६ मध्ये बँक ऑफ टोकियोची स्थापना करण्यात येऊन देशाला आर्थिक स्थैर्य व भरभराट देण्याची व्यवस्था करण्यात आली. ईशीशिबुसवा या जपानी उद्योगपतीने युरोपला भेट देऊन तेथील उद्योगधंद्यांची बारकाईने पाहणी केली आणि त्याने जपानमध्ये पाश्चात्यांच्या धर्तीवरचे उद्योगधंदे सुरू केले.

शेतीमालाला आधुनिक पद्धतीच्या बाजारपेठा उत्पन्न करून देऊन सरकारने शेतकऱ्यांनाही देशाच्या भरभराटीत सामील करून घेतले. नव्या कारखान्यांना लागणारे कामगार शेतमजुरांतून येऊ लागले. साहजिकच शेतीसाठी शेतमजुरांऐवजी यंत्राकडून कामे करून घेण्यावर भर दिला जाऊ लागला. त्यामुळे १८६२ नंतरच्या पन्नास वर्षांत सबंध जपानचा चेहरामोहरा बदलून ते जगातील एक गतिमान राष्ट्र बनले.

पाश्चात्य घटनात्मक राजकारणाचे अनुकरण मेईजी कारकीर्दीतच झाले. लिबरल पार्टी या नावाचा राजकीय पक्ष १८७३ मध्ये स्थापन झाला आणि १८८२ मध्ये प्रोग्रेसिव्ह पार्टी नावाचा पक्ष निघाला. इटागाक्ती यांच्या नेतृत्वाखालील लिबरल पक्षाला ग्रामीण भागात मोठा पाठिंबा होता तर ओकुमा शिगेनोबु यांच्या प्रोग्रेसिव्ह पक्षाचा मुख्य भर शहरी जनतेवर होता. या सुमारास जपानची आर्थिक स्थिती फारशी समाधानकारक नव्हती. त्यामुळे सरकारविरुद्ध जनतेत असंतोष फैलावणे या नव्या पक्षांना सहज शक्य झाले. त्या प्रचाराला उत्तर म्हणून मेईजी सरकारने मंत्रिमंडळाची पद्धत स्वीकारली आणि १८८८ मध्ये खास दरबार भरवून देशाला राज्यघटना दिल्याचे जाहीर केले.

राज्यघटनेनुसार वरिष्ठ सभागृह सरदार उमरावांचे व कनिष्ठ सभागृह जनतेतून निवडून आलेल्या प्रतिनिधींचे असावे असे ठरविण्यात आले. इंग्लंडच्या व जर्मनीच्या घटनांवर आधारित अशी ही राज्यघटना होती. या पार्लमेंटला डिएट असे नाव होते तेच अजून चालू आहे. लोकशाही हक्काबद्दलच्या असंतोषाने विशेष उग्र स्वरूप धारण करण्यापूर्वीच मेईजी सरकारने लोकांना हक्क बहाल करून

स्वत:ची इभ्रत वाढवलीच, पण लोकांना सम्राटाबद्दल वाटणाऱ्या मूळच्या नितांत प्रेमात भरच पडली. आतापर्यंत पाश्चात्य राष्ट्रे जपानशी व्यापारी करार करीत असत पण जपानमध्य लोकशाही नसल्याने पाश्चात्य राष्ट्रांकडून जपानला समानतेची वागणूक मिळत नसे. पण सम्राट मेईजींनी आपणहोऊन पार्लमेंटची स्थापन केल्यामुळे पाश्चात्य देशात जपानची प्रतिमा खूपच उंचावली. त्यांच्या कारकीर्दीत जपानने दोन बडया राष्ट्रांचा पाडाव केला, या घटनेचा खास उल्लेख केला पाहिजे. ही राष्ट्रे म्हणजे चीन व रशिया.

पॅसिफिक महासागरात जपानच्या जवळपासच्या अनेक बेटांवर आणि भूप्रदेशाबद्दल चीनची भूमिका संरक्षक बडया सत्तेची होती. फोर्मोसा, रुकुयु अशा बेटांचे राजे चीनला खंडणी देत असत. रुकुयुच्या राजांचे पूर्वज जपानी असल्याने ते राजे जपानलाही खंडणी देत. १८७१ मध्ये रुकुयूचे काही खलाशी वादळामुळे फॉर्मोसाला लागले, पण तेथील आदिवासींनी त्या खलाशांना मारून टाकले. त्यावर रुकुयाच्या राजांनी चीनकडे संरक्षक राष्ट्र म्हणून मदत मागितली. पण चीनने ती नाकारली. जपानने मात्र आपली जहाजे फोर्मोसाला पाठवून रुकुयाला मदत केली. तेव्हा रुकुयाच्या राजाने जपानला येऊन सम्राटांचा उमराव हा किताब स्वीकारला. त्या पाठोपाठ जपानने कोरियाशी तह करून समान भूमिकेवर व्यापारी व्यवहार सुरू केले.

चीनचे कोरियावर नियंत्रण होते. आणि जपानला कोरियाचा ९० टक्के व्यापार जाऊ लागताच चीनचा जळफळाट झाला. कोरियाचा एक नेता चीनमध्ये शांघायला गेला असता तेथे २९ मार्च १८९४ रोजी त्याची दया झाली. त्यामुळे चीनविरुद्ध कोरियात असंतोष माजला, तेव्हा चीनने आपले सैन्य पाठविले आणि कोरिया हा आपला मांडलिक देश आहे अस खलिता जपानला पाठवला. हा दावा जपनाला मान्य नसल्याने जपाननेही आपले सैन्य कोरियाला पाठविले. जुलैमध्ये दोन राष्ट्रांचे प्रचंड युद्ध झाले. चीनचे नौदल आणि लष्कर जपानच्या उभय दलापेक्षा सहा पटीने मोठे असूनही जपानने या लढाईत विजय मिळविला आणि कोरिया हा चीनपासून स्वतंत्र असल्याचे जाहीर केले. चीनने पराभव पत्करून तह केला. या तहामुळे जपानला दीडकोटी डॉलर्सची खंडणी, अनेक बेटे आणि व्यापारी सवलती चीनकडून मिळाल्या.

कोरियावर जपानचे वर्चस्व बसावे हे रशियाला नापसंत होते. ब्रिटिशांनी जपानबरोबर करार करून जपानचे श्रेष्ठत्व मान्य केले होते, हेही रशियाला खटकत होते. जपानसारख्या छोटया देशाने हातपाय पसरून आपल्या महत्त्वाकांक्षांच्या आड यावे हे रशियाला अर्थातच रुचणारे नव्हते. उलट, रशियाने मांचुरियावर वर्चस्व गाजवून कोरियात ढवळाढवळ करावी याला जपानचा विरोध होता. जपान

व ब्रिटनच्या दडपणामुळ रशियाने मांचुरियातील सैन्य काढून घेण्याचे मान्य केले, पण तो शब्द पाळला नाही. तेव्हा जपानने १० फेब्रुवारी १९०४ रोजी रशियाविरुद्ध युद्ध पुकारले. हे युद्ध वर्षभर चालले.

वास्तविक रशिया हे जपानपेक्षा अनेक पटींनी मोठे राष्ट्र, पण त्याच्या राजधानीपासून शेकडो मैल दूर मांचुरियात ही लढाई चाललेली. तेथे सैन्य पाठवण्यात एकच लहानसा आणि दीर्घ काळ घेणारा मार्ग होता. नौदलासाठीही केप ऑफ गुडहोपला वळसा घालून जावे लागे. उलट, जपानला मांचुरिया ही युद्धभूमी आणि सागर जवळ होते. वर्षभराच्या लढाईने दोन्ही राष्ट्रांचे नुकसान झाले तरी जपानचे पारडे जड होते. आणि अमेरिकेच्या मदतीने सप्टेंबर १९०५ मध्ये झालेल्या कराराने रशियाने जपानचे कोरियातील वर्चस्व मान्य केले. मांचुरियातून रशियन सैन्य मागे घेण्यास मान्यता दिली आणि रशियाने जपानला अनेक बेटांवर व्यापारी सवलती दिल्या. जपानने ज्या तत्त्वासाठी लढाई पुकारली, ती तत्त्वे रशियाला मान्य करावी लागली.

जपानने रशियासारख्या जागतिक महत्त्वाच्या शक्तीला नमविल्यामुळे जपानची इभ्रत सर्वत्र वाढली. ज्या चीनवर जपान सांस्कृतिक व राजकीय बाबतीत हजारो वर्षे अवलंबून होता, त्या चीनवरच आता जपानचा प्रभाव पडू लागला. या दोन युद्धांमुळे सम्राट मेईजींच्या कारकीर्दीत जपानची कीर्ती एक बलाढ्य राष्ट्र म्हणून पसरली.

मात्र या विजयानंतर तहाचे श्रेय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांना मिळाले ही गोष्ट जपानच्या बहुसंख्य जनतेला पसंत पडली नाही. या युद्धाचे प्रमुख सरसेनानी जनरल कत्सुरा यांना आपले स्थान गमवावे लागले. अमेरिकन मालावर बहिष्कार घालण्याची लाट जपानमध्ये उसळली. तरीपण जपान पराभूत न होता विजयी झाला, ही घटना जपानमध्ये अभिमानाची मानली गेलीच. परदेशातही ब्रिटनने लगेच जपानबरोबर नवा दहा वर्षांचा करार करून जपानला पाश्चात्य राष्ट्रांबरोबर समान स्थान दिले. कारण रशियाच्या वाढत्या प्रभावाला जपानने पायबंद घातला होता आणि याच कामासाठी भविष्यकाळातही जपानचा आपल्याला उपयोग होईल हे धूर्त ब्रिटिश मुत्सद्द्यांनी ओळखले होते. चीननेही जपानबरोबर तह करून आणखी सोळा बंदरात व्यापाराच्या सवलती दिल्या. या लढाईनंतर पाच वर्षांतच जपानने कोरियावर अंमल बसवला आणि जपानचे आंतरराष्ट्रीय महत्त्व अधिकच वाढले.

जपानसारखे छोटे राष्ट्र आपला पराभव करू शकते याचाच अर्थ रशियाच्या लष्करी व राजकीय पद्धतीत मोठा दोष असला पाहिजे. हा असंतोष रशियात धुमसू लागून त्याची एक परिणती म्हणजे १९०५ मधील रशियन क्रांती. झारला

तीमुळे लोकांना प्रतिनिधित्व द्यावे लागले. आणि आगामी रशियन क्रांतीचा त्याच वेळी पाया घातला गेला. युरोपियनांच्या वर्चस्वाच्या कल्पनांना धक्का बसला. भारतातही याच वेळी बंगालच्या फाळणीची घोषणा झाली आणि जपानप्रमाणे लहान आशियायी राष्ट्र युरोपियन बलाढ्य राष्ट्राचा पराभव करू शकते हे सत्य समोर दिसल्याने भारतातही ब्रिटिशांच्या विरुद्ध लढ्याला अधिकच स्फूर्ती मिळाली. जपानचा रशियाविरुद्धचा विजय ही अशा रीतीने जागतिक महत्त्वाची घटना होती.

३

# पाश्चात्यांच्या वर्चस्वाला जपानचा शह

पाश्चात्यांच्या वर्चस्वाला जपानने धक्का दिला. इंग्लंड, अमेरिका यासारखी बलाढ्य राष्ट्रे आपणहोऊन जपानसारख्या लहान पौर्वात्य राष्ट्राशी करार करतात याचा भारतावर असा परिणाम झाला की गोरा माणूस अजिंक्य आहे किंवा कृष्णवर्णीयपेक्षा गुणांनी व सामर्थ्याने वरचढ आहे ही कल्पना कालबाह्य ठरली.

१९०५ च्या युद्धातून जपान काहीसा स्थिरावत असतानाच २८ जून १९१४ रोजी ऑस्ट्रियाच्या भावी राजाचा खून झाला व त्याचा परिणाम म्हणून थोड्याच दिवसांत युद्धाचा भडका उडाला. सर्बियाने हा खून घडवून आणला म्हणून ऑस्ट्रियाचा दोस्त जर्मनीने त्यांची कड घेऊन सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले. त्यात जर्मनीने बेल्जियमचे स्वातंत्र्य पायदळी तुडवले म्हणून इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. वास्तविक, युरोपमधील हे युद्ध पूर्वेत जपानपर्यंत पसरण्याचे तसे थेट व सरळ कारण नव्हते. पण जर्मनीला सर्व बाजूंनी सतावण्याचे ठरवून इंग्लंडने पूर्वीच्या कराराची आठवण करून देऊन जपानने पूर्वेत जर्मनीविरुद्ध शस्त्र उचलावे असे सुचवले. किऑशाऊ प्रदेश फार पूर्वी जपानने जर्मनीच्या ताब्यात दिला होता. तो परत घेण्यासाठी या संधीचा उपयोग करून घेता येईल या विचाराने जपानने जर्मनीला निर्वाणीचा खलिता पाठवून हा भाग खाली करण्याची मागणी केली. ही मागणी जर्मनीने धुडकावून लावली, तेव्हा २३ ऑगस्ट १९१४ रोजी जपानने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.

चीनच्या तटस्थतेला न जुमानता जपानने चीनच्या हद्दीतून किऑशाऊ भागात आपले सैन्य पाठवले. चीनने अमेरिकेकडे सहाय्याची याचना केली पण 'इतक्या दूरवरच्या युद्धात अमेरिका स्वतःला गुंतवू इच्छित नाही' असे अमेरिकेने चीनला स्पष्टपणे कळविले. जपानच्या लष्कर आणि नौदल यांनी जर्मनीच्या तुटपुंज्या

संरक्षण व्यवस्थेचा धुव्वा उडविला. जपानने चीन, रशियानंतर आता जर्मनीवर विजय मिळवून आपले नाव आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अधिकच उजळ केले. या वेळी काउंट ओकुमा हे जपानचे पंतप्रधान होते.

या काळात चीन इतका दुबळा झाला होता की १९१५ मध्ये जपानने चीन-कडे आक्रमक अशा एकवीस मागण्यांचा खलिता पाठवला. चीनच्या काही भागावर जपानची हुकमत असावी, पोर्ट आर्थर व डेरियमबद्दलचा मूळ करार आणखी पंचवीस वर्षांच्या मुदतीने वाढवावा, पूर्वी जर्मनीच्या ताब्यात असलेला प्रदेश जपानच्या नियंत्रणाखाली असावा अशा या मागण्या होत्या. पण चीनला सर्वात अपमानास्पद वाटणारी मागणी अशी होती की चीनने आपले राजकीय, लष्करी आणि अर्थविषयक सल्लागार म्हणून जपानी तज्ज्ञ नेमावेत. या मागण्या मान्य करणे म्हणजे आपले स्वातंत्र्य गमावून जपानचे मांडलीक म्हणून जिणे कंठणेच होय अशी यावर चीनची प्रतिक्रिया झाली.

या मागण्या गुप्त होत्या. या वेळी युवान शिकाई चीनचे राष्ट्राध्यक्ष होते. जपानच्या या मागण्या म्हणजे त्यांच्यापुढे अत्यंत मोठा पेचप्रसंग होता. जवळची राष्ट्रे निरुपयोगी होती, अमेरिकेसारखी लांबची राष्ट्रे मदत देण्यासाठी उत्सुक नव्हती आणि स्वतःचे राष्ट्र तर दुबळे. अशा परिस्थितीत अप्रिय काम जास्तीत जास्त लांब ढकलणे एवढेच चीनला शक्य होते. राष्ट्राध्यक्षांनी या गुप्त मागण्यां-पैकी काही अपमानास्पद मागण्या चीनच्या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होतील अशी व्यवस्था केली आणि ही सरकारी रहस्ये फुटली असे मानभावी निवेदनही केले. या मागण्या प्रसिद्ध झाल्याबरोबर चीनभर संतापाची लाट पसरली. चीनचा डाव जपानने तत्काळ ओळखला आणि सत्तावीस तासांत मागण्यांविषयी बोलणी केली नाहीत तर शक्ती वापरावी लागेल असा निर्वाणीचा खलिता पाठवला. त्याचा परिणाम होऊन चीनने शान्टुंग भागावर जपानचे नियंत्रण मान्य केले, दक्षिण मांचुरियात जपानला सवलती दिल्या. फोर्मोसाच्या समोर फुकीन येथील रेल्वे विस्ताराबद्दल जपानशी सल्लामसलत करण्याचे मान्य केले. जपानला हवे ते सर्व मिळाले नाही, पण चीनला भीती होती तेवढे चीनला गमवावे लागले नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे चीनने अमेरिकेचा धावा केल्याने अमेरिकेने असे पत्रक काढले की चीन व जपानमध्ये होणाऱ्या करारातील जी कलमे व तरतुदी अमेरिकेच्या हिताला बाधक असतील ती अमेरिका मानणार नाही. राष्ट्राध्यक्षांनी करारास मान्यता देऊनही चीनच्या लोकसभेने हा करार संमत करण्यास स्वतः नकार देऊन नवाच पेचप्रसंग निर्माण केला.

राजकीय व लष्करी आघाडीवर या घडामोडी होत असतानाच जपानच्या अंतर्गत परिस्थितीत झपाट्याने बदल होत होता. लोकसंख्या द्रुत गतीने वाढत होती.

शेतीवर काम करणारे हजारो जपानी आता लढाईवर गेले होते. परिणामी जपानला अन्नधान्याची आयात करावी लागली. त्यासाठी औद्योगिक उत्पादन वाढवावे लागले. कारण आजुबाजूच्या अप्रगत राष्ट्रातून अन्नधान्य घ्यायचे तर त्याबदली त्यांना देण्यासाठी औद्योगिक उत्पादनाचा माल तयार पाहिजे.

नवे लोहमार्ग टाकले जात असल्याने जपानने आपले पोलादाचे उत्पादन वाढवले. आसपासच्या कमी विकसित राष्ट्रांतून कापडाची मोठी मागणी असल्याने कापडाच्या उत्पादनावर भर दिला. सर्वत्र जपानी मालाला तुफान मागणी होती. एकीकडे स्वत: आक्रमक व साम्राज्यशाही वाढीचे धोरण स्वीकारीत असताच जपानने इतर राष्ट्रांकडून तयार मालाला येणाऱ्या मागण्यांचा भरपूर लाभ उठवून आपली आर्थिक स्थिती बळकट केली. जपान ज्या प्रकारच्या लढाईत प्रत्यक्ष गुंतला होता, त्यात त्याची फारशी हानी झाली नाही. जपानला युद्धाचे फायदे मिळाले, पण तोटे सहन करावे लागले नाहीत.

१९१७ च्या सुरुवातीला अमेरिकेने जर्मनीशी आपले राजनैतिक संबंध तोडले आणि चीननेही तसे करावे असे दडपण चीनवर आणले. आपली अधिसत्ता वाढविण्याची उत्तम संधी आहे हे जाणून जपानने शान्टुंग व पॅसिफिक महासागरातील जर्मन बेटे यावर आपला ताबा असावा या मागणीला फ्रान्स व इंग्लंडकडून गुप्त पाठिंबा मिळविला. इतकेच नव्हे, तर अमेरिकेशीही करार करून चीनच्या बाजूने अमेरिका आपल्या विरुद्ध जाणार नाही अशी तरतूद जपानने केली.

१९१९ मध्ये भरलेल्या शांतता परिषदेने जपान ही आशियातील सर्वात महत्त्वाची अधिसत्ता असल्याचे मान्य केले. वांशिक समानतेचे तत्त्व सर्व राष्ट्रांना लागू करावे ही जपानची मागणी शांतता परिषदेने मान्य केली. पाश्चात्य राष्ट्रे व गौरवर्णीय लोक इतरांपेक्षा श्रेष्ठ आहेत असा जो दबदबा पूर्वी जगात सर्वच राष्ट्रांत होता, तो जपानची ही मागणी मान्य झाल्याने नाहीसा झाला. जपानला शांतता परिषद व लीग ऑफ नेशन्सद्वारा शान्टुंग व जर्मन बेटे या विभागात विशेष सवलती मिळाल्या. अतिपूर्वेकडील व्यापारावर जपानची पकड बसली. पहिल्या महायुद्धात जपानने युद्धाची प्रचंड तयारी केली. पण त्यापैकी फारच थोडी जपानला प्रत्यक्षात वापरावी लागली. उरलेला मोठा शस्त्रसाठा गरजू राष्ट्रांना विकून जपानने अमाप पैसा केला. १९१८ मध्ये हॅरा ताकाशी हे जपानचे पंतप्रधान झाले. सर्वसामान्य नागरिकांतून आलेले ते जपानचे पहिले पंतप्रधान होते. यापूर्वीचे पंतप्रधान सरदार–उमरावांच्या खानदानी घराण्यातील होते.

हॅरा ताकाशी हे सीयुआकी पक्षाचे नेते होते. व्यावसायिक, राजकीय नेत्यांच्या पिढीचा हा प्रारंभ होता. इंग्लड, अमेरिकेप्रमाणे आता जपानच्या डिएट किंवा संसदेत राजकीय नेत्यांबरोबरच उद्योग व व्यापार यांचे प्रतिनिधीही दिसू लागले.

युद्ध भागात जपानने केलेल्या अफाट आर्थिक प्रगतीमुळे एक महत्त्वाची गोष्ट जपानी नेत्यांच्या मनावर बिंबली. ती अशी की लष्कर व नौदल दूरवर पाठवून खर्चिक युद्धे करण्यापेक्षा परकीय बाजारपेठांचा कबजा घेणे कमी त्रासाचे आणि अधिक फायद्याचे आहे. या तत्त्वाचा पाठपुरावा करण्यासाठी युद्धोत्तर काळात जपानने अवाढव्य कारखाने आणि जागतिक व्यापार यांच्यावर भर दिला. पहिल्या महायुद्धाचे जपानच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने सर्वांत मोठे फलित हे, की, लीग नेशन्सच्या अत्युच्च कौन्सिलचा सभासद म्हणून जपानला स्वीकृत करून घेण्यात आले. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स व इटली या जागतिक महासत्तांच्या बरोबरीचे स्थान जपान या एकमेव पौर्वात्य देशाला मिळाले. जपानचा हा अत्युच्च विजय होता. आतापर्यंत जागतिक राजकारणाची सूत्रे सर्वस्वी पाश्चात्य देशांकडे होती. त्यात एकमेव पौर्वात्य देशाचा शिरकाव झाला.

राजकीय क्षेत्रात अशी घोडदौड करीत असतानाच जपानने अंतर्गत कारभारातही अनेक नवे उपक्रम सुरू केले. जपान सरकारने स्वतःचे उद्योगधंदे सुरू केले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जपान सरकारने काढलेले अनेक कारखाने पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत उत्कृष्ट भरभराटीला आले होते. खासगी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी सरकारने अनेक कल्पक उद्योगपतींना बिनव्याजी कर्जे दिली.

रेल्वे कंपनी स्थापन झाली, तेव्हा सरकारने नव्या उद्योगाला उत्तेजन म्हणून रेल्वेला अनेक कर माफ केले. रेल्वेला फायदा होवो न होवो, पण भागधारकांना किमान आठ टक्के डिव्हिडंड मिळेल अशी त्यामुळे रेल्वेने ग्वाही दिली. कोटयवधी डॉलर्सचे खासगी भांडवलही या घोषणेमुळे रेल्वेच्या विकासासाठी मिळाले. पोलाद, सिमेंट, सूत, वूलनचे कापड, काचसामान अशा अनेक क्षेत्रांत जपानमध्ये सरकारी व खासगी अशा दोन्ही क्षेत्रांत उत्पादन जोमाने सुरू झाले. एकेकाळी जपानी माल म्हणजे तकलुपी व बिनभरवशाचा असा समज होता, पण पहिल्या महायुद्धानंतर जपानने ही समजूत साफ खोटी ठरवली. उत्कृष्ट उत्पादन अत्यंत स्वस्त दरात देऊन जपानने अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राशी स्पर्धा सुरू केली. शेतीप्रधान देशापासून जपानने उद्योगप्रधान देशाकडे कशी प्रगती केली हे पुढील आकडेवारीवरून दिसते : १८७३ ते १८८० पर्यंतच्या काळात जपानच्या एकंदर उत्पन्नापैकी ७२ टक्के उत्पन्न शेतीचे होते. १८८१ ते १९०० पर्यंतच्या काळात ते ६० टक्के झाले. १९१५ ते १९२० या काळात जपानचे शेतीपासूनचे उत्पन्न फक्त वीस टक्क्यांवर आले.

या क्रांतिकारक बदलाचे श्रेय जपान सरकारच्या दूरदृष्टीला आहे, तसेच जपानमधील खासगी उद्योजकांनाही आहे. उदाहरणार्थ, टोशिमिची ओकुबु हे

उद्योगपती युरोपला गेले होते, तेव्हा पाश्चात्य देश आणि पौर्वात्य देश यांच्या राहणीमानातील प्रचंड फरक पाहून थक्क झाले. औद्योगीकरण ही पाश्चात्य राष्ट्रांच्या यशाची गुरुकिल्ली आहे हे त्यांनी ओळखले. आपले सर्व जीवन जपान-मधील उद्योगधंद्यांच्या विकासार्थ त्यांनी वाहिले. त्यांनी अनेक पाश्चात्य तज्ज्ञांना जपानमध्ये आणून त्यांच्या तंत्रविषयक ज्ञानाचा देशाला लाभ करून दिला. याच सुमारास सरकार आणि खासगी उद्योगपती यांच्या उत्तेजनाने शेकडो जपानी विद्यार्थी पाश्चात्य देशात उच्च शिक्षणासाठी जाऊ लागले. तेथे शिक्षण घेऊन त्यांनी आपल्या देशात परतल्यावर पाश्चात्य तंत्रज्ञान आणि उद्योगविषयक दृष्टि-कोन यांचा प्रसार केला.

पहिल्या महायुद्धानंतर जपानमध्ये आमूलाग्र बदल झाला. शेतीप्रधान देशाचा उद्योगप्रधान देश झाला. पूर्वी आरामाने आपल्या सोईसवडीने शेतावर जाणारा जपानी माणूस घड्याळाच्या ठोक्यानुसार कारखान्यात जायला लागला. त्याची जीवनपद्धती नव्या यंत्रयुगाला साजेशी बदलावी लागली.

हा बदल पन्नास-पाऊणशे वर्षांत हळूहळू झाला असता तर तो सहज पचनी पडला असता. पण औद्योगीकरण इतक्या झपाट्याने सर्वत्र पसरले की जपानमध्ये मूल्यांचा पेचप्रसंग निर्माण झाला. जुनी मूल्ये जिव्हाळ्याने जपणाऱ्या जपानी माणसाला नव्या मूल्यांशी अल्पावधीत मिळतेजुळते घेणे सोपे गेले नाही. पाश्चात्य देशातील नैतिक रूढींचे अनुकरण जपानमध्ये होऊ नये यासाठी विचारवंत जपत असत. या पेचप्रसंगातून तोड काढण्यासाठी समाजधुरिणांनी 'पौर्वात्य नैतिक मूल्ये आणि पाश्चात्य उद्योगधंदे' ही नवी घोषणा दिली. आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान न सोडता पाश्चात्य तंत्रशास्त्र व ज्ञान स्वीकारावे यावर भर देण्यात आला. अजूनही जपानमध्ये याच समन्वयाचा प्रभाव आहे. अत्यंत अद्ययावत, यांत्रिकी माणसांच्या साहाय्याने, कारखाने चालविणारा जपानी उद्योगपती आजही घरी आल्याबरोबर पाश्चात्य सूट-बूट नेकटाय काढून ठेवतो, जपानी पारंपरिक कपडे घालतो, घरात सपाता घालतो आणि जमिनीवर बसून छोट्या टेबलावर जेवतो. त्याच्या घरात रंगीत टीव्ही, व्हिडिओ, स्टीरिओ वगैरे सर्व अद्ययावत साधने असतातच, पण देव-घरात बुद्धमूर्तीबरोबरच तो आपले आजोबा व आजी यांच्या छायाचित्रांची देवा-सारखी पूजाही करतो.

पाश्चात्य आणि पौर्वात्य ज्ञान व मूल्ये यांचा उत्कृष्ट संगम हे जपानचे खरे बळ आहे. जपान, थायलंड, भारत, सिलोन इत्यादी देशांतील जनतेच्या जीवनावर धर्माचा फार खोल परिणाम झाला आहे. जपानमध्ये सम्राटांच्यापासून अगदी सामान्य माणसापर्यंत सर्वजण धर्माच्या समान बंधनांनी एकत्र आले आहेत. ही जपानची फार मोठी शक्ती आहे. जपान हा एक धर्म व एक भाषा यांनी एकत्र

आलेला खंबीर देश आहे. या बळकट पायावर जपानची राष्ट्रीयता विकास पावली आहे.

मात्र पहिल्या महायुद्धापूर्वीची जपानमधील राष्ट्रीयता आणि त्यानंतरची राष्ट्रीयता यात खूपच फरक आहे. पूर्वीच्या राष्ट्रीयतेचा उगम सम्राटां-विषयीच्या राजनिष्ठेतून झाला होता. युद्धोत्तर काळातही जपानमध्ये प्रखर राष्ट्रीयता होती. पण ती सम्राटनिष्ठ किंवा व्यक्तिनिष्ठ नसून राष्ट्रनिष्ठ होती. याचे प्रमुख कारण म्हणजे युद्धामुळे एकत्र आलेल्या जनतेला आपण सम्राट या व्यक्तीसाठी लढत नसून जपान या राष्ट्रासाठी आपल्या व आपल्या वंशजांच्या भवितव्यासाठी लढत आहोत ही तीव्र जाणीव होती.

चीनसारख्या बलाढ्य व अवाढव्य देशाजवळ असूनही जपानने फार प्राचीन काळापासून आपले व्यक्तिमत्त्व स्वतंत्र ठेवले होते. चिनी भाषेतून निघूनही जपानने आपली भाषा वेगळी ठेवली. चिनी संस्कृतीतून भरपूर उसनवारी करूनही जपानने आपली वेगळी संस्कृती जोपासली. शिन्टो धर्म व सामुराई योद्धे यांनी जपानी लोकांत स्थिर स्वभावाबरोबरच लढाऊपणाही कायम ठेवला. सम्राटांच्याविषयी सामुराई योद्धयांना वाटणारी निष्ठा ही भक्तीचे रूप घेऊनच अस्तित्वात होती. ही आत्यंतिक निष्ठा सामुराई सरदारांच्या अनुयायांतही दृढ झाली. सामाजिक जीवनात इतरांच्या भावनांची कदर करणे हा जपानी संस्कृतीचा स्थायिभाव झाला व अजूनही तो तसाच दृढ आहे. आपली प्रतिमा स्वच्छ व उजळ असावी असे प्रत्येक जपानी माणसाला वाटते. राष्ट्रभक्ती व राष्ट्राभिमान हे गुण जपानमध्ये शिगेस पोहोचले आहेत.

सम्राट मेईजी यांनी १८९० मध्ये जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले होते, “ आमच्या प्रजेला एकनिष्ठतेच्या सौंदर्याचा साक्षात्कार झाला आहे. जनतेची ही एकनिष्ठता हा आमच्या साम्राज्याचा चिरेबंदी पाया आहे. कोणत्याही बिकट प्रसंगी आमची जनता देशासाठी प्राण देण्यासाठी सज्ज आहे याबद्दल आमची खात्री आहे. सम्राटांच्या या भाषणाच्या ठळक अक्षरांतील प्रती शाळेतूनही लावण्यात आल्या होत्या. देशप्रेमावर जपानमध्ये बालवर्गापासूनच भर देण्यात येतो.

पॅरिस येथील शांतता परिषदेत जपानने वांशिक समानतेची मागणी मान्य करून घेतली. तसेच ‘ आशिया खंड आशियाई लोकांसाठीच ’ या नव्या घोषणेने साम्राज्यवाद्यांना उघड आव्हान दिले. या घोषणेमुळे भारत, ब्रह्मदेश, सिलोन अशा त्या वेळी पारतंत्र्यात असलेल्या अनेक देशांतील स्वातंत्र्यप्रेमी जनतेला नवा उत्साह मिळाला. जपानने पॅसिफिक महासागरातून जर्मनीला हाकलून लावले याचा आशियाई राष्ट्र म्हणून या राष्ट्रांना सार्थ अभिमान वाटू लागला.

योद्धा असणे ही जपानमध्ये फार पूर्वीपासून अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती.

सहाव्या शतकापासूनच जपानला वन्य जमाती आणि टोळ्या यांच्याबरोबर लढाया करून स्वातंत्र्य व अस्तित्व टिकवावे लागले होते. शोगुनांसारखे राजकीय क्षेत्रातील प्रमुखही उत्कृष्ट योद्धे होते. सामुराईची परंपरा राष्ट्राला युद्धसज्ज करण्यासाठी उपयोगी पडत होती. युद्धातील नैपुण्यामुळेच जपानने चीन, रशिया, जर्मनी अशा बलाढ्य राष्ट्रांना नमविले होते आणि जागतिक प्रतिष्ठा मिळविली होती. ज्युडो आणि कराटे या क्षेत्रातही लष्करी कलांचीच पूजा होत होती. या विविध कारणां-मुळे जपानमध्ये १९२० नंतरच्या दोन तपांत युद्धातील प्रावीण्याला अत्यंत महत्त्व आले. इंग्लंड-अमेरिकेतही सैन्याला महत्त्व होते, पण त्या देशातील दीर्घ लोकशाही परंपरेनुसार लष्कर हे राजकीय नेत्यांच्या हुकमतीखाली असते. उदाहरणार्थ, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हे नौदल, लष्कर व विमानदल यांचे प्रमुख असतात. पण १९२० नंतरच्या दोन तपांत जपानच्या युद्धप्रियतेने राजकीय नेत्यांवर प्रभाव गाजवला.

सम्राटासाठी किंवा देशासाठी प्राण देणे ही सैनिकांच्या जीवनातील सर्वांत मोठी संधी आहे अशी शिकवण हजारहून अधिक वर्षे जपानी लोकांना दिली जात होती. पराक्रमी शोगुनांचे सरकार हे 'तंबू सरकार' म्हणून ओळखले जात असे. म्हणजे लष्करी मोहिमेवरचे शोगुन जेथे असतील, तेथे त्यांच्या तळावरील तंबूतून सरकारी सूत्रे हलत असत. या खोलवर रुजलेल्या भावनेतूनच १९२० नंतरच्या लष्करीशाहीचा (मिलिटॅरिझम) जपानमध्ये उदय झाला.

जपानच्या घटनेप्रमाणे पंतप्रधानांना युद्धमंत्री आणि नौदलमंत्री असे दोन मंत्री मंत्रिमंडळात घ्यावेच लागत असत.

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स अशा देशांत संरक्षणमंत्री असत. पण जपानमध्ये सरळ 'युद्धमंत्री' व 'युद्धखाते' असे. इतर देशांत नागरी जीवनातील व्यक्तीची निवड संरक्षण खात्यासाठी होत असे. पण जपानमध्ये ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यां-चीच युद्धमंत्री व नौदल अधिकाऱ्यांची 'नौदलमंत्री' म्हणून निवड करावी लागे. साहजिकच मंत्रिमंडळावर त्यांचा नागरी व्यक्तीपेक्षा अधिक मोठा प्रभाव असे.

इतर देशांच्या तुलनेने जपानच्या कारभारावर लष्करी अधिकाऱ्यांची अधिक पकड होती. बराच सरकारी पैसा लष्करावर खर्च होत असे आणि अनेकदा आपले महत्त्व टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी जपानला नव्यानव्या लष्करी मोहिमांत अडकविण्याकडे युद्धमंत्र्यांचा कल असे. जपानच्या सम्राटांचा शब्द देशाच्या कारभारात अखेरचा असे आणि युद्धमंत्र्याचे सम्राटांवरही वजन असल्याने कधी कधी पंतप्रधानांपेक्षाही लष्करी बाबतीत युद्धमंत्र्यांना महत्त्व मिळे.

तेथील कारखानदार व व्यापारी यांना युद्धकाळात अधिक फायदा मिळे. त्यामुळे त्यांचाही कल युद्धजन्य परिस्थिती निर्माण करण्याकडे असे. त्यांना जपानी

संसदेत भरपूर प्रतिनिधित्व असल्याने युद्धमंत्री व नौदल मंत्री यांच्या बलिष्ठ स्थानाला संसदेतही आव्हान मिळत नसे. जपानची सर्वसामान्य जनता तर युद्धातील नेत्यांच्या पराक्रमांची पूजकच होती. जपानमधील लष्कर आणि नौदल यात सरदार-उमरावांच्या कुटुंबातील तरुण पिढीची भरती झाल्यामुळे त्या वरिष्ठ दर्जाचे तेज व वैभवही जपानच्या लष्कराला व नौदलाला मिळाले होते. परिणाम असा झाला की, अनेक लष्करी अधिकारी राजकीय निर्णयही स्वतःच घेऊ लागले. त्यांच्यामागे मोठी संरक्षक फळी असल्याने खुद्द राजकीय नेतेच त्यांना दबकून असत. १९२० नंतरच्या काळात जपानची सूत्रे प्रत्यक्षात लष्कराच्या हाती केवढ्या मोठ्या प्रमाणावर होती हे मांचुरिया प्रकरणावरून दिसून येते.

दक्षिण मांचुरिया रेल्वेच्या रक्षणासाठी मांचुरियात जपानने लष्कर ठेवले होते. या लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सप्टेंबर १९३१ मध्ये अशी अफवा उठवली की चिनी लष्कर ही रेल्वे उडवून लावण्याचा प्रयत्न करीत आहे. तसा अहवाल त्यांनी टोकियोला पाठविला. पण तेथून विशेष कारवाईचे हुकूम येण्यापूर्वीच या अधिकाऱ्यांनी सबंध मांचुरिया काबीज केला. त्यावर एक हस्तक राजा बसवला. त्या राज्याला मांचुकुओ हे नवे नावही देऊन टाकले ! जपानने नवा प्रदेश जिंकल्याच्या वार्तेचे सबंध देशात जनतेने तुफान स्वागत केले. लष्करी अधिकाऱ्यांना हे निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत अशी भूमिका घेणे आता जपान सरकारला परवडणारे नव्हते. 'मांचुरियन इन्सिडन्ट' (किरकोळ प्रकार) असा सरकारने या प्रकरणाचा उल्लेख केला. लीग ऑफ नेशन्सने आणि अमेरिकेने या प्रकरणी जपानचा निषेध केला आणि मांचुरियाचा प्रदेश परत करावा असे सुचविले, तेव्हा जपानने लीग ऑफ नेशन्सचाच राजीनामा दिला. काही लष्करी अधिकाऱ्यांच्या बेकायदा चढाईवर पांघरूण घालण्यासाठी जपान सरकार इतक्या टोकाला गेले, यावरून त्या काळी जपानवर लष्करशाहीचा केवढा प्रभाव होता हे दिसते.

४

# इतिहासाला कलाटणी देणारा पर्लहार्बर-वरील जपानचा हल्ला

मांचुरियातील हाराकरी विजयामुळे जपानवर लष्कराचा प्रभाव वाढला होताच. आता त्याची परिणती म्हणून लोकशाही पद्धतीच्या द्विपक्ष सरकारला लष्करी अतिरेक्यांकडून विरोध होऊ लागला. सरकारमधील मंत्री, दिएट ही संसद व दोन्ही राजकीय पक्षांचे नेते यांच्याकडून जपानच्या सम्राटांची मुस्कटदाबी करण्यात येत असल्याचा प्रचार या अतिरेक्यांनी सुरू केला. देशातील वातावरण तापत चालले. प्रक्षोभक भाषणे, लेख यांना ऊत आला. त्याचा अंतिम परिणाम असा झाला की, १५ मे १९३२ मध्ये नौदलातील काही तरुण अधिकाऱ्यांनी सिऊफाई या बहुमतवाल्या पक्षाचे नेते पंतप्रधान इनकी यांचा खून केला ! प्रतिगामी राजकीय पुढाऱ्यांच्या कचाट्यातून आपण सम्राटांना या खुनाने मुक्त करीत आहोत, असा त्यांनी दावा केला. लष्करी अधिकाऱ्यांनी या घटनेचे भांडवल केले आणि पक्षीय राज्यकारभाराविरुद्ध जनतेने दिलेला हा कौल असल्याने लोकशाही आता बस झाली असा प्रचार सुरू केला. पंतप्रधानांचा खून करणारे तरुण सम्राटांच्या मुक्ततेसाठी जीव द्यायला तयार झाले म्हणून त्या तरुणांना 'थोर राष्ट्रप्रेमी' मानण्यास जनता तयार झाली. या खुनी तरुणांच्यावर खटला भरण्यात आला. त्या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी लांबलचक भाषणे करून आपल्या कृतीचे समर्थन केले आणि देशहितासाठी ही कृती आवश्यकच होती, असे सांगितले. लोकमत त्यांना इतके अनुकूल होते की, न्यायालयाला या खुनी तरुणांना किरकोळ शिक्षा देऊन हे प्रकरण कसेबसे मिटवावे लागले. जपानवरील लष्करी प्रभावाचा हा सर्वांत उत्कर्षाचा काळ होता.

या वेळी जपानच्या लष्करात दोन भिन्न प्रवाह होते. कोडो पंथात बहुतेक तरुण, दुय्यम दर्जाचे लष्करी अधिकारी होते. ते ग्रामीण भागातून आले होते.

त्यांची घरची राहणी साधी होती. ते जेव्हा टोकियोतील ज्येष्ठ राजकीय नेत्यांची उच्च राहणी पाहात, तेव्हा त्यांना वाटे की, आपण लष्कराच्या कठीण नोकरीत हालअपेष्टा काढीत असताना हे पंतप्रधान, मंत्री, वरिष्ठ नेते विलासी राहणीत मश्गूल होतात हे अयोग्य आहे. वास्तविक पंतप्रधान आणि मंत्री यांच्या जबाबदाऱ्यांची या तरुण लष्करी अधिकाऱ्यांना कल्पनाही नव्हती. त्यांना त्यांचे मोठे बंगले, मोटारी, संरक्षण तेवढे दिसत. या उच्च राहणीबद्दलच्या असमाधानातून कोडो पंथाचा जन्म झाला. मग त्याला सम्राटांना संरक्षण हवे असा विचार सुचून त्याचे कोडो पंथीयांनी भांडवल केले. किता कोकुरियुकाई या क्रांतिकारक लेखकाने असे स्पष्ट म्हटले होते की, सध्याचे पक्षीय सरकार बाजूला सारून क्रांतिकारक राष्ट्रभक्तांनी देशाचा कारभार हाती घेणे आवश्यक आहे. या विचारांचा कोडो पंथीयांवर खोलवर परिणाम झाला होता.

कोडो या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गटाचे मत असे होते की सम्राट आणि जनता यांचे प्रत्यक्ष व थेट संबंध असावेत. संसद किंवा डिएटसारखी संस्था या दोघांच्यामध्ये येऊ नये. कोडो म्हणजे इंपीरियल वे किंवा सम्राटांचा मार्ग. जनरल अराकी आणि मझाकी या सेनानींचा या मतावर विश्वास होता. निवडणूक, पार्लमेंट, चर्चा, कायदे, फेरविचार हे सर्व कालापव्यय करणारे मार्ग असून सम्राटांच्या इच्छेनुसार आणि त्यांच्या थेट हुकमानुसार देशाचा कारभार चालावा असा त्यांचा दृष्टिकोन होता. याउलट टोसेई पंथाच्या लष्करी अधिकाऱ्यांना जनतेच्या हाती सत्तेचे नियंत्रण असावे आणि त्यासाठी संसदेसारख्या संस्थेची आवश्यकता आहे असे वाटत होते. टोसेई म्हणजे नियंत्रण. या दोन पंथातील मतभेदांचे रूपांतर उघड संघर्षात झाले. जनरल नागाटा हे टोसेई विचाराचे नेते होते. त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कोडो पंथाच्या एका अधिकाऱ्याने जनरल नागाटांचा खून केला. त्याची तीव्र प्रतिक्रिया होऊन खुनी अधिकाऱ्याला फाशी देण्यात आले आणि कोडो पंथांच्या अधिकाऱ्यांची बदली मांचुरियात करण्यात आली.

दरम्यान १९२५ मध्ये जपानने प्रौढ मतदानाचे तत्व अंगीकारिले. मिन्सिटो पक्षाचे ध्येय संसदीय कारभाराचे होते. या पक्षाला १९३६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत मिळाले आणि डिएटची सूत्रे या पक्षाच्या हाती आली. याचा कोडो पंथाच्या लष्करी अधिकाऱ्यांना विलक्षण राग आला. २६ फेब्रुवारी १९३६ रोजी पहाटेच या पंथाच्या एक हजार लष्करी अधिकारी आणि सैनिक यांनी बंड पुकारले आणि मिन्सिएटी पक्षाच्या अनेक नेत्यांची कत्तल केली. पंतप्रधान ओकुडा बचावले. पण अर्थमंत्री, लष्करी शिक्षणाचे इन्स्पेक्टर जनरल, लॉर्ड प्रिव्हीसील व इतर अनेक अधिकारी आणि नेते यांचे खून करण्यात आले, पण हे बंड क्षणिक ठरले. बंडखोरांनी नवी राजवट स्थापन केल्याची पत्रके हवेत फेकली, पण ती

खाली जमिनीवर येण्यापूर्वीच जपानच्या नव्या राज्यकर्त्यांनी लष्कराला बोलावून सर्व बंडखोरांना अटक केली आणि त्यांना कडक शिक्षा केल्या. लष्करी अधिकाऱ्यांनी संसदीय कारभाराला दिलेले आव्हान संपले. काही लष्करी अधिकाऱ्यांच्या या चढेल आणि मनमानी कृत्यांमुळे त्यानंतर कित्येक वर्षे जपानमधील लष्कराला जनतेच्या दृष्टीने प्रतिष्ठा राहिली नाही, कारण ते केव्हा काय करतील याचा नेम उरला नाही, जनतेचा लष्कराच्या एकनिष्ठेवरचा विश्वास उडाला.

देशातील सर्व घटकांत सुसंवाद साधायचा असेल, तर लष्कर, सम्राट आणि जनता यांचे संबंध स्नेहाचे व परस्पर आदराचे असले पाहिजेत, याची नवे पंतप्रधान कोनोये यांना पूर्ण जाणीव होती. ७ जुलै १९३७ रोजी चीनच्या राजधानीत जपानी वकिलातीचे रक्षक आणि चीनचे सैनिक यांच्यात तंटा झाला. किरकोळ संघर्ष होऊन तो तात्पुरता संपला. पण जपान सरकारने त्याची प्रतिक्रिया म्हणून पेकिंग, टिट्सीन, इन्नर मंगोलिया येथे लष्कर पाठवले. पूर्वीच्या पराभवाचे उट्टे काढण्याची खुमखुमी चीनलाही होतीच. चीनने संबंध किनाऱ्यावर जपानी सैन्याशी मुकाबला करण्याची तयारी केली.

जपानच्या अंतर्गत कारभारावर या घटनेचा एका दृष्टीने अनुकूल परिणाम झाला. तो असा की, जनता आणि लष्कर यातील दुरावा नाहीसा झाला. देशाच्या संरक्षणासाठी आणि परदेशात जपानच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी राष्ट्राला लष्कराची अत्यंत आवश्यकता आहे, याची जनतेला खात्री पटली. तसेच डिएट व जनता यांचा पाठिंबा असल्याशिवाय आपण परदेशात उत्तम लढा देऊ शकणार नाही याची लष्करालाही जाणीव झाली. अशा बिकट पेचप्रसंगात विविध पक्ष, सम्राट, लष्कर अशी अनेक दिशांनी देशाच्या शक्तींची ओढाताण होऊ नये आणि सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य करावे म्हणून ऑक्टोबर १९४० मध्ये सर्व राजकीय पक्षांतील निवडक प्रमुख एकत्र येऊन त्यांनी थिसाई युकुसान काई (सम्राटांना साहाय्य करणारी सर्वपक्षीय संघटना) स्थापन केली.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीस जर्मनी आणि सोविएट रशिया, यांचा सहकार्याचा करार झाला होता. पण पुढे त्यांच्यात वितुष्ट येऊन १९४१ मध्ये जर्मनीने रशियावर हल्ला केला. त्यापूर्वी १९३६ मध्ये जपानने जर्मनीबरोबर करार करून कम्युनिस्टांना विरोध करण्याचे समान तत्त्व स्वीकारले होते. जर्मनीच्या लष्करी वर्चस्वावर जपानचा एवढा विश्वास होता की, युरोपियन राष्ट्रे जर्मनीचा पराभव करू शकणार नाहीत अशी जपानची खात्री होती. पण पूर्वेतील जर्मनीचे वर्चस्व हुसकावून लावण्याचे जपानने गुप्तपणे ठरवले होते. जपानने जर्मनीविरुद्ध लढाईत उतरावे अशी अमेरिकेची इच्छा होती आणि राजनैतिक मार्गाने गुप्त वाटाघाटी करून अमेरिकेने तसे सुचविलेही होते. या वेळी

अमेरिका, जर्मनी, इंग्लंड व रशिया या बड्या राष्ट्रांच्या लढाईचा फायदा आपला मुलूख वाढविण्यासाठी जास्तीत जास्त करून घ्यावा ही जपानची सुप्त मनिषा होती. अमेरिकेने पूर्वीच जपानबरोबर व्यापारी करार करून पेट्रोल, रबर, पोलाद व लोखंड जपानला पुरविण्याचे मान्य केले होते. पण जर्मनिविरुद्धच्या लढाईत भाग घेण्यास जपान नाखूष आहे हे दिसून येताच दबाव आणण्यासाठी अमेरिकेने १९४० मध्ये करार संपताच त्याचे पुनरुज्जीवन करण्याचे अमान्य केले व जपानला कच्च्या मालाचा अतिशय तुटवडा भासू लागला. जपानची अमेरिकेतील मालमत्ता गोठविण्यात आली. जपानने इंडोचायनातून माघार घ्यावी अशी नवी अटही अमेरिकेने घातली. त्या वेळचे जपानचे पंतप्रधान कोनो यांनी राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांना भेटून वाटाघाटी करण्याची तयारी दाखविली. पण अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री हल यांनी स्पष्टपणे कळविले की जपानने आधी इंडोचायनातून माघार घेऊन अमेरिकेचे युद्धधोरण मान्य केल्याशिवाय राष्ट्राध्यक्षांची भेट होणार नाही. अमेरिका व जपान यांच्यातील तणावही वाढला. अमेरिकेसारख्या महासत्तेच्या आव्हानाला तोंड देणे नागरी पंतप्रधानाला शक्य होणार नाही म्हणून जनतेचे दडपण वाढले. पंतप्रधान कोनो यांना राजीनामा द्यावा लागला आणि युद्धमंत्री जनरल टोजो हे जपानचे पंतप्रधान झाले.

जनरल टोजो यांच्या नेतृत्वाखालील जपानी सरकारने आक्रमक धोरण अवलंबिले. जपानी सैन्याने दक्षिण इंडोचीन व्यापला. जपानने चीन व फिलिपाईन्स यांचे स्वातंत्र्य अबाधित राखावे, अशी अमेरिकेने मागणी केली, तेव्हा जपानने अमेरिकेकडे रबर व पेट्रोलच्या पुरवठ्याची हमी मागितली. जनरल टोजो यांच्या आक्रमक जपानी सरकारने या वेळी अमेरिकेविरुद्ध दुटप्पी धोरण स्वीकारले. सामोपचाराच्या वाटाघाटीसाठी म्हणून जपानने कुरुसु यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ अमेरिकेला पाठविले. त्याच वेळी इकडे गुप्तपणे युद्धाची तयारीही केली. कुरुसु यांची शिष्टाई असफल झाली, तेव्हा जपानच्या मंत्रिमंडळाने आणि लष्करी अधिकाऱ्यांनी १ डिसेंबर १९४१ रोजी गुप्त बैठक घेऊन युद्धाचा निर्णय घेतला.

सात डिसेंबर १९४१ रोजी रात्री जपानने अत्यंत अनपेक्षितपणे अमेरिकेच्या हवाई बेटावरील पर्ल हार्बरवर तुफान बाँबहल्ला केला. दुसऱ्या महायुद्धाला कलाटणी देणारी ही घटना होती. पर्ल हार्बरमध्ये असलेल्या बहुतेक अमेरिकन बोटी व तळ उद्ध्वस्त होऊन अमेरिकेचे दोन हजार एकशेसाठ नौसैनिक व नागरिक एका रात्रीत मारले गेले. कोटयवधी डॉलर्सचे नुकसान झाले. या अचानक हल्ल्याच्या यशाने सारा जपान आनंदाने भारून गेला. उलट अमेरिकेत संतापाची तीव्र लाट उसळली. आतापर्यंत जपानशी सामोपचाराचे धोरण स्वीकारावे, असे म्हणणारा एक मोठा गट अमेरिकेत होता, पण तो गटही आता जपानवर

कोणत्याही परिस्थितीत सूड उगवलाच पाहिजे, असा आग्रह धरू लागला. या पर्ल हार्बरला मी १९८१ मध्ये भेट दिली त्या वेळी चाळीस वर्षांपूर्वीचा अफाट विनाश दाखवणारे प्रदर्शन व त्या वेळची वृत्तपत्रे मला पाहायला मिळाली. ती पाहून मी थक्क झालो. विशेषत: पूर्वसूचना न देता सरसकट लष्करी आणि नागरी भागांवर बाँबफेक करणारे जपानचे हे कृत्य युद्धातसुद्धा क्षम्य नाही हे मला पटले. जनरल टोजो यांच्या या आततायीपणाचे जपानला पुढे फार घोर परिणाम भोगावे लागले.

पर्ल हार्बरच्या नेत्रदीपक यशानंतर जपानने विलक्षण वेगाने झेप घेतली. २ जानेवारी १९४२ रोजी जपानने मनिलावर ताबा मिळवला. पंधरा फेब्रुवारी रोजी जपानने सिंगापूर जिंकले. मार्चच्या सुरुवातीला डच इंडिज बेटे घेतली आणि ८ मार्चला रंगून जिंकले. 'रीपल्स' आणि 'प्रिन्स ऑफ वेल्स' या इंग्लंडच्या दोन बलाढ्य युद्धनौका जपानने बुडवल्या. या सुमाराला जपानने भारताच्या सीमा भागातही काही बॉम्ब टाकले. भारतात याच वेळी स्वातंत्र्यासाठी चळवळ चालू होती. जपान ब्रिटिशांना हैराण करीत आहे या कल्पनेने अनेक भारतीयांनी तेव्हा जपानच्या या बॉम्बहल्ल्याचे स्वागतही केले होते. जपानच्या या चौफेर विजयामुळे जनरल टोजो यांनी देशात अमाप लोकप्रियता मिळविली. टोजो हे हिटलर आणि मुसोलिनी या हुकूमशहांच्या पावलावर पाऊल टाकून वागू लागले.

पर्ल हार्बरच्या विनाशाच्या धक्क्यामुळे अमेरिका हबकून जाईल आणि त्याचा परिणाम इंग्लंड-फ्रान्स वगैरे देशांवरही होईल अशी जनरल टोजो यांची कल्पना होती. प्रत्यक्षात मात्र उलटच परिस्थिती होती. जपानने विश्वासघाताने आपले दोन हजारावर लोक मारले आणि कोटचवधी डॉलर्सचे नुकसान केले, त्याचा बदला घेण्यासाठी अमेरिकेने अपूर्व तयारी केली. सबंध नौदलाची पुनर्रचना केली. आतापर्यंत अमेरिका दुसऱ्याची लढाई लढत होती. पण पर्ल हार्बरनंतर हे अमेरिकेचे स्वत:चे युद्ध झाले. अमेरिकेने इतक्या जोमाने प्रतिहल्ले केले की, जपानला अत्यंत अनपेक्षितपणे माघार घ्यावी लागली. मिडवेच्या लढाईत जपानचे मोठे आरमार व विमानदल कामी आले. गुडाल-कॅनॉलच्या लढाईतही जपानला पराभव पत्करून माघार घ्यावी लागली. युद्धाचे चक्र निश्चितच उलटे फिरू लागले आणि जपानचे धाबे दणाणले. जुलै १९४४ मध्ये सैपान पडले आणि जपानचा मोठा पराभव निश्चित झाला. सैपान गमावल्यावर अमेरिकन बाँबफेकी विमाने टोकियो उद्ध्वस्त करू शकतील अशी परिस्थिती निर्माण झाली तेव्हा जपानच्या राजकारणात प्रचंड उलथापालथ झाली. जनरल टोजो यांची लोकप्रियता तर समूळ नष्ट झालीच पण जनतेचा त्यांच्यावरचा विश्वासही गेला. टोजो यांची हकालपट्टी होऊन कोईसो कुनियाकी यांचे मंत्रिमंडळ स्थापन झाले.

अधिकारावर आल्याबरोबरच या मंत्रिमंडळाला फार नाजूक परिस्थितीला तोंड द्यावे लागले. कारण जपानचा अनेक ठिकाणी पराभव झाला, ही वस्तुस्थिती पंतप्रधान टोजो यांनी राष्ट्रापासून लपवून ठेवली होती. आपण विजयीच होत आहोत अशी जनतेची समजूत होती. जपानच्या युद्धसाहित्याचे जे अपरिमित नुकसान झाले होते त्यावरून अंतिम युद्धात आपल्याला विजय मिळणे कठीण आहे, असे मत लष्करी, नाविक व विमालदलाचे प्रमुख व्यक्त करू लागले. जपानने गेल्या काही महिन्यांत ब्रह्मदेश, फिलिपाईन्स, सिंगापूर असे जे अनेक प्रदेश जिंकले होते, त्यांनी युरोपशी व्यापार न करता फक्त जपानबरोबरच व्यापार करावा, अशी जपानने अट घातली होती. पण जपानचा पराभव होत आहे ही बातमी या नव्याने जिंकलेल्या प्रदेशात पसरताच त्या देशांकडून व्यापारात ढिलाई होऊ लागली आणि जपानकडे येणाऱ्या मालात खंड पडू लागला. फिलिपाईन्सने जपान-बरोबर व्यापार करण्यास गुप्त विरोध करण्यास सुरुवात केली.

जपानने ब्रह्मदेशात बा माॅ यांच्या नेतृत्वाखाली कळसूत्री सरकार नेमले. पण त्याला जनतेचा फारसा पाठिंबा मिळाला नाही. ब्रिटिशांनी ब्रह्मदेश सोडण्यापूर्वी पेट्रोलच्या टाक्या उडवून दिल्या व शेतातील पिके जाळली. त्यामुळे ब्रह्मदेशातून पेट्रोल व तांदूळ मिळेल ही जपानची कल्पना फोल ठरली. इंडोनेशिया आणि इंडो-चायना यांतही जपानचा पाय भक्कम रोवला गेला नाही. या देशात अनुक्रमे डॉ. सुकार्नो आणि डॉ. हो चि मिन्ह यांनी राष्ट्रीय चळवळ सुरू केली. या चळवळी-मुळे जपानला या दोन्ही देशांपासून अपेक्षित फायदे मिळाले नाहीत. हो चि मिन्ह यांनी तर एवढी चिवट आणि बळकट संघटना उभी केली की कालांतराने या चिमुकल्या देशाने अमेरिकेसारख्या सर्वांत बलाढ्य देशालाही आपल्या भूमीवरून हुसकावून लावले. व ब्रह्मदेशापासून पॅसिफिकपर्यंत विजय मिळाले, तेव्हा जपानने ऑस्ट्रेलिया घेऊन तेथूनही ब्रिटिशांना हाकून लावण्याची योजना आखली होती, पण नंतरच्या पराभवामुळे आणि युद्धसाहित्याच्या तीव्र टंचाईमुळे ऑस्ट्रेलियावरील चढाईचा बेत जपानला सोडून द्यावा लागला.

युद्धाचे पारडे पालटले आहे, जपान पराभूत होत आहे, तेव्हा जपानला नामोहरम करण्याची हीच संधी आहे, असा निर्णय दोस्त राष्ट्रांनी कासाब्लांका येथील बैठकीत घेतला होता. त्याप्रमाणे ॲडमिरल निमिझ आणि जनरल मॅक्-ऑर्थर यांनी स्वतंत्र आघाड्या उघडून प्रचंड प्रमाणावर चढाई केली. निमिझ यांनी पॅसिफिक महासागरात विजय मिळवले. जनरल मॅक्ऑर्थर यांनी जानेवारी १९४५ मध्ये फिलिपाईन्सवर चढाई केली. जपान्यांनी तेथे घनघोर लढाई केली. आपल्या बाजूने फिलिपाईन्स लोकांनी लढावे म्हणून जपानी सरकारी अधिकाऱ्यांनी त्यांचा अतोनात छळ केला. पण मॅक्ऑर्थर यांचे शिस्तबद्ध सैन्य जपानला अनेक

पटींनी भारी पडले. आता पराभव निश्चित होणार, अशी खात्री झाली, तेव्हा जपानी सैन्याने मॅनिला बेचिराख करूनच ते शहर खाली केले. जनरल मॅक्‌ऑर्थर यांनी ५ फेब्रुवारी १९४५ रोजी मॅनिला व फिलिपाईन्स जिंकले.

आता अमेरिकेने आपला मोर्चा ओकिनावा बेटाकडे वळवला. जपान यावेळी अत्यंत प्रक्षुब्ध झाला होता. जपानने 'सुईसाईड स्क्वॉड' म्हणजे 'आत्महत्या पथके' तयार केली. या पथकातील वैमानिक आपल्या विमानात प्रचंड दारूगोळा भरीत आणि ते विमान अमेरिकन बोटीवर किंवा ठाण्यावर नेऊन स्वतःसह विमानाचा नाश करीत. त्याच वेळी दारूगोळ्याचा भडका उडून, अमेरिकन बोट किंवा ठाणे भस्मसात होई. या 'आत्महत्या पथकां'नी अमेरिकेचे अतोनात नुकसान केले, पण जन. मॅक्‌ऑर्थर आता ईर्ष्येला पेटले होते. आता जपानला कोंडीत पकडून नामोहरम केले नाही, तर अधिक नुकसान होईल, असा निर्णय त्यांनी अमेरिकेच्या रष्ट्राध्यक्षांना कळवला.

त्या वेळी ट्रुमन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. त्यांनी दोस्तराष्ट्रांशी वाटाघाटी करून असा निष्कर्ष काढला की, टोकियोवर दोस्तांनी बाँबहल्ला केला तर जपानी वैमानिक-लष्कर एवढा कडाडून प्रतिकार करतील की जपानवरच्या मोहिमेत निदान पाच लाख सैनिक दोस्तांना– त्यातले बहुतांश अमेरिकेला– गमवावे लागतील. म्हणून अमेरिकन दोस्तांच्या प्रमुखांच्या सल्ल्याने अखेर जपानवर अणुबाँब टाकण्याचा निर्णय नाइलाजाने घेतला. पर्ल हार्बरवर जपानने अचानक हल्ला केला, त्याचा सूड घेण्याचा सुप्त विचारही अमेरिकेच्या मनात होताच. मात्र अणुबाँब टाकण्यापूर्वी अमेरिकेच्या बी २९ जातीच्या विमानांनी जपानवर बाँबचा वर्षाव केला. आता जर्मनीने पराभव पत्करला होता. त्यामुळे दोस्तांनाही स्फुरण आले. त्यांनी २९ जुलै १९४५ रोजी जपानला अंतिम खलिता पाठवून संपूर्ण व विनाशर्त शरणागती पत्करण्याचे आवाहन केले. पण ही मानहानी पत्करण्यास जपानने नकार दिला.

ता. ६ ऑगस्टला अमेरिकेच्या सुपरफॉर्ट्रेस विमानाने हिरोशिमावर पहिला अणुबाँब टाकला. हिरोशिमा हे सुमारे अडीच लाख वस्तीचे शहर. या एकाच अणुबाँबच्या स्फोटाने तत्काळ किंवा काही दिवसांनी ७५ हजार लोक मरण पावले ! त्याशिवाय पन्नास हजारांवर जखमी झाले. या अणुस्फोटास आता सदतीस वर्षे झाली, पण शेकडो लोकांवर अजूनही खास 'ए बाँब हॉस्पिटलस्' मध्ये उपचार चालू आहेत. शेकडो लोक कायमचे अंध अथवा अपंग झाले. या बाँबस्फोटाने जपानलाच नव्हे, तर सबंध जगाला धक्का दिला आणि अणुबाँबची संहारक शक्ती केवढी मोठी असते, याची मानवजातीला जाणीव झाली.

७ ऑगस्ट रोजी रशियाने जपानविरुद्ध युद्ध पुकारले आणि मांचुरियात

रशियन सैन्य उतरविले. अजूनही जपान शरणागती पत्करण्यास तयार नव्हता. तेव्हा अमेरिकेने ९ ऑगस्ट रोजी नागासाकीवर अणुबाँब टाकला. या बाँबमुळे ३९ हजार लोक मरण पावले. आणि २५ हजार लोक गंभीरपणे जखमी झाले. हिरोशिमा व नागासाकी या दोन्ही शहरांतील मालमत्ता या दोन अणुस्फोटांनी जवळजवळ पूर्णपणे नष्ट झाली. प्रलंयकारी अशा या अणुबाँबने आता जपानमधील सर्वच लोकसंख्या नाहीशी होणार की काय अशी भीती वाटू लागली. अमेरिकेने हा संहार थांबविलाच पाहिजे, अशी जपानभर लाट पसरली.

त्या दिवशी मध्यरात्री जपानच्या सम्राटांनी मंत्रिमंडळाची बैठक बोलावली. पराभव पत्करण्यापेक्षा सर्वनाश पत्करावा अशी अटीतटीची भाषा त्या बिकट प्रसंगीही जपानच्या युद्धमंत्र्यांनी केली. पण जपानचे सम्राट हिरोहिटो यांनी सुचवले की आपली स्वायत्तता दोस्त राष्ट्रे मान्य करत असतील, तर शरणागती पत्करावी. दोस्तांना विनाअट शरणागती हवी होती. या वाटाघाटीत काही दिवस गेले. अधिक अणुबाँब टाकून सबंध जपान नष्ट करण्यापेक्षा शरणागती पत्करावी असा सूर मंत्रिमंडळातून येऊ लागला. पण जपानच्या सम्राटांच्या घराण्याचा इतिहास असा आहे की, युद्धकैदी म्हणून शत्रूच्या हाती पडण्यापेक्षा ते आत्महत्या करणे पत्करतात. ही वस्तुस्थिती दोस्तांच्या नजरेस आणण्यात आली, तेव्हा सम्राट हे आपल्या सिंहासनावर आहेत तसेच राहतील या अटीला दोस्त राष्ट्रांनी मान्यता दिली.

ता. १५ ऑगस्ट १९४५ रोजी जपानचे सम्राट हिरोहिटो यांनी रेडिओवर राष्ट्राला उद्देशून भाषण केले. अत्यंत व्यथित अंतःकरणाने त्यांनी जपानने शरणागती पत्करल्याची वार्ता राष्ट्राला जाहीर केली. त्याबरोबर संबंध जपानभर निदान पन्नास हजार स्वाभिमानी जपानी नागरिकांनी व सैनिकांनी हाराकिरी म्हणजे आत्महत्या केली. सबंध राष्ट्र शोकसागरात बुडून गेले. ज्यांनी आत्महत्या केली, त्यात जपानचे युद्धमंत्री होते. काही आततायी लष्करी अधिकाऱ्यांनी सम्राटांच्या वाड्याला आग लावली, पंतप्रधानांचे निवासस्थान पेटवले आणि सम्राटांनी शरणागतीची घोषणा करू नये म्हणून शिकस्त केली. पण शेवटी ही घोषणा झालीच. ज्या सूर्यपुत्राच्या देशावर पूर्वी स्वातंत्र्याचा सूर्य कधीही मावळला नाही, त्यांच्या नशिबी जगाच्या इतिहासात प्रथमच पारतंत्र्य आले ! शरणागती आणि अखेरपर्यंत लढाई अशा दोन बाजू घेणाऱ्यांचे दोन तट पडले. जपानमध्ये या दोन गटांत यादवी युद्ध सुरू होण्याची वेळ अगदी जवळ आली होती. पण टोकियोवर जनरल टनाका यांनी कडक लष्करी अंमल बसवून मोठ्या जिकिरीने ते टाळले.

जपानच्या सम्राटांनी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात सांगितले, " शत्रूने या युद्धात विनाशाची इतकी प्रचंड हत्यारे वापरली आहेत की, हे युद्ध असेच चालू राहिले, तर जपान राष्ट्राचा समूळ नाश होईलच पण सबंध मानवजातही पृथ्वीच्या

पाठीवरून संपूर्णपणे पुसली जाईल. काळ आणि दैव यांच्या दुर्दैवी आदेशानुसार मी सम्राट हिरोहिटो युद्धसमाप्ती आणि शरणागती जाहीर करून शांततेचा मार्ग खुला करीत आहे."

सम्राट हिरोहिटो यांनी युद्धसमाप्ती जाहीर केल्यानंतर काही दिवसांनी त्यांचा व जनरल मॅक आर्थर यांचा जो फोटो काही प्रमुख जपानी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला त्याने सबंध जपान राष्ट्र हादरले. कारण त्या छायाचित्रात जपानचे सम्राट नेकटाय, सूट वगैरे 'फॉर्मल' कपडे घालून उभे होते, तर मॅक आर्थर हे उघड्या गळ्याचा शर्ट आणि पँट घालून सम्राटांच्या जवळ उभे होते. ज्या देशात सम्राटांच्या दृष्टीला दृष्टी न देता खाली मान वाकवून उभे राहण्याची शेकडो वर्षांची शालीन परंपरा होती तिथे हे पाहून जपानी जनतेला अतोनात दुःख झाले. यापुढे आपण स्वाभिमानाने कधी तरी जगू शकू काय, असा विचार जपानी जनतेच्या मनात प्रामुख्याने आला. सम्राटांची जर ही अवस्था तर सर्वसामान्य जपानी नागरिकांपुढे कोणते भोग आहेत, याची कल्पनाही त्या स्वाभिमानी राष्ट्राला असह्य झाली.

जपानसारख्या छोट्या राष्ट्राने या युद्धात जे गमावले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. जपानमधील २५ लक्ष इमारती पार भुईसपाट झाल्या. लष्करी आणि बिनलष्करी मिळून बावीस लक्ष लोक मारले गेले. जखमींचा आकडा– त्यात कायमचे अंध झालेलेही आले– एक कोटीवर जाईल. युद्धनौका, विमाने, रणगाडे, पेट्रोलच्या टाक्या, मोटारी यांचे झालेले नुकसान अब्जावधी डॉलर्सच्या घरात गेले. जपानच्या साम्राज्यातील सुमारे सात लाख चौरस किलो-मीटर्सचा म्हणजे निम्मा प्रदेश जपानला गमवावा लागला. उद्योगधंदे, कारखाने, व्यापारी केंद्रे, शिक्षणसंस्था धुळीला मिळाल्या. या प्रलयंकारी विनाशातून जपानी कधी काळी डोके वर काढील असे युद्धसमाप्तीनंतर वाटले नव्हते !

५

# पराभूत जपानवर अमेरिकेचे कडक निर्बंध

जनरल मॅकआर्थर यांची नेमणूक सुप्रीम कमांडर ऑफ जपानीज ऑक्युपेशन (व्याप्त जपानचे सर्वोच्च शास्ते) म्हणून झाली. मॅक आर्थर हे स्वतः खानदानी आणि हुकूमशाही प्रवृत्तीचे होते. त्यांनी जपानचा कारभार पोलादी पद्धतीने करण्यास सुरुवात केली. २ सप्टेंबर १९४५ रोजी जपानने आपल्या शरणागतीचे अधिकृत कागदपत्र मिसूरी या युद्धनौकेवर जनरल मॅक आर्थर यांना सादर केले. ८ सप्टेंबर रोजी जन. मॅक आर्थर यांनी टोकियोत येऊन जपानच्या कारभाराची सूत्रे घेतली. त्यानंतर थोड्याच दिवसांनी जपानचे सम्राट हिरोहिटो स्वतः जन. मॅक आर्थर यांना भेटण्यास गेले. सम्राटांना भेटण्यासाठी इतरांनी यायचे, सम्राटांनी स्वतः कोणाकडे जायचे नाही ही जपानची शेकडो वर्षांची परंपरा त्यांनी मोडली.

सम्राट हिरोहिटो यांनी या भेटीत अशी इच्छा व्यक्त केली की आपले स्वतःचे अथवा कुटुंबियांचे काय होईल याची चिंता नाही, पण जपानी जनतेचे स्वत्व नष्ट होईल, असे अमेरिकेने काही करू नये. त्यांच्या या भेटीचा मॅक आर्थर यांच्यावर फार खोल परिणाम झाला. त्यांनी अमेरिकेकडे पाठविलेल्या अहवालात म्हटले की हिरोहिटो हे उच्चकुलीन, सौजन्य व सभ्यता यांनी परिपूर्ण असलेले आणि जनहिताची खरीखुरी कळकळ असलेले सम्राट आहेत. जपानचे भवितव्य ठरविताना सम्राटांचे खास स्थान शक्य तेवढे अबाधित राहावे, असेही मत या अहवालात मॅक आर्थर यांनी व्यक्त केले. सम्राटांनी आपल्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती जनतेला मिळाली, तेव्हा सम्राटांविषयीच्या आदराला पुन्हा उजाळा मिळाला. हिरोहिटो यांनी दाखवलेला मनाचा मोठेपणा जपानी जनतेवर मोठीच छाप टाकून गेला.

जपानची नवी राज्यपद्धती ठरवताना सम्राटपद नष्ट करावे आणि अमेरिकन

पद्धतीची लोकशाही आणावी असे त्या वेळच्या अमेरिकन सरकारमधील काही प्रमुख राजनीतितज्ज्ञांचे मत होते. पण अमेरिकेचे जपानमधील माजी राजप्रतिनिधी जोसेफ ग्र्यू आणि जन. मॅक्आॅर्थर यांना जपानी मनाची चांगली ओळख होती. मॅकआॅर्थर हे १९०४ मध्ये रूसो–जपानी युद्धात नायब अधिकारी म्हणून जपानमध्ये होते. सम्राटपद नष्ट केल्यास जपानी जनतेत अपूर्व असंतोष होईल, याची कल्पना असल्याने या दोघांनी सम्राटपद चालू ठेवण्याचा आग्रह धरला व अमेरिकन सरकारने त्याला मान्यता दिली.

तांत्रिकदृष्टया जरी सर्वच दोस्त राष्ट्रांनी मिळून जपानचा पराभव केला होता तरी प्रत्यक्षात दोस्तांच्या सैन्यात बहुतेक भूदल, नौदल व विमानदल अमेरिकन होते. युद्धाचे पारडे अचानक बदलणारे अणुबाँब अमेरिकेनेच तयार केले व जपानवर टाकले. अर्थात साहजिकच जपान अमेरिकन हुकमतीखाली आला आणि जपानचे सर्व भवितव्य ठरवण्याची क्षमता अमेरिकेचीच ठरली.

या वेळी रशिया स्वतःच्या शक्तीवर वेगळे विजय मिळविण्यात गुंतला होता. जपानवर पडलेले अणुबाँब आणि जपानची शरणागती या काळात रशियाने मांचुरिया घेतला. उत्तर कोरियावर कब्जा मिळविला आणि त्या भागात सापडलेली शत्रूची शस्त्रास्त्रे माओ त्से तुंग यांना देऊन कम्युनिस्टांचा लढा बळकट केला. जपानचे मुख्य चार भाग सोडले तर पूर्वीच्या जपानी साम्राज्याचे लचके तोडून रशिया आणि अमेरिकेने त्यावर आपला ताबा बसविला. होन्शु, क्युश, शिकोकु व होकियोडा आणि आसपासची लहान बेटेच काय ती जपान या नावाने अस्तित्वात राहिली.

महायुद्ध संपल्यानंतरची जपानची परिस्थिती अत्यंत करुणाजनक होती. पराभव आणि मानहानी झालीच होती, पण या दुःखद मनःस्थितीपेक्षाही बाह्य वस्तुस्थिती अधिक भयावह होती. शहरेच्या शहरे बेचिराख झाली होती. बाँबहल्ल्यात मोडून पडलेल्या इमारतींनी रस्ते व्यापले होते. युद्ध-समाप्तीनंतर शहरात परत आलेल्या नागरिकांपैकी ८५ टक्के बेघर होते. युद्धासाठी भरती केलेले लक्षावधी सैनिक बेकार हिंडत होते. कारखाने मोडून पडले होते. व्यापार विस्कळीत होता. रेल्वे, रस्ते, आगगाडया, बसेस, मोटारी यांपैकी पाचदहा टक्केच शाबूत होत्या. बाकीच्यांचा बाँबहल्ल्यात विनाश झाला होता. अन्नटंचाई तीव्र होती. कामधंदा मिळत नव्हता. बहुतेक जपानी लोकांना दोन वेळा जेवण मिळण्याची भ्रांत होती. बाँबहल्ल्यामुळे पिके जळून गेली होती. धान्यकोठारे उद्ध्वस्त झाली होती. जे थोडे अन्न-धान्य होते, त्याचा बेसुमार काळाबाजार चालला होता. किमती सर्वसामान्य माणसाच्या आटोक्याबाहेर गेल्या होत्या.

या विनाशातून नवे राष्ट्र उभारणे हे अत्यंत अवघड काम होते. त्यातच,

अमेरिकेने जपानवर अतिशय कडक निर्बंध घातले होते. युद्ध-गुन्हेगारांवर खटले, युद्धात अमेरिकेचे जे नुकसान झाले त्याची जपानने भरपाई करून देण्याची जबाबदारी, जपानने सैन्य बाळगण्यास अथवा शस्त्रे वापरण्यास बंदी, युद्धाचा हक्क जपानने कायमचा सोडण्याची सक्ती, उमरावांची पद्धत नष्ट करणे, सम्राटांचे हक्क कमी करणे अशी बंधने अमेरिकेने जपानवर घातली.

जपानने भावी काळात कधीही युद्ध करू नये, अमेरिकेला जपानच्या शस्त्रास्त्रांचा धोका निर्माण होऊ नये, जागतिक शांततेचा जपानकडून भंग होण्याची शक्यताच निर्माण होऊ नये, पण अमेरिकेची नुकसानभरपाई देण्याइतपत जपान आर्थिकदृष्टया पुन्हा समर्थ व्हावा अशा हेतूने हे निर्बंध घालण्यात आले होते. जपान जर आर्थिकदृष्टया दुबळा राहिला, तर विजेते राज्यकर्ते म्हणून अमेरिकेवरच जपानला मदत देण्याची जबाबदारी पडली असती व नुकसान भरून निघण्याची शक्यताही दुरावली असती, म्हणून अमेरिकेने विचारपूर्वक हे निर्बंध लादले होते.

पंतप्रधान शिदेहटा यांच्या नेतृत्वाखाली जपानचे युद्धोत्तर काळातील पहिले मंत्रिमंडळ अधिकारावर आले, ते अशा अत्यंत नाजूक राजकीय व आर्थिक अवस्थेत. 'जागतिक शांततेची खरीखुरी तळमळ असल्याने जपान युद्ध करण्याच्या आपल्या हक्काचा त्याग करीत आहे', अशी जपानच्या घटनेत अमेरिकेने दुरुस्ती करायला लावली. ही दुरुस्ती अत्यंत अपमानास्पद होती, पण ती अट नाकारणे जपानला अशक्य होते. 'जपान यापुढे लष्कर, नौदल आणि विमानदल कधीही ठेवणार नाही' असे या घटनादुरुस्तीत स्पष्टपणे म्हटले होते. जपानवर परराष्ट्राची चढाई झालीच, तर अमेरिका व इतर दोस्त राष्ट्रे जपानचे संरक्षण करतील, असे आश्वासन देणारा करार याच वेळी दोस्त राष्ट्रांनी केला होता.

पॉटस्डॅम कराराच्या तरतुदीनुसार दोस्तांनी म्हणजे मुख्यतः अमेरिकेने जपानवर जे निर्बंध घातले होते, त्यात पुढील प्रमुख होते. जपानच्या प्रदेशावर मर्यादा घालणे, युद्ध गुन्हेगारांना शिक्षा करणे, यापूर्वी जपानचे लष्करी धोरण ठरवण्याशी जे अधिकारी व नागरिक संबंधित होते, त्यांना नोकरी करण्यास बंदी, गुप्त संघटना मोडून काढणे, राजकीय कैद्यांची मुक्तता, उद्योगधंदे व शेती या क्षेत्रांत कामगार संघटनांना उत्तेजन देणे, मोठे विश्वस्त निधी आणि बडी कॉर्पोरेशन्स विसर्जित करणे, युद्धाचा आणि जपान व्याप्त करण्याचा सैन्याचा खर्च जपानकडून वसूल करणे, जपानी सैन्याने युद्धात परराष्ट्रातून लुटून आणलेली मालमत्ता ज्याची त्याला परत करणे, उद्योगधंद्यांचे लोकशाहीकरण करणे, व्यापार व उद्योग धंदे यांचे नियंत्रण करणे.

हे निर्बंध इतके कडक आणि जाचक होते की जपानसारखे कल्पक, चिकाटीचे

आणि दीर्घोद्योगी राष्ट्रच या संहारातून पुन्हा डोके वर काढू शकले. युद्धोत्तर काळातील पहिल्या मंत्रिमंडळाने प्रथम शेती सुधारणेवर लक्ष केंद्रित केले. कारण त्यात राजकारण नसल्याने अमेरिकेचा विरोध असण्याचे कारण नव्हते. तसेच अन्नधान्याचे उत्पादन ही जपानची सर्वांत तातडीची गरज होती. नव्या मंत्रिमंडळाने गैरहजर जमीन-मालकांची पद्धत नष्ट करून साडेसात एकरांच्या खालच्या सर्व जमिनी कुळांच्या ताब्यात दिल्या. पुढे ही मर्यादा अडीच एकरापर्यंत खाली आणण्यात आली. सर्व महिलांना मतदान करण्याचा हक्कही देण्यात आला. सहा ते नऊ वर्षांच्या सर्व मुलांना शिक्षण सक्तीचे करण्यात आले. शेती, शिक्षण व घटनादुरुस्ती लवकरात लवकर हाती घ्यावी असा ‘ स्कॅप ’ने जपानी मंत्रिमंडळाला तगादा लावला. (‘ स्कॅप ’ हे ‘ सुप्रीम कमांडर ऑफ अलाईड पॉवर्स ’चे लघुरूप.)

‘ स्कॅप ’चा नोकरवर्ग फार मोठा होता. त्याचे नेतृत्व जनरल डग्लस मॅक्-ऑर्थर करीत होते. त्यांच्या हाताखाली तीन हजार अधिकारी काम करीत होते. त्यात लष्कर, आर्थिक पुनर्रचना, शेती, शिक्षण, समाजकल्याण, राज्यघटना यांचे तज्ज्ञ होते. या तज्ज्ञांच्या सल्ल्याने जपानचे मंत्रिमंडळ कार्य करीत होते. या सर्व तीन हजार तज्ज्ञांचा व इतर नोकरवर्गाचा खर्च जपानने सोसायचा होता. अमेरिकन घटना तज्ज्ञांनी सुचवल्याप्रमाणे जपानच्या संसदेने ३ नोव्हेंबर १९४६ रोजी नवी घटना मंजूर केली. ३ नोव्हेंबर हा जपानचे पराक्रमी सम्राट मेईजी यांचा जन्मदिवस होता. आजही ३ नोव्हेंबर हा दिवस जपानमध्ये सम्राट मेइजींच्या स्मरणार्थ ‘ सांस्कृतिक दिन ’ म्हणून पाळला जातो.

नव्या घटनेनुसार २२ मे १९४६ रोजी पंतप्रधान शिगेस योशिदा यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. योशिदा हे अत्यंत कल्पक, ध्येयनिष्ठ आणि कर्तबगार नेते होते. जपानवर लष्कर, नौदल, विमानदल न ठेवण्याचा निर्बंध आपल्या हिताचाच आहे, कारण त्यामुळे राष्ट्राच्या खर्चाचा बराच मोठा भाग वाचेल व तो पैसा जपानच्या आर्थिक पुनरुज्जीवनासाठी वापरता येईल हे त्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यांना पटवून दिले. विजेत्या राष्ट्राने घातलेल्या कडक निर्बंधांचाही देशाच्या हितासाठी कसा फायदा करून घेता येतो याचे प्रात्यक्षिकच पंतप्रधान योशिदा यांनी जगाला दाखविले.

योशिदा अनुभवी शास्ते होते. रोममधील जपानचे राज्यप्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले. शिदेहे मंत्रिमंडळात त्यांनी परराष्ट्रमंत्रिपद भूषविले होते. महायुद्धाच्या अखेरच्या दिवसात त्यांना दोस्त राष्ट्रांच्या लष्कराचा तुरुंगवासही घडला होता. “युद्धात अपयश मिळाले, तरी मुत्सद्देगिरीने युद्धातील पराभव धुऊन काढता येतो, पुनः विजय मिळविता येतो.” हे त्यांनी घोषित केलेले तत्त्व त्यांनी प्रत्यक्षात आणून दाखविले. त्यांची राष्ट्रभक्ती वादातीत होती. त्यांनी अधिकार-

सूत्रे ग्रहण केली, तेव्हाची परिस्थिती अतिशय गंभीर होती. अनेक क्षेत्रांत आवाहने उभी होती. बेकार कामगारांची निदर्शने होत होती. लोक अन्नासाठी रस्त्या-रस्त्यातून मोर्चे काढीत होते.

एकीकडून अमेरिकेची अरेरावी व दुसरीकडून संपूर्णपणे हतबल झालेल्या राष्ट्राचा केविलवाणा आक्रोश या दोन्हींची आव्हाने पेलून योशिदांनी ज्या धैर्याने राष्ट्राची धुरा वाहिली, ती जगाच्या इतिहासात केवळ अपूर्व म्हटली पाहिजे.

जपानवर अमेरिकेचे प्रभुत्व आले, याचे कम्युनिस्टांना वैषम्य वाटतच होते. पण अमेरिकेनेच जपानवर विजय मिळविल्यामुळे या प्रभुत्वाला उघड विरोध करणे त्यांना शक्य नव्हते. म्हणून कम्युनिस्टांनी संपाच्या हत्याराने नव्या जपानी सरकारचे बळ खच्ची करण्याचा घाट घातला. कम्युनिस्टांनी जपानभर संप पुकारण्याचा इरादा व्यक्त केला, तेव्हा पंतप्रधान योशिदा यांनी संपवाल्यांना 'देशद्रोही' म्हटले आणि त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याची घोषणा केली. त्याने कम्युनिस्टांना अधिकच चिथावणी मिळाली. त्यांनी १ फेब्रुवारी १९४७ रोजी जपानभर संप करण्याची घोषणा केली. या देशव्यापी संपातून कम्युनिस्टप्रणित क्रांती होऊन देश कम्युनिस्टांच्या वर्चस्वाखाली जाईल, अशी भीती वाटून सुप्रीम कमांडर मॅक्ऑर्थर यांनी जपान सरकारच्या कामकाजात हस्तक्षेप केला आणि संभाव्य संप ऐन वेळी थोपविला आणि पंतप्रधान योशिदा यांनी नव्या निवडणुका घेऊन लोकांचा आपल्यावर विश्वास आहे हे सिद्ध करावे, असे योशिदांना कळविले.

ता. २५ एप्रिल १९४७ रोजी जपानमध्ये निवडणुका झाल्या. त्यात योशिदांचा लिबरल पक्ष पराभूत झाला. 'जपान सोशॅलिस्ट पक्षाला १४३ जागा मिळाल्या. योशिदांच्या लिबरल पक्षाला १३१ जागा मिळाल्या आणि डेमॉक्रॅटिक पक्षाला १२६ जागा मिळाल्या. २५ मे रोजी श्री. तेत्सु कटायामा यांच्या नेतृत्वाखाली जपानमध्ये पहिले सोशॅलिस्ट मंत्रिमंडळ अधिकारावर आले.

श्री. कटायामा यांच्या नेतृत्वाखाली समाजवादी मंत्रिमंडळाने जपानमध्ये अनेक सुधारणा केल्या. ज्या कामगार कायद्यामुळे पूर्वीचे मंत्रिमंडळ कोसळले, त्यात बदल केला, बेकारीच्या काळात कामगारांना विम्याचे पैसे मिळण्याची तरतूद केली, फौजदारी गुन्ह्यांसंबंधीच्या पूर्वीच्या कायद्यात सुधारणा केली आणि कौटुंबिक हक्काविषयीचे सिव्हिल कोडही अधिक प्रगतीशील केले. पण देशाच्या अर्थरचनेवर समाजवादी प्रभाव पाडण्यात या मंत्रिमंडळाला फारसे यश आले नाही. याच वेळी सत्ताधारी समाजवादी पक्षातच फूट पडली. त्या पक्षातील डाव्यांनी पक्षांतर्गत गट स्थापन करून अंदाजपत्रकाचा काही भाग रद्द करण्याची मागणी केली. समाजवादी राजवटीत लोकांना राहणीच्या मानात काहीच सुधारणा दिसून येईना. चलनफुगवटा धोक्याच्या पातळीपर्यंत चढला. सर्व दिशांकडून आलेल्या

या दबावामुळे फेब्रुवारी १९४८ मध्ये कटायामा मंत्रिमंडळाला राजीनामा देणे भाग पडले.

त्यानंतर डॉ. आशिडा यांचे समाजवादी–डेमॉक्रॅटिक पक्षांचे संमिश्र मंत्रिमंडळ अधिकारावर आले. हा काळ युरोप आणि पॅसिफिक या दोन्ही विभागांत अतिअनिश्चिततेचा होता. पूर्व युरोपमधील काही राष्ट्रे रशियाच्या वर्चस्वाखाली आली. महायुद्धात दोस्त म्हणून ज्यांनी एकत्र काम केले, त्या राष्ट्रांत दोन ठळक गट पडले, इतकेच नव्हे तर त्यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले. म्हणजे प्रत्यक्ष शस्त्रास्त्रांचे संघर्ष न होता वैमनस्य वाढत राहिले. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स एका बाजूला आणि रशिया दुसऱ्या बाजूला असे हे दोन गट पडले. आशिया व पॅसिफिक विभागातही हीच बदलाची व अनिश्चित परिस्थिती होती.

जपानचे नेतृत्व नष्ट झाले पण त्याची जागा घेणारे दुसरे आशियाई नेतृत्व न आल्यामुळे त्या भागाच्या राजकीय क्षेत्रात पोकळी निर्माण झाली होती. चीनमधील चँग कै शेक यांचे राष्ट्रीय सरकार पूर्वी अमेरिकेशी एकनिष्ठ होते, पण त्या भागातही माओ त्से तुंग यांच्या कम्युनिस्ट पक्षाचे सामर्थ्य इतके वाढले होते की चँग कै शेक यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होण्याची शक्यता उघड दिसत होती, अशा आंतरराष्ट्रीय राजकीय अस्थिर परिस्थितीत जपानचीही अंतर्गत परिस्थिती अस्थिरच होती. याच दडपणाखाली डॉ. आशिडा यांचे संमिश्र मंत्रिमंडळ अधिकार स्वीकारानंतर थोडचाच काळात अपेक्षेप्रमाणे कोसळले. पुन्हा सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे ठरले, पण दरम्यान १८ ऑक्टोबर १९४८ रोजी शिगेरू योशिदा यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाकडे पुन्हा राज्यकारभार सोपवावा लागला.

आशिया आणि पॅसिफिक या विभागातील बदलत्या परिस्थितीचा अमेरिकेला विचार करावा लागला. यामुळे ट्रुमन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. जपानने लष्करीदृष्टया प्रबळ होऊ नये म्हणून जपानला शक्य तेवढे दडपण्याचे आतापर्यंतचे अमेरिकेचे धोरण होते. पण माओ त्से तुंग आणि हो चि मिन्ह यांच्या वाढत्या सामर्थ्यामुळे आता जपान हा मुख्य शत्रू राहिला नाही तर कम्युनिझम हा अमेरिकेचा मुख्य शत्रू झाला. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्शल यांनी युरोपमधील राष्ट्रांच्या आर्थिक पुनरुज्जीवनाची मार्शल योजना आखली. तसेच आशियात जपानला बळकट करून त्या देशांतर्फे आशियात कम्युनिझमला थोपविण्याचा प्रयत्न करावा असे अमेरिकेचे नवे धोरण ठरले.

या नव्या धोरणामुळे सुप्रीम कमांडर ऑफ अलाईड पॉवर्स संघटनेमध्ये दोन तट पडले. सनातनी अधिकाऱ्यांना आपल्या कट्टर शत्रूवर –जपानवर मेहर नजर करावी हे पसंत नव्हते. उलट जपानला बळकट करणे अमेरिकेच्याच हिताचे आहे

असे अधिक प्रगतीशील अधिकाऱ्यांना वाटत होते. अमेरिकेने हजारो मैल अंतरावर आशियात वाढत्या कम्युनिझमच्या प्रभावाविरुद्ध लढण्यापेक्षा त्या भागातीलच जपानसारखे राष्ट्र या लढ्यात कम्युनिस्टांविरुद्ध सज्ज करणे हा अधिक शहाण-पणाचा मार्ग होता.

पंतप्रधान योशिदा यांना अमेरिकेच्या या बदलत्या धोरणाची पूर्णपणे समज आली. या नव्या धोरणाचा जपानच्या विकासासाठी व हितासाठी कसा फायदा घेता येईल इकडे योशिदा यांनी मुत्सद्देगिरीने सर्व लक्ष केंद्रित केले. पूर्वीचे वैर विसरून अमेरिकेच्या या नव्या मनःस्थितीचा पुरेपूर फायदा उठविण्याचे त्यांनी ठरविले. याच वेळी अमेरिकेने जपानच्या आर्थिक प्रगतीसाठी शिकागोचे जगप्रसिद्ध बँकर जोसेफ डॉज यांना जपानचे आर्थिक सल्लागार म्हणून पाठविले आणि त्यांना अमेरिकेच्या कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा दिला. डॉज हे द्रष्टे अर्थतज्ज्ञ होते. त्यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन जपानचे आर्थिक पुनरुज्जीवन करण्याचे पंत-प्रधान योशिदा यांनी ठरविले. मुत्सद्देगिरीत वाकबगार असलेल्या पंतप्रधान योशिदांनी श्री. डॉज यांचे हार्दिक स्वागत केले व जपानच्या इतिहासातील सर्वांत बिकट काळात धडाडीचे व योग्य निर्णय घेऊन आजच्या समृद्ध जपानचा पायाच घातला.

अर्थमंत्री हयातो इकेडो हेही अत्यंत कार्यक्षम आणि आपल्या क्षेत्रातील मोठे तज्ज्ञ होते. त्यांनी डॉज यांचे क्रांतिकारी धोरण धडाडीने अमलात आणण्यास प्रारंभ केला. यापुढच्या काळात जपानचे सारे चित्र पालटले. आतापर्यंत अमेरिका विरुद्ध जपान हे दृश्य होते. यापुढे आणि आजतागायत ते अमेरिका आणि जपान यांचे सहकार्य असे जोमदार चित्र झाले. डॉज यांच्या आगमनानंतर जपानवरची अमेरिकेच्या लष्करशाहीची पकड सैल झाली आणि सहकार्याचे, आर्थिक प्रगतीचे नवे खुले वारे देशभर वाहू लागले.

डॉज यांच्या सल्ल्याप्रमाणे पंतप्रधान योशिदा यांनी सरकारी कारभारात काटकसर आणि नोकरकपातीचे धोरण अमलात आणले. नोकरकपातीची संधी घेऊन योशिदा यांनी सरकारातील शेकडो ' रॅडिकल्स ' किंवा अतिभडक नोकरांची हकालपट्टी करून सरकारी नोकरवर्गात एकसंधपणा आणला. सरकारी धोरणा-नुसार अनेक कारखान्यांनीही नोकरकपात केली आणि कामगारवर्ग सुटसुटीत केला.

काटकसरीबरोबरच उत्पादनवाढ हेही योशिदा यांचे तत्त्व होते. नोकर-कपात केल्याने संप आणि कामगारातील अस्वास्थ्य यांचे प्रमाणही कमी झाले. अमेरिका आणि रशिया यांच्यामधील शीतयुद्धाचा फायदा घ्यायचा, तर जपानच्या हिताचा असा करार अमेरिकेबरोबर करावा असे योशिदा यांनी ठरविले. या-

प्रमाणे त्यांनी राजकीय हालचाली केल्या. त्यांनी १९५० मध्ये त्यासाठी अर्थमंत्री इकेडा यांना वॉशिंग्टनला पाठविले. यानंतर काही दिवसांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री जॉन फॉस्टर डलेस यांनी टोकियोला भेट दिली आणि प्राप्त परिस्थितीत जपानने मर्यादित शस्त्रास्त्रे व सैन्य ठेवण्यास हरकत नाही, अशी शिफारस त्यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना केली.

ता. २५ जून १९५० रोजी कोरियन युद्धास प्रारंभ झाला. उत्तर कोरियाच्या आक्रमणाचे अंतिम उद्दिष्ट सेऊल नसून टोकियो हे आहे, अशी भीती अनेक जपानी नेत्यांना वाटली. त्यांचे हे मत लक्षात घेऊनच जपानने पुन्हा काही प्रमाणात सशस्त्र व्हावे असे परराष्ट्र मंत्र्यांनी सुचविले. पण योशिदा यांनी या सूचनेस स्पष्ट नकार दिला. जपानने या वेळी लष्करावर खर्च केला, तर ढासळणारी अर्थव्यवस्था सावरणे अधिकच कठीण जाईल असे सांगून त्यांनी युद्ध-समाप्तीचे वेळी अमेरिकेने केलेल्या कराराकडे बोट दाखविले आणि उत्तर कोरियाने जपानने आक्रमण केलेच तर अमेरिकेनेच जपानचे संरक्षण केले पाहिजे असा आग्रह धरला. शेवटी बऱ्याच वाटाघाटी होऊन योशिदांचे तत्त्व मान्य झाले आणि ८ सप्टेंबर १९५१ रोजी सॅन्फ्रॅन्सिस्को येथील ऑपेरा हाऊसमध्ये जपान व अमेरिका यांच्यातील शांतता करारावर सह्या झाल्या.

या शांतता करारानुसार अमेरिकेने जपानच्या संरक्षणासाठी जपानमध्ये सैन्य ठेवावे असे ठरले. या कराराला खुद्द जपानमध्ये काही नेत्यांनी विरोध केला. जपानवरचा विजय सर्व दोस्त राष्ट्रांनी मिळवला असताना एकट्या अमेरिके-बरोबरचा करार जपानच्या हिताचा नाही असे त्यांचे म्हणणे होते. पण पंतप्रधान योशिदा यांनी या वेळी खंबीर धोरण स्वीकारून सर्व विरोध मोडून काढला सध्याच्या परिस्थितीत, अमेरिका व रशिया एकाच करारावर सह्या करणे अशक्य आहे हे ओळखून त्यांनी विरोधकांना आव्हान केले की त्यांनी केवळ सैद्धांतिक बाजू न मांडता वास्तववादी दृष्टिकोनातून या कराराचा विचार करावा. या नव्या शांतता कराराने सुप्रीम कमांड ऑफ अलाईड पॉवर्स ही संघटना बरखास्त होणार होती व अमेरिकेचे जपानवरील प्रत्यक्ष नियंत्रण सैल होणार होते हा योशिदांच्या मुत्सद्देगिरीचा फार मोठा विजय होता.

या कराराने जपानचे काही तोटेही झाले. रशिया नाराज झाला आणि त्याने व्हेटोचा हक्क वापरून जपानला यूनोत प्रवेश देण्यात मनाई केली. चीन-मधील चँग कै शेक यांच्या दुर्बळ सरकारला मान्यता व पाठिंबा देणे जपानला भाग पडले हा दुसरा एक तोटा झाला.

या सुमाराला घडलेल्या एका प्रसंगाने सबंध जगाला धक्का दिला. हा प्रसंग म्हणजे जन. मॅक्‌ऑर्थर यांची बडतर्फी. अमेरिकेस जन. मॅक्‌ऑर्थर यांच्या परा-

क्रमाबद्दल अपार आदर होता. पण त्यांनी केलेल्या एक जाहीर निवेदनामुळे अमेरिकेचे धोरण लोकनियुक्त राष्ट्राध्यक्षांनी ठरवायचे की लष्करी अधिकाऱ्यांनी ठरवायचे असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला. जन. मॅक्‌ऑर्थर यांनी १९५१ च्या मार्चमध्ये असे जाहीर केले की, यालू नदीच्या पलीकडील चिनी प्रदेशावर अमेरिकन सैन्य स्वारी करून तो प्रदेश ताब्यात घेईल. अमेरिकन सरकारचे असे काहीच धोरण नव्हते. तेव्हा राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांनी मॅक्‌ऑर्थर यांना तातडीने भेटायला बोलावले. त्यांच्यातील चर्चेनंतर ट्रुमन यांनी मॅकऑर्थर यांना बडतर्फ केले आणि अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरण लोकनियुक्त प्रतिनिधीच ठरवतात, या तत्त्वावर मोठ्या धैर्याने शिक्कामोर्तब केले.

जपानवर टाकलेले अणुबाँब आणि जन. मॅक्‌ऑर्थर यांची बडतर्फी हे राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांचे दोन अत्यंत धडाडीचे निर्णय होते. अमेरिकेच्या घटनेप्रमाणे राष्ट्राध्यक्ष हे तिन्ही संरक्षणदलाचे प्रमुख असतात. संरक्षणदलाने बंड करून लोकशाही व्यवस्था ताब्यात घेऊ नये म्हणून ही तरतूद करण्यात येते. भारतानेही आपल्या घटनेत अशी व्यवस्था केली आहे. ‘स्कॅल्प’ (सुप्रीम कमांडर ऑफ अलाईड पॉवर) शांतता करारानुसार बरखास्त झाल्यावर अमेरिकेचे जपानमधील राज्य प्रतिनिधी म्हणून रॉबर्ट मर्फी हे व्यावसायिक मुत्सद्दी आले. या घटनेला महत्त्व आहे ते अशासाठी की शांतता कराराने जपानवरील अमेरिकेचे लष्करी नियंत्रण जाऊन नागरी, सौम्य मार्गदर्शनाची भूमिका अमेरिकेने घेतली.

मात्र शांतता करारावर सह्या झाल्यानंतर तीन दिवसांनी जपानमधील अतिरेक्यांनी टोकियोत उग्र निदर्शने केली. अमेरिकन मोटारींना त्यांनी आगी लावल्या आणि अमेरिकेचा तीव्र शब्दांत निषेध केला. जपानी पोलिसांनी एक हजार लोकांना अटक केली. या निदर्शनात एका निदर्शकाचा मृत्यू झाला आणि शेकडो लोक जखमी झाले. पंतप्रधान योशिदा यांची लोकप्रियता ढासळू लागली त्याचे आणखी कारण म्हणजे या वेळी २ लक्ष ६० हजार अमेरिकन सैनिक जपानमध्ये होते. आपला देश स्वतंत्र असतानाही एवढे अवाढव्य परकीय सैन्य या लहानशा देशात आणावे हे जनतेला नापसंत होते. प्रतिनिधीगृहात योशिदा यांना विरोध होऊ लागला. तेव्हा १९५२ मध्ये त्यांनी ते गृह बरखास्त केले. त्यामुळे पक्षातील त्यांचे स्थानही डळमळीत झाले आणि लोकमताच्या दडपणापुढे त्यांना नमते घ्यावे लागून १९५४ मध्ये पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला.

त्याच वर्षीच्या डिसेंबरमध्ये इचिरो हटोयामा हे जपानचे पंतप्रधान झाले. त्यांचे प्रमुख सहकारी इचिरो कोनो हे होते. त्या दोघांनाही ‘स्कॅल्प’ने युद्धात दोषी ठरवले होते म्हणून त्यांची मनोभूमिका अमेरिकाविरोधी होती. आपले स्थान टिकावयाचे असेल तर जपानी जनतेच्या अमेरिका-विरोधाच्या खतपाणी घातले

पाहिजे, हे दोघांनीही धूर्तपणे ओळखले होते. जपानने संरक्षणदृष्ट्या बळकट होऊ नये म्हणून अमेरिकेने घटनाबदल करवून घेऊन जे निर्बंध घातले होते, ते पुन्हा घटनेत बदल करून घेऊन दूर करावेत असे या दोन नेत्यांनी आवाहन केले. रशियाबरोबर त्यांनी पुन्हा संवाद साधला. थोडक्यात म्हणजे जपान हे अमेरिकेच्या हातातील बाहुले नसून स्वतंत्र विचार करणारे, स्वतंत्र धोरण ठरविणारे स्वायत्त राष्ट्र आहे अशी जपानची नवी प्रतिमा घडविण्यावर पंतप्रधान हटोयामा आणि कोनो यांनी भर दिला. जपानच्या विकासात हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३० दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

६

# जगातील सर्वांत प्रगत राष्ट्र म्हणून जपानचा सन्मान

पंतप्रधान हटोयामा यांच्या कारकीर्दीत रशियाबरोबर जपानने उत्तम सुसंवाद साधला. इकिडो कोनो यांनी रशियाबरोबरच्या कराराची पार्श्वभूमी मोठ्या परिश्रमाने तयार केली. ऑक्टोबर १९५६ मध्ये पंतप्रधान हटोयामा मॉस्कोला गेले. त्यांनी रशियाबरोबर राजकीय संबंध पुन्हा स्थापन केले व त्या देशाबरोबरच्या करारावर १९ ऑक्टोबरला सही केली. थोड्याच दिवसांत रशियाने जपानला युनोत प्रवेश देण्यातील आडकाठी दूर केली आणि १८ डिसेंबर १९५६ रोजी जपानला युनोत प्रवेश मिळाला.

त्यापूर्वी १९५५ मध्ये हटोयामा यांचा डेमॉक्रॅटिक पक्ष आणि ओगॅटो यांचा लिबरल पक्ष यांचे विलीनीकरण होऊन जपानमध्ये दोनच प्रमुख पक्ष राहिले. हळूहळू अमेरिकेप्रमाणे जपानमध्येही द्विपक्षीय राजकीय रचना झाली. आता जपान आर्थिक बाबतीतही बळकट होऊ लागला होता. १९४५ ते १९५२ हा काळ जपानच्या इतिहासातील अत्यंत निराशेचा व बिकट होता. पण नंतर जपान राजकीय व आर्थिकदृष्ट्या खूपच सावरला.

जपानने १९५५ नंतरच्या दहा वर्षांत एवढी प्रचंड आर्थिक प्रगती केली की ' सुवर्णकाळ ' या नावाने त्याचा उल्लेख होऊ लागला. त्याचा प्रारंभ हटोयामा मंत्रिमंडळाने घोषित केलेल्या आर्थिक पुनरुज्जीवनाच्या सहा कलमी योजनेने झाला. पाश्चात्य तंत्रज्ञान आत्मसात करून घेऊन कमी खर्चाच्या कामगारशक्तीच्या आधाराने पाश्चात्यांशीच चढाओढ करून ही स्पर्धा जिंकणे हा या नव्या योजनेचा गाभा होता. डिसेंबर १९५५ मध्ये हटोयामा मंत्रिमंडळ जाऊन माजी अर्थमंत्री इशिबाशी यांचे मंत्रिमंडळ आले. पण प्रकृतीअस्वास्थ्यामुळे त्यांनी राजीनामा दिला आणि फेब्रुवारी १९५७ मध्ये नोबसुकी किशी यांचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले.

किशी हे पूर्वी परराष्ट्रमंत्री होते व दोन राजकीय पक्षांच्या एकत्रीकरणात त्यांनी प्रमुख भाग घेतला होता.

युद्धसमाप्तीनंतर पाच-सहा वर्षे जपानचे राहणीमान पार ढासळले होते. पण १९५७ मध्ये ते पूर्वीपेक्षा २७ टक्क्यांनी वाढले. जपानी मालाने भराभर परकीय बाजारपेठा काबीज केल्या. जहाज-बांधणीत जपान पूर्वीही अग्रेसर होता पण युद्धातील बाँबहल्ल्यामुळे बहुतेक जहाजबांधणी कारखाने व गोद्या नष्टप्राय झाल्या होत्या. जपानने त्या सर्वांची पुन्हा उभारणी केली आणि १९५७ मध्ये अनेक देशांच्या जहाजबांधणीची कामे मिळविली. आज याकोहोमा हे जगातील सर्वांत मोठे जहाजबांधणी केंद्र असून जगातील पन्नास टक्के जहाजबांधणी एकटचा जपानमध्ये होते.

सन १९५९ च्या सुमारास टेलिव्हिजन उद्योगास उधाण आले. १९५६ पासूनच्या तीन वर्षांत जपानमधील टी. व्ही. धारकांची संख्या वीसपट झाली. जपानी उद्योजकांनी टी. व्ही. बरोबरच टेपरेकॉर्डर, कॉम्प्युटर्स वगैरे उपकरणांवरही लक्ष केंद्रित केले. जगातील सर्वच प्रगत देशात आता या वस्तू चैनीच्या राहिल्या नसून दैनंदिन गरजेच्या झाल्या आहेत. या मालांचे जपानी कारखाने 'फुल कपॅसिटी' पर्यंत (कमाल उत्पादन) चालू राहू लागले. उत्तम तंत्र आणि उत्कृष्ट बनावट असूनही पाश्चात्यांच्या तुलनेने स्वस्थ किमती या मुळे इलेक्ट्रॉनिक्सची बाजारपेठ जपानने झपाट्याने काबीज करण्यात सुरुवात केली. आज जपान या क्षेत्रात क्रमांक एकचे राष्ट्र आहे. पोलाद आणि मोटारउत्पादन हे धंदेही जपानने १९५७ ते १९६७ या काळात अनेक पटींनी वाढवून जागतिक बाजारपेठांवर आपला प्रभाव पाडला.

पंतप्रधान किशी यांनी अशा द्रुत बदलाच्या वेळी अधिकारसूत्रे घेतली की त्यांच्या मंत्रिमंडळाला विरोध होणे साहजिकच होते. जपानी मंत्रिसमाज आता 'मास सोसायटी' म्हणजे प्रचंड प्रमाणावर उलाढाली करणारा समाज झाला. टेलिव्हिजन घरोघर आला होता. वर्तमानपत्रांचे खप अपूर्व वाढले. नियतकालिकांचा (मॅगेझिन्स) खपच एक कोटी वीस हजारांवर गेला. रेडिओ पूर्वीपासूनच काना-कोपऱ्यात पोहोचला होता. १९५७ पासून जपानमध्ये अमेरिकाविरोधी सूर वाढू लागला होता. त्याची अनेक कारणे आहेत. युद्ध समाप्तीच्या वेळी जी मुले आठ-दहा वर्षांची होती ती आता तरुण झाली होती आणि त्यांच्यात राष्ट्रीय भावना प्रकर्षाने उफाळत होती. अणुबाँब टाकून ज्या अमेरिकेने जपानला निर्दय शिक्षा केली त्या अमेरिकेचे वर्चस्व मानायला ही तरुण पिढी तयार नव्हती. जपान आता आर्थिकदृष्टया बळकट झाला होता, संपन्न झाला होता आणि सर्व प्रकारचा जपानी

माल पाश्चात्यांच्या मालापेक्षाही वरचढ असताना कुठल्यातरी जुन्या कालबाह्य कराराला मान देऊन जपानने अमेरिकेचे आश्रित म्हणून राहावे हे बहुसंख्य जनतेला नापसंत होते. फुकरू मारू येथे झालेल्या एका प्रकरणामुळे जपानी जनतेच्या भावना अधिकच प्रक्षुब्ध झाल्या होत्या. अमेरिकेने पॅसिफिकमध्ये बिकीनी अरॉस येथे हैड्रोजन बाँबची चाचणी केली. त्या वेळी या बेटाजवळून जात असलेल्या एका जपानी बोटीचे नुकसान झाले आणि बाँबस्फोटाचा परिणाम म्हणून एक खलाशी मरण पावला. अर्थातच अमेरिका पुन्हा अणुबाँबपेक्षा अधिक संहारक अशा बाँबचा शोध लावीत असून जपानला त्याचा उपद्रव होत आहे म्हणून जपानभर अमेरिकाविरोधी संतापाची लाट उसळली. अमेरिकेबाबत जपानने खंबीर भूमिका घ्यावी म्हणून जपानभर उग्र निदर्शने झाली आणि किशी सरकार हादरले. या निदर्शकांना वठणीवर आणण्यासाठी पोलिसांना अधिक अधिकार देणारे विधेयक किशी मंत्रिमंडळाने डिएटमध्ये मांडले तेव्हा तर आगीत तेल ओतल्यासारखे झाले आणि जनमत किशीच्या विरोधी झाले. हे विधेयक संमत करता यावे म्हणून डिएटची मुदत संपली असतानाही पंतप्रधान किशी यांनी ती मुदत वाढविली. तेव्हा लोकमताचा भडका उडाला आणि किशी यांना आपले विधेयक रेटणे अशक्य झाले.

अमेरिका व जपान यांच्यातील कराराला आता सुधारणा करून नवा करार करावा असे किशी यांनी ठरविले. जपान आता युनोचा सभासद असल्याने युनोचा जाहीरनामा आणि सुरक्षा मंडळाची मार्गदर्शक तत्त्वे यांचा फायदा जपानला मिळावा म्हणून पूर्वीच्या करारात सुधारणा करण्याचा त्यांचा विचार होता. पण त्यांच्या या योजनेला जपानमध्ये अभूतपूर्व विरोध झाला. लाखो लोकांनी उग्र, हिंसक निदर्शने केली. कारण अमेरिकेबरोबर करार करायचा म्हणजे अमेरिकेचे वर्चस्व व नियंत्रण नव्याने मान्य करायचे. जपान हा पूर्णपणे स्वतंत्र देश असल्याने ही स्वाभिमानशून्य भूमिका किशी सरकारने घेऊ नये असे निदर्शकांचे मत होते.

टोकियोत एक दिवस तीन लक्ष लोकांनी विराट निदर्शन केले. आणि आपल्या पायाखालची वाळू सरकत असल्याची किशी यांना जाणीव झाली. पण अमेरिकेबरोबर सुधारित करार केल्यानंतरच पंतप्रधानपद सोडायचे असा त्यांचा निश्चय होता. १९ जून १९६० रोजी अमेरिकेचे तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष आयसेनहोअर हे जपानला भेट देणार होते. त्या वेळी या करारावर सह्या व्हाव्यात असा त्यांचा निकराचा प्रयत्न होता. पण १९ मे रोजी डिएटची मुदत संपत होती. तरीही करारास डिएटची मान्यता मिळाली नाही म्हणून किशी यांच्या पक्षाने डिएटचे अधिवेशन आणखी पन्नास दिवस वाढवावे असे विधेयक मांडले. विरोधी सोशॅलिस्ट पक्षाने त्या विधेयकाला कडाडून विरोध केला. किशी हे अमेरिकेचे हस्तक आहेत,

देशाचे शत्रू आहेत, अशा प्रचाराला ऊत आला. सोशॅलिस्ट पक्षाने डिएटवर बहिष्कार घातलाच, पण किशी यांच्या संमिश्र पक्षातील अनेक नेतेही किशीच्या विरुद्धच्या निदर्शनात सामील झाले.

विरोधी पक्षाने बहिष्कार घातला असताही सर्व दडपणांना झुगारून २० मे १९६० रोजी किशी यांनी अमेरिकेबरोबरच्या करारात डिएटची मान्यता घेतली. १९ जून रोजी हे विधेयक आपोआप अमलात येणार होते. ज्या दिवशी आपल्या पक्षाच्या प्रतिनिधींच्या बळावर किशी यांनी हे विधेयक मंजूर करून घेतले, त्याच दिवशी त्यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याचा आपला इरादा जाहीर केला. हे विधेयक अशा प्रकारे जनतेच्या विरोधाची तमा न करता घाईघाईने व विरोधी पक्षाच्या गैरहजेरीत पंतप्रधान किशी यांनी मंजूर केलेले पाहून जपानमध्ये पुन्हा उग्र त्वेषाची लाट पसरली. अनेक हिंसक निदर्शनात राजकीय कार्यकर्त्यांचे खून झाले. इनेजिरो असानुमा या सोशॅलिस्ट पक्षाच्या नेत्याचा खून भरसभेत एका तरुणाने त्याच्या पोटात सुरी खुपसून केला. या तरुणाने नंतर पोलिस कोठडीत आत्महत्या केली.

जपान राष्ट्र असे संतापाने धगधगत असतानाच १९ जून रोजीच्या राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांच्या जपानभेटीच्या पूर्वतयारीसाठी त्यांचे प्रसिद्धीप्रमुख विल्यम हॅगर्टी हे टोकियोत १० जून रोजी आले. पण विमानतळावर जनतेने— विशेषतः कम्युनिस्टांनी— एवढी प्रखर निदर्शने केली की हॅगर्टी व अमेरिकेचे राज्यप्रतिनिधी यांची मोटार विमानतळावरून बाहेर काढणे अशक्य झाले. तेव्हा अमेरिकन लष्कराने हस्तक्षेप करून त्या दोघांना हेलिकॉप्टरने शहरात नेले.

त्यापूर्वी काही दिवस म्हणजे १ मे रोजी रशियाने अमेरिकेचे यू–२ जातीचे टेहळणी विमान पाडले आणि अमेरिका व रशियात तणाव विकोपाला गेला. ही घटना आणि जपानमध्ये अमेरिकेस होत असलेला तीव्र विरोध लक्षात घेऊन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी आपली जपानभेट रद्द केली. अमेरिका विरोधकांचा हा मोठाच विजय होता. पण शांतता करार आधीच मंजूर केल्याने १९ जूनपासून तो आपोआप अमलात आला.

जपानमध्ये झालेली अमेरिकाविरोधी निदर्शने अपूर्व होती. आतापर्यंत राज्यकर्त्यांचे हुकूम निष्ठेने पाळण्याची जपानी जनतेची परंपरा होती. पण आता वर्तमानपत्रे, जाहीरसभा, टेलिव्हिजन, रेडिओ, राजकीय पक्षांचा प्रचार आणि राज्यकर्त्यांचे धोरण विरुद्ध राष्ट्रहित यातला संघर्ष अशा बहुविध कारणांनी जनतेने प्रचंड चळवळ करून अखेर किशी यांना राजीनामा देणे भाग पाडले.

पाश्चात्य देशातील लोकशाहीचे वारे अशा रीतीने प्रथमच आतापर्यंतच्या सनातनी जपानमध्ये वाहू लागले. त्यानंतर बारा वर्षांनी अमेरिकेच्या जनतेने

निदर्शने व चळवळ करून राष्ट्राध्यक्ष निक्सन यांची केलेली पदच्युती व जपानी जनतेने किशी यांची केलेली हकालपट्टी यातले साम्य आश्चर्यजनक व उद्बोधक आहे.

या घटनेचा जपानवर दूरगामी परिणाम झाला. किशी यांच्यानंतर अधिकारावर आलेल्या कोणत्याही जपानी पंतप्रधानांना जनमताकडे सर्वस्वी दुर्लक्ष करणे शक्य झाले नाही. १८ जुलै १९६० रोजी किशी यांनी आपल्या पक्षाचे असाधारण अधिवेशन बोलावले. त्यात त्यांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा आणि पंतप्रधानपदाचा आपला राजीनामा जाहीर केला. त्यांच्या मागोमाग अर्थमंत्री हयाटो इकेडो हे पक्षाध्यक्ष व पंतप्रधान झाले. श्री. इकेडो यांच्या पहिल्याच जाहीर सत्कारात किशी यांच्यावर भरसभेत सुरीहल्ला करण्यात आला, यावरून त्यांच्या विरुद्धची जनतेतील तीव्र भावना लक्षात येते.

प्रक्षुब्ध राष्ट्राला शांत करून जनतेचा अनुनय करणे, भक्कम आर्थिक कार्यक्रम हाती घेऊन आणि सर्व परराष्ट्रांशी चांगले संबंध ठेवून व्यापार वाढविणे अशी अनेक बिकट कामे हयाटो इकेडो यांच्यापुढे होती. ते अर्थशास्त्रांत निपुण होते. योशिदांच्या दुसऱ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारून चलनवाढीला आळा घालण्याच्या कार्यात त्यांनी उत्तम यश मिळविले होते.

पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यावर इकेडो यांनी दहा वर्षांत जपानचे राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट करण्याचे जनतेला आश्वासन दिले. या घोषणेची जनतेवर चांगली छाप पडली. स्फोटक आंतरराष्ट्रीय राजकारण व अंतर्गत दुही यावरून लोकांचे लक्ष आर्थिक प्रगतीवर केंद्रित करण्यात पंतप्रधान इकेडो यशस्वी झाले. ओसामु शिमोमुरा या अर्थतज्ज्ञाच्या निष्णात सल्ल्याने इकेडो यांनी दहा वर्षांच्या संपन्न प्रगतीचा आराखडा तयार केला आणि तत्काळ त्या दिशेने कार्याला प्रारंभही केला. जपानच्या तंत्रविषयक ज्ञानाचा कमाल उपयोग जुन्या धंद्यात उत्पादनवाढ, नव्या क्षेत्रातील उद्योगधंदे वाढविणे आणि अधिकाधिक माल विकसित राष्ट्रांकडे निर्यात करणे, ही इकेडो यांच्या कार्यक्रमाची सूत्रे होती.

जपानने या काळात अनेक प्रगत राष्ट्रांकडून नव्या नव्या मालाची पेटंट्स आणली व जपानमध्ये त्या देशापेक्षाही स्वस्त माल उत्पादन करून पुन्हा तो माल त्याच देशाकडे निर्यात केला. स्वतःचे तंत्र-शास्त्र विकसित करून जपानने या दहा वर्षांत अनेक प्रकारच्या मालांत सुधारणा केली. जपानच्या आजच्या क्रमांक एकच्या राष्ट्राचा पाया या काळात घालण्यात आला. 'इकॉनमी फर्स्ट' (प्रथम आर्थिक प्रगती) हा इकेडो सरकारचा मंत्र होता. किशी सरकारच्या कारकीर्दीत द्विधा झालेल्या राष्ट्राने या मंत्राचा हार्दिक स्वीकार केला आणि सबंध जपान झपाट्याने आर्थिक प्रगती करू लागला.

जपानची आर्थिक स्थिती जसजशी सुधारू लागली, तशी त्या देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठाही वाढू लागली. इकेडा मंत्रिमंडळाच्या कारकीर्दीत जपानच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेकडा दहा टक्के वाढ होऊ लागली. म्हणजे दहा वर्षांत राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट करण्याचे त्यांचे आश्वासन प्रत्यक्षात येऊ लागल्याने जपानी जनता राजकीय कडवटपणा विसरून आर्थिक प्रगतीकडे आपले लक्ष केंद्रित करू लागली. स्वतःचे घर, स्वतःची मोटार व अशी सुखसाधने आतापर्यंत श्रीमंतांनाच उपलब्ध होती, पण आपण श्रम केले तर मध्यमवर्गाला व कनिष्ठ मध्यमवर्गीयालाही ती मिळविता येतात हे अनुभवाने सिद्ध झाल्याने लोक अधिक हिरीरीने उत्पादन करू लागले. चीनबरोबरचे जपानचे संबंध सुधारले आणि उभयदेशांना हितकारक असा व्यापारी करार या दोन देशांनी केला. ग्रामीण भागांतून अधिकाधिक लोक शहरांकडे उद्योगधंद्यासाठी जाऊ लागले आणि कमी माणसे लावून अधिक शेतमाल निर्माण करण्यासाठी शेतीच्या क्षेत्रांतही मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण झाले. जपानच्या या सर्वांगीण प्रगतीचा प्रभाव पडून ऑर्गनायझेशन ऑफ इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट या आंतरराष्ट्रीय दर्जेदार संघटनेत जपानला १९६४ मध्ये सहज प्रवेश मिळाला.

इकेडा राजवटीने गाजविलेले आणखी एक वेगळे पण मानाचे श्रेय म्हणजे 'ऑलिंपिक क्रीडा महोत्सव.' १९४५ मध्ये येथील अनेक भाग बेचिराख झालेल्या जपानने फक्त १९ वर्षांत एवढी प्रगती केली की १९६४ च्या ऑलिंपिक सामन्यांचे यजमानपद घेऊन अतिभव्य प्रमाणावर क्रीडामहोत्सव साजरा केला. अनेक देशांहून आलेले हजारो प्रतिनिधी जपानने दोन दशकात केलेल्या विलक्षण प्रगतीने थक्क झाले. जपानचे सम्राट हे या ऑलिंपिकचे आश्रयदाते (पेट्रन) होते. त्यांनी स्वतः देशोदेशींच्या खेळाडूंचे स्वागत केल्याने भाग घेणाऱ्या सर्वांनाच कृतार्थ वाटले. जपानची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढविण्यात या जागतिक ऑलिंपिकचा मोठाच हातभार लागला. जपानमध्येही त्यामुळे नवा आत्मविश्वास आला. विशेषतः जपानी महिलांनी व्हॉलिबॉलच्या सामन्यात रशियन महिलांशी दिलेल्या तोडीस तोड उत्तराने एका नव्या क्षेत्रांतही पराक्रम करण्यास जपान सिद्ध आहे हे दिसून आले.

ऑलिंपिक क्रीडा महोत्सवाने जपानचे वैभव नेत्रदीपक शिखरावर नेले असतानाच आशियातील राजकारण वेगळे वळण घेऊ लागले. चीनने अणुबाँबचा स्फोट करून सबंध जगाला धक्का दिला. चीनच्या या अनपेक्षित तांत्रिक प्रगतीने पाश्चात्यांचे धाबे दणाणले. या स्फोटाने अमेरिका व चीनचे संबंध दुरावले. दक्षिण व्हिएतनाममध्ये राष्ट्रीय विमोचन आघाडी विजयावर विजय मिळवीत होती आणि अमेरिकेसारख्या बलाढ्य जागतिक सत्तेला जेरीला आणीत होती.

पंतप्रधान इकेडा हे कॅन्सरने आजारी पडले आणि प्रतिष्ठेचे ऑलिंपिक सामने संपल्यावर दुसऱ्याच दिवशी त्यांनी प्रकृती-अस्वास्थ्याच्या कारणास्तव पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या जागी इसाकू सॅतो हे पंतप्रधान झाले. ते सात वर्षे आठ महिने पंतप्रधान होते. इकेडा सरकारच्या कारकीर्दीत जपान आर्थिकदृष्टचा प्रबल होत होता. अमेरिका व जपान यांच्या 'बॅलन्स ऑफ पेमेंट' मध्ये पूर्वी अमेरिकेचे पारडे जड होते, ते हळूहळू जपानच्या बाजूने झुकू लागले. सॅतो यांच्या कारकीर्दीत जपान बॅलन्स ऑफ पेमेंटमध्ये अमेरिकेच्या इतका पुढे गेला की जपानचे येन हे चलन जगातील एक अत्यंत प्रबल चलन झाले. इकेडा यांनी आशियातील राजकारणाबद्दल अलिप्ततेचे धोरण स्वीकारले होते. पण सॅतो सरकारने त्या क्षेत्रात अमेरिकेची री न ओढता आत्मविश्वासपूर्वक स्वतंत्र पावले टाकली. सॅतो यांनी दक्षिण कोरियाबरोबर व्यापारी करार केला. त्यामुळे जपानचे व उत्तर कोरियाचे संबंध ताणले गेले. पण सॅतो यांनी त्याची पर्वा केली नाही.

जपानने सॅतो यांच्या कारकीर्दीत आशियायी राष्ट्रांना आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. युद्धसमाप्तीनंतर प्रचंड प्रमाणात परदेशाकडून मदत घेणारा जपान आता स्वतःहोऊन इतर राष्ट्रांना आर्थिक मदत करीत असल्याचे दृश्य त्या देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उजळ करण्यास कारणीभूत झाले. जपानने मनिला येथील आशियाई विकास बँकेला भव्य प्रमाणावर आर्थिक मदत करून धनिक राष्ट्र म्हणून आपली प्रतिमा उंचावली. मात्र सॅतो यांनी आशियाई विकास बँकेला दिलेली ही मदत चीनला पसंत पडली नाही व चीनचे जपानशी संबंध दुरावले.

अंतर्गत बाबतीत सॅतो सरकारने असे धोरण स्वीकारले की आता जपानची आर्थिक स्थिती भरपूर बळकट झाली असल्याने आर्थिकऐवजी सामाजिक प्रगतीवर भर दिला पाहिजे. शिक्षण, महिलांची उन्नती, समाजसुधारणा, समाज कल्याण, आरोग्य यांना सॅतो सरकारने प्राधान्य दिले आणि जास्तीत जास्त खर्च या बाबीवर करण्यास सुरुवात केली. पण इकेडा राजवटीने आर्थिक प्रगतीच्या चक्राला दिलेली गती त्यामुळे मंद न होता उलट ती वाढलीच. कारण ज्या ध्येयाने इकेडा सरकारने उद्योगधंदे व व्यापार यांना उत्तेजन दिले होते, ते साध्य होऊन सरकारने त्यासाठी खास प्रयत्न करण्याची गरज उरली नसली, तरी उद्योगपती व व्यापारी यांनी आपल्या व देशाच्या हितासाठी ही गती चालूच ठेवली. याचा परिणाम म्हणजे १९६६ मध्ये 'इकॉनमिस्ट' या जगप्रसिद्ध नियतकालिकाने सर्वांत अधिक आर्थिक प्रगती करणारे राष्ट्र म्हणून जपानला पारितोषिक देऊन त्याचा आंतरराष्ट्रीय सन्मान केला.

औद्योगिक प्रगतीमुळे जपानच्या लोकसंख्येच्या विभागणीत महत्त्वाचे बदल झाले. खेडचातून लोक हळूहळू शहरांकडे आकर्षित होऊ लागले. उद्योगधंदे, उच्च

शिक्षण आणि व्यापार या तीन जबर. आकर्षणांनी त्यांना टोकियो, ओसाका, याकोहमा, नारा अशा मोठ्या शहरांत आणले. १९५५ मध्ये जपानमधील शहरातील लोकसंख्या देशातील एकंदर लोकसंख्येच्या ४५ टक्के होती ती १९६५ मध्ये ५८ टक्के तर १९७३ मध्ये ७० टक्के झाली. सध्या जपानच्या अकरा कोटी लोकसंख्येपैकी एकदशांश म्हणजे एक कोटी दहा लक्ष लोक एकट्या टोकियो शहरात राहतात! वीस वर्षांत निदान चार कोटी लोक खेड्याकडून शहरात वस्ती करण्यासाठी गेले. शेतीवर अवलंबून असलेल्या जपानी लोकसंख्येचे प्रमाण १९५५ मध्ये २२ टक्के होते, ते १९७५ मध्ये फक्त ७ टक्क्यांवर आले.

शहरातील वस्ती भरमसाठ वाढल्याने पहिला परिणाम झाला तो म्हणजे शहरात जागेची तीव्र टंचाई भासू लागली. इतकेच नव्हे, तर पाणीपुरवठा, वाहतूक, आरोग्यविषयक व्यवस्था यांवरही अपूर्व ताण पडला. एक मजली छोटी घरे हे पूर्वी जपानचे सौंदर्य होते. पण आता तेथे अमेरिकेसारख्या अनेक मजली इमारती दिसू लागल्या आणि स्वतंत्र बंगल्याऐवजी फ्लॅटसची संस्कृती आली.

जपानची या बाबतीतली एक महत्त्वाची अडचण म्हणजे वारंवार होणारे लहान–मोठे भूकंप. टोकियोत दरसाल तीनशे भूकंप होतात. अर्थात फार उंच इमारती बांधताना ही भौगोलिक अडचण लक्षात घेणे आवश्यक वाटू लागले. फार उंच इमारतींवर आपोआप अशी बंधने आली. टोकियो, ओसाका, कवासाकी अमॅगासाकी, योकाइची अशा औद्योगिक शहरांची रचना ग्रामीण जपानपेक्षा एकदम वेगळी झाली. प्रत्येक कुटुंबाजवळ एक किंवा अधिक मोटारी झाल्याने पार्किंग आणि मोटार अपघात हे नवे शहरी प्रश्न निर्माण झाले. मोठ्या शहरातील वाहतुकीसाठी भुयारी रेल्वे बांधणे आवश्यक झाले. अणुशक्तीवर चालणाऱ्या बोटी बांधण्यास जपानने १९६९ मध्येच सुरुवात केली.

एखाद्या देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा केवळ आर्थिक प्रगतीने वाढत नाही. विज्ञान, साहित्य, क्रीडा अशा अनेक इतर क्षेत्रांतील त्या देशाचे पराक्रमही ही प्रतिष्ठा वाढविण्याचे मोठे कार्य करीत असतात. जपानने याही क्षेत्रात नेत्रदीपक कार्य केले. डॉ. टोमोनागा यांना १९६५ चे पदार्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळाले. १९६८ मध्ये कवाबाटा यांना साहित्याचे नोबेल पारितोषिक मिळाले. १९७२ मध्ये सपाटो येथे हिवाळी ऑलिंपिक सामने भव्य प्रमाणावर घेतले गेले. १९७३ चे पदार्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक डॉ. इसाकी यांनी मिळविले. १९७४ मध्ये माजी पंतप्रधान इसाकू सॅतो यांना शांततेचे नोबल पारितोषिक मिळाले. त्यानंतरही विविध क्षेत्रांतील जपानी तज्ज्ञांनी हा आंतरराष्ट्रीय सन्मान मिळविला आहे.

महायुद्धात अमेरिकेने जपानची ओकिनावा बेटे आपल्या ताब्यात घेतली

होती. त्यांचा जपानकडे परत ताबा मिळावा म्हणून पंतप्रधान सॅतो यांनी परिश्रम केले. जागृत जपानच्या वाढत्या आकांक्षा केवळ आर्थिक प्रगतीमुळे पूर्ण होणार नसून ओकिनावा परत मिळवणे हे जपानी लोकांच्या राष्ट्रीयत्वास पोषक ठरेल हे त्यांनी ओळखले होते. अमेरिका व जपान यांच्या दीर्घकालीन सहकार्याचे व मैत्रीचे द्योतक म्हणून ओकिनावा जपानकडे द्यावे अशी सॅतो यांनी अमेरिकेचे तेव्हाचे अध्यक्ष जॉन्सन यांना विनंती केली. याबाबत सहानुभूतीने विचार करण्याचे आश्वासनही जॉन्सन यांनी दिले.

नोव्हेंबर १९६८ मध्ये झालेल्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे निक्सन हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. सॅतो यांनी ओकिनावाबद्दलचे आपले प्रयत्न चिकाटीने चालू ठेवले. त्यांनी निक्सन यांची भेट घेतली. १९७२ मध्ये ओकिनावा बेटांचा ताबा जपानला मिळेल असे आश्वासन पंतप्रधान सॅतो यांनी निक्सन यांच्याकडून मिळवले. या त्यांच्या कर्तबगारीचा जपानने एकमुखी सन्मान केला. सॅतो यांचे व त्यांच्या पक्षाचे त्यामुळे देशात एवढे वजन वाढले की नंतर लगेच झालेल्या निवडणुकीत त्यांच्या लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाने प्रचंड बहुमत मिळवून तीनशे जागा जिंकल्या ! अमेरिका हे मित्रराष्ट्र आहे ही भावना जपानमध्ये प्रबल झाली आणि जपान–अमेरिका सुरक्षा कराराची मुदत वाढविण्यात आली.

सन १९७० मध्ये जपानने ओसाका येथे जागतिक प्रदर्शन भरविले. १९६४ च्या ऑलिंपिकप्रमाणे या जागतिक प्रदर्शनानेही जपानची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उंचावली. जपानने उद्योगधंदे, इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, मोटार, स्कूटर्स, आगगाडी इत्यादी विविध क्षेत्रांत केवढी विलक्षण प्रगती केली आहे, हे लक्षावधी परकीयांनी समक्ष पाहिले. जपानबद्दल जगभर आता नवा आत्मविश्वास वाटू लागला.

जून १९७१ मध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाला अनपेक्षित कलाटणी देणारी धक्कादायक घटना घडली. ती म्हणजे ज्या चीनचे अस्तित्व अमेरिका आतापर्यंत नाकारीत होती, त्याच चीनला भेट देण्याची राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी घोषणा केली ! या घटनेचा जपानवर दूरगामी परिणाम झाला. कारण अमेरिकेचा मित्र म्हणून जपाननेही कम्युनिस्ट चीनला विरोध करून तैवानच्या राष्ट्रीय चीन सरकारला सतत पाठिंबा दिला होता. पण आता अमेरिकाच जर कम्युनिस्ट चीनशी सुसंवाद राखण्याचा प्रयत्न करीत असेल, तर जपानलाही आपल्या परराष्ट्रीय धोरणाचा फेरविचार करणे आवश्यक होते. अमेरिकेने कम्युनिस्ट चीनची प्रथमच दखल घेतली. तरी यूनोच्या आमसभेत तैवानच्या राष्ट्रीय सरकारलाच प्रतिनिधित्व हवे अशीही भूमिका अमेरिकेने घेतली. अमेरिकेचे दोस्त राष्ट्र म्हणून जपानलाही तीच भूमिका घ्यावी लागली. मात्र आमसभेत अमेरिकेची सूचना फेटाळली गेली आणि राष्ट्रीय चीनचे सभासदत्व जाऊन कम्युनिस्ट चीनला यूनोत प्रवेश

मिळाला.

याच सुमाराला जपानमध्ये एक उत्साहवर्धक घटना घडली. ती म्हणजे जपानचे सम्राट आणि सम्राज्ञी यांनी युरोपच्या सहा राष्ट्रांचा दौरा केला. १९२१ मध्ये सम्राटांचे पुत्र म्हणून हिरोहिटो यांनी युरोपला भेट दिली होती. आता पन्नास वर्षांहून अधिक कालानंतर ते पुन्हा युरोपला जात होते. राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी अँथरेडा विमानतळावर स्वतः सम्राटांचे स्वागत केले. पाश्चात्य जगात जपानबद्दल सदिच्छा वाढविण्यात सम्राट व सम्राज्ञी यांच्या भेटीने बरीच मदत झाली. १९७२ च्या सुरुवातीस ओकिनावी बेटे स्वतःकडे घेण्याचा ठराव जपानच्या संसदेने प्रचंड उत्साहाने संमत केला. १५ मे १९७२ रोजी भव्य समारंभाने जपानने या बंदरांचा ताबा अमेरिकेकडून घेतला. पंतप्रधान सॅतो यांनी जपानला दिलेली ही चिरंतन स्वरूपाची देणगी आहे. ओकिनावाच्या हस्तांतरानंतर लवकरच सॅतो यांनी राजीनामा दिला. केकुई तनाका हे लिबरल–डेमोक्रॅटिक पक्षाचे अध्यक्ष आणि जपानचे पंतप्रधान झाले. जुलै १९७२ मध्ये त्यांनी राष्ट्राची अधिकारसूत्रे आपल्या हाती घेतली.

इकेडो व सॅतो यांच्यापेक्षा वनाका यांची पार्श्वभूमी अगदी वेगळी होती. इकेडा व सॅतो हे पदवीधर होते. पण वनाका यांचे कॉलेजचे शिक्षणही झाले नव्हते. फक्त आठ वर्षांचे शालेय शिक्षण एवढीच त्यांची पुंजी होती. पण ते जनमताची नाडी ओळखण्यात पटाईत होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व उत्साहप्रेरक होते. काम करण्याची त्यांना जबरदस्त शक्ती होती. आपल्या कर्तृत्वाने व अढळ देशप्रेमाने ते कॅबिनेट दर्जाच्या मंत्रिपदापर्यंत पोहोचले होते. त्यांच्याकडे पोस्ट आणि टेलि-कम्युनिकेशन्स हे लहान खाते होते. पण पक्षात त्यांचे खूपच वजन होते. सर्वसामान्य जनतेला त्यांच्याविषयी नितांत जिव्हाळा वाटत असे. सोळाव्या शतकात टोयोटोमी हिडेयाशी हे सामुराई योद्धे अगदी गरीब शेतकरी घराण्यात जन्म घेऊनही अव्वल दर्जाचे राष्ट्रीय नेतृत्व करीत होते. वनाका यांची तुलना त्यांच्याशी करून जपानला सामान्य माणसातून वर आलेला पंतप्रधान मिळाला याबद्दल लोक आनंद व्यक्त करू लागले.

७

# पाश्चात्यांवर जपानचे आर्थिक आक्रमण

जपानमध्ये सम्राटांची दीर्घ परंपरा आहे. सध्याचे सम्राट हिरोहिटो हे १९२६ मध्ये राज्यावर आले आणि ५६ वर्षांहून अधिक काळ जपानचे प्रमुख आहेत. त्यांचे चिरंजीव राजपुत्र अकिहिटो यांनी सर्वसामान्यांच्या घराण्यातील एका मुलीशी विवाह करून जपानच्या सम्राटघराण्यात नवी प्रथा पाडली. आता-पर्यंतच्या सम्राटांच्या घराण्यातील विवाह राजघराणी किंवा उमरावांची घराणी यांतच होत असत. ती दीर्घ परंपरा राजपुत्र अकिहितो यांनी मोडली. त्यामुळे ते जपानमधील जनतेत अत्यंत लोकप्रिय झाले.

पंतप्रधान सॅतो यांच्यानंतर जुलै १९७२ मध्ये ककुई तनाका हे लिबरल डेमॉक्रटिक पक्षाचे अध्यक्ष झाले आणि जपानचे पंतप्रधानही झाले. पण त्यांना राजकीय स्थैर्य लाभले नाही. डिसेंबर १९७२ मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाच्या अनेक जागा सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्ट पक्षांनी जिंकून घेतल्या. त्या-नंतर १९७४ मध्ये झालेल्या काही जागांच्या निवडणुकीत ही घसरगुंडी वाढतच गेली आणि लिबरल डेमॉक्रटिक पक्षाला स्वतंत्रांच्या साहाय्याने आपले मताधिक्य कसेबसे टिकवून धरावे लागले. पंतप्रधान तनाका यांनी नोव्हेंबर १९७४ मध्ये ऑस्ट्रेलिया, ब्रह्मदेश आणि न्यूझीलंड या देशांचा बारा दिवसांचा दौरा काढला. या दौऱ्यावरून ते परत आले, तेव्हा अनेक सहकारी मंत्र्यांनी राजीनामे दिले होते आणि पक्ष अधिकच दुबळा झाला होता. त्याच वेळी श्री. तनाका हे पंतप्रधान-पदाचा राजीनामा देणार होते. पण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फोर्ड यांची जपानभेट त्याच सुमारास ठरली होती. ती पूर्ण होईपर्यंत तनाका थांबले. राष्ट्राध्यक्ष फोर्ड येऊन गेल्यावर श्री. तनाका यांनी २५ नोव्हेंबर रोजी पंतप्रधानदाचा राजीनामा दिला आणि सहा डिसेंबर १९७४ रोजी टाकेओ मिकी यांनी पंतप्रधान म्हणून

अधिकारग्रहण केले.

तनाका हे पंतप्रधान असतानाच त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होत होते. ते त्या पदावरून दूर होताच हे आरोप अधिक गंभीर झाले. अमेरिकेतील लॉकहीड या विमान कंपनीतून एका विमान खरेदी प्रकरणात तनाका हे पंतप्रधान असताना त्यांनी १६ लक्ष डॉलर्सची लाच घेतली, या आरोपाखाली ऑगस्ट १९७६ मध्ये तनाका यांना अटक झाली तेव्हा जपानलाच नव्हे, तर साऱ्या जगाला धक्का बसला. त्यामुळे लिबरल डेमॉक्रटिक पक्षाची जनमानसातली प्रतिमाही घरंगळली. मात्र पंतप्रधान मिकी यांनी आपल्याच पक्षाचे माजी अध्यक्ष आणि जपानचे माजी पंतप्रधान तनाका यांच्यावर खटला भरून तो चालविण्यात जी निर्भयता दाखविली, तिचे कौतुक झाले.

या काळात जपानची औद्योगिक आणि इतर आर्थिक प्रगती तुफान वेगाने होत होती. १९७६ मध्ये जपानने ६७ महापद्म डॉलर्सची निर्यात केली आणि ६४ महापद्म डॉलर्सची आयात केली. त्यापैकी सुमारे २५ टक्के निर्यात व आयात अमेरिकेशी होती. १९७७ मध्ये या दोन्हीत अनुक्रमे २२ टक्के आणि १३ टक्के वाढ झाली. पोलाद, जहाजबांधणी, मोटार आणि इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रांत जपानने जागतिक अजिक्यपद कायम ठेवले. जपानच्या या आर्थिक प्रगतीची चढाओढ अमेरिकेला एवढी जाणवू लागली की जपानने अमेरिकेकडून अधिक माल घ्यावा असे सौम्य दडपण अमेरिकन सरकार आणू लागले. कारण मोटार व इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रात जपानी माल अमेरिकन मालापेक्षा खुद्द अमेरिकेतच स्वस्त पडू लागला आणि अधिक गुणवत्तापूर्ण निघू लागला. त्यामुळे अमेरिकन कारखानदार अस्वस्थ झाले आणि जपानी मालाच्या आयातीवर निर्बंध घालण्याची वेळ आली आहे असे सरकारला सुचवू लागले.

अमेरिकेतच नव्हे तर इंग्लंड, फ्रान्स, प. जर्मनी अशा अनेक इतर पाश्चात्य देशांनाही जपानचे हे आव्हान जड जाऊ लागले. युरोपियन सामायिक बाजार-पेठेवर मंदीची छाया पसरली आणि या बाजारपेठेची राजधानी ब्रुसेल्स येथे अर्थ-तज्ज्ञांनी बैठक बोलावून जपानच्या आर्थिक आक्रमणाचा गंभीरपणे विचार करण्यास सुरुवात केली. कारण जपानी मालाचे पूरच्यापूर युरोपमध्ये थडकू लागले आणि त्या त्या भागातील कारखाने मंदीच्या आणि बेकारीच्या छायेत जाऊ लागले.

आधुनिक जपानच्या आव्हानाचा सर्वांत अधिक व तत्काळ परिणाम झाला तो मोटार उत्पादनावर. जनरल मोटर्स, क्रिसलर, रोल्स राईस, डेमलर, व्होक्स वॅगन अशा अमेरिका व युरोपमधील मोटार कारखान्यांना जपानी मोटारींची तीव्र झळ लागली. जपान अमेरिकेकडून घेत असलेल्या मालापेक्षा दोन महापद्म डॉलर्सचा अधिक माल अमेरिकेत खपवते याचा अमेरिकेला गंभीरपणे विचार करावा

लागेल, असे अमेरिकेच्या व्यापारमंत्र्यांनी जाहीर केले. जपानने आपल्या अविरत उद्योगाने, कल्पकतेने आणि सर्वोत्कृष्ट उत्पादनाने अमेरिका व युरोप यांच्या खुल्या व्यापाराच्या उदार धोरणापुढे पेचप्रसंग निर्माण केला.

जपानमधील मित्सुबिशी या कंपनीने सुपरसॉनिक विमाने, मोटारी, गणकयंत्रे, कॅमेरे, घड्याळे, वैद्यकीय उपकरणे अशा शेकडो क्षेत्रांतील उत्पादनांचा दर्जा इतका उंचावला की १९७७ मध्ये मित्सुबिशी ही जगातील सर्वांत मोठी उत्पादक व व्यापारी कंपनी आहे हे तिने अभिमानाने जाहीर केले. वृत्तपत्रांच्या क्षेत्रातही जपानने जगात पहिला क्रमांक मिळवला. आताही शिंबन आणि माइइची या दैनिकांचे खप ऐंशी लक्ष ते नव्वद लक्षापर्यंत जाऊन त्यांनी खपाचे जागतिक विक्रम स्थापन केले. आजही त्यांचा जगात पहिला व दुसरा क्रमांक आहे. अशुद्ध लोखंड आणि कोकिंग कोल हा पोलादाला लागणारा कच्चा माल परदेशातून आयात करूनही जपानने पोलाद उत्पादनात जगात पहिला क्रमांक मिळवला.

जपानी व्यवस्थापनाचे नवे शास्त्र पाश्चात्य देशात प्रथम कुतूहलाचा व नंतर आदराचा विषय होते. पण १९७८ पासून जपानी व्यवस्थापन तज्ज्ञ अमेरिकेत व युरोपमध्ये तेथील कारखानदारी वाचविण्यासाठी नेमले जाऊ लागले. जहाज बांधणीत तर जपानने एवढी आघाडी मारली की ज्या प्रचंड बोटी बांधण्यात जर्मनी, हॉलंड, बेल्जियम यांना २१ महिने लागत, त्याच बोटी जपान १४ ते १५ महिन्यांत व अधिक स्वस्त देऊ लागला.

जपानमधील उद्योगधंदे आणि व्यापारी संस्था यांची दूरदृष्टी इतकी विलक्षण की, १९७७ मध्येच त्यांनी एकविसाव्या शतकातील उत्पादनांची व नव्या मालाची आखणी करण्यात सुरुवात केली. अमेरिकन टी. व्ही. संचापेक्षा जपानी संच अमेरिकेत अधिक स्वस्त व लोकप्रिय झाले म्हणून अमेरिकेने जपानी टी. व्ही. ची आयात ४० टक्के करावी असा निर्बंध घातला. जपानी पोलादाच्या आयातीवर निर्बंध घातले. अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रासही जपानने नमविल्याचीच ही खूण होती.

सन १९७६ च्या अखेरीस झालेल्या निवडणुकीत लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाची बरीच पडझड झाली. त्या पक्षाने वरिष्ठ कायदे मंडळाने आपले मताधिक्य जवळजवळ गमावले पण पुन्हा स्वतंत्र पक्षाचे सहाय्य घेऊन ते कसेबसे टिकवले. पक्षाच्या या अपयशाची जबाबदारी स्वीकारून पंतप्रधान मिकी यांनी राजीनामा दिला. त्यांच्या नंतर पक्षाचे अध्यक्ष टाकेओ फुकुडा हे पंतप्रधान झाले. याचवेळी पक्षाची संघटना बळकट करावी म्हणून अंतर्गत निवडणुकीची नवी पद्धत अमलात आणून जपानभरच्या सभासदाना मते नोंदविण्याची मुभा देण्यात आली. पक्षाच्या अध्यक्षपदासाठी फुकुडा आणि मासायुशी ओहिरो हे दोन उमेदवार होते. पक्षांतर्गत

निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात ओहिरा यांना प्रचंड मताधिक्य मिळाले व ते पक्षाचे अध्यक्ष झाले. फुकुडा यांना अर्थातच पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा लागला व डिसेंबरमध्ये ओहिरा हे जपानचे पंतप्रधान झाले.

पंतप्रधान ओहिरा यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच त्यांना जपानच्या आर्थिक प्रश्नांना तोंड द्यावे लागले. तेव्हा उत्पादक अरब राष्ट्रांनी पेट्रोलचे दर अचानक वाढवले. जपानवरही इतर देशांप्रमाणे त्याचा प्रतिकूल परिणाम झाला. चलनवाढ झाली. वस्तूंच्या किमती एक वर्षात १५ ते २० टक्के वाढल्या. वाढता सरकारी खर्च भागविण्यासाठी ओहिरा यांनी करवाढ केली. अर्थातच ते लोकात अप्रिय झाले. येनची किंमत आता राष्ट्रीय चलनात डॉलरच्या व जर्मन मार्कच्या तुलनेने कमी झाली. पण जपानने निर्यातीवर भर देऊन येन बऱ्याच प्रमाणात सावरला. १९८० मध्ये जपानच्या निर्यातीत १६ टक्के वाढ झाली. जपानच्या आर्थिक आक्रमणाचा धसका घेतलेल्या राष्ट्रांनी जून १९८० मध्ये टोकिओ येथे 'आर्थिक शिखर परिषद' घेतली. या परिषदेत अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फरान्स, इटली, प. जर्मनी व जपान या देशांनी भाग घेतला. जपानने या राष्ट्रांतील निर्यात मर्यादित करावी असे या परिषदेत ठरले. १९८५ पर्यंत जपानने आपली निर्यात या राष्ट्रांत कोणत्या मर्यादेपर्यंत ठेवावी हे या परिषदेने निश्चित केले. जपाननेही परदेशांबाबत उदार धोरण स्वीकारले. यूनोच्या निर्वासितांच्या कार्यासाठी लागणाऱ्या एकंदर रकमेपैकी निम्मी रक्कम देण्याचे जपानने मान्य केले. जपान-मध्ये निर्वासित ठेवून घेण्यास आत्तापर्यंत जपानने विरोध केला होता, पण आता नाममात्र का होईना, पण आंतरराष्ट्रीय निर्वासित ठेवून घेण्याचे जपानने मान्य केले आणि इंडोनेशियातील यूनोच्या निर्वासित केंद्राचा निम्मा खर्च करण्याचेही मान्य केले.

अमेरिकेबरोबरचे जपानचे संबंध सुधारावेत, म्हणून पंतप्रधान ओहिरा यांनी ऑक्टोबर १९८० मध्ये अमेरिकेस भेट दिली. तेव्हाचे अध्यक्ष कार्टर यांच्याशी चर्चा करून त्यांनी अमेरिका व जपानचे आर्थिक संबंध दृढ केले आणि अमेरिके-कडून जपानच्या संरक्षणाची पुन्हा हमी घेतली. पंचवीस वर्षांपूर्वी अमेरिकेने जपानला अशी हमी दिली होती पण जपानला संरक्षण खर्च करावा लागत नसल्याने त्या देशाची अमेरिकेबरोबर आर्थिक चढाओढ होते, या विचाराने अलीकडच्या काळात अमेरिकेत अशी मागणी होऊ लागली होती की, जपानने आपले संरक्षणदल ठेवून लष्कर, नौदल व विमानदलावर योग्य तो खर्च करावा. या मागणीला आळा घालण्यात पंतप्रधान ओहिरा यशस्वी ठरले. ओहिरा यांच्या अमेरिका भेटीनंतर काही महिन्यांतच जपानने रशियाचा निषेध केला ही घटना अर्थपूर्ण आहे. रशियाने जपानच्या उत्तरेकडील भागात मोठ्या प्रमाणावर सैन्याची

व नौदलाची जमवाजमव करून जपानला धोका निर्माण केला आहे, असा निषेध-खलिता जपानने पाठविला, पण रशियाने तो फेटाळून लावला.

अमेरिकेहून परत आल्यावर पंतप्रधान ओहिरा यांना असे आढळून आले की आपल्या लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या बहुमताला धोका येत आहे. त्यांच्याविरुद्ध अविश्वासाच्या ठरावाला जोरदार पाठिंबा मिळत आहे असे दिसताच त्यांनी डिएट (पार्लमेंट) बरखास्त केले आणि नव्या निवडणुका जाहीर केल्या. या निवडणुका २२ जूनला व्हावयाच्या होत्या. ओहिरा यांच्यावर त्या निवडणुकीचे एवढे दडपण पडले की, प्रचार मोहिमेत असतानाच अतिश्रमामुळे त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि १२ जून रोजी, वयाच्या सत्तराव्या वर्षी ते निधन पावले. त्यांच्या निधनामुळे जनतेच्या मनातील त्यांची व त्यांच्या पक्षाची प्रतिमा एवढी उंचावली की नंतर दहा दिवसांनीच झालेल्या निवडणुकीत लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षास भरघोस बहुमत मिळाले. या निवडणुकीत त्या पक्षाला ५११ पैकी २८४ जागा मिळाल्या. जपान सोशॉलिस्ट पक्षाला १०७, कोमिओटो (स्वच्छ राज्य कारभार) पक्षाला ३३, न्यू लिबरल क्लबला १२ व स्वतंत्रांना १४ जागा मिळाल्या.

झेंको सुझुकी हे १५ जुलै रोजी लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले आणि १७ जुलै रोजी ते जपानचे पंतप्रधान झाले. सुझुकी हे अनेक वर्षे या पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत आणि त्यांनी मंत्रिमंडळातही काम केले आहे. सध्या सुझुकी हेच जपानचे पंतप्रधान आहेत. अधिकारावर येताच त्यांनी अमेरिकेशी घनिष्ठ सहकार्य ठेवण्याचे माजी पंतप्रधान ओहिरा यांचे धोरण पुढे चालू राहील असे जाहीर आश्वासन दिले. सुझूकी हे लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाच्या संस्थापकांपैकी एक आहेत. त्यांची निष्ठा आणि कर्तबगारी याबद्दल जपानमध्ये नितांत आदर आहे. सत्तेवर आल्यावर त्यांनी आर्थिक संघटनेकडे अधिक लक्ष पुरविले. जपानचे राष्ट्रीय उत्पन्न त्यांनी एक वर्षात एक टक्का वाढविले. पेट्रोलच्या किमती ६६ टक्क्यांनी वाढल्या होत्या म्हणून पेट्रोलची आयातच कमी करण्याचे धोरण सुझुकी यांनी आखले. एक वर्षात त्यांनी आयातीपेक्षा निर्यातीची रक्कम वाढवून ८८ कोटी डॉलर्सपर्यंत नेली.

जपानी मालाची–विशेषतः मोटारींची–आयात अमेरिका व युरोपला गेली पाच–सहा वर्षे अतिशय अडचणीची वाटत होती, पण सुझूकींच्या कारकीर्दीत या आयातीला होणाऱ्या विरोधाने उग्र स्वरूप धारण केले. अमेरिका व युरोपमध्ये अनेक मोटार कारखाने बंद झाले किंवा त्यांच्यात फार मोठी नोकरकपात झाली. या बेकार कामगारांनी जपानी मालाविरुद्ध उग्र निदर्शने केली. ही निदर्शने ' ऑटोमोबाईल वॉर ' या नावाने प्रसिद्ध आहेत. कल्पक जपानी कारखानदारांनी यावर तोड म्हणून अमेरिका व युरोपमध्येच स्थानिक उद्योगपतींच्या साहाय्याने मोटार

उत्पादनांचे कारखाने काढले. त्यामुळे त्या देशांच्या मोटार व्यवसायातील बेकारीला आळा बसला.

सम्राट हिरोहिटो यांचा नातू, राजपुत्र अकिहिटो यांचा मुलगा नरूहिटो सज्ञान झाल्याचा समारंभ २३ फेब्रुवारी १९८१ मध्ये प्रचंड प्रमाणावर जपानभर साजरा करण्यात आला. सम्राटांच्या हयातीत नातू सज्ञान होण्याचा जपानच्या इतिहासातील हा पहिलाच प्रसंग आहे. जुलै १९८१ रोजी अमेरिकेने जपानचे पंत-प्रधान सुझुकी यांच्याकडे अशी इच्छा व्यक्त केली की रशियाच्या वाढत्या प्रभावा-मुळे आता जपानने आपले संरक्षणदल वाढवावे. जपानने या सूचनेला अप्रत्यक्ष नकारच दिला. जपानला आर्थिक प्रगती अधिक महत्त्वाची असल्याने संरक्षण-विषयक खर्चात तूर्त मोठी वाढ करता येत नाही, असे पंतप्रधानांनी मुत्सद्देगिरीने अमेरिकेला कळवले.

जपान हा जगातील एक सर्वांत प्रगत देश आहे. ११ कोटी लोकसंख्येच्या या देशात साडेनऊ कोटी रेडिओ संच आणि चार कोटी टी. व्ही. संच आहेत. वाहतुकीचे नियंत्रण हेलिकॉप्टरमधून रेडिओ संदेश पाठवून करण्यात येते. वृत्त-पत्रांचा खप जगातील सर्वांत अधिक आहे. राजकीय आणि आर्थिक क्षेत्र सर्वोत्कृष्ट आहे. गेल्या पाच वर्षांत जपानने अनेक उपग्रह अवकाशात सोडून वैज्ञानिक प्रगतीतही आपला वाटा उचलला आहे. या देशाचा अभ्यास जगातील सर्वच राष्ट्रांना व विशेषत: विकसनशील राष्ट्रांना अत्यंत उद्बोधक ठरेल.

आजच्या जपानमध्ये उद्याच्या इतर जगाचे प्रतिबिंब दिसते. जपानने माणसांची जास्तीत जास्त कामे यंत्राच्याकडे सोपवली आहेत. मोठमोठ्या मोटर कारखान्या-तील पंचाऐंशी टक्के कामे यांत्रिक माणसे (रोबो) करतात, मोटारीचे सुटे भाग एकमेकांना जोडणे, रंग देणे, काचा बसविणे, टायर्स बसविणे, वायपरसारख्या भागांची चाचणी घेणे ही कामे इतर देशात कुशल कामगार करतात तर जपान-मध्ये यंत्रेच ही कामे करतात. या यंत्रावर नजर ठेवण्यासाठी (सुपरवायझिंग) माणसे नेमली जातात. विजेचा दाब कमी-अधिक होऊन यंत्रांच्या गतीत फरक पडतो काय, यंत्राचा एखादा भाग झिजला अगर तुटला आहे काय किंवा चुकून एखादा धातूचा तुकडा यंत्रात अडकला काय हे पाहण्याचे काम माणसे करतात. टोयॅटो या जपानच्या जगप्रसिद्ध मोटर कारखान्याचे संचालक म्हणाले, 'रोबोंचा वापर झाल्यापासून आता उत्पादनात नव्वद टक्के वाढ झाली आहे. रोबोला रजा, विश्रांती अथवा पगारवाढ द्यावी लागत नाही. त्यांचे काम विलक्षण अचूक असते. रोबो संपावर जाण्याचा प्रश्नच कधी निर्माण होत नाही.'

हे रोबो माणसाची जवळजवळ सर्व कामे करतात. ते जिने चढून किंवा उत-रून जाऊ शकतात, अवजड सामान वाहून नेतात, मध्ये अडथळा आला

तर त्याला वळसा घालून ते जातात आणि फारच अनपेक्षित अडचण येऊन रोबोचा मार्ग खुंटला तर 'मी संकटात आहे, मी अमुक जागेवर आहे.' असा इशारा रोबोच्या नियंत्रकाकडे ते देतात. टेलिव्हिजनच्या साहाय्याने नियंत्रक रोबोची परिस्थिती पाहतो आणि रेडिओ संदेशाद्वारे त्याच्या मार्गातील अडथळे दूर करून व रोबोत दुरुस्ती करून त्याला पुन्हा चालता करू शकतो. 'मेडिकल रोबो' नावाची यांत्रिक माणसे जपानने तयार केली आहेत. या माणसांचा उपयोग मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये व वैद्यकीय महाविद्यालयात प्रयोगादाखल करण्यात येतो. आता विद्यार्थ्यांना शरीरशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी शवविच्छेदन करावे लागत नाही. माणसाचे सर्व भाग असलेले वैद्यकीय रोबो ही गरज उत्तम प्रकारे भागवितात. या वैद्यकीय माणसांची बटने दाबली की त्यांना ताप येतो आणि इंजेक्शन दिले की तो ताप उतरतो. कार्डिओग्राम काढून त्यांचा रक्तदाब तपासता येतो. त्याची विशेष कळ दाबली तर तो जीभ बाहेर काढून दाखवतो आणि खोकूनही दाखवितो.

विवाह जमविणाऱ्या संस्था आता बहुतेक देशांत अस्तित्वात आल्या आहेत. जपानमध्ये हे काम करणारी गणकयंत्रे आहेत. मोठमोठ्या कारखान्यात आणि व्यापारी संस्थांत पाच ते दहा हजार लोक काम करतात. त्यातील अविवाहित हव्या असलेल्या वराकडून अथवा वधूकडूनच्या अपेक्षा यांची माहिती गणकयंत्राच्या फॉर्मवर भरून देतात. या माहितीचे पंचकार्ड तयार होते आणि ज्या वराकडून अथवा वधूकडून या अपेक्षा पूर्ण होण्याचा जास्तीतजास्त संभव असतो त्यांची नावे व पत्ते गणकयंत्राकडून त्या त्या व्यक्तींना कळविता येतात. मित्सुबिशी या जगड्व्याळ कंपनीने १९७१ सालापासून आपल्या विविध कारखान्यांत व संस्थांत अशी यंत्रे ठेवली आहेत. त्यात आठ हजार येन (सुमारे ३२० रुपये) घातले की फॉर्म येतो. तो फॉर्म भरून यंत्रात घालावयाचा आणि नियोजित वधू अथवा वराची वाट पाहावयाची. मित्सुबिशी कंपनीच्या टोकियो येथील कंपनीत दरवर्षी अडीच हजार लोकांची लग्ने जमविली जातात.

न्यूयॉर्कमध्ये काम करणारा जपानी तरुण आणि टोकियोत काम करणारी जपानी तरुणी यांचे लग्न या गणकयंत्राने सुचविले. त्यांनी दोन्ही देशांच्या मधोमध असलेल्या हवाई बेटावर एकमेकांची भेट घेतली आणि तेथेच विवाहही केला. या पद्धतीच्या प्राथमिक अवस्थेला 'ओमाई' म्हणजे ओळख करून देण्याची व्यवस्था असे नाव आहे. अर्थात ही ओळख विवाहाच्या अंतिम हेतूनेच करून दिली जाते.

गेल्या काही वर्षांत निवासी हॉटेलांचा एक अगदी नवा प्रकार जपानमध्ये निघाला आहे. या हॉटेलांना कॅप्सूल हॉटेल म्हणतात. ही हॉटेले रीएन्फोर्सड फायबरची केलेली असतात. त्यातील खोल्या साडेचार फूट रुंद व सात फूट लांब अस-

तात. वातानुकूलित आगगाडीच्या डब्यात झोपल्यासारखे या कॅप्सूलमध्ये वाटते. पण एवढ्याशा जागेत सर्व अद्ययावत सोई असतात. या खोलीत टूथपेस्ट, टूथब्रश, साबण, टॉवेल, टेलिफोन, गजराचे घड्याळ, आग लागली तर ती विझविण्याची साधने, छोटा रेडिओ आणि सहा इंच लांब व चार इंच उंच असा टेलिव्हिजनही असतो. विशेष म्हणजे प्रत्येक कॅप्सूलमध्ये झोप येण्याचे यंत्र असते. डोक्यावर या यंत्राचा पट्टा बांधून विजेचे बटन दाबले की मेंदूवर विजेचा परिणाम होऊन झोप येते. जपानमध्ये मोठमोठ्या शहरांची रेल्वे स्टेशन्स आणि विमानतळ यांच्याजवळ ही कॅप्सूल हॉटेल्स असतात. ज्यांच्या गाड्या किंवा विमाने पहाटे किंवा अपरात्री सुटत असतील, असे प्रवासी आदल्या दिवशी संध्याकाळी या कॅप्सुल हॉटेलमध्ये राहतात. गजर लावून वेळेवर उठतात आणि आपली गाडी किंवा विमान पकडतात. ज्यांना शहरातील कामामुळे घरी जाण्यास उशीर होतो, असे लोक अपरात्री घरी जाऊन पुन्हा पहाटे उठून शहरात कामावर येण्याऐवजी या कॅप्सूल हॉटेलमध्येच रात्री विश्रांती घेतात. आणि सकाळी कचेरीस जातात. जपानमध्ये प्रत्येक घरी फोन असल्याने घरी कळविणेही सहज शक्य असते.

अंधांना रस्त्यातून जाताना मार्गदर्शन करण्यासाठी इतर देशांत सरावशिक्षण देऊन कुत्रे तयार केलेले असतात. जपानमधील सुकुबा कंपनीने याच कामासाठी यांत्रिक कुत्रे तयार केले आहेत. हे यांत्रिक कुत्रे रस्त्यावरचे वाहतुकीचे लाल-हिरवे दिवे ओळखतात. रस्ता ओलांडण्यासाठी हिरवा दिवा लागला की, कुत्रे रस्ता ओलांडतात. त्याची यांत्रिक वायर धरून अंध व्यक्ती त्याच्या मागोमाग जाऊ शकते. हा यांत्रिक कुत्रा फूटपाथ उतरू शकतो. चढू शकतो. खांब समोर आला तर बाजूने जातो आणि जवळ मोटार येऊ लागली तर त्या मोटारीला थांबण्याची सूचना करतो. रस्त्यावरून जाताना एखाद्या झाडाची फांदी खाली आली असेल तर अंधाला वाकून चालण्याची सूचनाही हा यांत्रिक कुत्रा देतो. या यंत्राला मेलडॉग असे नाव आहे.

अत्यंत लहान टी. व्ही. संच तयार करण्यात जपानने आघाडी मारली आहे. मनगटी घड्याळातही दिसणारा टी. व्ही. जपानने तयार केला असून, कुठेही घड्याळाबरोबरच तो लावून फिरता येते व हा टी. व्ही. रंगीत आहे आणि तो मोठा करून पाहता यावा म्हणून त्यांच्याबरोबर सूक्ष्मदर्शकासारखे यंत्रही मिळते. अद्याप हा मोठ्या प्रमाणावर बाजारात आलेला नसला तरी १९८३ च्या सुरुवातीपासून हा सहज उपलब्ध होऊ शकेल, असा अंदाज आहे.

मोटारीचे अपघात कमी व्हावेत म्हणून जपानने आपोआप लागणारे ब्रेक शोधून काढले आहेत. मोटारवाहकांचे लक्ष नसताना मोटारीसमोर अचानक

सू...५

अडथळा आला तर इलेक्ट्रॉनिक्सच्या साहाय्याने आपोआप ब्रेक लागून गाडीची गती मंद होते.

जपानमधील होंडा या जगप्रसिद्ध स्कूटर कंपनीने एक मिनी स्कूटर तयार केली आहे. ती मोटारीच्या मागच्या डिकीत राहू शकते. जेव्हा मोटार बंद पडते किंवा ट्रॅफिक जॅममुळे पुढे जाऊ शकत नाही तेव्हा या मिनी स्कूटरचा उपयोग करून तातडीची कामे करता येतात. ही स्कूटर वजनाने अतिशय हलकी असून जरूर लागल्यास एका हाताने उचलून वाहून नेता येते.

आग विझविण्याच्या कामी अग्निशामक दलातील लोकांना अनेकदा धोका पत्करावा लागतो व जबर जखमी होण्याचा किंवा प्राण गमावण्याचा प्रसंग येण्याची शक्यता असते. हा धोका टाळण्यासाठी आता जपानने यांत्रिक अग्निशामक दले तयार केली आहेत. या रोबोची बांधणी अग्निप्रतिबंधक आहे. ज्या दिशेला आग असेल त्या दिशेला हा रोबो पाण्याचे पंप वळवतो. त्याला दुरून नियंत्रण (रीमोट कन्ट्रोल) करण्याची सोय आहे. आता जपानी अग्निशामक दल पेटत्या इमारतीपासून सुरक्षित अंतरावर राहून यांत्रिक माणसांच्याकरवी आग विझवू शकतात. याच तत्त्वावर जिवंत बाँब निकामी करणारे रोबोचे पथकही जपानी तंत्रज्ञांनी तयार केले आहे. हे रोबो जिवंत बाँबचा नाश करतात.

जगात इतरत्र कुठेही नाही अशी गुंतागुंतीची पण कार्यक्षम वाहतूक व्यवस्था टोकियो शहरात आहे. एक कोटी अकरा लक्ष वस्ती असलेल्या या शहरात अनेक ठिकाणी एकावर एक असे विविध स्तरांवर रस्ते बांधले आहेत. शिवाय जमिनीवरील व भुयारी अशी आगगाड्यांची व्यवस्थाही आहे. गर्दीच्या वेळी दर तीस सेकंदाला गाडी असते. तरीही गर्दी हटत नाही. टोकियोची मोटार वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पाच हजार अल्ट्रासॉनिक डिटेक्टर्सच्या साहाय्याने संदेश मिळविण्याची व पाठविण्याची अवाढव्य पद्धत तयार करण्यात आली आहे. टोकियो व आसपासच्या सर्व प्रमुख रस्त्यांचे चित्र एका प्रचंड फलकावर दिसते. जेथे ट्रॅफिक जॅम होतो त्या ठिकाणी आपोआप लाल दिवा लागतो. मग त्या भागावर हेलिकॉप्टर पाठवून रेडिओ संदेशांच्याद्वारे मोटारवाहकांना सूचना देण्यात येतात व वाहतूक खुली करण्यात येते. बर्फ, वादळ, अतिवृष्टि अशा बिकट वेळीही अशाच सूचना देऊन संभाव्य हानी टाळण्यात येते.

रेल्वे वाहतुकीच्या बाबतीत जपानचा जगात पहिला क्रमांक आहे. मॅग्नेटिक लेव्हिएशन पद्धतीने धावणाऱ्या बुलेटट्रेनसारख्या गाड्या ताशी तीनशे एकवीस मैल वेगाने जाऊ शकतात. जपानमधील लांब पल्ल्याच्या गाड्या जगातील सर्वात वक्तशीर असतात. अनेक मोठ्या मार्गावर ठरलेल्या वेळेपेक्षा गाडी पाच मिनिटांहून अधिक उशिरा पोचली तर उतारूंना तिकिटांचे सर्व पैसे परत करण्यात

येतात आणि झालेल्या उशिराबद्दल माफी मागण्यात येते.

बेबी कॅप्सुल नावाचे पाळण्यासारखे उपकरण जपानमध्ये तयार करण्यात आले आहे. त्यात लहान मुलाला ठेवले तर त्याला खेळवणे, दूध पाजणे, पाणी देणे, कपडे बदलणे वगैरे सर्व कामे हे विविधोपयोगी यंत्र आपोआप करते. टोकियोमध्ये मिझुनो नावाच्या तंत्रज्ञाने 'आर्ट रोबो' नावाची कलात्मक यांत्रिक माणसे तयार करण्यास सुरुवात केली आहे. ही माणसे औद्योगिक कामे करीत नाहीत, पण संगीत, चित्रकला, नाटक यासाठी उपयोगी पडतात. हे रोबो बोलतात, गाणे म्हणतात, वाद्ये वाजवतात आणि नाटकातील पात्रांचे संवाद म्हणून हालचालीही करतात. चेहऱ्यावर अनुरूप भावनाही दाखवितात. श्री. मिझुनो यांनी टोकियोत नुकत्याच राष्ट्राध्यक्ष केनेडी आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री मेरिलीन मॅन्रो यांच्या हुबेहूब प्रतिमा निर्माण केल्या. त्यांचे प्रात्यक्षिक दाखविले गेले तेव्हा त्या प्रतिमांनी एकमेकांशी गप्पा मारल्या आणि हस्तांदोलनही केले, हे पाहून जगाच्या विविध भागातून आलेले तंत्रज्ञ व व्यापारी थक्क झाले. एक संपूर्ण नाटक अशा यांत्रिक अभिनेत्यांच्या साहाय्याने करून दाखविण्याची आता श्री. मिझनो यांची योजना आहे.

निकान इशिका इत्यादी जपानी कॅमेरे आता छायाचित्रणांच्या क्षेत्रात क्रमांक एकवर आहेतच, पण सोनी कंपनीने तयार केलेल्या माविका कॅमेऱ्याने या क्षेत्रात क्रांती केली आहे. १४० वर्षांपूर्वी छायाचित्रणाचा शोध लागला. त्यानंतर माविकाचा शोध हा त्या क्षेत्रातील सर्वांत महत्त्वाचा आहे. या कॅमेऱ्याला फिल्म लागत नाही. इलेक्ट्रो मॅग्नेटिझमच्या सहाय्याने या कॅमेऱ्यातील तबकडीवर पन्नास छायाचित्रे थेट घेतली जातात. विशेष म्हणजे ही छायाचित्रे व्हिडिओवर दाखविता येतात. इतकेच नव्हे तर टेलिफोन केबलच्या साहाय्याने माविकाची छायाचित्रे तत्काळ दुसऱ्या ठिकाणी किंवा परगावी पाठविता येतात. माविकाचा हा शोध म्हणजे वृत्तपत्रांना वरदानच आहे. घटनास्थळाहून आता या छायाचित्रांचे प्रक्षेपण थेट वृत्तपत्रांच्या कचेरीत होऊ शकेल.

विविध प्रकारचे इलेक्ट्रॉनिक्स खेळ तयार करण्यात जपानने विलक्षण कल्पकता दाखविली आहे. टोकियोच्या दायिइची किंवा कोणत्याही मोठ्या हॉटेलच्या लॉबीमध्ये कोणाची वाट पाहायची असेल किंवा नुसती करमणूक करून घ्यायची असेल तर मोफत दूरदर्शनाची व्यवस्था तर असतेच, पण तेथे इलेक्ट्रॉनिक्सचे अनेक प्रकारचे खेळही असतात. एकट्याने किंवा अधिक लोकांना हे खेळ खेळता येतात. कॉम्प्युटर्सच्या साहाय्याने परगावच्या किंवा दूरगावच्या जोडीदाराबरोबरही असे खेळ खेळता येतात.

कृत्रिम रक्ताचा शोध लावण्यातही जपान यशस्वी झाला आहे. या कृत्रिम

रक्ताचे (सिंथेटिक ब्लड) प्रयोगशाळेतील प्रयोग यशस्वी झाले आहेत. हे रक्त सर्व प्रकारच्या मानवी रक्तासारखेच आहे. मानवी रक्ताची जागा हे रक्त घेऊ शकते. मात्र अजून व्यापारी प्रमाणावर या रक्ताची विक्री सुरू झालेली नाही.

जपानने अरब राष्ट्रांना पाणी पुरवण्याचे कोटचावधी डॉलर्सचे कंत्राट घेतले. जपानच्या तेलवाहू बोटी जपानहून पाणी भरून अरब राष्ट्रांना नेतात. तेथे त्या पाण्याची विक्री करून बोटीत पेट्रोल भरून घेतात. जपानमध्ये पेट्रोल आणून सर्वटाक्या धुऊन घेऊन पुन्हा पाणी भरून अरब राष्ट्रांना विकतात. हजारो मैलां-वर केवळ पाणी नेऊन विकणारे जपान हे इतिहासातील पहिलेच राष्ट्र आहे.

८

# व्यवस्थापन क्षेत्रात जपानने केलेली क्रांती

विसाव्या शतकात जगातील सर्वच देशांत उद्योगधंद्यांचा अपूर्व विकास झाला व व्यवस्थापनाच्या (मॅनेजमेंट) शास्त्राला अतिशय महत्त्व प्राप्त झाले. युरोप आणि अमेरिका या भागांत औद्योगिक क्रांती आधी झाली, म्हणून साहजिकच त्या भागात व्यवस्थापनाला स्वतंत्र शास्त्र म्हणून प्रथम मान्यता मिळाली. आता बहुतेक सर्वत्र विद्यापीठांतून व्यवस्थापनाचे अभ्यासक्रम आहेत, आणि केवळ याच शास्त्राचे शिक्षण देणाऱ्या संस्थाही निघाल्या आहेत. पीटर डकर यांच्यासारख्या अमेरिकन तज्ज्ञांनी या शास्त्राची पद्धतशीर बांधणी केली.

अर्ध्या शतकाहून अधिक काळ या क्षेत्रात वर्चस्व गाजविणाऱ्या अमेरिका-युरोपला प्रथम आव्हान दिले ते जपानने. व्यवस्थापनाचे स्वतंत्र तत्त्व आणि स्वतंत्र शास्त्र जपानने सुरू केले आणि ते अधिक यशस्वी झाल्याने आता पाश्चात्य तज्ज्ञच जपानच्या या शास्त्रातील नेत्रदीपक प्रगतीचा अभ्यास करू लागले आहेत. कमाल उत्पादन, किमान संप व किमान असंतोष आणि उत्कृष्ट व्यवस्था यांसाठी आता अमेरिकेतील मोठमोठ्या कंपन्या जपानी व्यवस्थापनाचा वापर करू लागल्या आहेत. जपानी व्यवस्थापन कलेवरची पुस्तके अमेरिकेत 'बेस्ट सेलिंग' यादीत जात असून, अधिकाधिक अमेरिकन तरुण जपानी व्यवस्थापन शास्त्रांचा अभ्यास करीत आहेत. 'थिअरी झेड' सारख्या ग्रंथांचे अमेरिकन वृत्तपत्रांनी गौरव केले आहेत. जपानी पद्धतीच्या व्यवस्थापनाचे आव्हान अमेरिका कसे पेलणार हा आज अमेरिकन उद्योगधंद्यातील एक ज्वलंत प्रश्न आहे.

या दोन पद्धतीतील फरक बराच गुंतागुंतीचा आहे. दोन्ही पद्धती अनेक वर्षांच्या वापराने, संशोधनाने आणि सुधारणांनी समृद्ध झाल्या आहेत. जपानी व्यवस्थापन पद्धतीत कामगार, इतर कर्मचारी व अधिकारी हे अधिक सुखी व अधिक स्थिर आहेत. फायद्याचे प्रमाण अधिक आहे आणि उपादनात खूपच वाढ

झाली आहे. गेल्या तीस वर्षांत जपानचे उत्पादन चारशे टक्क्यांनी वाढले आहे, हे सत्य पाश्चात्यांना स्तिमित वाटते. खुद्द अमेरिकेत उत्पादनाचा वेग तुलनेने कमी. इंग्लंडसारख्या देशात तर संप व इतर कारणांनी उत्पादनाचे प्रमाण गेल्या वीस वर्षांत कमी झाले आहे.

जपानी व्यवस्थापनाचा पहिला विशेष म्हणजे व्यवस्थापन किंवा मालक आणि नोकर यांचा परस्परांवरील पूर्ण विश्वास. या दोघांत जर अविश्वास असेल, तर संशय, स्वहित सांभाळण्यासाठी डावपेच आणि दुसऱ्यावर कुरघोडी करण्याची प्रवृत्ती या बळावतात आणि दोघांचेही मूळ कामावरील लक्ष कमी होते. पाश्चात्य देशात मालक व कामगार हे मूलत: विरोधी भूमिकांवर असल्याने त्यांना आवरण्यासाठी अनेक कायदेकानू सरकारला करावे लागले आणि दोन्ही पक्ष त्या कायद्याचे पालन करतात की नाही हे पाहण्यासाठी मजूर खाते व मजूर न्याय यंत्रणा आल्या. जपानमध्ये मालक आपले अधिकाधिक हित करणारच, असा कामगाराला विश्वास असल्याने जपानमध्ये संपाचे प्रमाण जगातील कोणत्याही राष्ट्रापेक्षा सर्वांत कमी आहे. जवळजवळ शून्य आहे म्हटले तरी चालेल. पन्नाससाठ वर्षे चाललेल्या अनेक मोठ्या कारखान्यांत एक तासही संपामुळे वाया गेलेला नाही अशी उदाहरणे जपानमध्ये आढळतात, तशी इतरत्र दिसत नाहीत. उत्पादन व परस्परांवरील विश्वास यांचे अतूट नाते आहे, हे जपानी व्यवस्थापनातील एक प्रमुख तत्त्व आहे.

हा विश्वास जपानमध्ये का निर्माण होतो ? कारण जपानी व्यवस्थापन हे कौटुंबिक स्वरूपाचे असते. आपला कारखाना हे एक कुटुंब आहे हे तत्त्व या व्यवस्थापनात अग्रक्रमी मानले जाते. मालक, व्यवस्थापक, अधिकारी आणि कामगार हे एक विशाल कुटुंब असते. चहाच्या व जेवणाच्या वेळी जपानी कारखान्यातील अथवा कंपनीतील सर्वांत वरिष्ठ अधिकारीही सर्व कामगारांच्याप्रमाणे कॅन्टीनमध्ये त्यांच्या बरोबरच चहा घेतो व जेवण करतो. जपानी कामगार आपल्या घरी कसा जगतो, त्याचे राहणीमान काय आहे, त्याला कशाची गरज आहे हे जाणून घेणे हे जपानी व्यवस्थापक आपले कर्तव्यच मानतो. वर्षातून एकदा महाव्यवस्थापक सर्वांत कनिष्ठ काम करणाऱ्या कामगाराच्याही घरी जातो, त्याचा पाहुणचार घेतो व त्याला भेटवस्तू देतो. कारण कामगार हा आपल्या कुटुंबियांपैकीच एक आहे, असे तो मनोमनी मानत असतो.

मी अमेरिकन सरकारच्या परराष्ट्र खात्यात मुंबईला एकवीस वर्षे काम केले. या दीर्घ मुदतीत निदान पाऊणशे ते शंभर अमेरिकन अधिकाऱ्यांचा माझ्याशी संबंध आला पण त्यांतील फक्त एकच अधिकारी माझ्या घरी आला व म्हणाला, "माझ्या कचेरीतील कर्मचारी कसे राहतात याबद्दल मला उत्सुकता आहे." पु. ल. देशपांडे यांनी जपानी साहेबांबद्दलची आठवण (पूर्वरंग, पृष्ठ १७९) दिली आहे.

त्यांचे आजोबा एका जपानी व्यापारी कंपनीत नोकरी करीत होते. वर्षातून एकदा त्यांचा जपानी साहेब सहकुटुंब अंधेरीला पु. लं. च्या आजोबांच्या घरी येत असत व आजोबाही मुलांना घेऊन वर्षातून एकदा त्या साहेबांच्या घरी जात असत. ही घटना निदान पन्नास वर्षांपूर्वीची आहे. आपला नोकर हा आपला कुटुंबीय आहे ही गोष्ट जपानी व्यवस्थापनात इतकी गृहित धरली जाते की, नव्या माणसाशी परिचय झाल्यावर जपानी कर्मचारी 'माझं नाव सुझुकी आहे' असं न सांगता 'मी हिताचीचा सुझुकी' किंवा 'मी मित्सुबिशीचा यामातो' असे अभिमानाने सांगतो. अनेकदा आजोबा, वडील, मुलगा, भाऊ असे एखाद्या घरातील अनेक पिढ्यांचे लोक एकाच कारखान्यात किंवा कंपनीत काम करतात आणि साहजिकच त्यांच्याशी एकरूप होतात.

जपानी कारखान्यात किंवा कंपनीत जेव्हा एखादा तरुण नव्या भरतीसाठी उमेदवार म्हणून मुलाखतीसाठी जातो, तेव्हा व्यवस्थापक त्याला विचारतात, "आयुष्यात तुला काय हवे आहे ?" तो सांगतो, "मला स्वतःची मोटार हवी आहे, बंगला हवा, चांगली पत्नी हवी. मुलाबाळांना उत्तम शिक्षण हवे आहे." त्यावर व्यवस्थापक त्याच्या पात्रतेची चाचणी घेतात व तो पसंतीस उतरला तर त्याला सांगतात, "तुला जे जे हवे ते सर्व देण्याची आम्ही हमी देतो. पण तू तुझे सबंध आयुष्य निष्ठेने कारखान्यासाठी वाहायला हवेस. तुला सुट्या, प्रवास भत्ता, चांगला पगार, वैद्यकीय मदत वगैरे सर्व मिळतीलच." अर्थात मोटार व बंगला या सोई त्या उमेदवाराला लगेच मिळत नाहीत. पण योग्य वेळी त्याला हे सर्व मिळवून देण्याची व्यवस्था केली जाते. आपली जीवनातील महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची हमी मिळाल्यावर कोणता कामगार किंवा कर्मचारी निष्ठेने काम करणार नाही ?

जगातील बहुतेक देशांत निरनिराळ्या कंपन्यांत एकच काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारात बरीच तफावत असते. उदाहरणार्थ, सरकारी कचेरीत काम करणाऱ्या टायपिस्टला सहाशे रुपये पगार असेल, मोठ्या उद्योगातील कचेरीतल्या टायपिस्टला बाराशे रुपये पगार असेल. बड्या देशाच्या कॉन्सुलेटमधील टाय-पिस्टला अठराशे रुपये असेल, तर खासगी लहान कचेरीत त्याच जागेवर एखादा टायपिस्ट साडेतीनशेवर राबत असेल. अशा परिस्थितीत एक नोकरी सोडून अधिक पगाराची दुसरी करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नेहमीच धडपड असते हे साहजिकच आहे. शिवाय एका कचेरीत कामाचे रोज सहा तास तर दुसरीकडे आठ तास, कुठे सहा दिवस तर दुसरीकडे शनिवार–रविवार सुट्या. एक कचेरी गर्दीची व कनिष्ठ प्रकारची तर दुसरी वातानुकूलित, आलिशान. अशा अत्यंत विषम परि-स्थितीत एकच नोकरी जन्मभर करीत राहण्याकडे कर्मचाऱ्याचा कल नसतो. मग

या अस्थिरतेच्या वातावरणात त्याचे कामाकडे पूर्ण लक्ष नसते आणि शक्य तेवढे काम टाळण्याकडे प्रवृत्ती होते.

जपानी व्यवस्थापन पद्धतीने यावर उत्तम तोडगा काढला आहे. तो असा की, देशात सर्वत्र एका कामासाठी समान पगार दिला जातो. सोनी, हिताची, मित्सुई अशा सर्व कारखान्यांत ड्रायव्हर्सचा पगार एकच, टायपिस्टचा एकच आणि सेक्रेटरीचाही एकच. प्रत्येकाला दरवर्षी वाढ मिळते, विशेष गुण दाखविले की बढती मिळते. पण मूळ पगार समान असल्याने एक नोकरी सोडून दुसरीकडे जाणे किंवा सध्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणे असे प्रकार होत नाहीत. तसेच चांगल्या कामगाराला आपल्याकडे ओढण्यासाठी जास्त पगाराचे आमिष दाखवून दोन कारखान्यांतील चढाओढही यामुळे टाळली जाते.

निष्ठा ही जपानची हजारो वर्षांची परंपरा आहे. प्राचीन काळी जपानी सामुराई (योद्धे) सम्राटांवरील निष्ठेपायी लढाया करीत व प्रसंगी प्राणत्यागही करीत. आधुनिक कालात व्यक्तीवरील निष्ठेचे रूपांतर आता कंपन्यांवरील निष्ठेत झाले आहे. त्यामुळे अधिक पैसा देऊनही पाश्चात्य देशातील कारखान्यातील कामगार ओव्हरटाईम (जादा काम) करण्यास नाखूष असतो. उलट जपानी कामगार असे काम करण्यास उत्सुक असतो. जपानी कामगारांच्या कामावरील भक्तीमुळे अनेक देशांत त्या त्या राष्ट्रातील कामगारांपुढे समस्या निर्माण झाल्या आहेत. उदाहरणार्थ, जपानच्या सोनी कंपनीने इटलीत काढलेल्या एका कारखान्यात इटालियन व जपानी कामगार होते. पण इटालियन कामगार मध्येच काम सोडून जाऊ लागले, तेव्हा जपानी कामगार स्वतःचे काम करून त्यांचेही काम पूर्ण करू लागले. पण इटालियन कामगारांनी त्याविरुद्ध निदर्शने केली, संप केला आणि न्यायालयात खटला भरून मागणी केली की जपानी कामगार फार काम करतात म्हणून त्यांना जादा काम करण्यास बंदी करावी !

जपानी कारखान्यांत कामगारांना इतक्या सुविधा असतात की, तेथील कामगार सहसा काम सोडून जात नाहीत. एका जपानी कंपनीने अमेरिकेत लॉस एंजेलिसला एक कारखाना काढला. त्यात अमेरिकन व जपानी कामगार काम करीत होते. कारखाना सुरू झाल्यापासून दोन महिन्यांतच एका अमेरिकन कामगाराने राजीनामा दिला आणि तो दूर आपल्या खेड्यात राहायला गेला. ही घटना कंपनीच्या टोकिओ येथील मुख्य कचेरीत कळली, तेव्हा तीन जपानी अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ अमेरिकेला गेले. खेड्यात जाऊन त्या कामगाराची भेट घेऊन शिष्टमंडळाने सांगितले, " आमच्या कंपनीच्या चाळीस वर्षांच्या इतिहासात कामगाराने आपण होऊन नोकरी सोडल्याचे एकही उदाहरण नाही. आपण राजीनामा दिलात, तर आम्ही कोणत्या सुविधा देण्यात कमी पडलो ते सांगा. म्हणजे

आम्हाला आमचे व्यवस्थेत तशी सुधारणा करता येईल." अमेरिकन कामगार म्हणाला, " तुमचे काहीच चुकले नाही, मलाच कंटाळा आला म्हणून मी नोकरी सोडली !"

वेळ वाचविण्यासाठी जपानी व्यवस्थापनात अनेक उपाय योजिले जातात. उदाहरणार्थ, जनरल मोटर्स आणि टोयाटो अशी एक अमेरिकन व दुसरी जपानी मोटार कंपनी घेऊ. जनरल मोटर्समध्ये कोणत्या खात्याने कोणते वाहन किती वेळ वापरले याचा हिशेब ठेवला जातो व शेवटी त्या वाहनाचा खर्च त्या त्या विभागावर टाकला जातो. हा हिशेब ठेवण्याच्या यंत्रणेचा खर्च अर्थातच कारखान्यावर पडतो. मात्र टोयाटोमध्ये असा खातेवार हिशेब केला जात नाही. त्या वाहनाचा खर्च सबंध कारखान्यावर टाकला जातो. त्यामुळे खातेवार खर्चाची विभागणी करणारी यंत्रणा टाळली जाते व तिचा खर्च वाचतो.

जनरल मोटर्समधील सर्व कामगारांना कारखान्यात आल्याबरोबर आपले कार्ड पंच करावे लागते. त्या कार्डावर ती वेळ छापली जाते व त्यावरून त्याच्या वक्तशीरपणाची नोंद कारखान्याच्या पगार खात्याकडे होते. मात्र जपानी कारखान्यात वेळेवर येणाऱ्या कामगारांना कार्ड पंच करावे लागत नाही. जे कामगार उशिरा येतील त्यांनीच फक्त आपले कार्ड पंच करायचे असते. जपानी कामगारांचा वक्तशीरपणा जवळजवळ शंभर टक्के असतो. टोयाटो मोटार कारखान्यात अशा आशयाचा फलक आहे. "आपल्या कामातच कामगारांना खरे सुख लाभेल. कारण श्रम हाच समाजाच्या स्थैर्याचा पाया आहे."

एक काळ असा होता की, जपानी माल म्हणजे तकलुपी, तात्पुरता किंवा हलक्या प्रतीचा अशी समजूत होती. हा काळ साधारण दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या पंचवीस ते तीस वर्षांचा. पण महायुद्धाच्या विनाशातून बाहेर पडण्यासाठी जपानने जे अनेक निश्चय केले, त्यात जपानी माल जगातल्या कोणत्याही पहिल्या प्रतीच्या मालाच्या तोडीचा असला पाहिजे हा एक होता. जपानी व्यवस्थापनात या अपेक्षेला झीरो डिफेक्ट मॅनेजमेंट असे नाव आहे. निर्दोष माल असे या चळवळीचे समर्पक वर्णन करता येईल. हे नाव प्रथम निप्पॉन इलेक्ट्रिक कंपनीने दिले व त्यानंतर त्याचा झपाट्याने प्रसार होऊन १९६५ च्या मध्यास जपानमधील सहा हजार कारखाने 'शंभर टक्के निर्दोष माल' या ध्येयाचे पालन करू लागले. या कारखान्यातील कामगारांची संख्या ३५ लक्ष होती. एका प्रकारचा माल एका कारखान्याने पूर्णपणे निर्दोष असा तयार केला की, त्या क्षेत्रातील इतर कारखान्यांनाही त्याच उच्च गुणांनी युक्त असा माल तयार करावा लागतो, नाही तर ते कारखाने धंद्यातून बाहेर फेकले जातात. या तत्त्वाप्रमाणे सबंध जपानच या " झिरो डिफेक्ट " चळवळीत गुंतला आणि जपानी मालाचा दर्जा जगात अमे-

रिकेच्या मालापेक्षाही उजवा ठरला. याचे सारे श्रेय जपानच्या नव्या व्यवस्थापन शास्त्रास आहे.

'आपल्या कार्यात परिपूर्ण व्हा' असा संदेश कन्फ्यूशियस या चिनी तत्त्ववेत्त्याने प्राचीन काळीच दिला होता. तो जपानने उद्योगधंद्यात प्रत्यक्षात आणला. जपानने त्यासाठी 'झिरो डिफेक्ट अवॉर्ड' म्हणजे परिपूर्ण मालासाठी पारितोषिके सुरू केली. इतके असूनही व्यवस्थापनातील काटकसर, अमेरिकेच्या तुलनेने स्वस्त कामगार शक्ती व संपाचा पूर्ण अभाव यामुळे जपानी माल अधिक स्वस्त पडतो. उदाहरणार्थ, 'टेलिफोन स्पायडर' या नावाचे उपकरण जपानने तयार केले आहे. त्याची उंची फक्त पाऊण इंच व रुंदी अर्धा इंच आहे. जगातील सर्वांत लहान वायरलेस मायक्रोफोन असे त्याचे वर्णन केले आहे. सहाशे फुटांच्या आत तशाच दुसऱ्या यंत्रावर त्याच्या साहाय्याने बोलता येते. त्याच्या जाहिरातीत या मायक्रोफोनची किंमत 'अशाच प्रकारच्या अमेरिकन मालाच्या फक्त एक पंचमांश' अशी दिली आहे.

कोणत्याही कारखान्यात अथवा कंपनीत निर्णय कोण घेतो याला फार महत्त्व आहे. पाश्चात्य व्यवस्थापनात असे निर्णय व्यक्ती घेते. मग ती मॅनेजिंग डायरेक्टर असो किंवा कंपनीची अध्यक्ष असो. व्यक्तीच्या निर्णयांना इतर संचालक तांत्रिक संमती देतात. पण जपानी व्यवस्थापनात सामुदायिक निर्णय घेतले जातात, हा या दोन व्यवस्थापनांतील एक महत्त्वाचा फरक आहे. जपानच्या कारखान्यात, जो जो अधिकारी अगर कामगार त्या निर्णयाशी संबंधित आहे, त्या प्रत्येकाला बोलावून सर्वांची साधकबाधक मते घेऊन मगच सामुदायिक निर्णय घेतले जातात. हे निर्णय घेण्यात आपला वाटा आहे या विश्वासाने त्यांचे पालन करण्यातही सर्वांना उत्साह व आपुलकी वाटते. एकाच व्यक्तीने आपला निर्णय कंपनीतील सर्वांवर लादला, तर त्यांच्यात नाराजी निर्माण होण्याचा संभव असतो, मग ती व्यक्ती कितीही उच्चपदी असो.

उद्योगधंद्यात प्राप्तीचे प्रमाण भरपूर असल्याने जपानी उद्योगाला भांडवलाची टंचाई भासत नाही. १९५३ नंतरच्या वीस वर्षांत जपानने आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा एक तृतीयांश भाग उद्योगधंद्यात गुंतविला. जगातील इतर कोणत्याही देशाने एवढ्या मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्यांत गुंतवणूक केली नाही. यावरून जपानी पद्धतीच्या व्यवस्थापनावर जपानचा किती गाढ विश्वास आहे हे दिसून येते. अमेरिकन व्यवस्थापन पद्धतीत भांडवलाला अग्रक्रम असतो, तर जपानी पद्धतीत तंत्रज्ञ, व्यवस्थापक, कामगार अशा व्यक्तींना अग्रक्रम असतो. कारण धंद्यात भांडवल कसे येईल याची जपानी व्यवस्थापनाला अजिबात चिंता करावी लागत नाही.

जपानच्या उद्योगधंद्यांत केवळ भत्ते, पगार, घर, मोटार अशा भौतिक सुविधा पुरवण्याकडेच व्यवस्थापक लक्ष देत नाहीत, तर आपल्या कर्मचाऱ्यांच्या मानसिक विकासावरही त्यांचा भर असतो. प्रत्येक उद्योगाची स्वतंत्र प्रार्थना असते. ती प्रार्थना सामुदायिकपणे– जनरल मॅनेजरपासून सफाई कामगारांपर्यंत– म्हटल्यानंतरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होते. कारखान्याचा काही वेळ शारीरिक शिक्षण, कवायत, व्यायाम यांसाठी राखून ठेवण्यात येतो. त्यासाठी खास शिक्षक असतात. तसेच काही वेळ कारखाना बंद ठेवून कामगारांनी धार्मिक चिंतन करण्याचीही अनेक कारखान्यांची परंपरा आहे. कर्मचाऱ्यांच्या आत्मिक उन्नतीसाठी उत्कृष्ट ग्रंथालय, कॅसेटस्, चित्रपट यांचीही व्यवस्था असते.

कर्मचाऱ्यांची वैयक्तिक, आर्थिक परिस्थिती भक्कम राहावी, इकडे जपानी व्यवस्थापन विशेष लक्ष पुरविते. कर्जबाजारी झालेला कामगार आपल्या कामाकडे उत्तम लक्ष पुरवू शकत नाही, याची या व्यवस्थापनाला जाणीव असते.

पाश्चात्य व्यवस्थापनात कामगार एकदा कारखाना सोडून गेला की तो काय करतो अथवा खासगी जीवनात त्याची वागणूक कशी आहे याची व्यवस्थापन चिंता करीत नाही. याबाबतीत अमेरिकन व्यवस्थापन पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य मानते. मात्र जपानी व्यवस्थापन असे मानते की एखादा कर्मचारी व्यसनी, कर्जबाजारी होऊ नये ही जबाबदारीही कारखान्याची आहे. म्हणून कामगाराने चांगली बचत करावी, सुखी समाधानी व निर्व्यसनी कुटुंबप्रमुख म्हणून सामाजिक जीवन जगावे, अशी जपानी व्यवस्थापनाची अपेक्षा असते. याचा परिणाम असा झाला आहे की, जपानी कामगारांची बचत जगातील संपन्न देशातील कोणत्याही कामगाराच्या बचतीपेक्षा दहा टक्के अधिक आहे. जपानच्या एकंदर राष्ट्रीय उत्पन्नात जपानी उद्योगधंद्यांतील व व्यापारातील कर्मचाऱ्यांच्या बचतीचा वाटा २८ टक्के आहे, यावरून त्यांच्या आर्थिक स्थैर्याची कल्पना येईल. जपानी कामगाराला वर्षातून दोन वेळा बोनस मिळतो. या दोन बोनसांपैकी साठ टक्के रक्कम बचत केली जाते. बहुतेक बाबतीत कारखान्यातर्फेच ही बचत चांगले व्याज देणाऱ्या शेअर्समध्ये किंवा दीर्घ मुदतीच्या सुरक्षित ठेवीत गुंतविली जाते. जपानी कामगारांची बचत एकंदर उत्पन्नाच्या २२ टक्के आहे, जर्मनीत ती १२ टक्के तर फ्रान्समध्ये फक्त ८ टक्के आहे.

पाश्चात्य पद्धतीच्या कारखानदारीत स्पेशलायझेशनवर (खास ज्ञान) वाजवीपेक्षा अधिक भर देण्यात येतो. घड्याळांच्या कारखान्यात फक्त एक भाग तयार करण्याचे खास ज्ञान असलेल्या लोकांना प्राधान्य देण्यात येते. या पद्धतीत मुख्य दोष असा राहतो की त्या कामगाराला त्या क्षेत्रातील व्यापक दृष्टी राहत नाही. स्पेशलायझेशनचा अतिरेक झाला की तो कामगार इतर कामाला नालायक

ठरतो. उदाहरणार्थ, मोटारीच्या इंजिनातील एकच भाग उत्तम करणारा कामगार असेल व तो भाग यंत्रांच्या साहाय्याने तयार करण्याचा शोध निघाला की, तो कामगार बेकार होतो. पण जपानी पद्धतीच्या कारखानदारीत ' ओव्हर ऑल व्ह्यू ' वा कारखान्याच्या संपूर्ण कामकाजांचा दृष्टिकोन हा महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे या संपूर्ण उत्पादनात आपले स्थान नक्की कोठे आहे व पुढे परिस्थिती बदलली तर आपल्याला काय करावे लागेल, याचे भान जसे जपानी कामगाराला असते, तसे पाश्चात्य कामगाराला असत नाही.

जपानी व्यवस्थापनातला मानवी दृष्टिकोन ' थिअरी झेड् ' मध्ये गृहित धरलेला असतो. यापूर्वी मॅक्ग्रेगरने थिअरी एक्स व थिअरी वाय अशा पाश्चात्य व्यवस्थापनाच्या दोन पद्धतींचे विश्लेषण केले आहे.

थिअरी एक्समध्ये कामगारांनी स्वयंपूर्ण काम करण्यावर भर असतो. थिअरी वायमध्ये कारखानदार किंवा व्यवस्थापन कामगारांचे संपूर्ण नियंत्रण करतो, तर जपानची थिअरी झेड् म्हणजे कामगारांवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवून त्यांनी स्वयंस्फूर्तीने काम करावे, अशी परिस्थिती निर्माण करण्यावर भर असतो.

वैयक्तिक हितसंबंध विरुद्ध राष्ट्रीय हितसंबंध यांचा संघर्ष आल्यावर कर्मचाऱ्याने जर स्वतःपुरतेच पाहिले तर प्रगत राष्ट्राचीही उत्पादनाच्या बाबतीत अधोगती होण्याचा धोका असतो. जपानमध्ये राष्ट्रीय हिताला अग्रक्रम देण्यात येतो. बहुतेक जपानी कारखान्यांत कामाला सुरुवात करण्यापूर्वी जी सामुदायिक प्रार्थना म्हटली जाते, तिचा सारांश असा असतो, " नव्या जपानची उभारणी करण्यासाठी आपण आपली शारीरिक आणि मानसिक शक्ती एकवटून काम करू या. उत्पादन वाढविण्यासाठी, आपला माल परदेशी निर्यात करण्यासाठी आपण अविरत परिश्रम करू या." राष्ट्राची भरभराट झाली की आपली वैयक्तिक भरभराटही होणारच, असा जपानी कामगाराला विश्वास वाटतो.

निर्यात ही जपानच्या उद्योगधंद्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. जपानी माल जगाच्या सर्व देशांना उत्तम प्रकारे निर्यात व्हावा, म्हणून जपान सरकारने ' जपान एक्स्पोर्ट ट्रेड ऑर्गनायझेशन ' ही संघटना स्थापन केली आहे. मित्सुबिशीसारख्या अवाढव्य निर्यात व्यापार करणाऱ्या कंपन्या फक्त अर्धा टक्का कमिशन घेऊन निर्यात करतात. कारखानदार, व्यापारी आणि सरकार यांच्यात निर्यातीबाबत उत्तम सुसंवाद आहे. निर्यात होणारा माल सर्वोत्कृष्ट दर्जाचा असला पाहिजे, असा या तीनही घटकांचा कटाक्ष असतो. अलीकडेच जपान सरकारने चीनला कोटयवधी डॉलर्सचे कर्ज दिले. त्या कर्जापोटी चीनने जपानला तेल पुरवावे व जपानचा इंजिनियरिंग माल घ्यावा, असा करार झाला आहे. म्हणजे सरकारने दिलेल्या कर्जाचा फायदा जपानी कारखानदारांना झाला.

प्रत्येक जपानी कारखान्यात प्रशिक्षणाचे वर्ग असतात. हे वर्ग आपले काम संपल्यावर, सुट्टीत किंवा रजेच्या वेळी कामगारांना खुले असतात. या वर्गात त्या कारखान्यातील सर्व प्रकारच्या कामकाजाचे मोफत शिक्षण देण्यात येते. त्यामुळे अकुशल कामगारही पुढे कुशल कामगाराची कामे या वर्गात शिकून आपली उन्नती करून घेऊ शकतो आणि कारखान्यासही अधिक उपयुक्त ठरतो. कारखान्यातील इतर कामांचे ज्ञान त्याला या वर्गातून झाल्यामुळे इतर विभागांच्या अडचणी तो समजावून घेऊ शकतो व आवश्यक तर त्याप्रमाणे आपल्या कामात बदल करून घेऊ शकतो.

जपानमध्ये कामगार संघटना आहेत. कामगार व व्यवस्थापक यांच्यात अधिक सहकार्य कसे होईल आणि त्यामुळे उत्पादन कसे वाढेल या दृष्टीने कामगार संघटना व व्यवस्थापक यांचे प्रयत्न असतात. कामगार संघटनांच्या निवडणुकांत फारशी ईर्षा दिसत नाही. अनेकदा, मालकांशी बोलणी करण्यासाठी कोणीतरी हवे म्हणून काही प्रमुख व अनुभवी कामगारांना आग्रह करून कामगार संघटनांचे पदाधिकारी करावे लागते. 'हिताची' सारख्या सर्व मोठ्या कारखान्यात 'कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग' या तत्त्वाला आधीच मान्यता देण्यात आली असून, संचालक मंडळात कामगारांचा प्रतिनिधी असतो. 'हिताची' या जगप्रसिद्ध कंपनीच्या कामगार संघटनेचे संघगीतच 'अवर हिताची' असे असून त्यात कामगारांची थोरवी गायिलेली नसून, हिताची कंपनीचे श्रेष्ठत्वच प्रशंसिले आहे.

'हिताची' कंपनीच्या कामगार संघटनेचे साप्ताहिक आहे. त्यात कामांचे तास, ओव्हरटाईम वगैरे विषयीचे नवे कायदे, नियम, कंपनीची प्रगती, कामगारांच्या हितासाठी कंपनीने केलेल्या सोई यांची माहिती देण्यात येते. या कामगार संघटनेची स्वतःची वातानुकूलित इमारत आहे.

'हिताची' कंपनीत एकच कामगार संघटना असून, प्रत्येक कामागाराला हिचे सभासदत्व घ्यावेच लागते. इमारत, कार्यक्रम, सभा वगैरे सर्व बाबतीत कामगार संघटनेला व्यवस्थापनाचे एवढे सहकार्य मिळते की कामगार आणि व्यवस्थापन यांच्यात कसलीही कटुता नाही. जपानमधील सर्वच उद्योगधंद्यांत तेथील कामगार संघटना हा विरोधी पक्ष नसून प्रगतीतील एक सहकारीच असतो, हे जपानी व्यवस्थापनांचे एक लक्षणीय यश आहे.

कामगारांचा किमान पगार किती असावा हे कामगार संघटनेबरोबरच चर्चा करून ठरविले जाते. मूळ पगार (बेसिक सॅलरी) हा एकंदर वेतनाच्या सुमारे ४२ टक्के असतो. मोईट सप्लिमेंट म्हणजे कामगाराने उत्तम काम केल्याबद्दल २३ टक्के वेतन मिळते. जॉबलेव्हल सप्लिमेंट म्हणजे त्या त्या कामाचे खास वेतन ३१ टक्के असते. कंपनीकडून मिळणारे वेगवेगळे भत्ते हे ४ टक्के असतात. 'मला पगार

वाढ किंवा बढती द्या ' असे कामगार अगर अधिकारी वरिष्ठांना सांगत नाही. तसे करणे हे कमीपणाचे मानले जाते. कारण प्रत्येक कामगाराच्या कामावर वरिष्ठांचे लक्ष असते व त्या कामाचे मूल्यमापन करून तो बढतीची शिफारस करीतच असतो. कामगाराने आपण होऊन पगारवाढ मागणे म्हणजे वरिष्ठाला मूल्यमापन करता येत नाही असे सुचवण्यासारखेच आहे. कामगार दोन किलोमीटर्सहून अधिक अंतरावर राहत असेल तर त्याचे संपूर्ण रेल्वेभाडे अथवा बस भाडे कंपनी देते. कुटुंबात जितके लोक त्या कामगारावर अवलंबून असतील त्या प्रमाणात त्याला अधिक भत्ता मिळतो. हा भत्ता माणशी सुमारे दोनशे रुपयांनी वाढतो. एकाच प्रकारचे काम करणाऱ्या विविध कामगारांना त्याच्या वैयक्तिक गरजांप्रमाणे कमी अधिक वेतन या भत्त्यामुळे मिळते.

जपानी कामगाराला दरमहा दहा ते बारा हजार रुपये एकंदर वेतन मिळते. मात्र जपानमधील महागाई लक्षात घेता ते २,५०० ते ३,००० रुपये आहे असे आपण मानले पाहिजे. पण ते त्याला चांगले जीवनमान ठेवून १५ ते २५ टक्के शिल्लक टाकण्यास पुरेसे असते.

अशा प्रकारे जपानी व्यवस्थापन कामगारांच्या वैयक्तिक जीवनाचीही काळजी घेत असल्याने तेथील कामगार सुखी असतो.

९

# जपानमधील राजकारण, नभोवाणी व दूरचित्रवाणी

स्थिर राजकीय परिस्थिती हे जपानच्या तुफान आर्थिक प्रगतीचे एक महत्त्वाचे कारण आहे. अगदी अपवादात्मक, थोडा काळ वगळला तर गेली सदतीस वर्षे जपानमध्ये लिबरल डेमॉक्रॅटिक पक्ष हा एकच पक्ष सत्तेवर आहे. हा पक्ष मध्यममार्गी व परंपरांना धरून राहणारा आहे त्यामुळे देशाला जे स्थैर्य मिळाले, त्याचा उपयोग आर्थिक नियोजन व उद्योगधंदे–व्यापार या क्षेत्रातील प्रगती यांना मोठ्या प्रमाणावर झाला आहे. जपानवर शेकडो वर्षे सम्राटांचेच आधिपत्य होते. पण ११ फेब्रुवारी १८८९ रोजी जपानमध्ये पहिली राज्यघटना मंजूर करण्यात आली. १ जुलै १८९० रोजी जपानमध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि त्याच वर्षी पहिले डिएट (पार्लमेंट) अस्तित्वात आले. ही राज्यघटना व निवडणूक सम्राट मेइजी यांच्या कारकीर्दीत झाली म्हणून ती मेइजी घटना व मेइजी निवडणूक या नावानेही प्रसिद्ध आहे.

ही राज्यघटना अमलात येण्यापूर्वी सुमारे २६० वर्षे जपान हे इतर जगापासून अलग पडलेले राष्ट्र होते. टोकुगवा शोगुनांनी १६३५ मध्ये जपान व इतर राष्ट्रे यांच्यातील संबंध तोडून एकाकीपणे राहण्याचे धोरण आखले. त्यामुळे पाश्चात्य राष्ट्रातील लोकशाही सरकारचे वारे जपानमध्ये खेळण्यास वेळ लागला तरी १८८९ मध्ये जेव्हा भारत, ब्रह्मदेश, सिलोन वगैरे देश पारतंत्र्यात होते तेव्हा जपानमध्ये सम्राट मेइजींनी घटना अमलात आणावी व निवडणुका घ्याव्यात, ही कौतुकाची बाब होती. अर्थात मेइजींच्या कारकीर्दीत घटना राबविण्यासाठी जे नेते पुढे आले ते बहुसंख्येने सरदारदरकदारांच्याच वर्गातील असावेत हे साहजिकच होते. जपानमध्ये शिक्षणाचा प्रसार फारसा झाला नव्हता आणि सर्वसामान्य जनता सरदार व जमीनदार यांच्याविरुद्ध निवडणुका लढविण्यास धजावत नव्हती. तरी

पण ज्यांना तशी प्रागतिक पावले टाकावयाची होती, त्यांची वाट सम्राट मेइजींनी मोकळी करून दिली होती. ‘ जपानचे भवितव्य ठरविणारे महत्त्वाचे निर्णय निवडून आलेल्या प्रतिनिधींनी जाहीरपणे घ्यावेत,’ असे सम्राटांनी म्हटले होते, हे लोकशाही प्रतिनिधित्वाचे तत्त्व जपानने याच घटनेनुसार स्वीकारले होते.

राजकीय पक्षाच्या आधारावर आलेले पहिले जपानी मंत्रिमंडळ म्हणजे शिगेनोबु ओकुमा यांचे १८९८ मधील मंत्रिमंडळ. यांच्या पक्षाचे नाव केन्सेइटो पक्ष (घटनात्मक राजकीय पक्ष) असे होते. परंपरागत सरदार आणि उमराव यांचा शेकडो वर्षे जपानवर जो मोठा प्रभाव होता, त्याला या पक्षाने जबरदस्त धक्का दिला. येथून पुढे जपानचे राजकारण उच्च घराण्यात जन्म घेतलेल्या सरदारदरकदारांच्याकडून केवळ कर्तबगारीवर व लोकसेवेवर आधारलेल्या राजकीय नेत्यांच्याकडे आले. जपानच्या आजच्या विकसित राजकारणातील हा महत्त्वाचा टप्पा होता. केन्सेइटो हा पक्ष पुढे त्या दीर्घ नावाचे लघुरूप होऊन इटो पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला. या पक्षाची चार मंत्रिमंडळे अधिकारावर आली. पण त्यानंतर बारा वर्षे जनरल कात्तुरा आणि सॅओन्जी यांची पाच मंत्रिमंडळे आली. या दोन्ही नेत्यांची पार्श्वभूमी उमरावांची होती. पण त्यांनी परंपरागत राजकारण अगदी दूरान्वयाने परत जपानमध्ये आणण्यचा चतुर प्रयत्न केला. त्यांच्याच कारकीर्दीत (१९०४) जपानने रशियाबरोबर युद्ध केले आणि कोरिया जिंकून घेतला. (१९१०). १९१२ मध्ये सम्राट मेइजी निधन पावले आणि त्यांचे राजपुत्र यौशिहिटो हे सम्राट झाले. त्यांच्या आशीर्वादाने आणि प्रोत्साहनाने कट-सुरा हे तिसऱ्या वेळी पंतप्रधान झाले. पण सरदार घराण्यांनी दीर्घ काळ सत्ता काबीज करण्याविरुद्ध जपानच्या जनतेत या वेळी प्रचंड असंतोष निर्माण झाला. पंतप्रधान कटसुरा यांच्याविरुद्धच्या चळवळीने एवढे उग्र स्वरूप धारण केले की जनमताच्या दबावापुढे त्यांना पंतप्रधानपदाच्या ५३ व्या दिवशीच राजीनामा द्यावा लागला. परंपरा विरुद्ध लोकमत या संघर्षात झालेला जनतेचा हा महान विजय होता.

त्यानंतर तॉयशो लोकशाही हा खंड (१९१२ ते १९२६) सुरू झाला. सरदार घराण्याचे दडपण या कालखंडात नाहीसे होऊन लोकशाहीचा विकास झाला. राजकीय पक्षांना अधिक स्वातंत्र्य मिळाले. ताकाशी हारा यांच्या नेतृत्वा-खाली संपूर्ण लोकशाही असे मंत्रिमंडळ स्थापन झाले. या कालखंडात यामामोटी, ओकुमा आणि तेरामुची यांची मंत्रिमडळे आली. याच कारकीर्दीत पहिले महायुद्ध (१९१४–१९१८) झाले.

सन १९१८ मध्ये जपानमध्ये झालेल्या ‘ तांदळाच्या दंगली ’चे भावी राज-कारणावर दूरगामी परिणाम झाले. युद्धकालात जपानमधील मालाला प्रचंड



यांत्रिक रिक्षावाला. आत बसलेला उतारू कळ दाबून याची दिशा व गती बदलू शकतो.





'इशिका' या जगप्रसिद्ध कॅमेरा कंपनीत काम करणारी एक महिल



जपानच्या ' दिएट ' ( पार्लमेंट )ची इमारत.

बॉंबहल्लयात उद्ध्वस्त झालेले टोकियो शहर ( ऑगस्ट १९४५ )






अणुशक्तीवर चालणारी पहिली बोट जपानने १९६९ मध्ये बांधली.
'मुत्सु' या अशा पहिल्या बोटीचा जलतरण समारंभ.

जपानमधील एका राजकीय प्रचार सभेचे दृश्य.





जपानमधल्या गजबजलेल्या रस्त्यावरील वाहतुकीचे नियंत्रण हेलिकॉप्टरमधून केले जात आहे.

सबंध जगातील पन्नास टक्के जहाजबांधणी जपानमध्ये होते.
जपानमधील सर्वांत मोठे जहाजबांधणी केंद्र : याकोहामा बंदर







जगप्रसिद्ध फुजियामा पर्वत आणि दोन स्तर
चालणारी जपानमधील वाहतूक



छायाचित्रणाच्या जगातील क्रांतिकारक शोध :
फिल्मशिवाय फोटो घेणारा जपानी कॅमेरा ' माविक '

चीन आणि रशिया या राष्ट्राविरुद्धची युद्धे जिंकणारे
जपानचे पराक्रमी सम्राट मेइजी ( १८९५ )






सातव्या शतकातील जपानमधील मिरोकी बोधिसत्त्वाचा पुतळा.
हा जगातील एक सुंदर व प्राचीन पुतळा आहे.



सम्राटांच्या राजवाड्याचे एक दृश्य

जपानमधील जगप्रसिद्ध फुजी पर्वत






कामाकुरा येथील बुद्ध



जपानी पद्धतीच्या विवाहाचे एक दृश्य.

नव्या वर्षाच्या प्रारंभी जपानमधील स्त्रिया बॅडमिंटनसारखा एक खेळ खेळत आहेत.






नागासाकी शहरातील शांततेचा पुतळा.

हिरोशिमामधील शांतता स्मारक उद्यान





जपानी पद्धतीच्या बांधणीचे होर्युजी मंदिर




जपानमधील एका अनाथाश्रमात निराधार मुलांचा आहार चालू असताना त्यांना संगीत ऐकविण्यात येत आहे.



कबुकी नाटकातील एक दृश्य.

'इकेबाना' पुष्परचना करीत असलेली जपानी युवती.





सुमो या जपानमधील सर्वांत लोकप्रिय कुस्तीच्या प्रकारातील दोन कुस्तीगीर

उद्यानात आनंदाने खेळणारी जपानी मुले.





आधुनिक संपन्न जपानचा पाया घालणारे पंतप्रधान इकेडो पत्रकारांना मुलाखत देताना.


जपानमधील प्राथमिक शिक्ष





झियो पर्वतावर बर्फावरून घसरत जाण्याचा खेळ.

जपानमधील एका महाविद्यालयातील एक दृश्य.



मागणी होती, पण महायुद्ध संपल्यावर ही मागणी एकदम थांबली आणि जपानमध्ये मंदीची लाट आली तशीच चलनवाढही झाली. भात हे जपानचे प्रमुख अन्न होते. त्यामुळे तांदळाचे दर बेसुमार वाढले. तेव्हा जपानमध्ये गरीब लोकांनी प्रचंड उठाव केले. दहा लाख लोक त्यात सामील झाले. त्यांनी सरकारी आणि व्यापाऱ्यांची तांदळाची कोठारे लुटली. सरकारला हा प्रचंड उठाव दाबून टाकणे अशक्य झाले. तेव्हापासून जनतेला किमान धान्यवाटप, वस्त्र, निवारा देणे याला जपानच्या राजकारणात अतिशय महत्त्व प्राप्त झाले.

याच सुमारास जपानच्या आर्थिक पुनर्घटनेबरोबर तेथील राजकीय परिस्थितीही झपाट्याने बदलत होती. पूर्वीचा शेतीप्रधान जपान आता उद्योगप्रधान झाला होता आणि कामगारवर्ग हा राजकारणात अधिकाधिक महत्त्वाचा घटक बनत होता. हाटा हे पंतप्रधान झाले, तेव्हा सर्वसामान्य नागरिकांकडे प्रथमच जपानचे नेतृत्व आले. हाटा यांना कोणतीही उच्च खानदानी परंपरा नव्हती. हाटा यांनी राजकीय पक्षांवर आधारलेले राजकारण जपानमध्ये स्थिर करण्यासाठी अतिशय श्रम घेतले. १९२१ मध्ये त्यांचा खून झाला आणि सेयुकाईचे दुसरे नेते ताकाहाशी यांच्याकडे पंतप्रधानपद गेले. त्यांनी सरदारवर्गातून बरेच मंत्री घेतले आणि काही काळ समाजाभिमुख लोकशाहीची परागती झाली. पण त्यांच्याविरुद्ध जनमत खवळले. चार महिन्यांतच ताकाहाशी यांच्या सबंध मंत्रिमंडळालाच राजीनामा द्यावा लागला आणि लोकशाहीचा ध्वज पुन्हा उभारला गेला. सेन्सिकाई (कॉन्स्टिटय़ूशनल असोसिएशन) पक्षाच्या काटो मंत्रिमंडळाची त्यानंतर स्थापना झाली. नव्या जगाच्या लोकशाहीचे वारे जपानमध्ये कसे वाहत होते आणि आपल्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी जनता किती जागरूक होती हे यावरून दिसते.

त्यानंतर १९३२ पर्यंत केन्सिकाई आणि सेयुकाई या दोन प्रमुख राजकीय पक्षांची मंत्रिमंडळे आलटून पालटून अधिकारावर येत होती. इंग्लंड व अमेरिका यांच्याप्रमाणे द्विपक्ष राज्यपद्धती याच काळात जपानमध्ये रूढ झाली व दोन विरोधी पक्षांत एक प्रकारचा समतोल निर्माण झाला. प्रौढ मतदानावर आधारलेली पहिली निवडणूक जपानमध्ये १९२८ मध्ये घेतली गेली. त्या वेळी वरील दोन प्रमुख राजकीय पक्षांव्यतिरिक्त रोडो नोमिटो (कामगार–शेतकरी पक्ष), शकाई मिन्शिटो (समाजवादी जनता पक्ष), नियॉन रोनोटो (जपान शेतकरी कामगार पक्ष) असे अनेक लहान पक्ष होते. त्या सर्वांना मिळून डिएटमध्ये फक्त आठ जागा मिळाल्या. कम्युनिस्ट पक्षावर बंदी होती. पण १९२२ पासून हा पक्ष भूमिगत राहून कार्य करीत असे.

ता. १५ मे १९३२ रोजी काही सरकारी अधिकाऱ्यांनी बंड केले. पंतप्रधान

त्सुयोशी यांचा खून झाला. त्यानंतर चार वर्षे जपानमधील राजकीय पक्षांत बेदिली आणि अस्थैर्यच माजले. २६ फेब्रुवारीस पुन्हा लष्करी उठाव करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला, पण हे बंड ताबडतोब दडपून टाकण्यात आले. तरीही राजकीय पक्षात स्थैर्य नव्हते हे सहा वर्षांत नऊ वेळा सरकार बदलले यावरून स्पष्ट होते. जपान, जर्मनी व इटली यांच्यात गुप्त वाटाघाटी चालू असतानाच जर्मनीने रशियाबरोबर अनाक्रमणाचा करार करून जागतिक राजकारणाला धक्का दिला. जपानमधील राजकीय स्थैर्य त्यामुळे आणखीनच ढासळले. विशाल राष्ट्रहितासाठी सर्व राजकीय पक्ष विसर्जन करावेत, अशी सूचना आली.

सन १९४० च्या जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत जपानमधील राजकीय पक्ष विसर्जित करण्यात आले. जनरल टोजो यांनी आपल्या हाती सत्ता घेतली आणि लोकशाही नावापुरतीच राहून जपानचे एका अर्थी लष्करीकरण झाले. १९४२ च्या निवडणुकीत तर जनरल टोजो यांनी ‘ सरकार पुरस्कृत उमेदवार ’ हा नवाच प्रकार शोधून काढला आणि डिएटचे जास्तीत जास्त सभासद आपल्या बाजूचे असतील याची तरतूद केली. पण दुसऱ्या महायुद्धात जपान जेव्हा पराभवाच्या समीप आला तेव्हा जनमत उग्र झाले आणि जनरल टोजो यांना राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर काही काळ कोइसो यांचे मंत्रिमंडळ आले. थोड्याच काळात सुझुकी यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे घेतली आणि दोस्त राष्ट्रांपुढे शरणागती पत्करली.

चार वर्षांच्या युद्धात राष्ट्र पार डबघाईला आले. आर्थिक नुकसानीची गणती करणेच कठीण होते आणि भविष्यकाळ अंधकारमय होता. पण या प्रचंड विनाशानेच जपानचा लष्करी विजयावरचा विश्वास उडाला आणि लोकशाहीच्या भक्कम पायावर राष्ट्र उभारण्याचा विचार नेत्यांनी गंभीरपणे सुरू केला. शरणागतीनंतरची दोन वर्षे आर्थिक जम बसविण्यात गेली. याच काळात राजकीय पक्षांचीही पुनर्बांधणी झाली. ३ मे १९४७ रोजी जपानची नवी घटना अस्तित्वात आली. त्यानंतरच्या काळातच आजच्या जपानमधील सुस्थिर राजकीय पक्षांचा पाया घालण्यात आला. या नव्या घटनेनुसार सार्वभौम सत्ता लोकांच्या हाती सोपविण्यात आली. सम्राट हे फक्त तांत्रिकदृष्ट्या देशाचे प्रमुख राहतील अशी तरतूद करण्यात आली. जपानने सरकारी मार्गांचा कायमचा त्याग करण्याचे ठरवले आणि मूलभूत मानवी हक्क प्रत्येक नागरिकाला मिळण्याची हमी देण्यात आली

या वेळी जपानमध्ये जे प्रमुख राजकीय पक्ष कार्य करू लागले त्यात जपान सोशॅलिस्ट पार्टी, जपान लिबरल पार्टी, जपान प्रोग्रेसिव्ह पार्टी आणि जपान को-ऑपरेटिव्ह पार्टी हे प्रमुख होते. जपान कम्युनिस्ट पक्षावरची बंदी उठविण्यात आली होती व तो पक्षही लहान प्रमाणात कार्य करू लागला होता. मात्र जपान-

मध्ये कम्युनिस्ट पक्षाला कधीच फार मोठा पाठिंबा मिळाला नाही. नव्या घटनेनंतरच्या पहिल्याच निवडणुकीत जपान लिबरल पक्ष प्रथम क्रमांकाने विजयी झाला. या पक्षाचे नेते शिगेरू योशिदा यांनी प्रोग्रेसिव्ह पक्षाच्या सहकार्याने मंत्रिमंडळ स्थापन केले. त्यानंतरच्या निवडणुकीत प्रोग्रेसिव्ह पक्षाने बहुमत मिळविले, पण १९४८ मध्ये डेमॉक्रॅटिक पक्षाच्या हितोशी अशिदा यांचे मंत्रिमंडळ आले. आता राजकीय पक्ष स्थिरावत होते आणि लोकशाही प्रक्रिया समाजाच्या सर्वांत खालच्या वर्गापर्यंत पोचली होती. फेब्रुवारी १९४९ मध्ये योशिदा यांच्या लिबरल पक्षाचे बहुमत झाले. योशिदा यांच्या नेतृत्वाने त्यांच्या पक्षाने जपानच्या राजकीय स्थैर्याचा पाया घातला. एका महायुद्धातून गेल्याने व अमेरिकेने काही काळ नियंत्रण आणल्याने १९४७ नंतरच्या काही वर्षांत भराभर मंत्रिमंडळे बदलत गेली हे खरे असले तरी लोकशाही स्थिरावण्याच्या प्रक्रियेचाच तो एक भाग होता. योशिदा हे अनेकदा पंतप्रधान झाले व त्यांनी एकंदर सात वर्षे एक महिना जपानचे नेतृत्व केले. संक्रमणाच्या काळात देशाला स्थैर्य देण्याची अत्यंत महत्त्वाची कामगिरी योशिदा यांनी केली.

अलीकडच्या काळातील जपानमधील सर्वांत महत्त्वाची राजकीय घटना म्हणजे नोव्हेंबर १९५५ मध्ये दोन प्रमुख पक्षांचे झालेले एकीकरण. डेमॉक्रॅटिक व लिबरल पक्ष एकत्र येऊन त्यांनी लिबरल डेमॉक्रॅटिक प्रबळ पक्ष स्थापन केला. तेव्हापासून अगदी थोडा अपवादात्मक काळ वगळता गेली २७ वर्षे जपानमध्ये याच पक्षाचे स्थिर सरकार आहे. आर्थिक प्रगतीसाठी राजकीय स्थैर्याची अत्यंत आवश्यकता असते- ते स्थैर्य जपानला लिबरल डेमॉक्रॅटिक पक्षाने दिले. स्थिर सरकार असल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणातही जपानचे प्रभुत्व कायम राहिले. हा पक्ष 'कॉन्झर्व्हेटिव्ह' म्हणजे परंपरेवर भर देणारा असल्याने जपानच्या जनमानसाशी त्यांची विचारपरंपरा मिळतीजुळती आहे. कोणत्याही आत्यंतिक मतवादी राजकीय पक्षाचा जपानी सनातनी मनावर प्रभाव पडत नाही. जपानी लोक हे उद्योगधंदे आणि व्यापार यांत जगातील अत्यंत प्रगत असले, तरी वैयक्तिक व कौटुंबिक जीवनात ते धर्म मानणारे, सनातनी विचारांचे व मनःशांतीला महत्त्व देणारे आहेत. त्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनाशी मिळताजुळता असा लिबरल डेमोक्रॅटिक पक्ष जपानमध्ये सातत्याने निवडून आला आहे. सध्याचे पंतप्रधान झेंको सुझुकी हे याच पक्षाचे नेते आहेत.

जपानमधील विरोधी पक्षांत जपानीज सोशॅलिस्ट पक्ष, डेमॉक्रॅटिक सोशॅलिस्ट पक्ष, क्लीन गव्हर्मेंट पार्टी, जपानी कम्युनिस्ट पक्ष, सोशल डेमॉक्रॅटिक पक्ष आणि न्यू लिबरल क्लब यांचा समावेश आहे. जून १९८० मध्ये झालेल्या डिएटच्या निवडणुकीत हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हजमध्ये एकंदर ५११ जागांपैकी लिबरल

डेमॉक्रॅटिक पक्षाला २८४ जागा मिळाल्या. त्याखालोखाल सोशॅलिस्ट पक्षाला १०७ जागा मिळाल्या. क्लीन गव्हमेंट पक्ष (३३), डेमॉक्रॅटिक सोशॅलिस्ट (३२), कम्युनिस्ट पक्ष (२९). न्यू लिबरल क्लब (१२), सोशॅलिस्ट डेमॉक्रॅटिक फेडरेशन (३) स्वतंत्र (११) अशी इतर जागांची विभागणी झाली. डिएट (संसद)चे कोकाई (वरिष्ठ सभागृह) आणि सॅन्जिनी (कनिष्ठ सभागृह) असे दोन भाग आहेत. भारत किंवा इंग्लंडप्रमाणेच खरी सत्ता कनिष्ठ सभागृह किंवा हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हकडेच असते.

जपानमध्ये निवडणुकांच्या प्रचारसभा आपल्याकडच्या सभांसारख्या क्वचितच विराट असतात. तेथे बहुधा कचेऱ्यांना लोक जाताना किंवा कचेऱ्याहून येताना भुयारी रेल्वेच्या स्टेशनजवळ या प्रचारसभा होतात. त्यासाठी व्यासपीठ वगैरे काही नसते. अशा काही सभा मी टोकियोत पाहिल्या आहेत. एका ट्रकवर तीन-चार कार्यकर्ते हातात मायक्रोफोन घेऊन उभे असतात. त्यांच्यापैकी एकदोन वक्ते भाषण करतात व इतर कार्यकर्ते जमावात पत्रके वाटतात. सकाळी कचेरीला जाताना लोक घाईत असतात, त्यामुळे संध्याकाळी या सभा अधिक वेळ चालतात व त्यांना गर्दीही अधिक असते. शिवाय वृत्तपत्रातील लेख, जाहिराती, पोस्टर्स याद्वारा प्रचार चालतोच. टी. व्ही व रेडिओची शेकडो खासगी केंद्रे आहेत त्यांचा प्रचारासाठी उपयोग होतो. तसेच एन. एच. के. या सरकारी रेडिओ व टी. व्ही. केंद्रावरही सर्व पक्षांना प्रचारस्वातंत्र्य असते. मात्र जपानवर लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाचा एवढा प्रभाव आहे की निवडणुकीत काही आश्चर्यकारक निकाल लागण्याची नजीकच्या भविष्यकाळात तरी शक्यता नाही.

मी टोकियोत असताना मला एक अनपेक्षित फोन आला. बोलणारा इसम जपानी होता, पण तो हिंदी भाषा उत्तम बोलत होता. तो म्हणाला, " माझं नाव हिरोशी थाका मारू. मी एन. एच. के. रेडिओ जपानच्या हिंदी विभागात काम करतो. आपण आमच्या रेडिओच्या हिंदी विभागात भाषण करावं अशी विनंती करण्यासाठी मी फोन केला आहे." मी ते निमंत्रण तत्काळ स्वीकारलं. थाका मारू यांचं हिंदी माझ्या हिंदीपेक्षाही चांगलं होतं, याचं मला कौतुक वाटलं. कोणी भारतीय लेखक टोकियोत आला आहे असं कळल्याबरोबर लगेच त्याचा पत्ता शोधून त्याचं भाषण ठरवण्याच्या त्यांच्या तत्परतेचंही मला कौतुक वाटलं.

त्यांनी सांगितलेल्या पत्त्यावर मी गेलो. शिबु या स्टेशनजवळच एन. एच. के या जपानमधील सर्वांत मोठ्या रेडिओ-टी. व्ही. संस्थेची मुख्य कचेरी होती. मी हिंदी विभागाकडे गेलो. तेथे श्री. सरीन नावाचे एक उत्तर भारतीय विभाग प्रमुख होते. ते म्हणाले, " जपानविषयीच्या तुमच्या अनुभवावर आधारलेली एक मुलाखत मला घ्यायची आहे. ही दहा मिनिटांची मुलाखत आहे. पण आम्ही त्यासाठी रोख

मोबदला देऊ शकत नाही. यात पैशाचा प्रश्न नाही, पण जपान सरकारच्याच नियमानुसार जपानला भेट देणाऱ्या प्रवाशांना इथे पैसा मिळविता येत नाही. एन. एच. के. ही सरकारी संस्था असल्याने आम्हीच आमचे नियम मोडणे अप्रशस्त होईल. पण आपल्या दहा मिनिटांच्या मुलाखतीसाठी आम्ही आपल्याला एखादी भेटवस्तू देऊ."

मी म्हटलं, "जपानमधून मी माझ्या भारतीय श्रोत्यांसाठी भाषण करू शकतो यातच मला आनंद आहे. आपण काहीही दिले नाही तरी चालेल." श्री. सरीन यांनी माझी चौदा मिनिटे मुलाखत घेतली. मग त्यांनी मला प्रवासी बॅग भेट म्हणून दिली. त्यांनी हिंदी विभागातल्या इतर अधिकाऱ्यांची ओळख करून दिली. थाका मारू यांच्याशिवाय आणखी एक जपानी मुलगी व एक भारतीय मुलगी त्या विभागात काम करीत होते. श्री. थाका मारू यांनी मग मला एन. एच. के. च्या इंग्रजी विभागात नेले. तेथे एका जपानी अधिकाऱ्याने माझी दहा मिनिटांसाठी इंग्रजीतून मुलाखत घेतली. त्यासाठी मला एक टायपिन व नेकटाय बक्षीस देण्यात आला. माझी ही भाषणे पुढच्या आठवड्यात भारतासाठी जपानहून होणाऱ्या प्रक्षेपणातून सादर करण्यात आली. जपानमधील नभोवाणी व दूरदर्शनबद्दल मिळालेली माहिती मला फारच उद्बोधक वाटली.

जपानमध्ये आठ ते दहा चॅनेल्सवर टी. व्ही. चे कार्यक्रम दिसतात. एन. एच. के. (जपान ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन) आणि एन. टी. व्ही. (जपान टेलिव्हिजन नेटवर्क) या संस्थात मिळून पस्तीस हजार लोक काम करतात. जपानची लोकसंख्या अमेरिकेच्या एक विसांश आहे, पण जपानचा रेडिओ व टेलिव्हिजन वापराबाबत अमेरिकेच्या खालोखाल जगात दुसरा क्रमांक लागतो. एन. एच. के. ही जपानमधील सर्वांत मोठी नॉनकमर्शिअल म्हणजे बिनव्यावसायिक अशी संघटना आहे. शिक्षण व संस्कृती यांच्यावरच या संस्थेच्या कार्यक्रमांचा भर असतो.

एन. एच. के. चा 'रेडिओ जपान' या नावाचा विभाग आहे. तो फक्त परदेशांसाठीच नभोवाणीचे कार्यक्रम प्रक्षेपित करतो. रेडिओ जपानतर्फे दररोज एकवीस भाषांतून जगाच्या सर्व भागांत एकूण ३७ तास प्रक्षेपण चालते. भारतासाठी रोज रात्री ८ ते ११ पर्यंत हिंदी, उर्दू, इंग्रजी व बंगाली या भाषांतून रेडिओ जपानचे कार्यक्रम होतात. परदेशासाठी होणाऱ्या कार्यक्रमांपैकी ६४ टक्के कार्यक्रम बातम्या व बातम्यांवरील टीका – टिप्पण्या या स्वरूपाचे असते. जपान सरकारची धोरणे, जपानी वृत्तपत्रांतील मतांचा गोषवारा आणि जपानचे औद्योगिक व व्यापारविषयक वृत्त यांवर या कार्यक्रमात भर देण्यात येतो. याशिवाय जपान प्रवासाविषयी माहिती, महत्त्वाच्या व्यक्तींची स्फूर्तिदायक चरित्रे, जपानी संगीत, नाटके, कथा यांचेही प्रक्षेपण होते. जगातील विविध राष्ट्रांतील लोकांना जपानी

भाषा शिकण्याची उत्सुकता असते, हे लक्षात घेऊन रेडिओ जपानवर जपानी भाषेचे शिक्षण इंग्रजी, फ्रेंच व इंडोनेशियन या भाषांतून देण्यात येते. जपानी भाषेचे शिक्षण घेण्यास उत्तेजन देण्यासाठी रेडिओ जपानने भाषेची क्रमिक पुस्तके छापली आहेत. ज्या श्रोत्यांना ही क्रमिक पुस्तके हवी असतील त्यांनी रेडिओ जपानशी पत्रव्यवहार केल्यास त्यांना ती मोफत पुरविण्यात येतात. ' जनता सर्व्हिस ' या विभागातर्फे दररोज १३ तास १० मिनिटे इंग्रजी व जपानीमधून जगभर बातम्या व त्यांचे समीक्षण ही प्रक्षेपित केली जातात. रेडिओ जपानचे कार्यक्रम जपानी, इंग्रजी, स्पॅनिश, इटालियन, जर्मन, हिंदी, ब्रह्मी, कोरियन, रशियन, अरेबिक, चिनी इत्यादी २१ भाषांतून प्रसारित होतात.

जपानमधील टेलिव्हिजन हा गुणवत्तेच्या दृष्टीने जगात पहिल्या क्रमांकाचा आहे. जपानी टेलिव्हिजनवरचे चित्र अत्यंत स्पष्ट व सुंदर दिसते. पण इतरत्र नसलेल्या अनेक सोई त्यात आहेत. उदाहरणार्थ, रोज सकाळी अकरा वाजेपर्यंत जपानी टेलिव्हिजनवर कार्यक्रम चालू असतानाच वेळही दाखवली जाते. दर सेकंदाला ही वेळ बदलत असते. सकाळी अचूक वेळ दाखविण्याचे कारण असे की लोकांना सकाळी आपापल्या कामाला जायचे असते. टी. व्ही. पाहताना किती वेळ झाला याचे भान राहिले नाही तर त्यांना कामावर जायला उशीर होईल म्हणून दर सेकंदाला अचूक वेळ कोणत्याही चॅनेलवरच्या कार्यक्रमात दाखविली जाते. कार्यक्रम चालू असतानाच त्याची व्हिडिओटेपही घरच्याघरी करण्याची सोय जपानमध्ये आहे.

तेथील लोक दररोज सरासरी तीन तास सहा मिनिटे टी. व्ही. पाहतात. सुट्टीच्या दिवशी ते तीन तास शेहेचाळीस मिनिटे टी. व्ही. पाहतात. रात्री साडे-अकरानंतरचे सहा तास सोडले, तर जपानमधील टी. व्ही. वर रोज सरासरी १७ तास ४० मिनिटे कार्यक्रम चालू असतात. जपानमध्ये टी. व्ही. चे कार्यक्रम प्रक्षेपित करणाऱ्या ९४ संस्था असून रेडिओ कार्यक्रम प्रक्षेपित करणाऱ्या ५८ संस्था आहेत. टी. व्ही. कार्यक्रम प्रसारित करणारी चार हजार दोनशे व रेडिओ कार्यक्रम प्रक्षेपण करणारी १९८ केंद्रे आहेत. टी. व्ही. चे कार्यक्रम जास्तीत जास्त ७० ते ७५ मैल परिसरातच जाऊ शकतात म्हणून त्यांच्या केंद्रांची संख्या एवढी मोठी आहे. इतक्या मोठ्या संख्येने टी. व्ही. व रेडिओचे कार्यक्रम होत असल्याने जपानमध्ये गुणवत्तेसाठी स्पर्धा होते आणि जास्तीत जास्त चांगले कार्यक्रम सादर करण्याची अहमहमिका लागते.

जपानची लोकसंख्या अकरा कोटी दहा लक्ष आहे. तेथे पावणेचार कोटी टी. व्ही. चे संच आहेत. त्यापैकी ९२ टक्के संच रंगीत आहेत. अनेक कुटुंबांत एकाहून अधिक संच आहेत. त्याशिवाय मोटारीतील व पोर्टेबल संच वेगळेच.

बहुतेक मोठ्या कारखान्यांत व कचेऱ्यांत उत्तम व्यवस्थेसाठी क्लोज सर्किट टी. व्ही. आहेत. अनेक मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्येही जागोजाग क्लोज सर्किट टी. व्ही. असतात. तंत्रदृष्ट्या जपानी टी. व्ही. व रेडिओ हे जगातील सर्वोत्कृष्ट संच असतात. १९८० मध्ये टोकियो येथे जागतिक टी. व्ही. परिषद भरली होती. त्या परिषदेत जपानने सर्वांत स्वस्त असा रंगीत टी. व्ही. संच सादर केला. त्याची किंमत फक्त साडेआठशे रुपये होती. जपानने जे अनेक प्रकारचे टी. व्ही. संच तयार केले आहेत, त्यांपैकी एक माणसाच्या अंगठ्याच्या आकाराचा आहे तर दुसरा मनगटी घड्याळात बसविता येण्याएवढा लहान आहे.

चार प्रमुख मार्गांनी जपानमध्ये टी. व्ही. चे कार्यक्रम दिसतात. एक थेट प्रक्षेपणाने, दुसरा केबल सर्व्हिसने. आता अमेरिका व इंग्लंडमध्येही ही केबल सर्व्हिस सुरू झाली आहे. कॅप्टन सर्व्हिस नावाचा तिसरा प्रकारही जपानमध्ये आहे. या प्रकारात काही बातम्या व राष्ट्रीय, शैक्षणिक कार्यक्रम टेलिफोन वायरला टी. व्ही. संच जोडला तर मिळू शकतात. चौथा प्रकार म्हणजे 'सकुरा' नावाच्या उपग्रहाच्या साहाय्याने.

दररोज अठरा तास जपानी दूरदर्शनवर काय कार्यक्रम देत असतील, असा प्रश्न साहजिकच पडेल. या कार्यक्रमांत भरपूर विविधता असते. चित्रपटमालिका हा एक विशेष कार्यक्रम असतो. मी जपानमध्ये असताना 'शोगुन' या कादंबरीवरील वीस भागांची चित्रपटमालिका टी. व्ही. वर चालू होती. हीच मालिका अमेरिकेतही अत्यंत लोकप्रिय झाली आहे. सकाळच्या कार्यक्रमात निसर्गविषयक माहितीपट, ताज्या बातम्या, या बातम्यांचे समीक्षण, शालेय शैक्षणिक कार्यक्रम, कॉलेजांसाठी कार्यक्रम हे प्रामुख्याने असतात. दुपारी व रात्री जपानमध्ये तयार झालेले तसेच अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे परदेशांत तयार झालेले निवडक चित्रपट दाखविण्यात येतात. जपानचा धर्म, संस्कृती, साहित्य, चित्रवाणी यांवर आधारलेले कार्यक्रम असतात. रंगभूमीविषयक कार्यक्रम, विज्ञान, व उद्योगधंदे या क्षेत्रांतील ताजी माहिती देणाऱ्या मुलाखती, प्रात्यक्षिके वगैरे कार्यक्रम असतात. मुलांसाठी करमणुकीचे तसेच आधुनिक जगाची माहिती देणारे कार्यक्रम असतात. त्याचप्रमाणे महिला विश्वातील घडामोडी दाखविणारे कार्यक्रमही सादर करण्यात येतात. कामगार, व्यवस्थापन, व्यापार, परदेशसंबंध, निर्यात अशा खास विषयांवरील कार्यक्रम तज्ज्ञांच्या साहाय्याने आयोजित केले जातात. अनेक संस्था असे भरगच्च कार्यक्रम प्रक्षेपित करीत असतात.

बहुतेक कार्यक्रम जपानी भाषेत होतात, पण काही चॅनेल्सवर जपानी संवादाबरोबरच इंग्रजी सब टायटल्सही दिसतात. चिनी, कोरियन, फ्रेंच या भाषांतील कार्यक्रमांसाठी काही वेळ राखून ठेवला जातो. संध्याकाळी व रात्रीच्या

कार्यक्रमांत संगीत व नृत्यांचे बरेच कार्यक्रम असतात.

जपानमध्ये भूकंप, वादळे, पूर यांचे प्रमाण बरेच मोठे असल्याने करमणुकी-बरोबरच व्यावहारिक व उपयुक्त माहिती मिळविण्यासाठीही रेडिओ व टी. व्ही.चा खूपच उपयोग होतो. नैसर्गिक आपत्ती किंवा अपघात यांमुळे एखाद्या भागातील वाहतूक बंद झाली असली किंवा तीत अडथळे आले असतील तर टी. व्ही. व रेडिओवर तत्काळ तसा इशारा देण्यात येतो. व लक्षावधी लोकांचा त्रास वाचतो. दिवसातून बहुतेक वेळ ही माध्यमे चालू असल्याचा हा एक मोठाच उपयोग आहे. हवामानविषयक बातम्या सांगणारे एक रेडिओ केंद्र तर चोवीस तास चालू असते.

१०

# नाट्यसृष्टी आणि वृत्तपत्रसृष्टी

मला जपानमधील नाटकांविषयी बरेच कुतुहल होते म्हणून मी टोकियोच्या मुक्कामात जपानच्या जगप्रसिद्ध कबुकी नाट्यगृहात जपानी नाटकाचा प्रयोग पाहिला. त्याआधी जपानी नाटककार एसुके सुगावा यांनाही मी भेटलो. आणि जपानमधील पारंपरिक व आधुनिक नाटकांविषयी चर्चा केली. ते म्हणाले, "परकीयांना जपानी नाटक म्हणजे कबुकी एवढीच अंधुक कल्पना असते. पण आमच्या पारंपरिक नाट्यप्रकारात बुगाकू, नोह, निंगुयो, जोरुरी आणि कबुकी हे प्रमुख आहेत. सध्याच्या काळी बुगाकू हा नाट्यप्रकार फक्त सम्राट, उच्चवर्गीय, मंदिरे आणि धार्मिक जत्रा यांच्यासाठीच होतो. हा प्रकार परकीयांना क्वचितच पाहायला मिळतो. कारण त्याचे कार्यक्रम खास प्रसंगीच होत असतात. बुगाकूमध्ये वाद्यसंगीत, गायन व नृत्य यांवर भर असतो. नोह म्हणजे मुखवटे घालून केलेले नाटक. त्यात नृत्य, संगीत यांबरोबरच शब्दांना किंवा संवादांनाही बरेच महत्त्व असते. पाश्चात्य देशात नोह प्रकाराची माहिती आहे कारण त्यात संवादावर भर असल्याने त्यांची पुस्तके उपलब्ध आहेत. पण कबुकी हा प्रकार सर्वांत अधिक प्रसिद्ध आहे. निंगुयो हा प्रकारही आता फारसा दिसत नाही. त्याशिवाय बन्राकु हा जोरुरीप्रमाणेच हा नाट्यप्रकार आहे. तो 'डॉल थिएटर' (बाहुल्यांची नाटके) या नावाने ओळखला जातो."

नोह हा नाट्यप्रकार मुख्यत: श्रीमंत, सरदार, सम्राट वगैरेंसाठी प्रथम सुरू झाला. त्याउलट कबुकी हे आम जनतेचे नाटक आहे. नोह हे बुद्धिमंतांचे नाटक होते. याउलट कबुकी हा प्रकार पारंपरिक नृत्य व संगीत यांतून विकसित झाला होता. कबुकी हा शब्द 'कबुकु' या क्रियापदावरून आला आहे. कबुकु याचा अर्थ 'विचित्र वेष वापरणे' असा आहे. स्वत:चे नसलेले म्हणजे दुसऱ्याचे कपडे

घालून रंगमंचावर वावरणे म्हणजेच दुसऱ्याची भूमिका करणे असा ‘ कबुकी ’ याचा अर्थ आहे.

कबुकी नाटकाचा पहिला प्रयोग जपानमधील क्योटो येथे १५९६ मध्ये झाला. तेव्हा जपानमध्ये अंतर्गत लढायांना ऊत आला होता. त्यामुळे पराक्रमी योद्धयांचे गुणगान करणे आणि त्यांचे युद्धकौशल्य रंगमंचावर दाखविणे हा कबुकी नाटच-प्रकाराचा मुख्य हेतू होता. १६०३ मध्ये टोकुगवा हे शोगुन झाले आणि त्यांच्या कारकीर्दीत जपानमधील अंतर्गत बंडाळी मोडली गेली व शांततेचे व समृद्धीचे दिवस आले. हा काळ कबुकीच्या विकासाला अतिशय लाभदायक ठरला. योद्धयांच्या पराक्रमाबरोबरच गैशांकडून होणारे लोकांचे मनोरंजन, नृत्य, संगीत यांचीही भर कबुकी नाटचप्रकारात पडली. हा नाटचप्रकार तसा एकसंध किंवा बांधीव नसतो. त्याची बांधणी बरीच सैल, नव्या कार्यक्रमांना सामावून घेणारी आणि लोकांच्या करमणुकीकडे लक्ष देणारी अशी असते.

कबुकी हे दीर्घकाल चालणारे नाटक आहे. टोकियोतील गिंझा या समृद्ध विभागात कबुकी झा या नाटचगृहात मी हा नाटचप्रकार पाहिला. त्याचे तिकीट दोन हजार येनपासून सहा हजार येनपर्यंत (८५ रु. ते २५० रु.) होते. मी तिकीट घेतले आणि नाटकाच्या वेळा पाहिल्या, तेव्हा थक्कच झालो. कारण सकाळी ११ वाजता नाटक सुरू होणार होते आणि रात्री १० वाजता संपणार होते.

या नाटकातील नायक इनासुके इचिकावा हा जपानमधील कबुकी नाटकां-तील सर्वश्रेष्ठ कलावंत होता, असे तिकिटाबरोबरच्या माहितीपत्रकात म्हटले होते. मला कौतुक वाटले ते याचे की आपल्या नाटकाच्या तिकिटासारखे कबुकीला मला नुसते तिकीट मिळाले नाही. त्या तिकिटाबरोबर कार्यक्रमपत्रिका, जपानी व इंग्रजीत नाटकाचा सारांश, कलावंतांची माहिती हे सर्व छापलेली पुस्तिका होती. हे सर्व एका सुंदर छपाईच्या सुबक पाकिटात घालून मला देण्यात आले. परकीय प्रवाशांनी आपला पासपोर्ट दाखविला की त्यांना तिकिटाच्या दरात सवलत मिळते हे तिकीटाच्या खिडकीवर इंग्रजीत स्पष्ट केले होते. मी ते तिकीट काढले खरे, पण अकरा तास नाटक पाहण्याची तपश्चर्या आपल्याकडून होईल ही खात्री नव्हती. पण मी असा विचार केला की अर्धा भाग तरी पाहू. कबुकी हा काय प्रकार आहे याची प्रत्यक्ष कल्पना आली, तरी खूप झाले.

कबुकी झा हे नाटचगृह इतके भव्य आहे, की पाहताक्षणीच त्याची आपल्या मनावर छाप पडते. बाहेरून ते पूर्णपणे जपानी बांधणीचे आहे व आतून न्यूयॉर्क, लंडनच्या कोणत्याही अद्ययावत नाटचगृहाइतकेच आलिशान आणि भव्य आहे. या पाच मजली नाटचगृहात एकावेळी सुमारे चार हजार लोक बसू शकतात. रंगमंच शंभर फूट लांब, चाळीस फूट उंच आणि साठ फूट रुंद आहे. लांबून पाहण्यासाठी

दुर्बिणी मिळू शकतात. नाट्यगृहात येणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाचे स्वागत तेथील द्वार-पालिका कमरेत वाकून, हसऱ्या चेहऱ्याने करतात व त्या त्या प्रेक्षकाला त्यांच्या जागेकडे घेऊन जातात. पॅरिसला या कामासाठी प्रेक्षकांकडून टिप मागितली जाते. जपानमध्ये कोठेही टिप देण्याची पद्धत नाही– उपाहारगृहात किंवा हॉटेलातही.

मी माझ्या हातातल्या कार्यक्रमाकडे पाहिले, तर त्यात एकच नाटक नसून वेगवेगळी सहा नाटके होती. पहिल्या नाटकाचा विषय असा होता की जपानच्या सम्राटांच्या विरुद्ध तीन सरदारांनी बंड केले, तेव्हा सम्राटांच्या सामुराई योद्धयांनी त्या तिघांचा पराभव करून त्यांना दूरवरच्या बेटावर विजनवासात ठेवले. अनेक वर्षांनी एक नाव त्या किनाऱ्यावर आली आणि ते तीन सरदार पुन्हा जपानला आले. त्या तिघांना माफ करण्यात आले. अनेक वर्षे सुसंस्कृत जगापासून दूर राहिल्यामुळे पुन्हा समाजात मिसळताना त्यांचा गोंधळ झाला. गमती घडल्या. ते गैशांचेकडे गेले, नाटके पाहिली, मारामाऱ्या केल्या आणि शेवटी सम्राटांचे निष्ठा-वान प्रजाजन म्हणून राहिले.

या नाटकाचा प्रयोग विलक्षण देखणा झाला. सामुराईच्या लढाया रोमांच-कारक होत्या. सम्राटांच्या योद्धयांचा विजय झाल्यावर तुडुंब भरलेल्या नाट्यगृहा-तील चार हजार लोकांनी केलेला टाळ्यांचा कडकडाट अद्‌भुत होता.

त्यानंतर ' हिटोरिटाबी गोजू सॅम त्सुगी ' नाटक झाले. या नाटकातही जुन्या जपानमधील सामुराई योद्धा हाच नायक आहे. त्याच्या वडलांचा विश्वास-घाताने खून झालेला असतो. या खूनाचा सूड हे या नाटकाचे मध्यवर्ती सूत्र होते. या नाटकाचा नायक अठरा वेगवेगळी वेषांतरे करतो कारण बलिष्ठ शत्रूला संशय येऊ नये म्हणून तो निरनिराळ्या रूपांत वावरत असतो. जपानमधील सर्वश्रेष्ठ कबुकी नट इनासुके इचिकवा याने ही भूमिका अप्रतिम वठविली आहे. या नाटकात मी जेवढी भव्य दृश्ये पाहिली तेवढी जगात इतरत्र कोठेही पाहिली नाहीत. या नायकावर सिंह सोडले जातात, अनेक भयंकर गुंड त्याच्यावर तुटून पडतात, त्याला दोरीने बांधून घातल्यावरही तो सुटून शत्रूचा पराभव करतो.

एका दृश्यात तर हा नायक समुद्राखाली जातो असे दाखविले आहे. हे दृश्य तर एवढे अदभुत होते की त्याचे वर्णन करणेच अशक्य आहे. सागराच्या तळाशी असलेले चित्रविचित्र जलचर, सागराच्या पृष्ठभागावरच्या लाटा, देवमासा व ऑक्टोपस यांच्याबरोबर नायकाने केलेल्या लढाया, त्यांना ठार मारल्यावर त्यांच्या अंगातून वाहणारे रक्ताचे पाट पाण्यात मिसळताना दिसणारे अचूक रंग हे सारे इतक्या नेटकेपणाने उभे केले होते की आपण खरोखरच सागराच्या तळाशी असून,

काचेतून ही दृश्ये पाहत आहोत, असे वाटते. अडीच तास चाललेल्या या नाटकाच्या वेळी टाळ्यांचा नुसता पाऊस पडत होता. या नाटकाचे नेपथ्य भव्य आणि विलक्षण देखणे होते. त्यात २१ वेळा संपूर्ण नेपथ्य बदलून राजवाडा, रस्ता, मैदान, समुद्र, गैशांचे घर, रणांगण अशी २१ स्वतंत्र दृश्ये दाखविण्यात आली होती. याशिवाय जी दोन इतर नाटके मी पाहिली, त्यांत संगीत, नृत्य, लढाया यांची रेलचेल होती. कथानके मात्र जपानच्या जुन्या इतिहासातील. जवळजवळ सहा तास काबुकी नाटके पाहून मी अत्यंत समाधानाने नाट्यगृहाबाहेर पडलो. मध्ये दोन मध्यंतरे होती.

कबुकी नाटकांच्या विकासात शोगुनांच्या काळात जपान दीर्घकाळापर्यंत इतर जगापासून अलग पडला होता. या घटनेला फार महत्त्व आहे. कारण त्यामुळेच कबुकी नाटकात जपानच्या इतिहासातील पराक्रमांची गाथा गाणे हे सर्व नाटकांचे मुख्य सूत्र ठरले. आजचा काबुकी हा प्रकार नृत्य, संगीत, युद्धशास्त्र व नाटक यांच्या मिश्रणातून तयार झाला आहे. एका वेळी शंभरावर पात्रे या नाटकातून दिसतात. राक्षस किंवा बंडखोर यांच्याबरोबर सामुराई योद्ध्यांच्या नेत्रदीपक लढाया हे सर्वसामान्य प्रेक्षकांना कबुकीचे एक मोठेच आकर्षण वाटते. अनेक जपानी प्रेक्षक जेवण घेऊनच या नाटकांना येतात आणि मध्यंतरात जमिनीवर चटया अंथरून घरच्यासारखं जेवण उरकतात. शिवाय थर्मासमधून आणलेला चहा आणि इतर खाद्यपदार्थ यांचा समाचार चालूच असतो. बहुतेक जपानी प्रेक्षक दहा-अकरा तासांचा संपूर्ण कार्यक्रम पाहतात व शेवटपर्यंत त्याला उत्साहाने दादही देतात. कबुकी नाटके हीं नायकप्रधान असतात. त्यात स्त्री पात्रे असतात पण ती दुय्यम. कबुकीतून नायकाचे काम करणाऱ्यांना फार मोठा मान आहे. टोकिओ, क्योटो, नारा व ओसाका ही जपानमधील कबुकीची प्रमुख केंद्रे आहेत. एखाद्या राज-घराण्यात पहिला जॉर्ज, दुसरा जॉर्ज अशी वंशावळ असते तशी जपानमध्ये कबुकी नाटकातून नायकांची कामे वंशपरंपरागत करणारी घराणी आहेत. त्यांची नावेही राजघराण्याप्रमाणे पहिला डांजुरो, दुसरा डांजुरो अशी अकराव्या डांजुरोपर्यंत आहेत. ओनो, मात्सुमोटो, इचिमुरा अशी नामवंत घराणी दीडशे ते दोनशे वर्षे-पर्यंत कबुकी नाटकांतील नायकांची कामे करणारी घराणी म्हणून प्रसिद्ध आहेत. जपानमध्ये ही घराणी अत्यंत आदरणीय असतात.

जिदाईमोनो (ऐतिहासिक) सेवामोनो (वास्तव चित्रण करणारी) असे कबुकी नाटकांचे दोन स्थूल भाग आहेत. पहिल्या प्रकारात ऐतिहासिक योद्ध्यांच्या जीवनाचे प्रामुख्याने चित्रण असते, तर दुसऱ्या प्रकारात सर्वसामान्य जनतेच्या जीवनाचे प्रतिबिंब असते.

नोह हा नाट्यप्रकार चौदाव्या व पंधराव्या शतकात विकसित झाला.

कनामी कियोत्सुगु आणि झिॲमी मोहोकियू हे या नाट्यप्रकाराचे अध्वर्यु होते. नोह नाटकाचा रंगमंच ठराविक प्रकारचा असतो. चार खांबांवर घातलेले छप्पर हे त्यांचे स्थूल रूप असते. पूर्वी देवालयासमोरील हिरवळीवर ही नाटके होत असत. तेव्हा रंगमंचाचा हा प्रकार अतिशय सोयीचा होता. तोच पारंपरिक पद्धतीने चालू राहिला आहे. कथानकाच्या दृष्टीने पाहिले तर नोहमध्ये कबुकीपेक्षा विषयांची विविधता अधिक दिसते. नोह हा प्रामुख्याने मुखवटे घालून करण्याचा नाट्यप्रकार आहे. मात्र त्यात प्रत्येक पात्राला मुखवटा असतोच असे नाही. या मुखवट्याचा विशेष असा की ते खरोखरीच्या माणसांच्या चेहऱ्यासारखे नसतात. त्यांच्यात एक प्रकारची अपार्थिवता असते. ज्याला स्टेज प्रॉपर्टी असे म्हणतात (रंगमंचावर वापरायचे सामान) तेही नोह नाटकात प्रतिकात्मक असते. उदाहरणार्थ, 'गेंजीची कथा' या नाटकात पलंगावर एक रिकामा कमिनो ठेवलेला असतो व ती एक आजारी स्त्री आहे, असे कल्पिलेले असते.

कथानकात नोह नाटके अधिक आधुनिक असतात. 'इझुत्सा' या नोह नाटकात एका कवीची कहाणी आहे. तो कविता पाठवून आपल्या प्रेयसीचे प्रियाराधन करतो आणि तीही कवितेनेच त्याला उत्तर देते. त्याच्या विवाहाच्या वेळी ती मुखवटा घालून एका खेडवळ महिलेचे सोंग घेते. कारण एका कवीशी हिने विवाह करावा हे हिच्या घरी पसंत नसते. पण लग्न लागल्यावर ती मुखवटा काढते व आपण त्याची खरी प्रेयसी असल्याचे उघड करते. कबुकी नाटकांत स्वप्नरंजनावर भर असतो तर नोहमध्ये वास्तवतेवर भर असतो.

जपानमधील आधुनिक रंगमंचाबद्दल दिग्दर्शक व लेखक सुकागावा यांना मी विचारले तेव्हा ते म्हणाले, "टोकिओत ३५० नाट्यगृहे आहेत, एवढ्या मोठ्या प्रमाणावर जगातील इतर कोणत्याही शहरात नाट्यगृहे नाहीत. कबुकी, नोह, बाहुल्यांची नाटके अशा पारंपरिक नाटकांबरोबरच जपानी आधुनिक व सामाजिक नाटकांचेही येथे प्रयोग होतात. शेक्सपिअर आणि चेकॉव्ह यांची जपानी रूपांतरेही येथे बरीच लोकप्रिय आहेत. आमच्या सामाजिक नाटकांचे विषय कौटुंबिक जीवनातील तणाव, औद्योगिक अस्वस्थता; तरुण पिढी व जुनी पिढी यांच्यातील मानसिक अंतर, राजकीय स्तरावरील घडामोडी असे विविध आहेत. टोकिओत आणि जपानमध्ये इतरत्र तरुणांची व विद्यार्थ्यांची स्वतंत्र व जोमदार नाट्यविषयक चळवळ आहे. त्यांची नाटके हे तरुण लेखकच लिहीत असतात. प्रायोगिक व व्यावसायिक अशा दोन्ही स्तरांवरील नाटकांना जपानमध्ये प्रचंड प्रतिसाद मिळतो."

मी पूर्वी पत्रकार म्हणून काम केले असल्याने जपानमधील वृत्तपत्रांचे काम कसे चालते हे पाहण्याची मला खूपच उत्सुकता होती. अमेरिकन वृत्तपत्रांचे काम

मी पूर्वीच पाहिले होते. इंग्लंडमध्ये वर्षभर राहून मी वृत्तपत्र व्यवसायाचे शिक्षण घेतले होते. जपानला जाण्यापूर्वीच या क्षेत्रातील जपानची ख्याती मला माहीत होती. दर हजारी वृत्तपत्रांच्या खपात जपान हे जगातील पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र आहे. जपानमध्ये दर हजारी ५८० वृत्तपत्रे खपतात. त्या खालोखाल अमेरिकेचा क्रम (हजारी ३९०) लागतो. मी टोकियोला गेल्यावर श्री. काई यांना भेटलो. ते 'युनेस्को आर्ट एज्युकेशन लीग' आणि 'इंटरनॅशनल फ्रेंडशिप असोसिएशन इन जपान' या दोन संस्थांचे प्रमुख संचालक आहेत. मला जपानी वृत्तपत्रांच्या कामकाजाची माहिती हवी आहे, असे मी सांगताच त्यांनी 'माइनिची' या जपानमधील सर्वांत जुन्या आणि श्रेष्ठ वृत्तपत्रमालिकेचे मॅनेजिंग डायरेक्टर व संपादक श्री. हिरोनी यांची व माझी भेट ठरवली. इतकेच नव्हे तर माइनिची संस्थेची कचेरी मला सापडणे कठीण जाईल म्हणून आपली सेक्रेटरीही त्यांनी माझ्याबरोबर पाठविली.

आम्ही संपादक श्री. हिरोनी यांना त्यांच्या केबिनमध्ये भेटलो, पण ते म्हणाले, "आपण बाहेर लॉबीत बसू. म्हणजे आपल्याला निवांतपणे बोलता येईल. इथे टेलिफोन व लोक सतत येत असतात." त्यांची कचेरी माइनिचीच्या भव्य इमारतीच्या पाचव्या मजल्यावर आहे. त्यांनी आम्हाला ज्या लॉबीत नेले ती पाहून मी चकित झालो. काचेच्या वीस फुटी भिंतीतून खाली नदीचे सुंदर दृश्य दिसत होते. लॉबी एवढी विस्तृत होती की तिथे दोनशे लोक बसू शकतील. खाली उत्कृष्ट गालिचा होता. अद्ययावत बार. सर्व विदेशी मद्ये, चहा-कॉफीचे कँटिन अशी सर्व व्यवस्था तिथे होती. मी माझा परिचय लिहिलेले पत्रक त्यांना दिले. ते वाचून श्री. हिरोनी म्हणाले, "तुम्ही पत्रकार आहात म्हणजे आमच्यातलेच आहात. कोणतेही प्रश्न विचारा."

विविध प्रश्नांवर मी श्री. हिरोनी यांच्याशी चर्चा केली. ते म्हणाले, "जपानमध्ये वृत्तपत्रांना संपूर्ण स्वातंत्र्य आहे. जपानी वृत्तपत्रे ही खप आणि जाहिराती यांच्या उत्पन्नातून पूर्णपणे स्वावलंबी आहेत. कोणत्या जाहिराती स्वीकारायच्या याविषयी आमच्या संघनेटची कडक आचारसंहिता आहे. अंतर्गत बाबतीत सरकारशी आमचे कोणतेही मतभेद असले तरी जपानची राष्ट्रीय अस्मिता टिकविणे आणि उंचावणे या प्रश्नांबाबत सर्व वृत्तपत्रे आणि सरकार यांचे एकमत असते."

आपल्या वृत्तपत्रांबद्दल बोलताना श्री. हिरोनी म्हणाले, "माइनिची या जपानी शब्दाचा अर्थ 'दररोजचे' म्हणजे डेली असा आहे. शिंबून म्हणजे वृत्तपत्र. आमचे 'माइनिची शिंबून' जपानी भाषेतील व 'माइनिची डेली न्यूज' हे इंग्रजी भाषेतील अशी दोन प्रमुख वर्तमानपत्रे असून अनेक नियतकालिके आहेत. आमचे दैनिक जपानमधील सर्वांत जुने एकशेदहा वर्षांचे आहे. आमच्या जपानी दैनिकाचा

दररोजचा खप एक कोटी आणि इंग्रजी दैनिकाचा चाळीस लक्ष आहे. 'असाही शिंबून' हे जपानमधील दैनिक सर्वाधिक खपाचे म्हणजे एक कोटी दहा लाख खपाचे आहे. आमची जपानमध्ये अनेक छपाई केंद्रे व स्वतंत्र आवृत्या आहेत. आपण जेथे बसलो आहोत, त्या या मुख्य कचेरीत पत्रकार व कामगार मिळून पाच हजार लोक काम करतात.

श्री. हिरोनी यांनी मग मला आपल्या कचेरीचा काही भाग दाखविला. १९८० मध्ये या पत्राने एका सचित्र बातमीबद्दल राष्ट्रीय पारितोषिक मिळविले होते. ते मूळ छायाचित्र व बातमी त्यांनी मला दाखविली. थाई–कंबोडियन सरहद्दीवर लढाई चालू असताना तोफगोळयांच्या माऱ्यामुळे थायलंडची एक महिला व तिचे मूल गळयापर्यंत जमिनीत गाडले गेले. नंतर मारा ओसरल्यावर रेडक्रॉसचे पथक त्या ठिकाणी गेले, तेव्हा त्या महिलेने आपल्या जिवाची आशाच सोडली होती. रेडक्रॉसचे लोक आलेले पाहताच त्या बाईने टाहो फोडून "माझ्या मुलाला वाचवा हो" अशी विनंती केली. त्या क्षणाचे अत्यंत हृदयद्राव क असे ते चित्र होते.

संपादकीय विभागात फोटो कंपोझिंग, टेलिफोन वायरच्या साहाय्याने येणारा छायाचित्रे वगैरे विभाग पाहिल्यावर आम्ही छपाई विभागात गेलो. तेथील प्रचंड यंत्रे पूर्णमणे कॉम्प्युटरवर चाललेली पाहून मी थक्क झालो. श्री. हिरोनी म्हणाले, "वृत्तपत्रांची संपूर्ण छपाई 'नेल्सन' या कॉम्प्युटर पद्धतीने करण्यात असाही शिंबूनचा जगात पहिला क्रमांक आहे. त्यानंतर आम्ही ही पद्धत सुरू केली." माइनिची दैनिकाचा पहिला अंक त्यांनी मला दाखविला. तो ११ एप्रिल १९०२ रोजी प्रिन्स ऑफ वेल्स यांनी जपानला भेट दिली त्या वेळी प्रसिद्ध झाला होता. श्री. हिरोनी यांनी नंतर मला आपले कार्ड दिले आणि ते म्हणाले, "आपल्यासारख्या परकीय पत्रकारांना जपानमधील वृत्तपत्रांची भरपूर माहिती देता यावी म्हणून या देशातील संपादक व प्रकाशक संघटनेने जपान प्रेस सेंटर ही संस्था १९७६ पासून सुरू केली आहे. त्या ठिकाणी आपण जाऊन हे कार्ड द्या. म्हणजे तेथील अधिकारी आपल्याला सर्व प्रकारचे सहकार्य देतील." त्यांचे आभार मानून मी टोकिओच्या चिओडाकू विभागात फॉरेन प्रेस सेंटरच्या स्वतःच्या नऊ मजली इमारतीत गेलो. तेथे सहाव्या मजल्यावर वृत्तपत्रांचे माहिती केन्द्र आहे.

श्री. हिरोनी यांच्याकडून मी आलो आहे हे कळल्यावर तेथील प्रमुख अधिकारी स्वतः माझ्या स्वागतासाठी आले. त्यांनी मला फॉरेन प्रेस सेंटर दाखविला आणि जपानी वृत्तपत्रे, टेलिव्हिजन, रेडिओ या प्रसार माध्यमांविषयी माहिती देणारी अनेक पुस्तके व पुस्तिका भेट म्हणून दिल्या. ही पुस्तके परकीय पत्रकारांसाठी असल्याने इंग्रजीत आहेत. या सेंटरची प्रकाशने केवळ वृत्तपत्रे व इतर प्रसार

माध्यमे (मीडिया) याबद्दलचीच नाहीत, तर परकीयांना जपानची सर्वांगीण माहिती मिळावी म्हणून या संघटनेने जपानचे साहित्य, नाटक, अर्थकारण, भाषा, महिला, कामगार, शिक्षण अशा विविध विषयांवर प्रकाशने काढली आहेत.

असाही शिंबून, माइनिची शिंबून व योमियुरी ही जपानमधील सर्वांत लोकप्रिय आणि दर्जेदार दैनिके आहेत. ही तिन्ही वृत्तपत्रे कोणत्याही राजकीय पक्षाशी निगडित नाहीत. रशियाने अफगाणिस्तानात केलेल्या हस्तक्षेपाविषयी बातम्या देताना अमेरिकेने व्हिएटनाममध्ये केलेल्या तशाच हस्तक्षेपाचेही उल्लेख त्यात वारंवार करण्यात येत होते. एकांगी वर्णन केले जात नव्हते. जपानमध्ये लिबरल डेमॉक्रॅटिक पक्ष दीर्घकाल सत्तेवर असून, त्याला आव्हान देईल, असा बलिष्ठ राजकीय पक्ष नाही. म्हणून सरकारच्या चुका दाखविण्यासाठी, सरकारवर टीका करण्याची विरोधी पक्षांची जबाबदारी वृत्तपत्रांवर येऊन पडली आहे, अशी या तिन्ही वृत्तपत्रांची समान भूमिका आहे. या तीन वृत्तपत्रांचा एकत्रित खप पावणेतीन कोटी व वाचकवर्ग साडेसहा कोटींवर आहे. जपानच्या अकरा कोटी लोकसंख्येत हा आकडा साठ टक्के होतो.

जपानमध्ये राष्ट्रभर खपाच्या वरील तीन दैनिकांशिवाय डेम्पा शिंबून, होची शिंबून, जपान टाईम्स, निहॉन, केइझी शिंबून, सँकेई शिंबून, टोकिओ टाईम्स, टोकिओ शिंबून, ओसाका शिंबून, मुकान फुजी अशी पन्नासवर दैनिके आहेत. त्याशिवाय स्थानिक स्वरूपाची दोन हजारांवर दैनिके व नियतकालिके आहेत. खेळांना वाहिलेली चाळीसवर साप्ताहिके असून शिपिंगला (जहाज वाहतूक) वाहिलेली डझनभर नियतकालिके आहेत. कारण जपानमध्ये जहाजबांधणी आणि जलवाहतूक हे फार मोठे व्यवसाय आहेत. त्याशिवाय गेल्या दहाबारा वर्षांत जपानमध्ये कार्टुन पुस्तिकांचा प्रसार फार विस्तृत प्रमाणावर झाला आहे. ही कार्टून पुस्तके दीडशे ते दोनशे पानांची असतात. दर आठवड्याला निघतात आणि त्यांच्या प्रत्येकी पन्नास ते साठ लक्ष प्रती खपतात. त्यात व्यंगचित्रे, विनोद, साहसकथा वगैरे हलके साहित्य असते.

जपानमध्ये नऊ प्रमुख वृत्तसंस्था आहेत. त्यात क्योडो आणि जिजित्सुशीन या विशेष महत्त्वाच्या आहेत. वृत्तपत्रांना फक्त छायाचित्रे पुरविणारी सन टेलिफोटो ही संस्थाही विख्यात आहे. या तिन्हींचे जगातील सर्व प्रमुख देशांत प्रतिनिधी आहेत. शिवाय एन्. एच्. के. ही सरकारी रेडिओ– टी. व्ही. संस्थाही आपले स्वतंत्र प्रतिनिधी परदेशात नेमते. क्योडो ही वृत्तसंस्था वर्षातून तीनशेपासष्ट दिवस, चोवीस तास सतत चालू असते. बातम्या, लेख, छायाचित्रे, अर्थविषयक अहवाल, उद्योगधंदे व व्यापारविषयक खास वार्ताचित्रे, रॉयटर्स, यू. पी. आय, तास, ए. एफ्. पी. अशा परकीय वृत्तसंस्थांच्या बातम्या इत्यादींचा पुरवठा

वृत्तपत्रे, टेलिव्हिजन व रेडिओ यांच्या या संस्थेमार्फत होतो.

निहॉन शिंबून किओकाईने (जपान वृत्तपत्र संघटना) संमत केलेली आचार-संहिता बातम्या देताना आणि संपादकीय विचार लिहिताना सर्व पत्रे आदर्श म्हणून पाळतात. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, बातम्या सत्याला धरूनच असल्या पाहिजेत. वार्ताहर अथवा वृत्तसंपादकाची वैयक्तिक मते बातम्यांत प्रतिबिंबित होता कामा नयेत. बातमीचा प्रचार म्हणून वापर करू नये, व्यक्तिस्वातंत्र्यास मान देऊन संबंधित व्यक्तीच्या खुलाशाला स्थान द्यावे, संपादकीय चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. प्रत्येक बातमी व संपादकीय निःपक्षपाती असले पाहिजे आणि त्यात सार्वजनिक शुचिता पाळली पाहिजे. संपादकीयात कोणाही व्यक्तीची प्रशंसा न करता त्याच्या विचाराचे मूल्यमापन असावे, देशातील ज्या कोट्यवधी लोकांना आवाज उठवता येत नाही त्यांचा प्रतिनिधी म्हणून संपादकाने लिहिले पाहिजे ही जाणीव अशा अनेक तत्त्वांचा आदर्श या आचारसंहितेत ठेवलेला आहे. हे आदर्श पाळण्यात जर एखाद्या वृत्तपत्राने कसूर केली, तर निहॉन शिंबून किओकाई 'ची समिती त्या संपादकाला त्याबद्दल जाब विचारते.

या वृत्तपत्र संघटनेकडून दरवर्षी अनेक राष्ट्रीय पारितोषिके देण्यात येतात. उत्कृष्ट बातमी, उत्कृष्ट छायाचित्र, उत्कृष्ट संपादकीय यांबद्दल पारितोषिके असतातच, पण दोन पारितोषिके अगदी वेगळ्या कारणासाठी असतात. त्यांपैकी एक ' न्यूजपेपर कल्चर 'साठी असते. वृत्तपत्रांचा सांस्कृतिक दर्जा उंचावण्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न करणाऱ्या संपादकांना किंवा संचालकांना हे पारितोषिक देण्यात येते. गेल्या वर्षी 'योमियुरी'चे अध्यक्ष श्री. मित्सुओ मुताई यांना 'सतत पन्नास वर्षे वृत्तपत्राचे सांस्कृतिक कार्य करण्यात अग्रेसर ' असल्याबद्दल हे पारितोषिक देण्यात आले. दुसरे बक्षीस वृत्तपत्रांच्या व्यावसायिक व तंत्रविषयक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यास देण्यात येते. ' कॉसमॉस ' पद्धतीने छपाईचे काम करण्याचा शोध लावणाऱ्या तोशिकी इशिहारा यांना गेल्या वर्षी हे पारितोषिक दिले गेले. कॉसमॉस म्हणजे कॉम्प्युटरच्या साह्याने छपाई करण्याची पद्धत. श्री. इशिहारा हे शिनारो माइनिची शिंबूनचे अध्यक्ष आहेत.

काही पारितोषिके वाचकांची मते मागवून देण्यात येतात. ' असाही शिंबून ' ने ही पारितोषिके ठेवली आहेत. गेल्या वर्षी श्री. हारिकी नावाच्या छायाचित्रकाराने हे पारितोषिक मिळवले. त्यांनी घेतलेल्या छायाचित्राचा इतिहास अतिशय मनो-रंजक आहे. नारा या शहरातील प्राणिसंग्रहालयातील पन्नास-साठ हरणे एकदा कुंपणावरून उड्या मारून शहरात धावू लागली. नारा शहरातील हमरस्त्यावरून ही हरणे धावताना या छायाचित्रकाराने ते दृश्य टिपले. जपानचे पंतप्रधान



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३९

ओहिरा हे भरसभेत भाषण करताना हृदयविकाराचा झटका येऊन पडले. त्या क्षणाचे छायाचित्र घेणाऱ्या छायाचित्रकारालाही त्या वर्षी प्रथम पारितोषिक मिळाले होते.

जपानी वृत्तपत्रे सार्वजनिक हितासाठी सरकारबरोबर किंवा पोलिसखात्या-बरोबर कसे सहकार्य करतात याचे उदाहरण लक्षणीय आहे. जपानी वृतपत्रे व पोलिस यांच्यात एक अलिखित करार झाला आहे की एखाद्या व्यक्तीला पळवून नेले गेले, तर त्या व्यक्तीचा तपास लागेपर्यंत वृत्तपत्रांनी ती बातमी प्रसिद्ध करायची नाही. याचे कारण असे की एकदा एका मुलाला एका गुन्हेगाराने पळवले. त्याबद्दलच्या बातम्या वृत्तपत्रात छापून आल्या तेव्हा पोलिस आपल्याला पकडतील या भीतीने त्याने त्या मुलाचा खून केला. म्हणून पळविल्या गेलेल्या व्यक्तीच्या सुरक्षिततेसाठी बातम्या प्रसिद्ध होत नाहीत. मात्र पोलिस तपास जारी असतो व ती व्यक्ती सापडल्यानंतरच ती बातमी प्रसिद्ध होते. असे बंधन स्वतःवर आपण होऊन स्वीकारणारा जपान हा एकमेव देश आहे. वृत्तपत्राप्रमाणेच जपानमधील रेडिओ व टी. व्ही. ही माध्यमेही हे बंधन पाळतात.

११

# जाहिराती, ग्राहक, भाषा आणि साहित्य

आधुनिक जगातील उद्योगधंद्यांप्रमाणेच वृत्तपत्रांच्या दृष्टीनेही जाहिरात हा आता एक अत्यंत महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग झाला आहे. जपानमध्येही दरसाल कोटचवधी येन्स जाहिरातीसठी खर्च केले जातात. जगातील सर्वांत मोठी जाहिरात कंपनी जपानी आहे, तिचे नाव डेन्त्सु. या जाहिरात कंपनीत सहा हजार लोक काम करतात. जपानमध्ये जाहिरातीवर जो एकंदर खर्च होतो, त्यात जास्तीत जास्त खर्च टेलिव्हिजनवरच्या जाहिरातीवर होतो. त्या खालोखाल वृत्तपत्रांच्या जाहिरातीवर. शेवटचा क्रम रेडिओच्या जाहिरातीचा येतो. १९८१ मध्ये जपान-मध्ये टेलिव्हिजनवर ७८,८३० कोटी येन्सच्या जाहिराती दिल्या गेल्या, वृत्तपत्रांतून ७०,८६० कोटी येन्सच्या जाहिराती आल्या. रेडिओवर १२,६९० कोटी येन्सच्या जाहिराती प्रसारित करण्यात आल्या. नियतकालिकांच्या वाटयाला फक्त १२,७१० कोटी येन्सच्या जाहिराती आल्या. टक्केवारीच्या दृष्टीने पाहिले, तर टी. व्ही. ला ३६ टक्के, वृत्तपत्रांना ३१ टक्के, नभोवाणीला ५ टक्के आणि नियतकालिकांना ५.५ टक्के जाहिराती मिळाल्या. वार्षिके, तात्कालिक ग्रंथ वगैरेंना बाकीच्या जाहिराती मिळाल्या (एक रुपया म्हणजे सुमारे २४ येन). वृत्तपत्रांच्याकडे अधिकाधिक जाहिरातीचा ओघ कसा वळविता येईल, यावर आता जपानी वृत्त-पत्रे आपले लक्ष केंद्रित करीत आहेत.

वृत्तपत्रांतून उत्कृष्ट जाहिरात करणाऱ्यासाठी वृत्तपत्र संघटनेने "शिबून कोकायुशो" हे पारितोषिक ठेवले आहे. वृत्तपत्रातील जाहिराती या शुष्क माहिती देणाऱ्या नसाव्यात, त्यात सौंदर्य व मनोरंजकता यावर भर द्यावा, असे आवाहन जाहिरात कंपन्यांना करण्यात आले आहे.

कोणत्या क्षेत्रातून वृत्तपत्राकडे अधिक जाहिराती येतात, याचा तपशीलवार

अभ्यास करण्यात आला. त्यात असे आढळून आले की, गृहनिर्माण व घरबांधणीचे सामान यापासून जास्तीत जास्त (८७५० कोटी येन) उत्पन्न मिळाले. त्या खालोखाल ग्रंथप्रकाशन, त्यानंतर डिपार्टमेंट स्टोअर्स, नंतर नाटक-चित्रपट इत्यादी करमणूक, अन्न व पेये, विजेचे सामान, बँकिंग व विमा आणि सौंदर्यप्रसाधने. आधुनिक जगात जाहिरात हे महत्त्वाचे माध्यम आहे, याची नागरिकांना लहानपणापासूनच जाणीव व्हावी, म्हणून आता जपानी शाळांच्या वरच्या वर्गात जाहिरातीचे शास्त्र या विषयावरील धडयांचा समावेश करण्यात आला आहे.

जपानमधील वृत्तपत्र संघटनेने ७६ मध्ये जाहिरातीच्या विषयीची आचारसंहिता मंजूर केली आहे. त्यांतील मुख्य कलमे अशी आहेत :

१) दुसऱ्या कंपनीच्या मालापेक्षा आपला माल अधिक चांगला आहे, असा दावा करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध केल्या जाणार नाहीत.

२) बातमी किंवा संपादकीय लेखन आहे असा भास निर्माण करणारी जाहिरात घेऊ नये.

३) जपानचे सम्राट किंवा जगातील कोणत्याही देशाच्या प्रमुखाचा अनादर होईल, अशी जाहिरात प्रसिद्ध करू नये.

४) ज्या कंपनीच्या सचोटीची पूर्ण माहिती नसते, अशा कंपनीच्या अगर संस्थेच्या जाहिराती घेऊ नयेत.

५) नशिबावर अवलंबून राहण्याची (गेम्स ऑफ चान्स) लोकांना भुरळ पाडणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करू नयेत.

६) एखाद्या वृत्तपत्राने जाहिरात छापली याचा अर्थ त्या वृत्तपत्राचा जाहिरातदाराच्या मालाला पाठिंबा आहे, असा आभास निर्माण करणाऱ्या जाहिराती छापू नयेत.

७) वृत्तपत्रांचा एखादा भाग कापून त्याचा कूपन किंवा सवलत म्हणून उपयोग करण्याचे आवाहन करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करू नयेत.

८) देशात किंवा परदेशांत नोकऱ्या देण्याची आमिषे देऊन पैसे गोळा करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करू नयेत.

९) हिंसा, अस्वस्थता, वेश्या व्यवसाय किंवा जुगार यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती छापू नयेत.

१०) स्वत:खेरीज इतरांचे ट्रेड मार्क किंवा त्यासारखे दिसणारे ट्रेडमार्क असलेल्या जाहिराती छापू नयेत.

अशी अनेक बंधने जपानी वृत्तपत्रांनी आपण होऊनच स्वत:वर घालून घेतल्याने अपवाद वगळता वृत्तपत्रांतील जाहिरातीमुळे लोकांची फसवणूक झाल्याचे प्रकार जपानमध्ये घडत नाहीत.

जपान ही अमेरिकेच्या खालोखाल जगातील सर्वांत मोठी ग्राहक पेठ आहे. ती काबीज करण्यासाठी जपानीच नव्हे तर जगातील अनेक देशांतील कारखानदारांची अहमहमिका लागलेली असते. पण जपानमध्ये यशस्वी होणे ही परकीय कारखानदारांना अशक्य नसली तरी अतिशय कठीण गोष्ट आहे. कारण जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात जपानी माल पहिल्या दर्जाचा आणि स्वस्त असतो. आपल्या देशात परदेशातून येणारा माल निर्भेळ व उत्कृष्ट दर्जाचा असलाच पाहिजे, असा जपानच्या सरकारचाही कटाक्ष असतो. उदाहरणार्थ, औषधांच्या बाबतीत जपानी कस्टम्सचा असा नियम आहे की, परकीय देशात सर्व प्रकारच्या चाचण्या करून औषधे तयार झाली असली तरी जपानमध्ये त्या औषधांचा उपयोग प्राण्यांवर करून त्या चाचण्या समाधानकारक ठरल्या तरच ती औषधे जपानमध्ये विकण्यास परवानगी देण्यात येते.

कोणत्याही मालाची वृत्तपत्रातून किंवा टी. व्ही. रेडिओवर मोठ्या प्रमाणावर जाहिरात करण्यापूर्वी ती जाहिरात कितपत परिणामकारक आहे, याची चाचणी करणाऱ्या संस्था जपानमध्ये आहेत. कारण देशभर जाहिरात करायची तर कोटचवधी येन्सचे अंदाजपत्रक तयार करावे लागते. जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर ती निष्प्रभ आहे असे ठरले तर हे पैसे वाया जातात. म्हणून जाहिरातीचे विविध नमुने लोकांना दाखवून, त्यांच्या प्रतिक्रिया पडताळून पाहिल्यानंतरच प्रत्यक्ष जाहिरात प्रसिद्धीसाठी देण्यात येते. जपानच्या ग्राहक पेठेत जो थोडा परदेशी माल यशस्वी झाला आहे, त्यात कोकाकोला, जर्मनी व स्वित्झर्लंडची औषधे, ॲव्हानची प्रसाधने, चहा, स्कॉच व्हिस्की, फ्रेंच अत्तरे, जॉन्सन अँड जॉन्सनची पावडर असे काही मोजके जिन्नस आहेत.

जपानमध्ये ग्राहकांची केवढी कदर करतात याचा अनुभव मला तेथील मुक्कामात अनेकदा आला. पोस्ट ऑफिसात साधे कार्ड किंवा पाकीट द्यायचे तर प्रथम तेथील प्लॅस्टिकच्या थाळीत आपण पैसे ठेवून काय हवे ते सांगायचे. मग तेथील विक्रेती मुलगी आभार मानून ते पैसे घेते, तुम्हाला हवे ते कार्ड अगर पाकीट प्लॅस्टिकच्या पाकिटात घालून तुमची मोड व ते पाकीट थाळीत घालून थाळी पुढे करते. आणि तुम्ही ते घेतल्यानंतर ती पुन्हा तुमचे आभार मानते. टोकियोत मला शंभर डॉलर्सचे येन हवे होते. गिंझा भागातील मित्सुई या अवाढव्य बँकेत मी गेलो. प्रवेशद्वारातच तेथील अधिकाऱ्याने वाकून अभिवादन करून काय हवे ते विचारले. मग त्याने मला दुसऱ्या मजल्यावर अकरा क्रमांकाच्या कौंटरवर जायला सांगितले. त्या मजल्यावरच्या अधिकाऱ्याने पुन्हा कमरेत वाकून माझे स्वागत केले आणि स्वतः तो माझ्याबरोबर अकरा क्रमांकाच्या कौंटरवर आला. त्या कौंटरवरच्या कारकुनानेही मला लवून अभिवादन करून शंभर डॉलरची

नोट घेतली. हिशेबयंत्रावर, त्या दिवसाच्या वटणावळीच्या दराने त्याचे किती येन होतात ते पाहिले. मग तेवढे येन आणि ते कोणत्या दराने दिले याची छापील पावती हे सर्व एका प्लॅस्टिकच्या पाकिटात घालून ते पाकीट पुन्हा ब्राऊन पेपरच्या पाकिटात घालून आभारपूर्वक मला दिले. बँकेतून मी परत जाताना पुन्हा पूर्वीच्या सर्व अधिकाऱ्यांनी वाकून अभिवादन करून "प्लीज कम अगेन सर" असे म्हटले. वास्तविक मी फक्त शंभर डॉलरची येनमध्ये मोड घेतली होती. पण मला अशी नम्रतेची वागणूक मिळाली की जणू काही मी वडा उद्योगपती किंवा राजा-महाराजाच होतो आणि त्या बँकेला मी कोटचवधी येन्सचा धंदा दिला होता.

पुस्तकांच्या एका दुकानातून मी जपानवर दोन छोटी पुस्तके घेतली. ती पुस्तकेही प्लॅस्टिक व कागदी अशा दोन पिशव्यांतून देण्यात आली. दोन्ही पुस्तकांत प्रकाशकांचा पत्ता छापलेली व पोस्टेज आधीच दिलेली कार्डे होती. त्या कार्डांवर ग्राहकाला अशी विनंती करण्यात आली होती, "हे पुस्तक विकत घेतल्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोत. कृपया या कार्डावर आपला या पुस्तकावरचा अभिप्राय कळवावा. त्यामुळे आम्हाला नवी पुस्तके प्रसिद्ध करण्याच्या कामी आपले बहुमोल मार्गदर्शन मिळू शकेल."

जपानमधील ग्राहकांच्या संघटना अतिशय प्रबळ आहेत. त्यात बहुधा गृहिणीच प्रामुख्याने भाग घेतात. देशात अशा बाराशेवर ग्राहक संघटना आहेत. काळचा बाजाराचा कोणी प्रयत्न केला किंवा साठेबाजी अथवा अन्य मार्गांनी (अन्फेअर ट्रेड प्रॅक्टिसेस) ग्राहकांची लुबाडणूक करण्याचा प्रयत्न दुकानदाराने केला तर या जागरूक संघटना हे त्या दुकानदारांची कृत्ये उघडकीस आणतात आणि त्याच्यावर बहिष्कार घालून इतरांनाही जरब बसवितात.

'डेन्त्सु' या जगातील सर्वांत मोठ्या जाहिरात कंपनीने स्वतःची जी जाहिरात केली आहे, तीवरून ग्राहक आणि ग्राहक संघटना यांना जपानच्या समाजव्यवस्थेत किती महत्त्वाचे स्थान आहे, हे लक्षात येते. या जाहिरातीत एका जपानी कंपनीने गृहिणीचे छायाचित्र छापले आहे. त्या चित्राच्या बाजूला म्हटले आहे, "जपानी ग्राहक अत्यंत चोखदंळ आहे. ही गृहिणी दररोज खरेदी करताना अनेक शंकाकुशंका काढते. अनेक वेळा मालाच्या उत्कृष्टपणाबद्दल व वाजवी किमतीबद्दल आपली खात्री करून घेते. जपानी ग्राहकांची मर्जी संभाळणे हे फार कटकटीचे काम आहे. 'डेन्त्सु' जाहिरात कंपनीचे सहा हजार कर्मचारी या गृहिणीच्या सर्व कसोटचांना तत्परतेने उतरणारा माल उपलब्ध करून देतील."

एखाद्या दुकानात एखादा माल घेतला, तर त्याच्या किरकोळ दुरुस्तीसाठी जपानी दुकानदार किंवा कारखानदार पैसे आकारीत नाही. त्यासाठी लेखी गॅरींटीची आवश्यकता नसते. 'हा माल तुमच्याकडे घेतला आहे' असे गिऱ्हाइकाने

म्हटले तरी त्यावर विश्वास ठेवून मोफत दुरुस्ती करून देण्यात येते. गली सहा वर्षे टोकियो येथे राहणाऱ्या सौ. शैलजा कुलकर्णी या मराठी महिलेने मला एकदा सांगितले, " मी टोकियोतील एका दुकानात चष्मा घेतला. तीन-चार वर्षांनी त्याची एक काडी मोडली. मी त्याच दुकानात गेले आणि 'याची काडी बसवून द्या' असे सांगितले व चष्मा तेथेच घेतला होता असेही सांगितले. त्या दुकानदाराने लगेच काडी बसवून दिली. पण पैसे घेतले नाहीत. 'आमच्या ग्राहकांची अशी कामे आम्ही मोफत व आनंदाने करून देतो.' असे वर त्याने सांगितले."

एखाद्या अपघातात अथवा अन्य कारणाने 'टोयाटो' मोटारीची काच, आरसा, अथवा दिवा फुटला तर तो मोफत बसवून देण्यात येतो. आपल्या कंपनीची प्रतिष्ठा जपण्याच्या कामी टोयाटो कंपनी एवढी दक्ष असते की, त्या कंपनीची मोटार घेण्यासाठी अथवा इतर कामासाठी तुम्ही कंपनीच्या आवारात इतर कोणत्याही मोटारीतून जाऊ शकत नाही. त्या आवारात फक्त टोयाटो कंपनीच्या मोटारीलाच प्रवेश मिळतो. इतर कंपन्यांच्या मोटारींना बाहेर थांबण्याची विनंती करण्यात येते. त्यांची मोटार बाहेर ठेवून त्यांना टोयाटोची मोटार व ड्रायव्हर मोफत देण्यात येतो व मगच पाहुण्यांना टोयाटोच्या विशाल आवारात जाता येते. थोड्या वेळासाठी का असेना, पण प्रत्येक पाहुण्याला टोयाटो मोटारीत बसण्याचा अनुभव यावा हा कंपनीचा उद्देश असतो.

आपल्या ग्राहकाला नक्की काय हवे आहे याचा मागोवा घेण्यासाठी आणि आपल्या मालाच्या दर्जात सुधारणा करण्याचे नवे मार्ग शोधण्यासाठी जपानी कारखानदार आपल्या उत्पन्नाचा काही भाग वेगळा काढून ठेवतात. अमेरिकन कंपन्याही या कामासाठी पैसा खर्च करतात. 'विकास, ग्राहक पेठांचा अभ्यास व सुधारणा' या कामासाठी जपानी कंपन्या एकंदर उत्पन्नाच्या सहा टक्के पैसा खर्च करतात. 'आता आपले बस्तान चांगले बसले आहे, भरपूर फायदा मिळतो तेव्हा नव्या सुधारणा व विकास यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही' अशी भावना जपानी कारखानदारांमध्ये कधीच येत नाही. याची दोन प्रमुख कारणे म्हणजे दर्जाच्या बाबतीत तीव्र स्पर्धा आणि जागरूक ग्राहक संस्था. या संस्थांच्या कार्यामुळे कारखानदार व दुकानदार गिऱ्हाइकांना जास्तीत जास्त चांगला माल रास्त दरात देण्याबाबत दक्ष असतात.

चिनीच्या खालोखाल जपानी ही जगातील सर्वांत अवघड भाषा आणि लिपी आहे. ही भाषा कोणत्या भाषा-गटात मोडते याबद्दल तज्ज्ञांत मतभेद आहेत, पण स्थूलपणे ती 'आस्ट्रोआशियाई' गटातील आहे, असे मानले जाते. जपानी भाषेत एकवचनी आणि अनेकवचनी यात निश्चित फरक नाही. या भाषेत लिंगभेद नाही. एकाच उच्चाराच्या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. उदाहर-

णार्थ, ' कोशो ' या शब्दाचे एकंदर २९ अर्थ आहेत. अक्षरांचे उच्चार तर इतके विविध आहेत की परकीयांना ही भाषा शिकणे अत्यंत दुर्घट आहे. ' को ' हे अक्षर एकशेतीस प्रकारांनी उच्चारले जाते, यावरून उच्चारातील गोंधळाची कल्पना येईल. जपानी भाषेत स्वरांचे प्राबल्य अत्यंत मोठे आहे. दोन व्यंजने सलग येऊ शकत नाहीत, त्यामध्ये स्वर घालावा लागतो. इंग्रजी भाषेतील एक्स्ट्रा (Extra) हा शब्द जपानीत Ekisutora असा उच्चारतात. तसेच जपानीमध्ये शब्दाच्या शेवटी व्यंजनान्त करण्याची पद्धत नाही. तो स्वरान्त व्हावा लागतो. सॅलडचा उच्चार सॅरडा आणि ' कप 'चा उच्चार ' कप्पु ' असा होतो. जपानी भाषेत व्याकरणदृष्टचा भविष्यकाळ नाही. फक्त भूतकाळ आणि वर्तमानकाळ हे दोनच काळ आहेत; त्यामुळे वाक्यातील भविष्यकाळ हा अंदाजाने ओळखावा लागतो. शब्दांचा आघात हा जपानमध्येही अनेक प्रांतांत अनेक प्रकारे करण्यात येतो. त्याला एक नियम नाही. ' हाशी ' (चॉपस्टिक्स) या शब्दाचा उच्चार टोकियोत वेगळा, कन्साईत वेगळा आणि हिरोशिमात तिसराच असा प्रकार आहे. पुन्हा त्यात गोंधळ असा की ' हाशी ' हा शब्द टोकियोतील उच्चारासारखा कन्साई विभागात उच्चारला तर तिथे त्याचा अर्थ चॉपस्टिक्स असा होत नाही तर ' पूल ' (ब्रिज) असा होतो ! एकाच शब्दावर वेगळा आघात केला तर त्याचे विविध अर्थ होऊ शकतात. शेकडो जपानी शब्द असे विविध अर्थांचे आहेत. असे प्रकार इतर भाषांतही आढळतात, पण जपानीत त्याने कालमर्यादा गाठली आहे. उच्चाराबाबत जपानी अक्षरांचा जपानी उच्चार वेगळा आणि चिनी उच्चार वेगळा या प्रकाराने तर या गोंधळात अधिकच भर पडते. ' शू ' या चिनी अक्षराचा जपानीतील उच्चार सेक असा होतो व त्याचा अर्थ मद्य असा होतो. काही चिनी शब्द कोरियातून जपानीत आले आहेत. त्यांचा अर्थ मूळ चिनी अर्थापेक्षा आणखीच वेगळा असतो. एकाच शब्दाचा बाराव्या शतकातला अर्थ निराळा आणि सतराव्या शतकातला अर्थ अगदीच वेगळा असाही प्रकार जपानी भाषेत आढळतो !

लिपीबाबत जपानी भाषा हा दुर्घटतेचा जणू उच्चांकच आहे. अडचण म्हणजे ती उभी लिहिता येते किंवा आडवी (मराठीसारखी) लिहिली जाते. मात्र पारंपरिक पद्धत उभी व उजवीकडून डावीकडे (उर्दूसारखी) लिहिली जाते. अलीकडे ती काही वेळा आडवी लिहिली जाते. जपानी भाषेत मुख्यतः तीन प्रकार आहेत. हिटागाना, काताकाना व कांझी अशी त्यांची नावे आहेत. काताकाना हा भाषेचा प्रकार परदेशी नावे लिहिताना वापरतात. उदाहरणार्थ केक (Cake) चा उच्चार 'केऽऽकी' असा होतो. 'अमेरिका'चा उच्चार आमेरिका आणि आफ्रीकाचा उच्चार आहरिका असा होतो. कांझीची अक्षरे चिनी लिपीतून घेतलेली आहेत.

सध्याच्या कांझीच्या शब्दकोशात १९७०अक्षरे आहेत. मात्र अठरा हजार अक्षरांतून ही अत्यंत आवश्यक अशी १९७०अक्षरे निवडून जपानीत वापरण्यासाठी घेतली आहेत. त्यांपैकी १८५० अक्षरे दैनंदिन जीवनात आवश्यक आहेत. प्रत्येक कांझीच्या उच्चाराला ओन आणि कून हे दोन प्रकार आहेत. ओन हा चिनी उच्चार व कून हा जपानी उच्चार असतो. बऱ्याचशा कांझी अक्षरांना एकाहून अधिक कून उच्चार असतात. कांझीमध्ये एक ते सव्वीसपर्यंत रेषांनी एक अक्षर तयार होते. याचा एक परिणाम म्हणजे विशेषनामे अनेक प्रकाराने लिहिता येतात. उदाहरणार्थ 'यामाशिटा' हे नाव निदान पंचवीस प्रकारांनी कांझीतून लिहिता येईल. आणखी एक घोटाळ्याचा प्रकार म्हणजे 'ओन्मा' व 'ओवारू' यातील दोन्ही ओ वेगळ्या प्रकारे लिहावे लागतील. मराठीत हे उदाहरण द्यायचे तर मारुती, माझा व मानिनी या तिन्ही शब्दातील प्रत्येक मा हे अक्षर वेगळ्या प्रकारे लिहावे लागेल. कांझीचाच एक प्रकार म्हणजे हिरागाना. पण हिरागाना ही मूळ जपानी लिपी आहे. जे काझीतून व्यक्त करता येत नाही, ते हिरागानामधून लिहिले जाते. हिरागाना व काताकाना यात प्रत्येकी ४६ अक्षरे आहेत. जपानमध्ये मुलांना शाळेत प्रवेश मिळण्यापूर्वीच त्यांनी घरच्या घरी हिरागाना व काताकाना लिप्या शिकल्या पाहिजेत असा नियम आहे.

जगातील विविध राष्ट्रांतील लोकांनी जपानी भाषा शिकावी म्हणून सरकार आणि इंडो-जपान असोसिएशनसारख्या संस्था खास प्रयत्न करतात. कोणत्या राष्ट्राचे किती नागरिक जपानी भाषा शिकत आहेत, याची अद्ययावत आकडेवारीही ठेवण्यात येते. या आकडेवारीनुसार जपानी शिकणाऱ्या अमेरिकनांची संख्या सर्वांत मोठी म्हणजे ३२००० आहे. त्या खालोखाल कोरिया (२२०००), ब्राझील (१७०००), चीन (१३०००), तैवान (१२०००), ऑस्ट्रेलिया (८०००), फ्रान्स (३०००), भारत (८०५) अशा या संख्या आहेत. भारतात मुंबईतील इंडोजपानी असोसिएशनमध्ये व तशाच इतर अनेक संस्थांत जपानी भाषेचे वर्ग चालविण्यात येतात. जपानीज असोसिएशन फॉर ओव्हरसीज टेक्निकल स्कॉलरशिप्स या संघटनेने आशियातील तंत्रज्ञांच्या प्रशिक्षणास जपानी भाषेचे साहाय्य व्हावे, म्हणून त्यांना जपानी भाषेचे शिक्षण देण्यासाठी आर्थिक मदत दिली आहे. या संस्थेने आतापर्यंत अशा १०,००० आशियाई तंत्रज्ञांना जपानी भाषा शिकण्यास साहाय्य केले आहे.

जपानी साहित्यांची परंपरा फार जुनी व श्रेष्ठ आहे. कोजिकी व निहॉन शोकी हे ग्रंथ इ. स. ७१२ ते ७२० या काळातले आहेत. त्यापूर्वीही काव्यरचना केली जात असे, पण ती मुखोद्गत करून नंतरच्या पिढयांना पोचवण्याच्या स्वरूपातच राहिली. आठव्या शतकात जपानने चीनची लिपी घेतली, तेव्हा-

पासून लिखित स्वरूपातली ग्रंथरचना व काव्यरचना सुरू झाली. कोजिकी हा ग्रंथ प्राचीन विषयावरील नोंदीच्या स्वरूपाचा आहे, तर निहोन शोकी हा जपान-विषयीच्या बखरींच्या स्वरूपाचा आहे. इ. स. ७७० च्या सुमारास वीस खंडांतील 'मान्योशी' हा ग्रंथ लिहिला गेला. हा जुन्या व तत्कालीन काव्याचा संग्रह असून त्यात ४५०० कविता संग्रहित केल्या आहेत. विशेष म्हणजे जपानच्या सम्राटांना शेकडो वर्षे काव्याचा छंद आहे. काव्य हे वंशपरंपरेनेच जणू सम्राटांच्या घराण्यात शतकानुशतके वावरत आहे. 'मान्योशी' या संग्रहात जपानचे सम्राट, सम्राज्ञी, सरदार, उमराव यांच्यापासून ते सर्वसामान्य नागरिकांच्यापर्यंत सर्व थरांतील कवि–कवयित्री यांच्या कविता आहेत. इंग्लंडचा जसा शेक्सपीयर तसा जपानचा सर्वश्रेष्ठ कवी काकिनोमो नोटो हिटोमारा (सुमारे इ. स. ६५५) यांच्या अनेक कविता या संग्रहात आहेत.

आठव्या व नवव्या शतकात 'काना' पद्धतीने जपानीतच लेखनास प्रारंभ झाला. त्या काळातील अनेक व्यक्तींच्या कविता कोकिन्शु (इ. स. ९०३) या ग्रंथात एकत्रित केल्या आहेत. प्रेम आणि देशभक्ती हे विषय या काव्यातून प्रामुख्याने आढळतात. परदेशात ज्याची ख्याती जास्तीत जास्त वापरली आहे, असा जपानी ग्रंथ म्हणजे गेन्जी मोनोगटॅरी (गॅन्जीच्या कथा) हा ग्रंथ १०१० मध्ये प्रसिद्ध झाला. ही जगातील पहिली महान कादंबरी आहे, असे जपानी तज्ज्ञ मानतात. सम्राटांच्या दरबारातील मुरासाकी शिकिबु नावाच्या लेखिकेची चोपन्न खंडांतील ही कादंबरी आहे. जपानच्या उमरावांचे पराक्रम आणि त्यांच्या प्रेमकथा हे या कादंबरीचे प्रमुख विषय आहेत. या काळातील खानदानी घराण्यातील उच्च अभिरुचीच्या जीवनाचे हळुवार दर्शन या कादंबरीत घडते.

उमरावांच्या दैनंदिन जीवनाची लालित्यपूर्ण ओळख करून देणारा 'मकुटांनो सोझी' हा ग्रंथही सी शोनानुन (९९६ ते १०१३) या सम्राटांच्या दरबारातील लेखिकेनेच लिहिला आहे. जपानी साहित्यात विनोदाचा पहिला शिडकावा या पुस्तकात दिसतो. त्या काळातील बहुतेक साहित्य स्त्रियांनी लिहिले असले तरी पुरुषही पुढे काव्याकडे वळू लागले.

तेराव्या शतकात जपानचे सम्राट दुर्बल झाले आणि सामुराई योद्धे हेच लोकांचे आदर्श झाले. साहित्यावर याचा साहजिकच परिणाम झाला. कविता करणारा, कोमल हृदयाचा नायक जनमानसातून उतरला आणि पराक्रमी योद्धा हाच काव्य, कथा, कादंबऱ्या यांचा प्रभावी विषय बनला. 'शिन कोथिन्इड' हा या खंडातील काव्यसंग्रह मशहूर आहे. याच सुमारास धर्मप्रसारासाठी व चित्तशांतीसाठी काही बुद्धभिक्षूंनीही लेखनास प्रारंभ केला. अशा प्रकारच्या पुस्तकात योशिदा केन्को यांचे 'त्सुरेझूट गुसा' हे पुस्तक विशेष महत्त्वाचे आहे. त्यानंतर नोहू आणि

कबुकी नाटकांचे युग आले. या नाटकांतून सामुराई योद्धयांच्या पराक्रमाचे दर्शन घडू लागले. काव्यातून ज्या लढायांचे केवळ वर्णन होते, त्या आता प्रत्यक्ष रंग-मंचावर दिसू लागल्याने लक्षावधी लोक या प्रकाराकडे खेचले गेले. झियामी (१३६३ ते १४४३) यांची नाटके यादृष्टीने सर्वांत प्रभावी ठरली.

सोळावे शतक लढायांत आणि तंग परिस्थितीतच गेले. पण टोकुगवा अमदानीत, सतराव्या शतकात जपानी साहित्य पुन्हा बहरू लागले. मात्र आता सरदार दरकदारांच्या व सामुराईच्या पराक्रमाकडून साहित्यांचे विषय नव्या सधन, सुसंस्कृत व्यापारी वर्गाच्या कलाप्रिय जीवनाकडे वळले. या काळातील सर्वांत मोठे लेखक सईककु (१६४२ ते १६९३) यांच्या कादंबऱ्यांत त्या काळातील धनिकांच्या सुसंस्कृत जीवनाचे यथार्थ दर्शन घडते. त्या वेळच्या सर्वसामान्य लोकांची काही प्रत्ययकारी चित्रेही त्यांच्या कलाकृतीत आढळतात. वरिष्ठ वर्गातून जपानी साहित्य जनसामान्यांच्यापर्यंत येण्याला हा प्रारंभ होता.

चिकामात्सु मोंझायमॉन (१६५३ ते १७२४) हे जपानचे एक श्रेष्ठ नाटककार आहेत. त्यांच्या नाटकात नायकाची पात्रे ही सामुराई योद्ध्याऐवजी व्यापारी आहेत. लढाईत या नायकांना वीराचे मरण येण्याऐवजी ते निष्फळ प्रेमाच्या तीव्र निराशेने हाराकिरी म्हणजे आत्महत्या करतात. त्यांच्या नाटकांपैकी बरीच नाटके ही पपेट थिएटरसाठी (बाहुल्यांची नाटके) लिहिली होती. पण नंतर कलाकारांनी ती उचलली. कौटुंबिक विषयावर नाटके लिहिण्याचा पायंडा प्रथम मोंझायमॉन यांनी पाडला.

हायकूचा उदय हे सतराव्या शतकातील जपानी साहित्याचे आणखी एक वैशिष्टय. तीन ओळींची ही कविता अद्याप जपानमध्ये लोकप्रिय असून जगातील इतर अनेक देशांतही हायकूचा प्रसार झाला आहे. महाराष्ट्रातही अनेक कवींनी हायकू लिहिल्या आहेत. बाझो (१६४४ते १६९४) हा हायकू प्रकारांची कविता लिहिणारा सर्वांत श्रेष्ठ कवी आहे. सतराव्या व अठराव्या शतकात जपान बाहेरच्या जगापासून अलिप्त असल्याने त्याच्या साहित्याची प्रगतीही या काळात काहीशी खुंटली आणि त्याच त्या परिघात जपानी काव्य, कादंबऱ्या, नाटक इत्यादी प्रकार फिरत राहिले. मात्र १८६८ च्या मेईजी सांस्कृतिक पुनरुत्थानाने जपानी साहित्यावर पाश्चात्य साहित्यातील ठळक प्रवाहांचा परिणाम दिसू लागला.

१८७८ मध्ये पहिल्या पाश्चात्य कादंबरीचे जपानी भाषेत भाषांतर झाले. त्यानंतर अमेरिका, ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन इत्यादी साहित्यिकांच्या कलाकृती जपानीत मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध होऊ लागल्या. त्याचबरोबर स्वतंत्र जपानी आधुनिक साहित्यालाही बहर येऊ लागला. सामाजिक जाणिवेची पावले 'युकिगुमो' या कादंबरीत दिसू लागली. फुतावतेई शिमेयी (१८६४ ते१९०९) यांनी या कादंबरीत

मेइजी काळातील अतिसुधारणावादी समाजाचा केलेला उपहास रशियन साहित्याच्या वळणाचा होता.

रशिया व जपान यांच्यातील युद्धात जपानने विजय मिळविल्यामुळे जपानमध्ये जो नवा आत्मविश्वास निर्माण झाला, त्याचे प्रतिबिंब विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासूनच जपानी साहित्यात दिसू लागले. ओगाई, सोसेकी, टाकुबोकु, टोसन, नओया, रुनोसुको अशा अनेक साहित्यिकांच्या सर्वोत्कृष्ट कलाकृती विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत प्रसिद्ध झाल्या. या वेळेपर्यंत सबंध जपानी समाजच पाश्चात्यांच्या जीवनपद्धतीचे अनुकरण करीत होता. युद्धोत्तर काळात तर जपानचे 'पाश्चात्यीकरण' पूर्ण झाले. उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक, राजकारण, हे सर्व युरोप–अमेरिकेप्रमाणे झाले. याचा साहजिकच साहित्यावरही परिणाम झाला. फ्रेंच व रशियन साहित्यातील पात्ररचना, शैली, मांडणी ही आधुनिक जपानी साहित्याने आत्मसात केली. जीवनाच्या केवळ वरिष्ठ थरांतील नव्हे, तर सर्व थरांच्या जीवनाचे प्रतिबिंबच भरभराट पावलेल्या जपानी साहित्यात दिसू लागले. कवाबाटा यंसुनारी (१८९९ ते १९७२) वॅनिझाकी जुनिकिरी, डॅझॅई ओसामु, मिशिमा युकिओ अशा श्रेष्ठ साहित्यिकांनी जपानच्या सध्याच्या जीवनाचे यथार्थ व सखोल चित्रण केले. कवाबाटा यांना तर नोबेल पारितोषिकही मिळाले.

शेकडो जपानी पुस्तकांची इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन अशा भाषांत भाषांतरे होऊन त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली. मिशिया यांच्या 'किकाकुजी' या कादंबरीत एका बौद्ध धर्मगुरूच्या मनातील खोल संघर्षामुळे तो बुद्ध मंदिराला आग लावतो, असे दाखविले आहे. सेंबा-झुरू या कवाबाटा यांच्या कादंबरीत पारंपरिक व आधुनिक जपानी समाजातील संघर्षाचे चित्रण आहे. वास्तववाद हे आजच्या जपानी साहित्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. मध्ययुगीन स्वप्नरंजनापासून प्रारंभ करून जपानने आधुनिक काळापर्यंत येताना मोठीच मजल मारली आहे.

साहित्यावर राजकारणाचा प्रभाव पडणे हा नव्या जीवनपद्धतीचा सहजभावच आहे. हिरोशी नोमा हे डाव्या विचारसरणीचे लेखक आहेत. 'सिनेन नोवा' (तरुणांचे वर्तुळ) या कादंबरीत त्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जपानमध्ये डाव्यांची चळवळ कशी हतप्रभ झाली याचे प्रभावी चित्रण केले आहे. जे पॉल सार्त्र यांच्या पक्झिन्सशालिनझमचा (अस्तित्ववाद) परिणाम ज्या काही जपानी लेखकांवर झाला आहे, त्यांत केनेशाबुरो ओटा यांचा समावेश करावा लागेल.

कवाबाटा आणि मिशिया या दोन्ही आधुनिक जपानी साहित्यातील श्रेष्ठींनी आत्महत्या केल्या. कवाबाटा यांना नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर समाजाला देण्यासारखे आपल्याजवळ नवीन काही उरले नाही या वैफल्यातून त्यांची आत्महत्या घडली असे मानले जाते. मिशिमा हे 'उजवे क्रांतिवादी' होत. त्यांनी उभा-

रलेल्या खासगी सैन्याचा उठाव यशस्वी होऊ शकत नाही, या भावनेपोटी त्यांना वैफल्य आले. शोहेई ऊका यांनी 'नोबी' या कादंबरीत दुसऱ्या महायुद्धात जपानच्या लष्कराची झालेली दैना परिणामकारकरित्या चित्रित केली आहे. बंद असलेल्या आधुनिक समाजातून सुटका करून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या बुद्धिवंताचे चित्रण 'सुना नो ओना' (वूमन ऑफ द ड्यून्स) आणि 'हाको ओटाको (मॅन इन बॉक्स) या कादंबऱ्यांत कोबो ॲबे यांनी केले आहे. जुन्या नोह पद्धतीच्या नाटकांना आधुनिक विषय देऊन ती सादर करण्याचे यशस्वी प्रयोग कवाबाटा यांनी केला आहे. शिगेहारू नकानो हे मार्क्सवादी लेखक आहेत. त्यांनी आत्मचरित्र-पर लेखनातून जपानमधील राजकीय जागृतीवर प्रकाश टाकला आहे.

एकतीस अक्षरांची वाका आणि त्याची अर्धी १७ अक्षरांची हायकू हे जपानी काव्याचे प्रकार जगभर प्रसिद्ध आहेत. निसर्ग आणि प्रीती हे जपानी काव्याचे फार प्राचीन काळापासूनचे विषय आहेत. त्यात आता आधुनिक जीवनातील सामाजिक जाणिवेचेही दर्शन घडू लागले आहे. आधुनिक हायकू लेखकात नात्सुमे हे नाव विशेष प्रसिद्ध आहे. त्यांनी विचारवंतांच्या कोंडमाऱ्याविषयी कादंबऱ्याही लिहिल्या आहेत.

आजचे जपानी साहित्य एका राष्ट्राचे किंवा एका प्रादेशिक विभागाचे साहित्य राहिले नाही. जागतिक साहित्यात जपानने मानाचे स्थान मिळविले. जपानमधील माझ्या मुक्कामात मी होशी या प्रथम दर्जाच्या लेखकाची भेट घेतली. विज्ञानकथेच्या क्षेत्रांतील ते आजचे सर्वश्रेष्ठ साहित्यिक आहेत. ते म्हणाले की जपानी विज्ञानकथा जगातील सर्व प्रथम भाषांतून भाषांतरित झाल्या असून जपानने आता भूतकाळ व वर्तमानकाळातून भविष्यकाळाकडे नजर वळविली आहे. इंग्रजी-तून प्रसिद्ध झालेला आपला एक कथासंग्रहही त्यांनी या वेळी मला दिला.

## १२

# समाजकल्याण आणि कला

जपानच्या एकंदर राष्ट्रीय उत्पन्नांपैकी दहा ते बारा टक्के खर्च समाजकल्याणावर होतो. जपानमधील सरकारी समाजकल्याणाच्या कार्यक्रमांना १८७४ मध्ये सुरुवात झाली. त्या वर्षी कमी उत्पन्नाच्या किंवा निराधार असलेल्यांना आर्थिक मदत देण्याचा कायदा झाला. तसेच आजच्या वैद्यकीय योजनेचा पायाही त्याच वर्षी घालण्यात आला व गरिबांना मोफत औषधोपचाराची योजना लहान प्रमाणावर सुरू झाली. १९२२ मध्ये जपानने हेल्थ इन्शुरन्स (आरोग्य विमा) कायदा मंजूर केला. त्या पुढच्याच वर्षी सार्वजनिक सेवा निवृत्ती वेतनाचा कायदा झाला.

इतर देशांच्या मानाने जपानमध्ये वृद्धांच्या कल्याणाची सरकारवर कमी जबाबदारी पडते. प्रत्येक कारखाना, कंपनी, महापालिका इत्यादी आपल्या कामगारवर्गाच्या उतारवयात त्यांना पुरेसे निवृत्तीवेतन व इतर सवलती मिळाव्यात म्हणून व्यवस्था करतात. पाश्चात्य देशांच्या तुलनेने जपानमध्ये वृद्धांची संख्या कमी आहे. जपानमध्ये ६५ वर्षांच्या वरचे लोक नऊ टक्के आहेत, तर स्वीडन, पश्चिम जर्मनी आणि ब्रिटनमध्ये हीच लोकसंख्या १४ ते १४॥ टक्के आहे. त्यामुळे जपानला वृद्धांच्या कल्याणासाठी अधिक पैसा उपलब्ध करून देणे शक्य होते. मात्र उत्तम आरोग्यव्यवस्था आणि पुरेसे स्वास्थ्य यामुळे जपानमधील सरासरी आयुर्मर्यादा वाढत असल्याने ही टक्केवारी वाढतच राहील असा अंदाज आहे.

जपानमधील उद्योगधंदे व व्यापारी कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पगाराव्यतिरिक्त इतर सवलती व फायदे देत असतात. उदाहरणार्थ, आजीव नोकरी, वयाप्रमाणे वाढता पगार, उत्तम निवृत्तीवेतन, मोफत वैद्यकीय मदत, वाहन भत्ता. आर्थिक मंदीतही जपानी कारखाने नोकरकपात करीत नाहीत,

तर पगार काहीसा कमी करून का होईना पण कामगारांना नोकरीत ठेवतात व कमी काम देतात. मंदी संपली की, पुन्हा पूर्वीप्रमाणे काम व वेतन सुरू होते. त्यामुळे प्रत्यक्ष बेकारीचे प्रमाण अत्यल्प असते. जपानी नागरिक ठराविक रक्कम बचत करतो. त्यामुळे निवृत्तीनंतर त्याला सर्वसाधारणपणे सरकारी मदतीवर अवलंबून राहावे लागत नाही. प्रत्येक कर्मचाऱ्याला निवृत्तीच्या वेळी जी ग्रॅच्युइटी देण्यात येते, ती सरासरी दरडोई एक लक्ष साठ हजार रुपये एवढी असते. कर्मचाऱ्यांनी केलेली बचत लक्षात घेतली तर जपानमध्ये प्रत्येक कर्मचारी निवृत्त होतो तेव्हा त्याच्या खात्यावर बँकेत तीन लक्ष रुपयांची रक्कम शिल्लक असते.

समाजकल्याणाचे दोन प्रमुख प्रकार आहेत. खासगी कारखाने व कंपन्यांनी दिलेल्या सवलती आणि सरकारने केलेल्या सोई व सुविधा. जपानमधील कारखाने व कंपन्या पगाराव्यतिरिक्त आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना पुढील साह्य देतात.

१) स्वतःचे घर अथवा फ्लॅट घेण्यास आर्थिक मदत.

२) वैद्यकीय मदत. ठराविक वेळी तपासणी, औषधे, ऑपरेशन्स, हॉस्पिटलमध्ये ठेवण्याचा सर्व खर्च.

३) मोफत जेवण व अल्पोपाहार.

४) सांस्कृतिक कार्यक्रमात कर्मचाऱ्यांना भाग घेता यावा म्हणून मदत. (यात जिम्नॅशियमचाही (व्यायाम शाळा) समावेश आहे.)

५) कर्मचाऱ्यांच्या विम्यात कंपनीचा सहभाग.

६) कंपनीचे शेअर्स कर्मचाऱ्याला खरेदी करता यावेत म्हणून आर्थिक साह्य. याचा परिणाम असा होतो की, निवृत्तीनंतरही कर्मचाऱ्याला त्या शेअर्सवर डिव्हिडंड मिळतो आणि कंपनीच्या मालकीत आपलाही लहानसा वाटा आहे ही भावना कर्मचाऱ्याच्या मनात कायमची राहते. संस्था आणि कर्मचारी यांच्यातील भावनिक संबंधांना जपानमध्ये अतिशय महत्त्व देण्यात येते.

प्रत्येक नागरिकाने विमा उतरावा व नियमित बचत करावी म्हणून सरकार व खासगी कारखाने, कंपन्या सक्रीय मदत करतात. नोकरी लागल्याबरोबर कर्मचारी तीस वर्षांचा विमा उतरतो. त्याचे हप्ते भरण्यासाठी प्राप्तीकरातून सरासरी वर्षाला अडीच हजार रुपये करमुक्त असतात. तीस वर्षांच्या अखेरीस कर्मचाऱ्याने भरलेल्या मूळ रकमेच्या दुपटीहून अधिक रक्कम विमा कंपनीकडून त्याला मिळते. वास्तविक त्या भरलेल्या रकमेपैकी कर्मचाऱ्याने निम्मी रक्कम भरलेली असते व कंपनीने निम्मी भरलेली असते. याचाच अर्थ असा की, कर्मचाऱ्याच्या स्वतःच्या रकमेच्या चौपटीहून अधिक पैसा त्याला निवृत्तीच्या वेळी एकरकमी विमाकंपनीकडून मिळतो. शिवाय कंपनीची ग्रॅच्युइटी वेगळीच मिळते. जपानमध्ये सध्या प्रत्येक नागरिकाचा सरासरी ऐंशी हजार रुपयांचा विमा उतरलेला आहे.

युनोच्या इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने प्रत्येक राष्ट्राने आपल्या कामगारांच्या कल्याणासाठी किती पैसा किमान खर्च करावा याची काही मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली आहेत. या अपेक्षित रकमेच्या आठपट रक्कम जपान सरकार खर्च करीत आहे. सरकारच्या समाजकल्याणविषयक कार्यक्रमाचे पाच प्रमुख भाग आहेत : १) सार्वजनिक साहाय्य, २) समाजकल्याणाच्या सुविधा, ३) सामाजिक विमा (वैद्यकीय मदत, निवृत्तिवेतन, मुलांच्यासाठी भत्ता, बेकारीच्या काळात साह्याची हमी, अपघात झाल्यास नुकसानभरपाई इत्यादी ४) सार्वजनिक आरोग्य आणि ५) वृद्धांना आर्थिक साहाय्य व युद्धामुळे ज्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना मदत.

सोशल सिक्युरिटी (सामाजिक सुरक्षितता) या सदरात सरकारतर्फे जो खर्च होतो, त्यापैकी ४९ टक्के वैद्यकीय मदतीवर खर्च होतो आणि ५१ टक्के रक्कम रोखीच्या स्वरूपात देण्यात येते. जपानमधील ७० ते ७५ टक्के लोकांना या सोईचा लाभ होतो. उद्योगपती, धनिक, व्यापारी, बडे अधिकारी या वर्गातील लोकांना सरकारी मदतीची आवश्यकता नसते. थोडक्यात सांगायचे, तर ज्याला आर्थिक व वैद्यकीय मदतीची गरज आहे, अशा प्रत्येक नागरिकास या सुविधा मिळतात. जपान सरकारने भावी कालाचे नियोजन करून १९९३ मध्ये जपानमध्ये ६५ वर्षांवरील किती लोक असतील याचा अंदाज करून त्यानुसार आत्ताच पुढील दहा वर्षांत वृद्धांना द्यावयाचे साह्य वाढविण्याची योजना आखली आहे. १९२० मध्ये जपानी माणसाचे सरासरी आयुर्मान फक्त ४५ वर्षांचे होते, ते आता पुरुषांच्या बाबतीत ७३ वर्षे आणि स्त्रियांच्या बाबतीत ७८ वर्षे इतके झाले आहे. स्कॅन्डीनेव्हियन देशातील नागरिकांचे आयुर्मान हे जगातील विक्रमी असून जपानने त्या देशांच्या बरोबरीने आपल्या नागरिकांचे सरासरी आयुर्मान आणले आहे. जपानमध्ये कॅन्सरने मृत्यू पावणाऱ्यांचे प्रमाण पाश्चात्य देशांच्या मानाने अतिशय अल्प आहे. मात्र आधुनिक यंत्रयुगाचा शाप म्हणजे हृदयविकाराने मृत्यू पावणाऱ्यांचे प्रमाण पूर्वी कमी होते, ते गेल्या काही वर्षांत युरोप व अमेरिकेच्या प्रमाणाच्या आसपास आले आहे.

गेल्या दहा वर्षांत जपानमध्ये वैद्यकीय खर्च पाच पटीने वाढला आहे. रुग्णालयाचे दर इंग्लंड-अमेरिकेच्या जवळपास किंवा काही प्रसंगी अधिकच आहेत. त्यामुळे सरकारचे वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रकही झपाट्याने वाढत आहे. हा खर्च आता चाळीस महापद्म येनपर्यंत गेला आहे. जपानमधील गरजू रोग्यांना सरकारकडून ७५ ते ८५ टक्के वैद्यकीय खर्च मिळतो. काही बाबतीत सरकार शंभर टक्के खर्च करते. नोकरीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना ठराविक रक्कम भरली की, व्यवस्थापनातर्फे त्या रकमेच्या चार ते सहा पट रक्कम मिळते व त्यातून त्याला

वैद्यकीय खर्च भागविता येतो. त्याला ग्रुप इन्शुरन्स योजना असे नाव आहे. जपानमधील सर्व कारखाने व कचेऱ्यांना ही योजना लागू आहे. जेथे आवश्यक असेल तेथे सरकार स्वतः ही योजना राबविते. ही गरज लहान कारखान्यांना अधिक भासते. ज्यांना कोणत्याही कंपनीची अथवा कारखान्याची विमा व वैद्यकीय हमीची योजना लागू नाही, त्यांना सरकार वैद्यकीय मदत देते. इतरांच्या बाबतीत प्रत्यक्ष नोकरांचा १०० टक्के व कुटुंबियांचा ७० टक्के वैद्यकीय खर्च कारखाना किंवा कंपनीकडून होतो. जपानमधील डॉक्टर्स आणि परिचारिका यांचे लोकसंख्येचे दर हजारी प्रमाण पाश्चात्य राष्ट्रांएवढे आहे. (एक लाख लोकसंख्येला १४० डॉक्टर्स, ४८ दंत वैद्य आणि ३७५ नर्सेस).

कमी उत्पन्नाचे नागरिक, गरोदर स्त्रिया आणि मुले यांना जपानमध्ये चिकित्सा व औषधोपचार मोफत मिळतात. हा कायदा १९४७ पासून लागू करण्यात आला आहे. नोकरीवर जाणाऱ्या स्त्रियांची मुले सांभाळण्यासाठी देशात अठरा हजार शिशुपालन गृहे असून त्यांना सरकारचे आर्थिक साह्य मिळते. अपंग मुलांसाठी खास शिशुपालन गृहे आहेत. कमी उत्पन्नाच्या पालकांची अपंग मुले तिथे मोफत ठेवून घेण्यात येतात. या सर्व मुलांना उत्कृष्ट अन्न व शिक्षण देण्यात येते व त्यांचे व्यंग नाहीसे अथवा कमी करण्याचे प्रयत्न करण्यात येतात. अपंग मुलांसाठी असे सर्वांत मोठे केंद्र कानागावा प्रांतात आहे. निराधार मुलांसाठीही सरकारतर्फे शिशुगृहे चालविण्यात येतात.

गरजू स्त्रियांना साहच करण्याच्या अनेक योजना जपान सरकारने कार्यान्वित केल्या आहेत. विधवांना आणि निराधार स्त्रियांना व्यावसायिक शिक्षण, वैद्यकीय मदत, निवारा व इतर साहच करण्यात येते. ज्या निराधार स्त्रियांना वीस वर्षांखालील लहान मुले आहेत, त्यांच्या मुलांची शिक्षणाची व आरोग्याची जबाबदारी सरकारतर्फे पार पाडण्यात येते. अशा स्त्रियांसाठी सरकार दरवर्षी सुमारे तीन ते चार हजार गाळे बांधते आणि सहा लक्ष स्त्रियांना व मुलांना साह्य करते. निराधार मुले व स्त्रिया यांच्यासाठी सरकारतर्फे करमणूक केंद्रे, ग्रंथालये व उद्याने यांचीही व्यवस्था करण्यात येते. समाजकार्य करणाऱ्या शेकडो सेवाभावी संस्था जपानमध्ये आहेत. त्यांचे दोन हजार कार्यकर्ते समाजकार्य करीत असतात. अशा संस्थांनाही जपानचे सरकार दरसाल मोठ्या प्रमाणावर आर्थिक साहाय्य करीत असते.

वृद्धापकाळात सरकारकडून कोणत्या देशात दरमहा किती पेन्शन मिळते, याची तुलना उद्बोधक होईल. ब्रिटनमध्ये दरमहा १९२ डॉलर्स, जपानमध्ये ३३७ डॉलर्स, अमेरिकेत ३३९, आणि स्वीडनमध्ये ३१७ डॉलर्स ही पेन्शन मिळते. जपान-

मध्ये वृद्धांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीची व महागाईच्या निर्देशांकाची सांगड घालण्यात आली आहे. महागाई जर पाच टक्के किंवा अधिक प्रमाणात वाढली, तर पेन्शनमध्येही तेवढी वाढ करण्यात येते. ज्यांना उत्पन्नाचे साधन नाही अशा वृद्धांना केवळ निर्वाहासाठीच साह्य देण्यात येते असे नाही; तर त्यांचा वेळ चांगला जावा म्हणून टेलिव्हिजन, रेडिओ, ग्रंथालय इत्यादी सुविधाही त्यांना उपलब्ध करून देण्यात येतात. निधनानंतर त्यांच्या अन्त्यविधीचा खर्च करण्याचीही जबाबदारी सरकारने स्वीकारली आहे.

एखाद्या कुटुंबप्रमुखाची नोकरी काही कारणाने गेली अथवा शारीरिक असमर्थतेने त्याला काम करणे अशक्य झाले, तर जपानमध्ये त्या प्रकारच्या कामगाराला जेवढा सरासरी पगार असेल, त्याच्या सुमारे ४८ ते ५० टक्के भत्ता सरकार देते. गरजेप्रमाणे या भत्त्यासाठी तीन वर्ग करण्यात आले आहेत. पहिल्या वर्गासाठी दरमहा सुमारे तीनशे डॉलर्स मिळतात. १९७९ मध्ये अशा तेरा लक्ष लोकांना सरकारने आर्थिक साहाय्य दिले. एकंदर लोकसंख्येच्या सुमारे बारा टक्के लोकांना असे साह्य देण्यात येते.

हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर पडलेल्या अणुबाँबमुळे कायमचे अपंग झालेले काही लोक आहेत. त्यांना आजन्म मोफत वैद्यकीय आणि आर्थिक साह्य सरकारतर्फे देण्यात येते. तसेच युद्धात इतर कारणांनी जखमी होऊन काम करण्यास असमर्थ झालेल्यांनाही पुरेशी मदत मिळते.

एक खास सुविधा जपानमध्ये वृद्धांना मिळते. त्याला 'वेलफेअर टेलिफोन्स' म्हणतात. जे वृद्ध अंथरुणाला खिळून राहिले आहेत किंवा शहरापासून दूरवर एकाकी राहत आहेत, त्यांना सरकारतर्फे वेलफेअर टेलिफोन्स पुरविण्यात येतात. हे फोन मोफत असतात. तातडीच्या वेळी त्यांना वैद्यकीय मदत अथवा ॲम्ब्युलन्स मागविता यावी म्हणून अशा वेलफेअर टेलिफोन्सची सोय करण्यात आली आहे. ज्या अपंगांना सरकारी अपंगगृहात येऊन राहण्यास संकोच वाटत असेल, त्यांच्या घरी जाऊन सेवा करण्याचीही योजना सरकारने कार्यान्वित केली आहे. अपंगांना केवळ आर्थिक व वैद्यकीय साह्य न देता त्यांच्या मर्यादांत त्यांना काम कसे करता येईल यावर अधिक भर देण्यात येतो.

एकंदरीत जपानच्या समाजकल्याणाच्या सुविधा जगातील इतर पुढारलेल्या देशांच्या तोडीच्या आहेत. त्या देशांना जे कार्य करण्यासाठी शंभरहून अधिक वर्षे लागली, तेच जपानने गेल्या महायुद्धानंतर म्हणजे पस्तीस वर्षांत केले, हा जपानचा विशेष म्हणावा लागेल.

जपान अत्यंत कलाप्रिय देश आहे. चित्रकला, संगीत, शिल्पकला, मातीकाम, नृत्य इत्यादींना जपानमध्ये महत्त्वाचे स्थान आहेच, पण पुष्परचनेसारख्या क्षेत्रातही

जपानने आपले स्वतंत्र शास्त्र प्रस्थापित केले आहे. ते 'इकेबाना' नावाने प्रसिद्ध आहे. इकेबाना शब्दाचा अर्थ 'फुलांची भाषा.' चहापान इंग्लंड, भारत, चीन अशा जगातील बहुतेक देशांत सर्वत्र चालते. जपानने 'टी सेरिमनी' म्हणजे चहापानाचा स्वतंत्र समारंभच केला आहे.

बाहुल्या प्रत्येक देशात असतात आणि त्या त्या देशांचे वैशिष्ट्य दाखविणाऱ्या बाहुल्याही प्रचारात असतात. जपानमध्ये डॉल मेकिंग म्हणजे बाहुल्या तयार करण्याचे स्वतंत्र शास्त्र आहे. त्याचे वर्गही भरतात, त्याचे पद्धतशीर शिक्षण देण्यात येते. जपानमधील प्रत्येक घरात फुले ठेवण्याची स्वतंत्र जागा असते. त्याला तोकोनामा म्हणतात. उद्यानशास्त्रातही जपानने स्वतंत्र स्थान मिळविले आहे. जपानी उद्याने कलात्मक आहेत. 'जॅपनीज गार्डन्स'चा प्रसार व्हावा म्हणून जपानने अनेक देशांत जमीन घेऊन, तेथे आपल्या पद्धतीची खास उद्याने तयार करून ती त्या देशांना भेट म्हणून दिली आहेत. असे एक देखणे जपानी उद्यान मी अमेरिकेच्या होनोलुलू या शहरी पाहिले आहे.

बोनसाई हा आणखी एक खास जपानी प्रकार. मोठ्या वृक्षांच्या कलमांवर छोटे स्वरूप देण्याच्या (मिनिचरायझेशन) प्रक्रिया करून लहानशा जागेत किंवा कुंडीत मोठ्या वृक्षांच्या या छाट्या बोनसाई प्रतिकृती तयार करण्यात येतात.

जपानी कलेची परंपरा फार-प्राचीन आहे. उत्खननात सापडलेल्या काही दगडाच्या मूर्ती पाषाणयुगातील आहेत असे तज्ज्ञांनी मत व्यक्त केले आहे. त्या नंतरच्या काळातील मातीच्या मूर्ती आणि मातीची भांडीही उत्खननात सापडली आहेत. इ. स. ५३८ मध्ये जपानमध्ये बौद्धधर्म आला. त्या वेळच्या 'आसुका' कालखंडात अनेक कलात्मक बुद्धमंदिरे बांधली गेली. त्यांपैकी नारा या शहराजवळील होर्युजी मंदिर हे जगातील सर्वांत जुने लाकडी मंदिर आहे. ते अतिशय कलात्मक म्हणून प्रसिद्ध आहे. हे मंदिर राजपुत्र शोटोकू यांनी उभारले. शोटोकूची प्रतिमा आजही जपानच्या दहा हजार येन्सच्या नोटांवर काढलेली आहे. इ. स. ६०७ मध्ये बांधण्यात आलेल्या या मंदिरात अनेक प्राचीन पुतळे, मूर्ती आहेत. मुख्य मूर्ती साडे-आठ फूट उंच व अतिशय घाटदार आहे.

'हाकुहो' कालखंडात (इ. स. ६४६ ते ७१०) जपानी शिल्पकलेवर चीन व भारत यांचा मोठा प्रभाव आढळतो. या काळातील मूर्तींच्या चेहऱ्यावर शालीनतेचा भाव प्रामुख्याने दिसतो. इ. स. ७१० ते ७८४ हा 'तेम्पो' कालखंड म्हणजे बौद्ध धर्माचे व जपानी शिल्पकलेचेही सुवर्णयुग होते. या काळातील शेकडो उत्कृष्ट मूर्ती क्योटो व नाटा या प्राचीन जपानच्या राजधान्यांच्या शहरांत आहेत. या काळातील मूर्तींच्या चेहऱ्यावर शांतता व प्रगल्भता यांचा प्रभाव दिसतो. त्यानंतर तेराव्या शतकापर्यंत 'हेइयान' व 'जोगान' कालखंडातील मूर्तींत प्रसन्नता आणि

लालित्य अधिक दिसते.

आधी चीनच्या कलेच्या छायेखाली वाढत असलेले जपानी शिल्प तेराव्या शतकाच्या सुरुवातीस स्वतंत्र अस्मिता दाखवू लागले. इथून पुढच्या काळात जपानने शिल्पकलेत आपले स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित केले आणि त्या क्षेत्रात जागतिक मान्यता मिळविली.

जपानच्या चित्रकलेचाही प्रथम चीनच्या चित्रकलेच्या आधारानेच विकास होऊ लागला. त्या पद्धतीला 'कराटा' म्हणतात. पण नंतर जपानने या क्षेत्रात आपले स्वतंत्र वैशिष्टय दाखविण्यास सुरुवात करून चिनी चित्रकलेपासून जपानी चित्रकला अलग केली. या काळात जपानी चित्रकलेच्या पद्धतीला 'यामाटोए' असे नाव आहे. त्याबरोबर वुड ब्लॉक पद्धत सुरू झाली. तीत पुन्हा मारो यांचे नाव विशेष अग्रगण्य आहे. मुरोगामी कालखंडात झेन बुद्धिस्टांची शाईने काढलेली चित्रे खास प्रसिद्ध आहेत. त्यातूनच कानो पद्धतीची चित्रकला उदयाला आली. जपान-मधील सरदार, उमराव व इतर वरिष्ठ कानोपद्धतीची चित्रकला अधिक लोकप्रिय होती. निसर्ग आणि सुंदर स्त्रिया हे जपानी चित्रकलेचे प्रमुख विषय होते.

जपानी संगीताचे प्राचीन रूप गागा कु या दरबारी संगीत - नृत्यात दिसते. हे गायन व वादन राजदरबारात आणि शिंटो मंदिरात होत असे. आजही बुद्ध शिंटो मंदिरात गागाकु संगीत व नृत्याचे कार्यक्रम होतात. चित्रकलेप्रमाणेच हे संगीतही चीनमधून जपानमध्ये आले. तांग अमदानीत आठव्या शतकात हे संगीत जपानमध्ये प्रथम सुरू झाले. चीनने पर्शिया, भारत व कोरिया यांच्या संगीताची काही अंगे आत्मसात केली होती. आधुनिक जपानी संगीतावर पाश्चात्य संगीताचाही प्रभाव दिसतो. जॅझ हा पाश्चात्य संगीताचा प्रकार जपानमध्ये लोकप्रिय झाला आहे. जपानी वाद्यसंगीतात तीन तारांचे शामीसेन हे वाद्य प्रमुख आहे. त्याबरोबरच शाकुहाची हे बासरीसारखे वाद्य आणि कोतो हे रेशमाच्या तेरा तारांचे वाद्य हीही महत्त्वाची आहेत. शाकुहाचीचा उपयोग शेकडो वर्षांपूर्वीपासून बौद्ध भिक्षू करीत असत. कोतो हे जपानमधील सर्वांत लोकप्रिय वाद्य आहे. या तीन जपानी वाद्यांचा उपयोग अनेक पाश्चात्य आपल्या ऑर्केस्ट्रात करून घेत आहेत. दरसाल वसंत ऋतूमध्ये ओसाका येथे आंतरराष्ट्रीय संगीत समारंभ होतो. त्याच वेळी ऑपेरा, ऑर्केस्ट्रा, सिंफनी, बॅले असे संगीताशी निगडित पन्नास ते साठ कार्यक्रमही होतात व जागतिक प्रमुख गायक-वादक त्यात भाग घेतात. जपानच्या तीन प्रमुख ऑर्के-स्ट्रांनी अमेरिका, युरोप व लॅटिन अमेरिका यांचे अनेक यशस्वी दौरे केले आहेत. जपानच्या शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांत जपानी व पाश्चात्य संगीताचे अभ्यासक्रम आहेत व त्या त्या क्षेत्रातील डिप्लोमा व पदव्याही देण्यात येतात. अनेक जपानी संगीतज्ञांनी पाश्चात्य देशात जाऊन पाश्चात्य संगीताच्या क्षेत्रात

सर्वोच्च बहुमान मिळविले आहेत. सेईजी ओजावा यांनी टोरॅन्टो व सॅनफ्रॅन्सिस्को येथे ऑर्केस्ट्रांचे नेतृत्व केले आहे. एन्सेबल निवान ही संघटना जपानी व पाश्चात्य संगीताचे सहकार्य करून वेगळे संगीताचे प्रकार शोधून काढण्यात १९६४ पासून मग्न आहे.

नृत्याचा प्रसार जपानमध्ये फार मोठ्या प्रमाणावर आहे. दक्षिण भारतातील मंदिरांत भरत नाट्यम्सारख्या नृत्यप्रकाराचा जन्म झाला, तसेच प्राचीन मंदिरात जपानी नृत्याचा प्रारंभ झाला. कबुकी व नोहसारख्या जपानी नाटकांतूनही नृत्याची दृश्ये भरपूर असतात. गैशा या नृत्यात तरबेज असल्याच पाहिजेत. अलीकडे जपानी तरुणांत डिस्कोसारखी पाश्चात्य पद्धतीची नृत्येही लोकप्रिय झाली आहेत. जपानमधील बरीच नृत्ये स्त्रियांनी करण्याची आहेत.

'इकेबाना'ची पद्धत जपानमध्ये तेराशे वर्षांपूर्वी सुरू झाली. बौद्धधर्मातील काही कल्पना फुलांच्या मांडणीतून साकार कराव्यात हा पहिल्या इकेबानाचा उद्देश होता. पण नंतरच्या काळात त्यांची धार्मिक बाजू मागे पडली आणि जपानच्या कलात्मक लोकांना पुष्परचनेच्या मूलभूत सौन्दर्यानेच मोहिनी घातली. इकेबाना ही रचना वरवर साधी व सुंदर दिसते, पण त्या सौन्दर्यामागील अर्थ लक्षात घेतला, तर त्यातील रहस्य आपल्या मनावर अधिकच छाप पाडते. इकेबानामध्ये तीन प्रकारचे साहित्य वापरले जाते. काटक्या, वाळलेली पाने, पूर्णपणे उमललेली फुले, हा पहिला प्रकार. दुसरा प्रकार म्हणजे अर्धोन्मिलित फुले, ताजी पाने. तिसरा प्रकार म्हणजे कळ्या. या तीन प्रकारांत जपानी पुष्परचनाकारांना फुलांचा भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ अभिप्रेत आहे, हे लक्षात घेतले तर या पुष्परचनेला अधिक खोल अर्थ आहे हे आपल्याला पटते. याशिवाय ग्रीष्म, शिशिर, हेमंत इ. ऋतूंनुसार इकेबानाची पद्धतही बदलत असते आणि त्या काळात अनुकूल अशी वेगवेगळी पुष्परचना करण्यात येते. इकेबानाचे मुख्य तीन प्रकार असतात. उभट फुलांची उंच, मधल्या बिंदूपासून दूर वळणारी आणि पसरट रचना.

जपानमधील उत्सव व सण आणि विशिष्ट प्रकारची फुले व पुष्परचना यांचा निकटचा संबंध आहे. उदाहरणार्थ, नव्या वर्षाच्या आगमनाला पाईन आणि शुभ्र क्रिसॅन्थेमियम या वाटोळ्या फुलांची रचना प्रत्येक घरात करण्यात येते, तर बाहुल्यांच्या महोत्सवात पीच ब्लॉसम्सचा उपयोग करण्यात येतो.

रिक्का पद्धतीची पुष्परचना सहाव्या शतकातील आहे. शुमिसेन या बौद्धधर्मीयांच्या पवित्र पर्वताचे प्रतीक म्हणून ही रिक्का रचना सुरू झाली. या पद्धतीत मध्यभागी पाईन वृक्षाची फांदी असते. या रचनेत पांढरी फुले हे पाण्याचे प्रतीक असते. विविध ऋतूंचे प्रतीक म्हणून रंगीत फुले वापरण्यात येतात. शोका पद्धतीच्या रचनेत विश्वदर्शन घडविण्याचा हेतू असतो. स्वर्ग, पृथ्वी आणि मानव

यांचे पौर्वात्य तत्त्वज्ञानातील प्रतीक म्हणून शोका रचनेत देठ, पाने व फुले यांचा वापर होतो. मुक्त पद्धतीत पुष्परचनेला अधिक स्वातंत्र्य असते. शांत चित्त, निसर्ग-प्रेम आणि भविष्यकालाचे दर्शन या मुक्त पद्धतीच्या पुष्परचनेत घडते. आता जगातील बहुतेक देशांत इकेबानाचे वर्ग चालविण्यात येतात. जपानी पुष्परचना सर्वत्र लोकप्रिय होत आहे.

साध्या कागदापासून विविध कलाकृती बनविण्याचे ओरिगामी हे शास्त्र जपानने केले आहे. इतर कलांच्या मानाने ओरिगामी हे कमी खर्चाचे असल्याने ते जपानमधील शाळांतून व इतर देशांतील मुलांतही अतिशय लोकप्रिय आहे. त्याला फक्त कागद आणि कात्री यांची आवश्यकता असते. त्या कागदापासून विमान, घोडा, रथ, झाड, घर, हत्ती अशा अनेक आकृती सहजपणे तयार करण्यात जपानी लोकांनी विलक्षण कौशल्य मिळवले आहे. विशेषत: दीर्घ प्रवासात वेळ जाण्यासाठी ओरिगामीने आकृत्या तयार करून मुलांचे मनोरंजन करणे व त्यांच्यात कलेविषयी प्रेम वाढविणे सहज शक्य असते.

चित्रपटसृष्टीतही जपानने चांगली आघाडी मारली आहे. तेथे दरसाल २२५ ते २५० पूर्ण लांबीचे चित्रपट आणि दीड हजारावर लहान चित्रपट तयार होतात. १९५१ मध्ये ' रोशोमॉन ' या जपानी चित्रपटाने आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव व्हेनिस येथे प्रथम क्रमांक मिळविला. त्यानंतरही ' गेट ऑफ हेल ', ' रिक्शामॅन ', ' फायर्स ऑन द प्लेन ', ' द ग्रेट व्हाईट टॉवर ' अशा अनेक जपानी चित्रपटांनी आंतरराष्ट्रीय बहुमान मिळविले आहेत. ' युकिवारिसु ' हा एका बालकाच्या जीवनावरील जपानी चित्रपट भारतात अत्यंत लोकप्रिय झाला होता. टोकियोमध्ये मला एक तरुण जपानी चित्रपट निर्माते भेटले. त्यांचा विशेष असा की, त्यांनी भारतात येऊन वाराणसीच्या पार्श्वभूमीवर एक चित्रपट जपानी भाषेत तयार केला आहे. एक जपानी प्रवासी वाराणसीत येतो आणि त्याची बाबू नावाच्या भारतीय मुलाशी मैत्री जडते हा त्या चित्रपटाचा मुख्य विषय आहे. त्याचे हिंदीत डबिंग करून ' यादगारी सिक्के की लॉकेट ' असे त्यांनी हिंदी नाव दिले आहे. जपानी प्रवाशाने दिलेले पाच येनचे नाणे भारतीय मुलगा आपल्या गळ्यात आठ-वण म्हणून लॉकेटसारखे बांधतो या घटनेवरून या चित्रपटाला हे नाव देण्यात आले आहे.

जपानी टी. व्ही.वर दर आठवड्याला सरासरी सोळा चित्रपट दाखविले जातात.

जपानमधील वास्तुशिल्पकलेची सुरुवात पाचव्या शतकात शिंटो मंदिराच्या रूपात सुरू झाली. लाकूड, बांबू आणि गवत अशा साध्या व सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंनी ही पहिली मंदिरे उभारली गेली. शोडेन म्हणजे मुख्य इमारत, त्या

इमारतीजवळ लहान इमारती आणि या सर्वांभोवती भिंत किंवा कुंपण हे त्या बांधकामाचे स्वरूप होते. जवळजवळ एक हजार वर्षे मंदिरांच्या बांधकामांचे हे स्वरूप जपानभर प्रचलित होते. नारा शहराजवळील होर्युजी मंदिर हे या प्रकारचे सर्वांत लक्षणीय उदाहरण आहे. मुख्य इमारतीवर पॅगोडा असतो. ते अनेक मजली, बाकदार व उतरत्या पातळीचे असत. हे पॅगोडा अजूनही जपानच्या वास्तुशिल्पकलेचे प्रतीक मानले जातात.

इ. स. ७१० ते ७८४ या कालात चीनमधील तांग अमलातील वास्तुशिल्पकलेचा प्रभाव जपानवर पडला. नारा ही जपानची त्या काळची राजधानी चिनी शहर रचनेच्या पद्धतीने बांधण्यात आली होती. ही राजधानी नंतर क्योटो येथे नेण्यात आली. तेव्हा मात्र साधी वास्तुशिल्पकला अधिक मान्य झाली. रंगीबेरंगी इमारतीऐवजी साधे, लाकडाच्या रंगासारखे रंग व पारंपरिक जपानी बांधणी याचा भर देण्यात आला. त्यानंतरच्या तीनशे वर्षांत राष्ट्रीयतेचा प्रखर पुरस्कार होऊन कलेच्या क्षेत्रातही परकीय प्रभावांना विरोध झाला. शोगुनांच्या राजवटीत कामाकुटाला राजधानी गेली आणि कलेला शोगुन, सरदार उमराव यांचा खानदानी आसरा मिळाला. या काळातील भव्य वाडे शिंडेन पद्धतीचे होते. एकाच आवारात वेगवेगळ्या अनेक इमारती बांधून त्या कॉरिडॉर्सनी जोडण्यावर या पद्धतीत भर होता.

आज सम्राटांचा प्रासाद साधा पण निसर्गसुंदर पार्श्वभूमीवर बांधला आहे. टोकियोसारख्या मोठ्या शहरातील वास्तुशिल्पकलेवर पाश्चात्य शहररचनेचा प्रभाव दिसत असला, तरी लहान गावांतील नागरिकांची घरे खास जपानी पद्धतीची व छोटी आहेत. जपानमध्ये भूकंपाचे प्रमाण मोठे आहे हेही या टुमदार बंगला पद्धतीच्या घरांचे एक कारण आहे. १९२३ साली कँटो येथे झालेल्या मोठ्या भूकंपात पाश्चात्य पद्धतीच्या अनेक मजली उंच इमारती उद्ध्वस्त झाल्यानंतर छोटेखानी इमारती बांधण्याकडे पुन्हा कल दिसू लागला. ओसाका येथील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय, फुकुओका येथील मध्यवर्ती ग्रंथालय, टोकियो येथील नॅशनल जिम्नॅशियम ही आधुनिक जपानी वास्तुशिल्पकलेची निवडक उदाहरणे आहेत.

जपानमध्ये सर्वत्र वातावरण कलात्मक असते. रेल्वेच्या दूर अंतराच्या डब्यात दरवाज्याशी सपाता ठेवलेल्या असतात, भिंतीवर सुंदर चित्रे असतात, छोट्या टेबलावर फुलदाणीत नयनमनोहर फुले असतात. रेल्वेच्या डब्यातील बाथरूममध्ये साबण व फुलांची चित्रे असलेले टॉवेल हे साहित्य असते. डब्यात खाली गालिचे असतात. डबा पूर्णपणे वातानुकूलित असतो. जपानी दुकानातून एखादा माल घेतला तर त्याचे सुंदर कागदात पॅकिंग करून पुनः ते पॅकेट प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून देण्यात येते.

१३

# क्रीडा क्षेत्र आणि दैनंदिन जीवन

क्रीडा क्षेत्रात जपान आज ज्या दोन खेळांमुळे विख्यात आहे ते म्हणजे ज्युदो आणि कराटे. पण याशिवाय अनेक खेळ खास जपानी परंपरेचे आहेत. या पारंपारिक खेळात सुमो हा जपानी कुऱ्यांचा प्रकार जपानमध्ये अत्यंत लोकप्रिय आहे. त्याशिवाय केन्डो हा जपानी दांडपट्टा किंवा इंग्रजीत ज्याला फेन्सिंग म्हणतात तो खेळही जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर खेळला जातो. क्यूडो हे जपानचे शरसंधानाच्या क्रीडेचे नाव आहे. सूमो हा कुऱ्यांचा कुस्त्यांचा प्रकार जपानी लोकांना अत्यंत प्रिय आहे. या कुस्त्यांची परंपरा दोन हजार वर्षांची आहे. त्या मानाने ज्युदोची परंपरा अलीकडची आहे. ज्युदो व कराटे हे स्वसंरक्षणाचेच एक प्रकार आहेत. पण बऱ्याच वेळी क्रीडा म्हणूनही याचा स्वीकार केला जातो. ज्युदोची पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा टोकियोमध्ये १९५६ मध्ये घेण्यात आली. या स्पर्धेत २१राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. आता जगातील जवळजवळ प्रत्येक राष्ट्रात ज्युदोचे वर्ग आहेत आणि अनेक प्रमुख शहरांत ज्युदोचे आंतरराष्ट्रीय सामने घेतले जातात. १९७९ मध्ये पॅरिस येथे झालेल्या अशा सामन्यात जपानने चार सुवर्णपदके मिळविली, रशिया दोन, फ्रान्स व जर्मनीने प्रत्येकी एक सुवर्णपदक मिळविले.

केन्डो हा फेन्सिंगचा प्रकारही आता इतर राष्ट्रांतही पोहोचला आहे. १९७० मध्ये टोकियो येथे आंतरराष्ट्रीय केन्डो संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेमार्फत घेण्यात आलेल्या केन्डो आंतरराष्ट्रीय स्पर्धांत १७ राष्ट्रांनी भाग घेतला. त्यानंतर लॉस एंजेलिस येथे १९७३ मध्ये व लंडन येथे १९७५ मध्ये केन्डोचे आंतरराष्ट्रीय सामने झाले. जपानमध्ये सपारो येथे १९७९ मध्ये केन्डो सामने झाले.

आपले राष्ट्रीय खेळ इतर देशांतही स्वीकारले जावेत, असा जपानचा खास

प्रयत्न असतो. कारण इतर देशांशी स्नेहसंबंध जोडण्यासाठी खेळ हे उत्कृष्ट माध्यम आहे, असा जपानचा विश्वास आहे. आपले खेळ इतर देशांत पोचवावेत हा जपानचा प्रयत्न आहे, तसेच जपाननेही अनेक परराष्ट्रांचे खेळ आपलेसे केले आहेत. उदाहरणार्थ, बेसबॉल हा अमेरिकेचा खेळ जपानमध्येही अतिशय लोकप्रिय आहे. कोणत्याही क्षेत्रात प्रवेश केला की तेथे जगातील प्रथम क्रमांक पटकवावा ही जपानची जिद्द असते. बेसबॉलसारखा परकीय खेळ अगदी अलीकडे स्वीकारूनही जपानने अमेरिकेत डेट्रॉईट येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बेसबॉल खेळात जागतिक चँपियनशिप पटकावली !

जपानमध्ये सेंट्रल आणि पॅसिफिक असे बेसबॉलचे दोन प्रमुख संघ आहेत. आपल्याकडे मोहन बगान् हा फुटबॉलचा संघ मशहूर आहे तसेच जपानमध्ये हे अत्यंत लोकप्रिय संघ आहेत. त्यांच्या सामन्यांना एवढी मागणी असते की टोकियो, नारा, क्योटो अशा सर्व प्रमुख शहरी त्यांचे सामने होतात. १९८० मध्ये हे सामने एक कोटी साठ लक्ष प्रेक्षकांनी पाहिले. जपानने परदेशाकडून स्वीकारलेला आणखी एक खेळ म्हणजे टेबल टेनिस. या खेळातही जपानने एवढे प्रावीण्य मिळविले की, स्टॉकहोम येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस सामन्यात जपानच्या संघाने जागतिक चँपियनशिप मिळविली. या सामन्यात सातापैकी पाच अजिंक्यपदे मिळवून जपानने टेबल टेनिसच्या क्षेत्रात नवा उच्चांक स्थापन केला.

परदेशातून आयात केलेला पण जपानने आंतरराष्ट्रीय पातळीवर नाव कमावलेला आणखी एक खेळ म्हणजे व्हॉलिबॉल. या खेळात जपानी महिलांनी अपूर्व कर्तबगारी गाजवली आहे. मॉस्को येथे झालेल्या आंतराराष्ट्रीय महिला व्हॉलिबॉल सामन्यात जपानी महिलांनी लागोपाठ सात विजय मिळवून सर्वांना थक्क केले. १९६४ मध्ये टोकियो येथे झालेल्या ऑलिंपिकमध्ये जपानी महिलांनी व्हॉलिबॉलचे जागतिक अजिंक्यपद मिळविले. १९६८ च्या मेक्सिको ऑलिंपिक्स-मध्ये जपानच्या पुरुष आणि महिला या दोन्ही व्हॉलिबॉल संघांनी रौप्यपदके मिळविली. त्यानंतर १९७२ मध्ये म्युनिकच्या ऑलिंपिकमध्ये जपानी पुरुष संघाने व्हॉलिबॉलचे जागतिक अजिंक्यपद मिळविले तर त्यानंतरच्या माँट्रियल ऑलिंपिक्स-मध्ये जपानी महिलांनी त्याच खेळात जागतिक अजिंक्यपद पटकावले.

दरवर्षी जपानमध्ये राष्ट्रीय क्रीडा महोत्सव भरतो. तो इतक्या मोठ्या प्रमाणावर आयोजित केला जातो की एकाच वेळी सबंध महोत्सव घेणे अशक्य होते, म्हणून हिवाळा, उन्हाळा व शिशिरऋतू अशा तीन वेळी तीन विभागांत हा राष्ट्रीय क्रीडा महोत्सव होतो. १९४६ पासून हा महोत्सव दरसाल अधिकाधिक भव्य प्रमाणावर घेतला जातो. १९४५ मध्ये बॉम्बहल्ल्यामुळे जपानचा बराच भाग बेचिराख झाला असतानाही लगेच एका वर्षात जपानने पहिला राष्ट्रीय क्रीडा

महोत्सव भरवावा हे विशेष कौतुकास्पद आहे. या सामन्यात ज्या पुरुष संघाला सर्व खेळांत मिळून सर्वांत अधिक गुण मिळतील, त्याला जपानच्या सम्राटांचा चषक देण्यात येतो. तसेच ज्या महिला संघाला सर्वांत अधिक गुण मिळतील त्याला सम्राज्ञींचा चषक देण्यात येतो. नंतरच्या सर्व आंतरराष्ट्रीय व ऑलिंपिक सामन्यांत जपानने जे विजय मिळविले, त्यांना याच राष्ट्रीय क्रीडा महोत्सवांनी खेळाडू पुरविले आहेत.

घोडयांच्या शर्यती हा जपानमधील फार जुना खेळ आहे. निदान एक हजार वर्षांपूर्वीच्या चित्रात घोडयांच्या शर्यतींच्या चित्रांचा समावेश आहे. मात्र त्या वेळी जिंकणाऱ्या घोडयावर पैसे लावण्याची पद्धत नव्हती. विजयी घोडयांना तेव्हा पारितोषिके मिळत असत व लोकांची करमणूक होत असे. तेवढाच त्यांचा उपयोग होता. पण याकोहामामध्ये स्थायिक झालेल्या काही ब्रिटिश नागरिकांनी १८६१ मध्ये जपानमध्ये प्रथमच पाश्चात्य धर्तीवर घोडयांच्या शर्यती सुरू केल्या. १९०८ मध्ये सरकारने शर्यतींत पैसे लावण्यावर बंदी आणली. त्यामुळे एक क्रीडा व घोडयांच्या पैदाशीला उत्तेजन एवढेच शर्यतींचे स्वरूप राहिले. १९२३ मध्ये सरकारने पैसे लावण्यास पुन्हा परवानगी दिली. १९३२ पासून जपान डर्बी सुरू झाली व शर्यतींना जपानभर मोठेच उत्तेजन मिळाले. १९४० ते ४५ या काळात महायुद्धामुळे पुन्हा शर्यतींना उतरती कळा आली. पण महायुद्धानंतर जपानी शर्यतींना स्थैर्य आले. सध्या जपानमध्ये शर्यतींची पन्नासवर मैदाने आहेत. राष्ट्रीय आणि स्थानिक अशा दोन पातळयांवर या शर्यती होतात. सपारो, टोकियो, होकियाडो, च्यूको व फुकुशिमा येथे जपानमधील प्रमुख शर्यतींची मैदाने आहेत. मे महिन्यात टोकियो येथे जपान डर्बी होते.

जपानने ॲंग्लो– अरब घोडयांची पैदास केली असून या घोडयांनी व जपानी अश्वरोहकांनी अनेक आंतरराष्ट्रीय शर्यती जिंकल्या आहेत. शर्यतीच्या घोडयांची पैदास व घोडयांचे आजार यांवर उपचार करण्यासाठी इक्विन हेल्थ लॅबोरेटरीत खास संशोधन करण्यात येते. क्योटो येथे घोडयांच्या खेळयांचा महोत्सव होतो. त्यांची सुरुवात ७८१ मध्ये झाली. धावत्या घोडयावर बसून चित्रे काढण्याची स्पर्धा या महोत्सवात होते. एका हातात पंखा धरून त्यावर दुसऱ्या हाताने लिहीत धावत्या घोडयावर बसण्याचीही स्पर्धा होते.

गिर्यारोहण हा जपानमधील अत्यंत लोकप्रिय छंद आहे. दरसाल जुलैमध्ये हजारो लोक समारंभपूर्वक फुजी पर्वतावर जातात. मी जुलै १९८१ मध्ये जपानमध्ये होतो, तेव्हा हा समारंभ पाहिला. सूर्य उगवल्याबरोबर प्रचंड ढोल वाजवले जातात आणि त्या आवाजाचा इशारा झाल्याबरोबर हजारो जपानी लोक फुजी पर्वतावर जाण्यास प्रारंभ करतात. दररोज पाच ते सहा हजार लोक फुजीवर

जातात. जपानमधील इतर पर्वतांवरही असेच समारंभपूर्वक कार्यक्रम होतात. हिवाळ्यात तर पर्वतावरील खेळांचे अनेक महोत्सव होतात. बर्फावरून घसरत जाण्याच्या काहीशा धोक्याच्या पण अत्यंत उत्साहवर्धक खेळात लाखो लोक रमलेले असतात. यामागाटा विभागातील झिओ पर्वत बर्फावरील खेळासाठी प्रसिद्ध आहे. सपारो येथे हिवाळी क्रीडा महोत्सवाच्या वेळी बर्फाचे प्रचंड, देखणे पुतळेही बनवितात.

बोटींच्या शर्यती हा अगदी वेगळा प्रकार जपानमध्ये आहे. अनिल कुलकर्णी हे महाराष्ट्रीय युवक गेली अनेक वर्षे टोकियोत जहाज कंपनीत काम करतात. त्यांनी या शर्यती पाहिल्या आहेत. ते म्हणाले, "इतर अनेक देशांतही बोटींच्या शर्यती होतात. ऑक्सफर्ड विरुद्ध केंब्रिज या इंग्लंडमधील शर्यती प्रसिद्ध आहेत, तसेच ओणम सणाच्या वेळी आपल्या भारतात केरळमध्ये होणाऱ्या नावांच्या शर्यतीही सर्वांना माहीत आहेत, पण जपानमधील शर्यती व या शर्यती यात दोन मुख्य फरक आहेत. जपानमधील शर्यती नदीत न होता बंद स्टेडियममध्ये होतात. मध्ये जमिनीऐवजी पाणी असते. त्या पाण्यात अतिवेगवान यांत्रिक स्पीड बोटींच्या शर्यती होतात. दुसरा विशेष म्हणजे अश्वशर्यतीप्रमाणेच या बोटींवर पैसे लावतात. तोकोनामी, मियाजिमा अशा अनेक प्रमुख शहरांत बोटींच्या शर्यतीची स्टेडियम्स आहेत. त्यात पन्नास पन्नास हजार लोक एका वेळी शर्यती पाहतात. या भागातील कॅलेंडर्सवर बोटींच्या शर्यतीचे दिवस लाल खुणांनी दाखविलेले असतात. या बोटी पाण्यात गोल फिरतात– अगदी अश्वशर्यतीसारख्या अनेक फेऱ्या मारतात."

सुमो या जपानी कुस्त्यांच्या प्रकाराबद्दल बोलताना श्री. कुलकर्णी म्हणाले, "सुमो खेळणारे पैलवान किमान दोन सव्वादोनशे पौंडावरून अधिक वजनाचे भक्कम आणि अत्यंत शक्तिमान असतात. अमेरिकेतील बॉसिंगसारखा सुमो हा जपानमधील अत्यंत लोकप्रिय असा खेळ आहे. सुमोचे तिकीट सर्वसाधारणपणे चार माणसांचे एकत्र मिळते. त्यात चौघांना मांडी घालून बसण्याएवढीच जागा असते. प्रत्येक दोनशे असे हे सुमारे आठशे रुपयांचे तिकीट असते. या सुमो कुस्त्या दुपारी दोनपासून साडेसहा-सातपर्यंत चालतात. भारतातील कुस्त्यांप्रमाणेच प्रथम लहान पैलवानांच्या, मग मध्यम पैलवानांच्या कुस्त्या होतात. टी.व्ही.वर मध्यम व प्रमुख पैलवानांच्या सुमो कुस्त्या दाखवल्या जातात. आपल्याकडे चित्रपटनायकांना जशी लोकप्रियता असते तशीच ती सुमो पैलवानांना जपानमध्ये मिळते."

केन्दोबद्दल माहिती देताना श्री. कुलकर्णी म्हणाले, "मुलगा अगर मुलगी सहासात वर्षांची झाल्याबरोबर जपानमध्ये ती केन्दोच्या वर्गात जातात. या खेळाला फेन्सिंग म्हटले जाते. पण त्यात तलवार वापरली जात नाही, तर सुमारे तीन फूट लांबीची काठी वापरली जाते. ही काठी प्रतिस्पर्धी डोक्यावर, छातीवर किंवा

हातावर मारतो; पण त्याआधी 'हेड', 'हार्ट' असे ओरडून तो कोठे प्रहार करणार ते सांगतो. मग उलटपक्षीयाने मध्ये आपली काठी घालून स्वसंरक्षण करायचे असते. यावेळी चेहऱ्यावर पोलादी तारांचे शिरस्त्राण घातलेले असते. जपानी मुलांना सहा ते दहा वर्षे वयात केन्दोमध्ये बराच मार खावा लागतो व त्यामुळे ती भावी जीवनात सोशिक व टणक बनतात."

परदेशांकडून घेतलेला पण जपानने आत्मसात केलेला बेस बॉलसारखा आणखी एक खेळ म्हणजे सॉकर किंवा अमेरिकन फूटबॉल. या खेळातही आपण जगात प्रथम क्रमांक मिळवावा अशी जपानची महत्त्वाकांक्षा आहे. १९६४च्या ऑलिंपिक्स-मध्ये जपानने अर्जेंटिनाचा पराभव करून सॉकरमध्ये ब्राँझ पदक मिळविले. आज जपानमध्ये सॉकरचा खेळ खेळणारे व तो आवडीने पाहणारे यांची संख्या दहा लाखांवर आहे. शाळा व कॉलेजमध्ये सॉकर खेळाडूंना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मित्सुबिशी, टोयाटो, हिताची अशा मोठमोठ्या औद्योगिक संस्थांनी आपले कामगारवर्गाचे सॉकर संघ तयार केले आहेत. रग्बी हा अमेरिकन खेळ, जपानमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुरू झाला. त्याची लोक-प्रियता वाढत असली तरी ती सॉकर आणि बेसबॉलएवढी नाही. व्हॉलिबॉल मात्र जपानी लोकांत आपली लोकप्रियता टिकवून आहे.

सबंध जपानमध्ये सर्वसामान्य लोकांत सर्वांत लोकप्रिय खेळ म्हणजे पचिन्को. त्याचे प्रचंड हॉल्स सर्व प्रमुख शहरांत व आता अनेक लहान गावांतही आहेत. पचिन्को हे एक यंत्र असते. शंभर येन्सचे दहा गोळे मिळतात. ते गोळे या यंत्रात टाकायचे आणि बटन दाबायचे. एक एक गोळा यंत्रात वर जातो आणि खाली पड-ताना अनेक पिनांच्या बेचक्यात कधी कधी अडकतो. या घरावर ५०,१००,१००० असे आकडे असतात. ज्या आकड्यांच्या बेचक्यात गोळा अडकेल, तेवढ्या येन्सचे गोळे खेळणाऱ्याला मिळतात. पचिन्को खेळण्यात चार चार- सहा सहा तास घाल-विणारे लोक जपानमध्ये आढळतात. विशेषतः निवृत्त लोक, सुटीवाले कामगार, गृहिणी यांना वेळ घालविण्याचे पचिन्को हे उत्कृष्ट साधन आहे. त्यावर फार मोठ्या प्रमाणावर पैसे मिळतही नाहीत व जातही नाहीत. रुपयांच्या हिशोबात सांगायचे तर, सुमारे पाच-दहा रुपयांत चार-पाच तास करमणूक होते आणि फार तर तीस पस्तीस रुपये मिळतात. किंवा पाचदहा रुपये जातात. या पचिन्कोत मिळालेल्या गोळ्यावर खेळाच्या शेवटी काही वस्तू घेता येतात. रोकड हवी असेल तर तीही मिळते. लोकांचा वेळ करमणुकीत जावा पण मोठ्या प्रमाणावरच्या जुगाराचे स्वरूप त्याला येऊ नये, अशीच त्याची योजना केलेली असते.

जपानने आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात अनेक बहुमान मिळविले आहेत. ऑलिं-पिक क्रीडा महोत्सवाच्या ८१ व्या बैठकीत जपानचे मसाजी कितोकवा यांची

निवड ऑलिंपिकचे उपाध्यक्ष म्हणून झाली. पोहण्याच्या स्पर्धेत त्यांनी लॉस एंजलिसच्या ऑलिंपिक्समध्ये जागतिक अजिक्यपद मिळविले आहे. १९७२ च्या सपाटो विंटर ऑलिंपिक्समध्ये ७० मीटर्सच्या शर्यतीत जपानने तिन्ही पदके मिळविली. १९७२ च्या ऑलिंपिक्समध्ये जपानने २९ सुवर्णपदके मिळविली. त्यानंतरच्या प्रत्येक ऑलिंपिक्समध्ये जपानी खेळाडूंनी अनेक आंतरराष्ट्रीय उच्चांक मोडले. १९८८ चे ऑलिंपिक्स सामने जपानमध्ये भरवावेत अशी जपानने विनंती केली होती व नागोया येथे त्यांची पूर्वतयारीही चालू केली होती. पण ऑलिंपिक समितीने हे सामने कोरियात घेण्याचा निर्णय घेतला. तरीही त्यापुढचे १९९२ चे ऑलिंपिक सामने जपानमध्ये व्हावेत, म्हणून जपान आतापासूनच प्रयत्नशील आहे. जेव्हा हे सामने भरतील तेव्हा दुभाषी तयार असावेत, म्हणून जपानने नागोया येथे अनेक भाषांचे शिक्षण देणारी शाळाही उघडली आहे. एखादे काम हाती घेतले की ते अत्यंत निर्दोष व्हावे या दृष्टीने जपानचे नियोजन कसे दक्ष असते याचे हे उदाहरण आहे.

नैसर्गिक सुविधा अत्यंत अपुऱ्या असतानाही अनेक क्षेत्रांत अग्रेसर असणारे जपानी लोक कसे राहतात, त्यांचे कौटुंबिक आणि दैनंदिन जीवन कसे असते हे जाणून घेण्याची सर्वांनाच उत्सुकता असते. जपानी लोकांचे वैशिष्टय असे की अत्यंत आधुनिक तंत्रशास्त्र पचवूनही त्यांच्यावर धर्माची खोल छाप आहे. बहुसंख्य जपानी लोक शिंटो आणि बौद्ध या दोन्ही धर्मांचे उपासक आहेत. शिंटो हा निसर्गपूजेचा साधा परिपाठ आहे. त्यामुळे तो बौद्ध धर्माच्या आड येत नाही. शिंटो म्हणजे देवांचा मार्ग. सूर्य, चंद्र, पर्जन्य, नदी, सागर यांची जपानच्या प्राचीन कालात पूजा होत असे, त्यालाच पुढे धर्माचे स्वरूप आले. शिंटो आणि बौद्ध या दोन्ही धर्मांत साधी राहणी, चिंतन व निसर्गाचा सन्मान या समान गोष्टी असल्याने या दोन्हींत विरोध नाही. शिंटोमध्येही दोन प्रकार आहेत. एका प्रकारची शिंटो मंदिरे स्वतःचे पूर्वज व कुटुंबाचे रक्षण करणाऱ्या देवतांची असतात. दुसऱ्या प्रकारची मंदिरे सर्वसाधारण स्वरूपाची असतात. धार्मिक जीवनावर श्रद्धा असल्याने जपानी लोकांना दैनंदिन जीवनातही मनःशांती आणि निष्ठा यांचा लाभ होतो. सम्राट, पंतप्रधान, मंत्री, मोठे कारखानदार, व्यापारी हे सर्व घटक चिंतन आणि मंदिरात जाऊन दर्शन घेणे यांना महत्त्व देतात. सर्वसामान्य जनता तर धर्मपरायण आहेच.

आई, वडील, आजोबा, आजी अशा ज्येष्ठ नातेवाईकांना जपानी कुटुंबातून अत्यंत आदराने वागविण्यात येते. अनेक जपानी कुटुंबांच्या देव्हाऱ्यात देवांच्या मूर्तींबरोबरच आजोबा आणि आजी यांची छायाचित्रेही ठेवण्यात आलेली असतात. एकत्र कुटुंबाच्या परंपरेमुळे जपानी लोकांत वृद्धापकाळी एकाकीपणाची भावना येत

नाही. पाश्चात्य देशात मुले सज्ञान व मिळवती झाली की स्वतंत्र राहण्याची प्रवृत्ती आहे. जपानमध्ये मात्र तशी प्रथा नाही.

जपानमधील सर्वसामान्य माणसाची दिनचर्या अशी असते : सकाळी सहा वाजता उठणे, ६॥ ते ७ न्याहरी. या न्याहरीत भात, कच्चे अंडे. मिसेशिरू, मासे, नोरी आणि मुळयाचे लोणचे असते. नोरी हे शेवाळयासारखे एक समुद्र-अन्न असते व त्याचे पापडासारखे पापुद्रे केलेले असतात, मिसेशिरू हे प्रत्येक जपान्याचे आवश्यक असे सूप असते. हे शक्यतो आईच्याच हातचे असते. कचेरीची किंवा कारखान्याची वेळ सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत असल्याने जपानी कर्मचारी अथवा कामगार सात सव्वासात वाजता घरातून बाहेर पडतो आणि आठ वाजण्यापूर्वीच म्हणजे वेळेआधीच पाच दहा मिनिटे कामावर हजर होतो.

बाराच्या सुमाराला लंच किंवा दुपारच्या जेवणाची वेळ होते. हे जेवण कंपनी अथवा कारखान्यातर्फे देण्यात येते. जनरल मॅनेजरपासून शिपाई कामगार या सर्वांना एकाच प्रकारचे जेवण मिळते. एका चपटचा डब्यातील हे जेवण कारखान्याच्या कंपनीच्या आवारात तयार केलेले असते. ते हलके असते. त्याला ओबेन्तो म्हणतात. मूळ नाव बेन्तो आहे, पण अन्नाचा मान ठेवायचा म्हणून त्या शब्दापूर्वी ‘ओ’ हे सन्मानार्थी अक्षर लावण्यात येते. या डब्यात भात, दोन भाज्या, एखादे लोणचे एवढेच मोजके पदार्थ असतात. पाच वाजता कारखाना किंवा कचेरी सुटली तरी बरेच कामगार व कर्मचारी त्यानंतर तास दीड तास त्या आवारात असतात. कारण कंपनीतर्फे अनेक खेळांची सोय केलेली असते. हे खेळ खेळणे, टी. व्ही. अगर इतर करमणूक यात सहकाऱ्यांच्या बरोबर तास दीड तास घालवून मग जपानी माणूस घरी जायला निघतो. घरी जाताना वाटेत बारमध्ये बहुतेक जण साकी हे जपानीमद्य किंवा बिअर पितात. साकी हे तांदळापासून केलेले मद्य असून ते कोमट प्यायचे असते. त्याचे ग्लासही तीन-चार चमचेच मद्य एकावेळी मावेल एवढे लहान असतात. बाटली मात्र बिअरच्या बाटलीएवढी मोठी असते.

घरातून बाहेर पडताना जपानी माणूस पाश्चात्य पद्धतीने कपडे घालतो, पण घरात आल्यावर मात्र सूट, बूट काढून पायांत सपाता आणि अंगात जपानी पद्धतीचे साधे कपडे घालतो. तो कामावरून येण्याच्यावेळी त्याची पत्नी हे कपडे प्रवेशद्वाराजवळ तयार ठेवते किंवा हातात घेऊन उभी असते. कपडे बदलल्यावर जपानी माणूस आपल्या कुटुंबियासमवेत हळूहळू साकीचे घोट घेत, गप्पा मारीत एखादा घरगुती खेळ खेळतो किंवा टी. व्ही. पाहतो. मग सर्व कुटुंबियांचे एकत्र जेवण होते. हे जेवण मात्र भरपूर असते. त्यात मिसेशिरू किंवा क्लीअर सूप, भात, दोन-तीन भाज्या, सॅलड, चिकन, मासा किंवा पोर्क, तेनपुरा (कोळंबी), सुशी (कच्चा मासा) असे अनेक पदार्थ असतात. रात्री दहा साडेदहापर्यंत जपानी माणूस

झोपी जातो.

शनिवारी, रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी जपानी लोक कुटुंबीय किंवा मित्रांबरोबर मंदिर, नाटक, सुत्रा हा कुस्त्यांचा प्रकार, बेसबॉलसारखा खेळ किंवा वनभोजनाला जातात. वनभोजनासाठी जाताना ओनेगेरी नावाचे भाताचे त्रिकोणी लाडू व साशमी कच्चा मासा नेण्याची पद्धत आहे.

जपानी लोक उंचीने कमी असतात. काही आहारशास्त्रज्ञांच्या मतानुसार भातापेक्षा पाव खाण्याने उंची वाढते असे कळल्याने अलीकडे जपानमध्ये मुलांना पंधराव्या वर्षापर्यंत भाताऐवजी पाव देण्याचा उपक्रम वाढत आहे. उमेबोशी नावाचे प्लमचे लोणचे किंवा मुळ्याचे लोणचे चवीसाठी बहुधा प्रत्येक जेवणात असते. अनेकांच्या जेवणात स्वस्त म्हणून चिकनचा समावेश होतो. शंभर ग्रॅम चिकनला सुमारे चार रुपये पडतात पण बीफ अथवा स्टीक हे महाग खाणे आहे. त्याला चौपट किंमत पडते. कोबे आणि मात्सुझावा अशा काही खास ठिकाणी गुरांना बिअर पाजण्यात येते. त्यांचे मांस हे सर्वांत मौल्यवान मानले जाते व चवीला ते उत्कृष्ट असते. त्याच्या शंभर ग्रॅमला सुमारे बाराशे येन पडतात. (पंचेचाळीस रुपये) शाबू शाबू म्हणजे बीफचे तुकडे व सॉस. हे श्रीमंती खाणे असते.

जपानी लोक साकी व बिअर यांचे शौकीन असतात. कामावर असताना मात्र कोणीही मद्यपान करीत नाही. काम हे अतिशय पवित्र मानले जाते. ते निष्ठेने केल्यानंतरच जपानी लोक साकी किंवा बिअरचा आस्वाद घेतात.

झाडे, नद्या, जंगले, फुले यांचे जपानी माणसाला अतिशय वेड आहे. त्याच्या काव्यात व चित्रकलेत मुख्यतः निसर्गाचेच स्तवन किंवा रसग्रहण असते. प्रत्येक जपानी माणसाच्या घरात तोकोनामा म्हणजे फुले ठेवण्याची जागा असते. स्त्रियांना इकेबाना ही पुष्परचना येणे आवश्यक असते. संगीत व नृत्य या कला सर्वत्र मुलींना शिकविण्यात येतात. टी. व्ही. वरही या दोन्हींचे धडे देण्यात येतात.

जपानी लोकांना प्रवासाची अतिशय हौस आहे. जपानी कंपन्या प्रवासभत्ता देतात आणि बहुतेक जपानी लोक दरसाल कुटुंबियांना घेऊन देशात किंवा परदेशी प्रवास करतात. दर हजारी हौशी प्रवाशांची संख्या जपानमध्ये सर्वांत अधिक, त्या खालोखाल फ्रान्समध्ये आणि त्यानंतर अमेरिकेत आहे. गेल्या वर्षी मी दक्षिण भारतात गेलो होतो. तंजावर आणि मदुराई येथे मी चौकशी केली, तेव्हा मला सांगण्यात आले की दक्षिण भारतातील मंदिरे पाहण्यासाठी येणाऱ्या परदेशी प्रवाशांपैकी सर्वांत जास्त संख्या जपान्यांची असते.

एकमेकांशी बोलताना व वागताना जपानी लोक अतिशय मृदु व सौजन्यशील असतात. संभाषण करताना ते अनेक वेळा लवून अभिवादन करतात. इतरांना मदत करण्यात ते तयार असतात. मात्र त्यांचे एक वैशिष्ट्य असे की, जवळच्या

पाहुण्यालाही ते सहसा घरी बोलावीत नाहीत. त्याला ते मोठ्या हॉटेलात ठेवतील, त्याचा सर्व खर्च करतील आणि त्याच्याशी अत्यंत विनम्रपणे वागतील पण एखाद-दुसरा अपवाद वगळता जपानी माणूस सर्वसाधारणपणे पाहुण्यांना आपल्या घरी ठेवून घेत नाही किंवा जेवायलाही बोलावीत नाही. आपले घर व कुटुंब ही अगदी व्यक्तिगत व खासगी बाब आहे, असे जपानी लोक मानतात.

परकीयाशी लग्न करणाऱ्या जपानी युवकांचे किंवा युवतींचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. एका महाराष्ट्रीय तरुणीने टोकिओ येथील एका जपानी अधिकाऱ्याशी लग्न केले आहे. तिने मला फोन केला व ती मला माझ्या निवासस्थानावर भेटली. पण मला तिने आपल्या घरी बोलावले नाही. याचे प्रथम मला आश्चर्य वाटले. पण जपानमध्ये पाहुण्याला बाहेरच जेवण वगैरे देण्याची पद्धत आहे, असे मला नंतर समजले. मुंबई, पुणे अशा काही ठिकाणी महाराष्ट्रीयांशी विवाह करून स्थायिक झालेल्या जपानी स्त्रियांची तुरळक उदाहरणे आहेत.

काही जपानी लोकांच्या घरी जाण्याचा मला योग आला होता. शिनिची होशी या प्रसिद्ध लेखकाच्या घरी मी गेलो. ते जपानमधील पहिल्या दर्जाचे लेखक आहेत. त्यांनी मला कसे यायचे त्या सर्व सूचना दिल्या होत्या तरीही ते मला घ्यायला स्टेशनवर आले, लवून माझे स्वागत केले आणि जवळच असलेल्या त्यांच्या घरी आम्ही गेलो. दरवाजातच सौ. होशी यांनी लवून व प्रसन्नहास्य करून माझे स्वागत केले. जपानी पद्धतीप्रमाणे मी घरात प्रवेश केल्यावर बूट काढले. सौ. होशी यांनी स्वतः घरात वापरण्याच्या सपाता माझ्या पायाजवळ ठेवल्या आणि माझे बूट उचलून त्यांनी स्टँडवर ठेवले. घर अत्यंत स्वच्छ, देखणे पण साधे होते. श्रीमंती दाखवण्याचा त्यात लवलेशही नव्हता. जागोजाग उत्तम पुष्परचना होत्या. सौ. होशी यांनी आम्हाला काही जपानी खाद्यपदार्थ आणि ग्रीन टी हा खास जपानी चहा दिला. दीडदोन तास मी श्री. होशी यांच्याशी साहित्यविषयक चर्चा केली. त्यांनी आपले एक इंग्रजी पुस्तक मला दिले. मला त्यांच्याविषयी लिहायचे होते म्हणून मी त्यांचा फोटो मागितला पण त्यांच्याकडे सगळे रंगीत फोटो होते. ब्लॉकसाठी फारसे उपयोगी पडत नाहीत तेव्हा श्री. होशी माझ्याबरोबर जवळच्या फोटोग्राफर-कडे आले आणि स्वतःचा कृष्णधवल फोटो काढून ताबडतोब तो मला दिला. मग त्यांनी मला स्टेशनपर्यंत पोचविले. एका ज्येष्ठ लेखकाचा हा नम्र व निगर्वी स्वभाव पाहून माझा जपानी लोकांविषयीचा आदर खूपच वाढला.

जपानी लोक विज्ञानाच्या बाबतीत जगात अग्रेसर असूनही बहुतेकांचा भविष्यावर जबरदस्त विश्वास असतो. भविष्य सांगणारे जागोजाग बसलेले असतात. लोक हातावरच्या रेषा, चिठ्ठ्या किंवा कसल्याशा काड्या यांच्या सहाय्याने भविष्य जाणून घेण्यासाठी रांगा लावून उभे असतात. अनेक बुद्ध मंदिराजवळची

झाडे चिठ्ठ्या चपाट्यांनी भरलेली असतात, कारण देवाजवळ आपले मनोदय व्यक्त करून त्याची लेखी नोंद करून झाडाला बांधली की आपले मागणे देव मान्य करतो, अशी जपानी लोकांची समजूत आहे. मोठमोठे व्यापारी व औद्योगिक कंपन्याही नव्या कामांची सुरुवात करताना देवदेवतांचा आशीर्वाद घेण्याचा धार्मिक विधी करतात.

एखादे काम हाती घेतले की त्यात परिपूर्णता मिळविणे हे आपले कर्तव्यच आहे, अशी जपानी माणसाची निष्ठा असते. मग तो त्याकामी परिश्रमांची कसूर करीत नाही. नेमून दिलेले काम कारखान्याच्या किंवा कचेरीच्या वेळात पूर्ण झाले नाही तर अधिक वेळ बसून तो ते काम संपल्यावरच जातो. त्यासाठी ओव्हर-टाईमची अपेक्षा तो करीत नाही. कोणत्याही कामात अपयश येणे हा त्याला जीवनातला सर्वांत मोठा अपमान वाटतो. अशावेळी तो निराशेच्या पोटी आत्म-हत्या (हाराकिरी) करण्याची अनेक उदाहरणे आहेत. गेल्या महायुद्धात जपानचा पराभव झाला तेव्हा शेकडो जपान्यांनी हाराकिरी केली होती. योकोई नावाचा जपानी सैनिक या पराभवानंतर २८ वर्षे जंगलात लपून बसला होता. कारण पराभूत होऊन आलेला जपानी माणूस म्हणून पुन्हा समाजात तोंड दाखविणे त्याला अशक्य झाले होते.

जपानी नागरिकांचे वाचन जबरदस्त आहे. वृत्तपत्रांच्या दर हजारी वाचकांत जपानचा पहिला क्रमांक आहेच पण पुस्तकांच्या खपातही जपान जगातील पहिल्या पाच देशांत आहे. इवानामी शॉटगन या जपानमधील अग्रेसर प्रकाशन संस्थेचे जनरल मॅनेजर व संपादक श्री. कोशी टाकेज यांना मी भेटलो. तेव्हा ते म्हणाले, जपानमध्ये दरवर्षी सरासरी ३७,७०० पुस्तके तयार होतात. त्यांपैकी तंत्रविषयक पुस्तके ११,०००, सामाजिक शास्त्रावरची ६००० व ललित साहित्याची ५,००० पुस्तके प्रसिद्ध होतात. पं. जवाहरलाल नेहरू यांचे 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हे पुस्तक याच इवानामी शॉटगन प्रकाशन संस्थेने जपानी भाषेत प्रसिद्ध केले.

सम्राटांविषयीची जाज्वल्य निष्ठा हा प्रत्यक जपानी नागरिकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग असतो. २९ एप्रिल रोजी सम्राटांचा वाढदिवस असतो. त्यादिवशी सर्व कारखाने व कंपन्या आपल्या नोकरांना आर्थिक पगारवाढ जाहीर करतात. त्या दिवशी सम्राट आपल्या प्रजाजनांना आशीर्वाद देतात व त्यासाठी लक्षावधी नागरिक राजवाड्यासमोरील विस्तीर्ण आवारात जमतात.

युरोपियन देशातील लोकांच्या तुलनेने जपानी लोकांची सरासरी उंची व वजन कमी असते. जपानी माणूस सरासरी १६६ सें. मी. उंच असतो. जपानी स्त्री १५४ सें. मी. उंच असते. जपानी पुरुषाचे सरासरी वजन ५८ किलोग्रॅम व स्त्रीचे

५० किलोग्रॅम असते. गेल्या चाळीस वर्षांत जपानी लोकांचे आयुर्मान वेगाने वाढत आहे. १९४० मध्ये जपानी पुरुष सरासरी ४७ वर्षे व स्त्री ५० वर्षे जगत असे. सध्या जपानी पुरुषाचे वय ७० वर्षे व स्त्रीचे ७६ वर्षे आहे. जपानमधील ७० टक्के लोक शहरात राहतात. टोकिओ ओसाका, नागोवा आणि किताक्युशु या चार प्रमुख शहरांत जपानमधील ५८ टक्के लोक राहतात.

१४

# महिला, शिक्षण आणि शेती

महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने वागावे ही जपानची परंपरा नाही. या बाबतीत जपान सनातनी आहे. पण गेल्या महायुद्धानंतर या क्षेत्रात जपानमध्ये क्रांती झाली. या क्रांतीसाठी जपानी महिलांनी जाणीवपूर्वक फारसा प्रयत्न केला नाही, पण गरज हीच या क्रांतीची मुख्य प्रेरणा होती. महायुद्धात जपानचे पुरुष मोठ्या प्रमाणावर ठार अगर जायबंदी झाल्यामुळे अनेक क्षेत्रांत महिलांना नव्या नव्या जबाबदाऱ्या उचलाव्या लागल्या. ज्या कामात महिला पुढे सरसावतील असे पूर्वी स्वप्नातही आले नव्हते, ती कामे महायुद्धानंतरच्या काळात जपानी महिलांनी हिरीरीने पत्करली व ती उत्तम प्रकारे यशस्वी करून दाखविली. १९४५ मध्ये मंजूर झालेल्या निवडणूक कायद्याने जपानच्या इतिहासात प्रथमच स्त्रियांना मतदानाचा समान हक्क मिळाला. या कायद्यानुसार झालेल्या पहिल्या निवडणुकीत १० एप्रिल १९४६ रोजी मतदार यादीत असलेल्या महिलांपैकी ७० टक्के महिलांनी मतदान केले. या निवडणुकीत जपानी महिला मोठ्या प्रमाणावर उमेदवार होत्या. जपानच्या डिएट ऊर्फ संसदेच्या निवडणुकीत ३९ महिला निवडून आल्या. जपानच्या इतिहासात महिलांनी मिळवलेले हे सर्वांत मोठे यश होते. मात्र या संख्येत सतत वाढ होईल ही अपेक्षा होती, ती फलद्रूप झाली नाही. १९७६ च्या निवडणुकीत फक्त २३ महिला उमेदवार यशस्वी झाल्या. तरीही मतदान करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढ झाली. सध्या ७५ व ७७ टक्के महिला मतदार राष्ट्रीय निवडणुकीत मतदान करतात.

गेल्या महायुद्धापूर्वी जपानमध्ये सहशिक्षणाची फारशी प्रथा नव्हती, पण महायुद्धानंतर ही प्रथा वाढतच गेली. आता जवळजवळ सर्वच शैक्षणिक संस्थांत मुले व मुली एकत्र शिक्षण घेतात. सध्या जपानमधील महाविद्यालये व इतर उच्च

शिक्षणसंस्थेतील विद्यार्थ्यांत विद्यार्थिनींचे प्रमाण ३५ ते ३७ टक्के आहे. जपानमधील विश्वविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या साडेसात लाखावर आहे. सरकार व खासगी उद्योगधंदे यांतील वरिष्ठ जागांवर अधिकाधिक महिला येत आहेत. जपान सरकारमधील १३ खात्यांच्या प्रमुख म्हणून महिला काम करतात. कौटुंबिक स्वरूपाचे खटले चालविणाऱ्या न्यायाधीशांत ३९ टक्के न्यायाधीश महिला आहेत. बायकोला टाकणे, मुलांची ताटातूट, घटस्फोट, मुलांवर आईचा अथवा वडिलांचा हक्क प्रस्थापित करणे याबाबतचे खटले न्यायालयात चालतात- चाइल्ड वेलफेअर कमिशन्समध्ये (मुलांच्या कल्याणाविषयीच्या सरकारी समित्या) ४० टक्के सभासद महिला आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारे यांच्यातही लोकप्रतिनिधी व अधिकारी म्हणून काम करणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. जपानमधील न्यायालयात ५८ महिला न्यायाधीश आहेत. त्यांपैकी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून दोन महिला काम करतात. राज्य न्यायालये आणि जिल्हा न्यायालये यात इतर ५६ महिला काम पाहतात.

जपानमध्ये कामगार, विक्रेते, परिचारक, शिक्षक, कचेरीतील कारकून, सरकारी कर्मचारी, कारखान्यातील कर्मचारी इत्यादींपैकी दोन कोटी सात लक्ष महिला आहेत. जपानमधील एकंदर कामगार व इतर कर्मचारी यात महिलांचे प्रमाण ३६ टक्के आहे. पाश्चात्य देशांच्या जवळजवळ बरोबरीने हे आकडे आहेत.

एक-दोन मुले झाल्यानंतर नोकरी सोडणाऱ्या महिलांचे प्रमाण मात्र वाढले आहे. स्त्रियांना व पुरुषांना समान कामासाठी समान वेतन असावे असा १९४७ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने (इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन) ठराव केला. तो जपानने स्वीकृत केला आहे. किंडरगार्टन, प्रायमरी व ज्युनियर शाळांतील ९० टक्के शिक्षक महिला असतात. जपानमध्ये १५००० महिला कॉलेजमधून व विद्यापीठातून प्राध्यापिका आहेत. वेगवेगळ्या व्यवसायात निष्णात असणाऱ्या हजारो जपानी महिला स्वतंत्रपणे नाव कमावीत आहेत. त्यांत डॉक्टर, वकील, इंजिनीअर्स, आर्किटेक्ट अशा अनेक व्यवसायांचा समावेश आहे. महायुद्धापूर्वी पोलिस खात्यात काम करणारी स्त्री म्हणजे अपूर्वाई. आता टोकियो, ओसाका, नागोया अशा मोठ्या शहरांत वाहतूक व गुन्हे अन्वेषण अशा दोन्ही क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर महिला पोलिस आहेत. अनेक लहान गावांतही महिला पोलिस दिसतात.

...जपानी स्त्रीचे खासगी जीवन शांत व सफल असते. वयाच्या वीस वर्षांनंतर मुलींना विवाह करता येतो. अजूनही जपानमध्ये ८० टक्के विवाह वडीलधाऱ्यांनी सुचविलेल्या मुलाशी किंवा मुलीशी होतात. सर्वसाधारणपणे आई, वडील

भाऊ किंवा इतर नातेवाईकांनी सुचविलेल्या अनेक स्थळांतून निवड करून उपवर मुलगी लग्न करते. जपानी विवाह बौद्ध पुरोहित लावतात. त्याप्रसंगी वधू, वर व दोन्हीकडील कुटुंबीय मंदिरात जातात व साकी हे मद्य धर्मगुरूंच्या आशीर्वादाने लहान बशांतून एकत्र घेतात. बऱ्याच कारखान्यांत व कचेऱ्यांत कॉम्प्युटरच्या सहाय्याने अनुरूप वधू व वर सुचविले जातात व कारखान्यांचे अधिकारी पुढाकार घेऊन हे विवाह कारखान्याच्या आवारात घडवून आणतात. जपानमधील विवाह सर्वसाधारणपणे सुखी व दीर्घकाल टिकणारे असतात. घटस्फोटांचे प्रमाण अतिशय अल्प आहे. पाश्चात्य देशांत घटस्फोटांचे प्रमाण शेकडा सुमारे चार आहे पण जपानमध्ये एक हजार विवाहांपैकी फक्त एकाचा अंत घटस्फोटात होतो. जपानी कुटुंबव्यवस्था ही जगातील अत्यंत स्थिर कुटुंबव्यवस्थांपैकी एक आहे. दोघांच्या संमतीने घटस्फोट देण्याचे तत्त्व जपानने १८९८ मध्येच मान्य केले आहे. पण त्याचा उपयोग क्वचितच केला जातो. घटस्फोटांचे खटले मुख्यतः महिला न्याया-धीशांपुढे चालतात.

घरातील कर्ता पुरुष निधन पावला तर एकंदर मालमत्तेपैकी एकतृतीयांश संपत्ती विधवा पत्नीला मिळते, उरलेली मुलांच्यात समान वाटली जाते, असा जपानमध्ये कायदा आहे. या कायद्याचे जपानमधील महिलांना संरक्षण असल्याने दुर्दैवाने पतीचे निधन झाले, तरी ती उघड्यावर पडत नाही किंवा परावलंबी होत नाही. मुले नसतील तर ती सर्व मालमत्तेची एकटी वारस होते. घरगुती जीवनात जपानी महिलेला वाचन, खेळ, करमणूक, समाजकार्य यासाठी भरपूर वेळ मिळतो. कारण स्वयंपाकाची विजेची साधने, घर साफ करण्यासाठी यंत्रे, धुलाईची यंत्रे इत्यादीमुळे तिची घरगुती कामे अल्प वेळात होतात आणि हात स्वच्छ ठेवून करता येतात.

जपानमधील जननसंख्येचे प्रमाण दरहजारी फक्त १७ आहे.

शेतीवर काम करणाऱ्या जपानी महिलांचे प्रमाण ५२ टक्के आहे. शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे ही कामे अवजड नसतात. शेतावर स्वतः ट्रॅक्टर चालविणाऱ्या जपानी स्त्रियांची संख्याही मोठी आहे. त्यांचे शेतकरी पती मुख्यतः मोठ्या शहरी जाऊन शेतमालाच्या विक्रीवर लक्ष केंद्रित करतात. शेतावर बांधलेल्या घरातही वीज, टी. व्ही. रेडिओ, स्वयंपाकघरास लागणारी यंत्रे वगैरे सर्व आधुनिक सोई असतात.

जपानमध्ये महिलांची चळवळ व संघटना बलवान आहेत. वीस वर्षांवरील सर्व महिलांपैकी २२ टक्के महिला एक किंवा अनेक महिला संघटनांच्या सभासद असतात. सध्या जपानमध्ये विविध विषयांना वाहिलेल्या अशा चाळीस हजार महिला संस्था आहेत. त्यांपैकी मध्यवर्ती संस्थेचे नाव 'नॅशनल कौन्सिल ऑफ

फेडरेशन ऑफ रीजनल वुमेन्स क्लब' असे आहे. या संघटनेला पंचवीस हजार महिला संस्था संलग्न असून त्यांची एकंदर सभासद-संख्या साठ लक्ष आहे. शेती-विषयक कार्य करणाऱ्या महिलांच्या चार हजार संघटना आहेत व त्यांची सभासद-संख्या सत्तावीस लक्ष आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांचे आर्थिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्याचे कार्य या संस्था करतात. 'विडोज असोसिएशन' ही विधवांची संघटना विधवांना अधिकांत अधिक वारसा व इतर हक्क मिळवून देण्यासाठी मोफत कायदेशीर सल्ला देते व इतर मदत करते. जपानीज लीग ऑफ वुमेन व्होटर्स ही संस्था सार्वत्रिक निवडणुकीत अधिकात अधिक महिलांनी भाग घ्यावा म्हणून प्रयत्नशील असते. त्याशिवाय जपानी गृहिणींची संघटना, जपानी पदवीधर महिला संघ अशा इतर अनेक संस्था कार्य करीत आहेत. वस्तूंच्या किमती रास्त असाव्यात, अधिक महिलांना लोकसभेत व राज्यसरकारात प्रति-निधित्व मिळावे, नोकरीत महिलांवर अन्याय होऊ नये, अशा अनेक उद्देशांसाठी या संस्थांचे कार्य चालते.

जपानी समाजात स्त्रीला पुरुषापेक्षा कमी मानाचे स्थान असते आणि ही वस्तुस्थिती जपानी महिला बव्हंशी मान्य करतात. याचा एक परिणाम असा झाला आहे, की पाश्चात्य पुरुषांना जपानी स्त्रीशी विवाह करायला आवडते पण पाश्चात्य मुलींशी लग्न करण्यास जपानी पुरुष उत्सुक नसतो. जपानी लोक परकियांशी क्वचितच विवाह करतात, पण असे जे विवाह झाले आहेत, त्यात जपानी वधू व पाश्चात्य वर यांचे प्रमाण जपानी वर व पाश्चात्य वधू यांच्या प्रमाणाच्या दहा पट आहे. मात्र अशा संमिश्र विवाहाच्या संततीचे जीवन काहीसे बिकट असते. कारण जपानी समाज आपले एकसंधत्व आणि वांशिक शुद्धता यांना अतिशय जपणारा आहे. त्यामुळे अशा संमिश्र विवाहानंतर जपानमध्ये राहण्यापेक्षा पर-देशात वास्तव्य करणे ही जोडपी अधिक पसंत करतात.

पाश्चात्य देशात स्त्रीमुक्तीची चळवळ विशेष जोमात आहे. युरोप, आफ्रिके-तील अनेक स्त्रिया आपल्याला प्रत्येक बाबतीत पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळावेत म्हणून संघर्ष करीत आहेत, पण जपानमध्ये या स्त्रीमुक्तीच्या चळवळीला विशेष प्रतिसाद मिळालेला नाही. जपानी गृहिणी समाजात व घरात पुरुषापेक्षा आपल्याला कमी मानाचे स्थान आहे यात आश्चर्य वा खंत मानीत नाही. याबाबत एन. एच. के. रेडिओवरील एक महिला अधिकारी मला म्हणाल्या, "चळवळ करून, संघर्ष करून आम्हाला अधिक काही मिळवायचे नाही. आम्हाला जो मान मिळतो त्यावर आम्ही संतुष्ट आहोत. ज्या घरात जन्मभर आपल्याला नवऱ्याबरोबर व मुलांच्या बरोबर राहायचे आहे ते घर समाधानी असले पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीने सतत झगडा केला तर सुखी संसाराला त्याची झळ लागते. आपण पुरुषापेक्षा

दुय्यम आहोत अशी शिकवण आम्ही मुलींना सुरवातीपासूनच देतो त्यामुळे पुढे त्यांच्यात निराशा निर्माण होत नाही."

जपान प्रेस सेंटरमधील एका पत्रकर्तीने मला सांगितले, "आता वृत्तपत्र व्यवसायातही जपानी महिला बऱ्याच दिसतात. काही जपानी वृत्तपत्रांच्या परदेशातील प्रतिनिधी महिला आहेत. जपानी पुरुष स्त्रियांना अतिशय आदराने वागवतात. भांडखोर, आक्रमक अशी स्त्री जपानी पुरुषाला आवडत नाही. स्त्री ही कलात्मक, मितभाषी आणि प्रेमळ असते ही पुरुषाच्या मनातील प्रतिमा जपानी स्त्रियांनी कायम ठेवली आहे. आज्ञाधारकपणा हा जपानी महिलेचा प्रमुख गुण आहे. आमच्याकडे विवाहाच्या वेळी वधू डोक्यावर एक खास टोपी घालते. त्या टोपीने कान झाकून घेते. त्यात अशी कल्पना आहे की ही टोपी वधूची शिंगे झाकते. शिंगे म्हणजे दोष. माहेरहून सासरी जाताना आपले दोष लग्नात उघड होऊ नयेत म्हणून ही टोपी घालण्याची पद्धत आहे. पुरुष मात्र अशी टोपी घालीत नाही. यावरून परंपरेने आमच्या समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम मानले आहे हे सिद्ध होते. त्यात आम्ही काही कमीपणाचे किंवा अपमानास्पद असे मानीत नाही."

सांस्कृतिक कार्य हे जपानी महिलांचे प्रमुख क्षेत्र आहे. पंधरा वर्षांवरील सर्व जपानी लोक दर आठवड्याला ४तास ३३मिनिटे सांस्कृतिक कार्यात घालवितात. त्यात संगीत, नाटक, टी सेरिमनी (चहापानाचा समारंभ) वाचन, नृत्य, वादन, उद्यान इत्यादींचा समावेश असतो. बोनसाई, इकेबाना, उद्यान तयार करणे, यात मुख्य भाग महिलांचा असतो. जीवनात आनंद, गोडवा, प्रसन्नता निर्माण करण्याचे मुख्य कार्य महिला करतात. तसेच घरगुती खर्चावर महिलांचेच नियंत्रण असते. जपानमध्ये तीन ते चार जणांच्या कुटुंबाचा महिन्याचा खर्च सुमारे अडीच ते तीन लक्ष येन इतका असतो. त्यांपैकी घरभाडे किंवा स्वतःचे घर असेल तर त्यांचे हप्ते व कर वीस हजार येन, अन्न व चहा वगैरे ६६ हजार येन, कपडे ३१ हजार येन, वीज व घर वातानुकूलित करणारी यंत्रे ११ हजार येन, करमणूक ८ हजार येन, पुस्तके, वृत्तपत्रे ५ हजार येन, शाळा-कॉलेजचा खर्च २२ हजार येन आणि उरलेला संकीर्ण म्हणजे सणवार, सहली, पाहुणचार वगैरेसाठी खर्च होतो. घरचे हे सर्व अंदाजपत्रक स्त्रीने सांभाळायचे असते.

जपान हा जगातील सर्वांत सुशिक्षित देश आहे. जपानमधील साक्षरतेचे प्रमाण १०० टक्के आहे. याच्या तुलनेने अमेरिकेचे ९७ टक्के आहे. १९४७ मध्ये जपानने मूलभूत शिक्षणाचा कायदा केला. तेव्हापासून जपानमध्ये प्राथमिक शिक्षण सहा वर्षांचे, ज्युनियर हायस्कूल तीन वर्षांचे, हायस्कूल ३ वर्षांचे आणि विद्यापीठाचे शिक्षण चार वर्षांचे असा दंडक घालून देण्यात आला. यालाच ६ + ३ + ३ + ४ असा आकृतीबंध म्हणतात. त्याशिवाय एकूण तीन वर्षे किंडरगार्टन शिक्षणाची

पद्धत जपानमध्ये आहे. सम्राट मेइजी यांच्या पूर्वीपासून जपानमध्ये शिक्षणाची उच्च परंपरा आहे. सामुराई योद्ध्यांच्या काळात शालेय शिक्षणाबरोबरच युद्ध-शास्त्राच्या शिक्षणावरही भर देण्यात येत असे. ती परंपरा अजूनही चालू आहे. आजही जपानमधील शिक्षणसंस्थांमध्ये वर्षाकाठी सुमारे शंभर तास शारीरिक शिक्षणासाठी राखून ठेवण्यात आलेले असतात. जपानी युद्धकला (मार्शल आर्टस) जगात नाणावलेल्या असून, केंदो, ज्यूदो, कराटे वगैरेंचे शिक्षण सर्व शाळा-कॉलेजां-तून देण्यात येते. दीडशे वर्षांपूर्वी जपानमध्ये तेराकोया नावाच्या खास शिक्षणसंस्था असत. त्यात सरदार, जमीनदार, उमराव इत्यादी समाजातील प्रतिष्ठितांची मुले युद्धकलांचे तसेच भाषा, अंकगणित, इतिहास अशा विषयांचे शिक्षण घेत. १८७२ मध्ये जपान सरकारने देशभर प्राथमिक आणि माध्यमिक शाळा उघडून आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. १८८६ मध्ये सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करून प्रत्येक मुलाने चार वर्षेपर्यंत प्राथमिक शिक्षण घेतलेच पाहिजे, असा दंडक घातला. त्यानंतर चार वर्षांनी प्रत्येक मुलाला चार वर्षे प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यात आले. १९०८ मध्ये सहा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. १९४७ मध्ये प्रत्येक मुलाला नऊ वर्षे शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यात आले.

थोडक्यात सांगायचे तर पहिले वर्ष पूर्ण झाल्याबरोबर जपानी मुलाचे शिक्षण चालू होते ते तेराव्या वर्षापर्यंत त्याला मोफत व सक्तीचे शिक्षण असते. म्हणूनच जगातील उच्चांक म्हणून शंभर टक्के साक्षरता करणे जपानला शक्य झाले. शिक्षण घेताना विद्यार्थी शाळा सोडून जाणे हा प्रकार जपानमध्ये जवळजवळ घडत नाही. अगदीच अपघात, अपंगत्व किंवा अशा एखाद्या कारणानेच शिक्षण मध्येच सोडले जाते. पण तो अपवाद असतो. पहिल्या नऊ वर्षांत विद्यार्थ्याला नापास करून मागच्या वर्गात ठेवण्यात येत नाही. त्याचा अभ्यास चांगला नसेल तर त्याला वरच्या वर्गात घालण्यात येते आणि मागच्या इयत्तेच्या परीक्षेला बसावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांची वर्षे फुकट जात नाहीत व त्यांना निराश व्हावे लागत नाही.

विद्यार्थ्यांचे सर्व भवितव्य एकाच वार्षिक परीक्षेवर अवलंबून ठेवण्यात येत नाही. वर्षभर त्याची प्रगती कशी होते, साप्ताहिक, मासिक, त्रैमासिक परीक्षेत तो कोणती प्रगती दाखवितो, यावर त्याला श्रेणी देण्यात येते. जपानमधील शाळांचे वर्ष एप्रिलच्या प्रारंभी सुरू होते. वर्षातून तीन महिने सुटचा असतात. केवळ अभ्यासातील प्रगतीच नव्हे, तर विद्यार्थ्याला चित्रकला, संगीत, खेळ इत्यादीत कितपत स्वारस्य आहे, याचीही माहिती त्याच्या प्रगतीपुस्तकात देण्यात येते. त्यामुळे त्याला पुढील जीवनात कोणता व्यवसाय अधिक सुखाचा व फलदायी

होईल, हे कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्यापूर्वीच ठरविता येते. कॉलेजमध्ये विषयांची निवड करताना यापूर्वीची प्रगतीपुस्तके पाहून प्राध्यापक विद्यार्थ्याला मार्गदर्शन करतात. ज्या विद्यार्थ्यांना उद्योगधंद्यात विशेष गती आहे अशांना नववी झाल्यावर औद्योगिक शिक्षण देण्याची व्यवस्था होते. जपानमध्ये साधारण पंधरा वर्षांच्या विद्यार्थ्याला नोकरी अगर कामधंदा करता येतो. पण बरेच विद्यार्थी त्यापुढेही दोन ते चार वर्षं शिक्षण घेतात. नऊ महिन्यांच्या शालेय वर्षात सुमारे एक हजार तास शिक्षण दिले जाते.

दुसऱ्या महायुद्धानंतर सामाजिक शास्त्रावर जपानच्या शिक्षणात अधिक भर देण्यात आला. ज्यांना नोकरी करताना किंवा विशेषतः स्त्रियांना घर सांभाळून पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी टपालाने शिक्षण देण्याची व्यवस्था (कॉरस्पॉडन्स कोर्स) करण्यात आली. जपानमध्ये ४२५ विश्वविद्यालये आहेत. त्यातून साडेअठरा लक्ष विद्यार्थी शिक्षण घेतात.

ज्युनियर कॉलेजेसची संख्या ५११ असून त्यात चार लक्ष विद्यार्थी शिक्षण घेतात. ज्युनियर कॉलेजांमध्ये विद्यार्थिनींचे प्रमाण ७० टक्के व विद्यापीठांत ४५ ते ४८ टक्के आहे. त्याशिवाय व्यावसायिक व औद्योगिक शिक्षण देणाऱ्या एक हजारावर संस्था जपानमध्ये आहेत. जपानमध्ये खासगी विद्यापीठे आहेत व ज्युनियर कॉलेजेस यांच्यात जाण्याकडे विद्यार्थ्यांचा अधिक कल असतो. सरकारी शिक्षणसंस्थांमध्ये १५ टक्के विद्यार्थी आहेत. तर खासगी म्हणजे सरकारचे नियंत्रण नसलेल्या शिक्षणसंस्थांत ८५ टक्के विद्यार्थी शिक्षण घेतात. ६२ विद्यापीठांत संध्याकाळचे वर्ग आहेत. नोकरी करून पुढील शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी या संस्थांत शिक्षण घेतात.

परदेशातून जपानमध्ये शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना जपान हा अत्यंत महाग देश वाटतो. अमेरिकेपेक्षा जपानमध्ये शिक्षणासाठी जास्त खर्च येतो. आशियातून आलेल्या विद्यार्थ्याला दरमहा किती खर्च येतो याचा अंदाज असा आहे. (१ रुपया बरोबर २४ येन) : राहण्याची जागा– १८, ७०० येन, जेवण ३०,६०० येन, कॉलेजची फी व पुस्तके वगैरे– १५,००० येन. खेळ व करमणूक– ६,२०० येन, आगगाडी, बस वगैरे स्थानिक प्रवास– २,५०० येन; इतर किरकोळ ९,१०० येन. एकंदर खर्च दरमहा ८८,६०० येन. ज्या विद्यार्थ्यांना असोसिएशन ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन ऑफ जपानची शिष्यवृत्ती मिळते, त्यांना त्या संघटनेकडून दरमहा सुमारे चाळीस हजार येन मिळतात. (या संस्थेचा पत्ता : Association of International Education of Japan, Information centre, 4–5–29, komapa Megurc-ku, Tokyo 153, Japan)

जपानमध्ये सध्या ६,८०० परकीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांत

आशियातील जास्तीत जास्त (५,९००) आहेत. त्या खालोखाल अमेरिका (५४९), युरोप (३२२), दक्षिण अमेरिका (२५४), मध्यपूर्व व नजीकची पूर्व (११८) आणि बाकीचे इतर देशांतील आहेत. ज्या परकीय विद्यार्थ्यांना जपानच्या सरकारकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती किंवा इतर आर्थिक साहृय मिळते, त्यांना मॉनबुशो विद्यार्थी म्हणतात. १९५४ मध्ये ही योजना सुरू झाल्यापासून सहा हजार परकीय विद्यार्थ्यांना सरकारने आर्थिक साहृय केले आहे. जपानी वकिलाती व जपानी विश्वविद्यालये यांच्याकडून त्यासाठी विद्यार्थ्यांची निवड होते. जपानमध्ये शिक्षण घेण्यासाठी बहुतेक अभ्यासक्रमात जपानी भाषेचे ज्ञान असावे लागते व जपानी ही चिनीखालोखाल जगातील सर्वांत अवघड भाषा आहे हे या शिष्यवृत्त्यां-साठी प्रयत्न करणाऱ्या परकीय विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. जपानमध्ये परदेशातून शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी हृयुमॅनिटीज्‌कडे अधिकात अधिक (१,५००) विद्यार्थी जातात. त्या खालोखाल सोशल सायन्सेस (१४६५), इंजिनियरिंग (८१७), वैद्यकीय शिक्षण (६४७), शेती (१९३) होम इकॉनामिक्स (१५३) असे प्रमुख विषयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आकडे आहेत. ज्या परकीय विद्यार्थ्यांचे इतर विषयांतील गुण असामान्य आहेत, पण ज्यांना जपानी भाषा येत नाही, त्यांच्यासाठी जपानी भाषेचा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम त्या त्या शिक्षणसंस्थेतर्फे जपानमध्ये पूर्ण करून घेण्यात येतो. टोकियो विद्यापीठात परकीय विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकविण्यासाठी खास विभाग आहे.

जपानच्या विद्यापीठांत अनेक परकीय भाषांचे शिक्षणक्रम आहेत. संस्कृत, हिंदी व मराठी भाषा काही विद्यापीठांत शिकविल्या जातात. डॉ. नायटा हे जपानी प्राध्यापक उत्तम मराठी बोलतात. रेडिओ आणि टी. व्ही. या माध्यमांच्या द्वारे शिक्षण देणाऱ्या काही संस्था जपानमध्ये आहेत. त्यांना 'युनिव्हर्सिटी ऑफ द एअर' असे नाव आहे. वर्गात घेतलेल्या धड्याच्या कॅसेटस बाजारात मिळतात, त्या लावून घरच्या घरी टेपरेकॉर्डरच्या सहाय्याने शिकणारे विद्यार्थीही जपानमध्ये आहेत. ते बहुधा नोकरी करणारे असतात. सध्या जपानमध्ये विद्यापीठे व इतर मिळून ९०० संस्था टपालाद्वारे शिक्षण देतात आणि त्याचा फायदा सहा लाखांवर विद्यार्थी घेतात. अर्थशास्त्र, इतिहास, भाषा, गणित, समाजशास्त्रे वगैरे विषयांचे हे शिक्षण असते. टपालाद्वारे शिक्षण घेणाऱ्यांना पदव्या दिल्या जातात. पण पदवी घेण्यापर्यंत शिक्षण पूर्ण करणाऱ्यांची संख्या कमी असते. ज्युनियर कॉलेजांचे ५० टक्के विद्यार्थी पदव्या घेतात. याचे प्रमुख कारण असे आहे की हे विद्यार्थी आधीच नोकऱ्या करीत असतात. त्यांना नोकरीसाठी पदव्या घ्यायच्या नसतात तर अधिक ज्ञान मिळविणे हा त्यांचा उद्देश असतो.

जपानमध्ये क्रमिक पुस्तके खासगी प्रकाशक प्रसिद्ध करतात. मात्र या

व्यवसायाचा गैरवापर होऊ नये म्हणून सरकारी नियंत्रक मंडळाकडून ही पुस्तके प्रथम मंजूर करून घ्यावी लागतात. अनेक प्रकाशक असल्याने स्पर्धा होते व क्रमिक पुस्तकांची गुणवत्ता वाढत राहते. शाळेतील शिक्षकांना ठराविक काळानंतर प्रशिक्षण देण्याचीही जपानमध्ये सोय आहे. बी.ए. सारखी पदवी घेतल्यानंतर ज्यांना शिक्षक व्हावयाचे असेल, त्यांना चार वर्षांचा प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. जपानचे सरकार शिक्षणावर आपल्या एकंदर खर्चापैकी २१ टक्के रक्कम खर्च करते.

शिक्षणाला पूरक म्हणून ग्रंथालये आणि वस्तुसंग्रहालये यांचा उपयोग विद्यार्थ्यांनी करावा जशी शिक्षणतज्ज्ञांची अपेक्षा असते. या दोन्हींवरही जपानचे सरकार भरपूर खर्च करते. जपानसारख्या लहानशा देशात दीड हजार सार्वजनिक व मोफत ग्रंथालये असून पाचशेवर वस्तुसंग्रहालये आहेत. त्यांपैकी दोनशे वस्तुसंग्रहालये विज्ञान आणि इतिहास यांना वाहिलेली आहेत. त्याशिवाय वनस्पतीशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी बोटॅनिकल गार्डन्स आणि प्राणिशास्त्राच्या अभ्यासासाठी झुलॉजिकल गार्डन्स, प्राणिसंग्रहालये, मत्स्यालये, इत्यादींची व्यवस्थाही सरकारने केलेली आहे.

जपानच्या शिक्षणक्रमात आणि पूरक शिक्षणक्रमात संगीत, नाटच, चित्रकला, शिल्पकला, नृत्य इत्यादी कलांच्या शिक्षणासाठी मोठा वाव आहे. त्या त्या क्षेत्रातील पदव्या देण्यात येतात. या कलांच्या बरोबरच जुडो, कराटे, केंदो, सुमो या खास जपानी 'युद्धकलां'चेही शिक्षण देण्याची व्यवस्था प्रत्येक विद्यापीठात, महाविद्यालयात आणि शाळेत असते. ज्युनियर फॉरेस्ट पेट्रोल या नावाची खास पथके तेथील शिक्षणसंस्थांत असतात. या पथकातील विद्यार्थी शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच वनरक्षणाचेही शिक्षण घेतात. ते आठ ते पंधरा दिवस जंगलातच तंबू ठोकून राहतात. वनाचे रक्षण करणे, दुर्मिळ प्राण्यांची शिकार होऊ नये म्हणून दक्ष राहणे, जंगलात लागलेली आग विझविणे इत्यादींचे शिक्षण या पथकांना देण्यात येते. या पथकांतून कित्येक मुलीही हौसेने भाग घेतात व जंगलातच अन्न शिजवून जेवण करतात. जपानचा जंगल, पाणी, पर्वत व शेती यांच्याशी फार निकटचा संबंध आहे व तो प्रत्यक्ष शिक्षणक्रमातही प्रतिबिंबित होतो.

जपानमधील शेती मुख्यतः दोन प्रकारांत विभागली जाते. जमिनीवरील शेती आणि 'समुद्रातील शेती' ऊर्फ मासेमारी. भात आणि मासे हे जपानमधील मुख्य अन्न आहे. इतकेच नव्हे तर जपानमधील सर्वांत लोकप्रिय मद्य साकी हेही भातापासूनच तयार करतात. या देशाच्या अगदी वेगळ्या भौगोलिक परिस्थितीमुळे तेथील शेतीवर फार मोठ्या मर्यादा पडल्या आहेत. जपानच्या छोट्या धनुष्याकृती, लांबट भूमीतून पर्वतांची रांग जाते. त्याशिवाय दऱ्या व नद्या यांची

संख्याही भरपूर असल्याने शेतीसाठी शेकडो एकर सपाट जमीन एकत्र मिळत नाही. याचाच परिणाम असा झाला आहे की, जपानमधील शेते लहान आहेत आणि छोटया शेतकरी कुटुंबांकडूनच ही शेते पिकवली जातात. जपानमधील शेतांचे सरासरी क्षेत्रफळ सव्वा हेक्टरपेक्षाही कमी (१.१७ हेक्टर) आहे. मात्र शिक्षण शंभर टक्के असल्याने ही लहान शेतकरी कुटुंबेही शेतीची अत्याधुनिक साधने वापरून उत्कृष्ट पिके पिकवतात. भात, मासे आणि ओन्शू नारिंगे यांचे उत्पादन एवढे होते की सबंध जपानला पुरून त्यांची निर्यातही होते. भाताचे अति उत्पादन (over production) हा जपानच्या शेतकी खात्याचा चिंतेचा विषय झाला असून भाताऐवजी इतर पिके काढण्यासाठी आता शेतकी खाते प्रयत्नशील आहे. जपानमधील फक्त एक पंचमांश जमीन डोंगर व नद्याविरहित आहे. त्यातच भौगोलिक परिस्थिती शेतीत अडचणी आणते. जपान हा आशियाच्या मान्सून क्षेत्रातील देश आहे. हिवाळ्यात उत्तर जपानवर बर्फ पडते आणि वादळे होतात. पण इतर भागातील बरेच क्षेत्र कोरडे राहते.

सध्या सुमारे ५४ लक्ष ६१ हजार हेक्टर जमिनीत शेती होते. जपानच्या एकंदर क्षेत्रफळापैकी हे फक्त १४।। टक्के क्षेत्रफळ आहे. भारताच्या तुलनेने जपान मध्ये दरडोई एक षष्ठांश जमीन शेतीसाठी उपलब्ध आहे. जपानी भात-शेतीचा प्रसार जगातील अनेक देशांत झाला असून महाराष्ट्रातही कर्जतजवळ जपानी भात-शेतीचे केंद्र आहे. अमेरिकेचे शेतकी मंत्री श्री. ऑर्व्हील फ्रीमन यांनी भारताला भेट दिली होती, तेव्हा मी कर्जत येथील जपानी भातशेतीवर त्यांच्या समवेत गेलो होतो. जपानी पद्धतीने भाताचे पीक पारंपरिक पद्धतीपेक्षा खूप जास्त येते. जपान-मधील ९२ टक्के शेतांवर ट्रॅक्टर्स आणि शेतीची इतर आधुनिक यंत्रे वापरण्यात येतात. जपानला दरसाल १ कोटी १५ लक्ष टन तांदूळ लागतो, पण त्याहून बराच अधिक जपानमध्ये पिकविला जातो. तांदळाचे अति उत्पादन होऊन किमती फार घसरू नयेत म्हणून किमती सावरण्यासाठी सरकार तांदळाची खरेदी करून त्याची निर्यात करते. मांस व अंडी यांच्या उत्पादनासाठीही जपानमध्ये गाई, डुकरं आणि कोंबडया यांची मोठ्या प्रमाणावर पैदास केली जाते. मात्र जपानला गहू आणि मका यांची आयात करावी लागते.

जपान हा बेटांचाच देश आहे. आणि त्या बेटांतही अनेक नद्या आहेत. त्यामुळे मासे हे भाताबरोबरच जपानचे मुख्य अन्न झाले आहे. जपानी खाद्य-पदार्थांत माशांचे सत्तरहून अधिक पदार्थ आहेत. मासे पकडणे हेच जपानचे शास्त्र नसून माशांची पद्धतशीर पैदास व वाढ करणे हेही त्याचे एक प्रमुख कार्य आहे. म्हणून या विभागास फिशिंग न म्हणता फिश फार्मिंग असे नाव आहे. समुद्रकिनारा व नद्या यांतून अनेक प्रकारचे मासे, खेकडे, झिंगे वगैरे समुद्रअन्न (सी फूड) वाढविले

जाते. तसेच कल्चर्ड मोती हाही जपानच्या व्यापाराचा एक महत्त्वाचा भाग आहे. १९५० नंतरच्या तीस वर्षांत जपानने मासेमारी व माशांची पैदास यांची १६० पट वाढ करून जगात नवा विक्रम स्थापन केला आहे. मोती काढण्याचे प्रमाण याच कालात तेरा पटीने वाढले आहे. जपानमध्ये शेकडो सरकारी आणि खासगी मत्स्य संशोधन केंद्रे आहेत. त्यांत माशांची वाढ करण्याचे नवेनवे प्रयोग सतत चालू असतात.

१५

# वर्षाला ३५५ सण व उत्सव !

प्रत्येक देशात अनेक सण व उत्सव असतात, पण याबाबतीत जागतिक उच्चांक जर कोणत्या देशाचा असेल तर तो जपानचा. वर्षाचे दिवस ३६५ तर जपानमध्ये साजऱ्या होणाऱ्या सण व उत्सवांची संख्या ३५५ ! या सणांचे अनेक प्रकार असतात. काही उत्सव धार्मिक असतात, काही सम्राटांच्या घराण्याशी निगडित असतात, काही बदलत्या ऋतुमानाशी संबंधित असतात, काही प्रादेशिक असतात तर काही राष्ट्रीय. सम्राटाचा वाढदिवस राज्यारोहण दिन, सम्राज्ञींचा वाढदिवस असे सण राष्ट्रीय असतात. नवी पिके, बर्फ, पिकांची पेरणी हे सण निसर्गमानाचे असतात. बुद्धजयंतीसारखे सण धार्मिक असतात. नवे बौद्ध वर्ष व इंग्रजी वर्ष हे कालमानास अनुसरून असतात. पण सण किंवा उत्सव म्हटला की जपानी माणूस अतिशय उत्साहाने त्यात भाग घेतो. सणाला जपानात मात्सुरी म्हणतात. मात्सुरी म्हणजे जपानी माणसाचा आनंदाचा उच्चांक.

जपानमधील बहुतेक सणांत पवित्र मेणा रस्त्यातून नेणे हा महत्त्वाचा कार्यक्रम असतो. त्या मेण्याला मिकोशी म्हणतात. तो भक्तांनी आपल्या खांद्यावरून वाहून न्यायचा असतो. त्यात देवदेवतांची प्रतिमा असते. या मेण्याला वाहून नेण्याची संधी मिळणे हा मोठाच मान समजला जातो. या मेण्याच्या मिरवणुकीत भाग घेणारे जपानी लोक अर्ध्या हाताचा रंगीबेरंगी कोट घालतात. त्याला 'हॅपी कोट' आनंदाचा कोट म्हणतात. मिरवणुकीच्या अग्रभागी हायको नावाचे प्रचंड ढोल असतात. कधी कधी हे ढोल दीड ते दोन पुरुष उंचीचे असतात. या ढोलावर आपटल्या जाणाऱ्या आवाजाच्या तालावर नृत्य करीत देवाचा मेणा वाहून नेला जातो. वाटेवर फटाके उडविले जातात, फुले उधळली जातात, जयजयकार केले जातात.

वसंत ऋतूत मुलासाठी दोन सण जपानमध्ये असतात. मार्चमध्ये बाहुल्यांचा

सण असतो. तो खास मुलींचा सण असतो. त्या वेळी प्रत्येक घरात मुली उत्कृष्ट बाहुल्यांची आरास करतात. आई, वडील, इतर नातेवाईक हे मुलींना नव्या नव्या बाहुल्या भेट म्हणून देतात. या सणाचे नाव 'हिना मात्सुरी' असे आहे. तीन मार्च रोजी हा सण येतो. त्यापूर्वी पंधरा दिवस आई आपल्या मुलीला उत्तम पोशाख चढविलेल्या पंधरा बाहुल्यांचा संच देते. त्यांत एक राजपुत्र, राजकन्या, सरदार वगैरे असतात. यापूर्वी आईने दिलेल्या बाहुल्याही जपून ठेवलेल्या असतात. मग पायऱ्या पायऱ्यांच्या चबुतऱ्यावर गालिचा घालून त्यावर सर्व बाहुल्यांची आरास केली जाते. शेवटच्या पायरीवर खुर्च्या, टेबले वगैरे खेळ ठेवलेला असतो. बाहुल्यांच्या सणाच्या दिवशी सर्व बाहुल्या खाली काढल्या जातात, त्यांना खुर्च्यांवर बसविले जाते आणि त्यांना चहापार्टी देण्यात येते. त्या निमित्ताने मैत्रिणी चहा-फराळाचा चट्टामट्टा करतात. मग गाणी व नृत्य यांचा कार्यक्रम होतो. त्यानंतर पाच मे रोजी मुलांचा सण येतो. त्या वेळी वडील मुलांसाठी भेटीच्या वस्तू आणतात. या सणापूर्वी घरासमोर एक काठी रोवली जाते. त्या काठीवर चार पाच भिंगऱ्यांना बांधलेले कागदाचे मासे लावले जातात. वाऱ्यावर हे मासे फडफडतात आणि भिंगऱ्यांचा आवाज होतो. पाच मे रोजी सबंध जपानभर कोट्यवधी खांबांवर असे मासे भिरभिरत असतात. हे मासे चार ते पाच फूट लांब असतात. या दिवशी घरातल्या दिवाणखान्यात मुले आपल्या युद्धसाहित्याची आरास मांडतात. त्यात धनुष्य, बाण, भाले, कुऱ्हाड, चिलखत वगैरे असतात. ही आयुधे जपानी कुटुंबात वंशपरंपरा शेकडो वर्षे चालत आलेली असतात. आपल्याकडच्या खंडेनवमीसारखाच हा जपानी सण आहे. या आराशीत प्राचीन काळातील सामुराई योद्धयांचे व घोडयांचे पुतळे ठेवले जातात. जपानी मुलांनी बलवान व पराक्रमी व्हावे, हा या सणाचा उद्देश असतो. मुलांना या सणाला तांदळाच्या गोड केक्सची मेजवानी मिळते.

या दोन सणांच्या तारखांकडे बारकाईने पाहिल्यास त्यात एक सुसंगती आढळते. ती अशी की मार्च हा वर्षातील तिसरा महिना म्हणून बाहुल्यांचा सण तीन मार्चला येतो. मे हा वर्षातील पाचवा महिना म्हणून मुलांच्या सणाची तारीख पाच मे. अगाता मात्सुरी हा सण सहा जूनला येतो. त्या दिवशी रात्री कागदाचा प्रचंड फुगा मिरवणुकीने बुद्ध मंदिरात नेला जातो. देवाचा प्रवेश तेथे या फुग्यात होतो, असा समज आहे. मंदिरातून परत येताना या फुग्याचे तुकडे करण्यात येतात. हजारो भक्तांच्या जमावात हे तुकडे उधळण्यात येतात. या फुग्याचा एखादा तुकडा मिळविण्यासाठी खूप गोंधळ होतो. असा तुकडा परिश्रमाने हस्तगत करून घरी नेऊन देवघरात ठेवणे म्हणजे देवाचा आशीर्वाद मिळविणे असे मानले जाते. हा तुकडा घेणे हे शक्तीचे काम असल्याने हजारो जपानी तरुण कमरेभोवती लंगोटासारखे एकमेव वस्त्र नेसून या रणधुमाळीत सामील होतात. आठ ऑगस्टला सुमियोशी

मात्सुरी येतो. टोकियो शहरात हा सण विशेष मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. टोकियोमधील चुओ विभागातील एका बेटावर सुमियोशी मंदिर आहे. या दिवशी नावांतून व होडयांतून मोठमोठे कागदी सिंहाचे मुखवटे आणि अवाढव्य कागदी मासे बेटावर नेले जातात. देवाचा अष्टकोनी मेणा मिरवणुकीने बेटावर नेण्यात येतो. तेथे मिरवणूक, नृत्ये, शोभेचे दारूसामान, वाद्ये असा मोठा उत्सव होतो. सप्टेंबर हा वर्षाचा नववा महिना. म्हणून ९ सप्टेंबरला छोयो–नो– सीकु हा सण साजरा केला जातो. जपानी युद्धकलांशी हा सण निगडित आहे. मध्ययुगीन काळात जपानी सामुराई योद्धे शोगुनांच्याकडे जाऊन त्यांना या दिवशी कुर्निसात करून आपली स्वामिनिष्ठा व्यक्त करीत असत. मग सम्राट आणि शोगुन आपल्या एकनिष्ठ योद्धयांच्या सन्मानार्थ बादशाही मेजवान्या देत असत. १० ऑक्टोबरला शिगा विभागात ओत्सु मात्सुरी आणि टोकियो विभागात कॉम्पीरा मात्सुरी असे सण साजरे केले जातात. शिगामध्ये तेरा देवतांच्या मूर्तींची मिरवणूक काढण्यात येते व तेथे हा सण दोन दिवस साजरा केला जातो. टोकियोत कॉम्पीरा बुद्ध मंदिरात या दिवशी प्रचंड घंटांच्या टोलांना लांबच लांब रंगीबेरंगी दोऱ्या बांधल्या जातात आणि दिवसभर तेथे येणारे भक्त दोऱ्या ओढून घंटा वाजवीत असतात.

आपण पाच-तीन-दोनच्या पत्त्यांचा डाव खेळतो. जपानमध्ये 'सात-पाच-तीन' नावाचा सण असतो (शिशी–गो–सॅन) ज्या घरात सात वर्षांची मुलगी, पाच वर्षांचा मुलगा आणि तीन वर्षांची मुलगी अथवा मुलगा आहेत त्याच घरात हा सण साजरा केला जातो. या दिवशी या वयाच्या तीन मुलांना उत्तमोत्तम कपडे घालून बुद्ध मंदिरात नेण्यात येते. तेथे ती मुले प्रार्थना करतात. आणि दीर्घायुष्य, आरोग्य व संपन्नता यासाठी देवाचे आशीर्वाद मागतात. नोव्हेंबर ३ ते १० या तारखांच्या दरम्यान आठवडयात हा सण साजरा केला जातो. पण जपानमधील सर्वांत मोठे सण म्हणजे इंग्रजी नवे वर्ष, सम्राटांचा वाढदिवस आणि क्योटो येथील गिऑन ओडोरी सण. धार्मिक सणांपैकी संत निचरेनचा सण आणि बुद्ध जन्माचा सण मोठा मानला जातो. इंग्रजी नव्या वर्षाचा प्रारंभ ३१ डिसेंबर आणि १ जानेवारीला जपानभर मोठ्या सोहळयांत साजरा होतो. याच वेळी हिगुयामा शोरसी हा धार्मिक सण येतो. ऑक्टोबरपासून दोन धर्मोपदेशक शंभर दिवसांचे उपोषण सुरू करतात, त्याची समाप्ती यावेळी होते. ३१ डिसेंबरच्या रात्री या धर्मोपदेशकांकडून भक्तांना दिल्या जाणाऱ्या भेटीच्या वस्तू अत्यंत पवित्र व लाभदायक मानल्या जातात. सध्याचे सम्राट हिरोहिटो यांचा वाढदिवस २९ एप्रिल रोजी येतो. त्याची तयारी महिना महिना आधी होत असते. जपानमधील सर्व कारखाने, उद्योगधंदे सम्राटांच्या वाढदिवसाला आपल्या कर्मचाऱ्यांना बोनस व पगारवाढ देतात. त्याच दिवशी कामाकुरा महोत्सवही होतो. तेव्हा जुन्या सरदारांच्या पोशाखातले शेकडो लोक

मिरवणुकीत भाग घेतात. क्योटो येथे गिऑन ओडोरी या सणाच्या दिवशी देवतांच्या रथांची प्रचंड मिरवणूक निघते. आपल्याकडच्या जगन्नाथाच्या रथाच्या धर्तीवर ही मिरवणूक निघते. गिऑन कैकान नावाच्या नाटचगृहात या काळात (डिसेंबर २ ते १३) क्योटो विभागातील गैशा आणि मायको (नर्तकी) आपल्या नृत्याचे व गायनाचे कार्यक्रम सादर करतात.

तोरी नो इचि हा सण इडो कालापासून (१६०३) जपानमध्ये चालत आला आहे. या वेळी सुशोभित केलेल्या बांबूच्या डोल्या व शुभलाभदायक ताईत यांची खरेदी करून लोक ते हातात बांधतात. धनाढ्य लोक सोन्याची नाणीही ताइतात घालतात. सुशोभित डोल्यांचे आकार दोन इंचापासून चार फुटांपर्यंत विविध प्रकारचे असतात. अनेक व्यापारी व उद्योगपती हे लाभदायक ताईत आपल्या कचेऱ्यांत व कारखान्यांत ठेवतात. डिसेंबरमध्ये होकियाडो विभागात अस्वलांचा सण असतो. आपल्याकडे नागपंचमीला लोक नागाला दूध घालतात, त्याप्रमाणे या सणाच्या दिवशी अस्वले रस्त्यातून फिरविली जातात आणि लोक त्यांना खाद्यपदार्थ देतात व दरवेशांना पैसे देतात. २१ ऑक्टोबरला कोबेचा उत्सव असतो. त्या दिवशी १८६७ मध्ये कोबेमध्ये परकीयांना हे शहर खुले करण्यात आले, त्याचे हे स्मारक आहे. कामाकुटा येथे याबुसामे उत्सव होतो. तेव्हा मर्दानी खेळ होतात. विशेषत: घोडयावर बसून लढाई करणे, धनुर्विद्या यांचा हा सण असतो. निगाता मात्सुरी हा बंदरांचा आणि जलचरांचा सण आहे. दोनशे वर्षांच्या परंपरेच्या या सणाला खलाशी समुद्राची पूजा करतात. मात्सुशिना तोगोगाशी या सणाला रात्री शोभिवंत कंदिल लावून हजारो नावा समुद्रात आणि नद्यांत विहार करतात. राक्षसांच्या प्रचंड प्रतिमांची मिरवणूक काढण्यात येते.

सपोरोचा बर्फ महोत्सव हा जपानमधील एक अत्यंत महत्त्वाचा आणि विख्यात महोत्सव आहे. सपोरो ही होकाइडो या जपानच्या सर्वांत उत्तरेकडील बेटाची राजधानी. या भागात हिवाळयात कडाक्याची थंडी पडते. सपोरो येथे बर्फाचे जेवढे कौतुक होते, तेवढे जगात इतरत्र होत नाही. होकाइडो बेटावर जपानच्या इतर भागाच्या मानाने खूपच कमी लोक राहतात. पण दरसाल फेब्रुवारीमध्ये मात्र सपोरोची तात्पुरती लोकसंख्या पन्नास लाखांनी वाढते, कारण त्यावेळी येथे साजरा होणारा अवाढव्य बर्फमहोत्सव पाहण्यासाठी जपानच्याच नव्हे तर जगातील अनेक दूरदूरच्या देशांतून प्रवाशांची रीघ लागलेली असते. या महोत्सवात बर्फाच्या तीस ते पन्नास फूट उंचीच्या प्रचंड मूर्ती तयार करण्यात येतात. या मूर्तीत अवाढव्य डायना सोअर्स, दैन्य, बुद्ध, शिंटो मंदिरे,

भव्य कमानी, उंच मनोरे अशा शेकडो प्रतिकृती बर्फातून तयार केल्या जातात. महोत्सवाच्या सुरुवातीला या मूर्ती तयार झाल्यावर त्यांना साकी हे जपानी मद्य पाजण्यात येते, म्हणजे त्यांच्या तोंडात साकीच्या बाटल्या रित्या करण्यात येतात. किंगकाँगची मूर्ती एवढी मोठी करण्यात येते की तिच्या पोटात मुले जातात आणि पाठीवरून घसरून खाली येतात. या सर्व मूर्तींत उठावदार अशी मूर्ती असते ती ऐझेन म्येयो या देवाची. हा प्रेमाचा देव आहे. तो आपत्ती-पासून प्रेमिकांचे रक्षण करतो, अशी समजूत आहे. आठ ते दहा फूट उंचीच्या चबुतऱ्यांवर या देवाची चाळीस फूट बर्फाची मूर्ती तयार करण्यात येते. होकाइडो बोटावर तीव्र व दीर्घकाळ टिकणारा हिवाळा असतो. त्यावेळी समाजजीवन अगदी थंडावून जाऊ लागते म्हणून हा बर्फाचा महोत्सव सुरू करण्यात आला. आता या महोत्सव काळात या बर्फाच्या बेटावर असीम चैतन्य दिसते. हॉटेले, उपाहारगृहे गच्च भरलेली असतात. दुकानदारांचा धंदा जोरात चालतो आणि आगगाड्या, मोटारी, बसेस, टॅक्सी यांनी भरभरून प्रवाशांची अखंड रीघ लागते. या बर्फाच्या महोत्सवात मुलांना अत्यंत आवडणारी वस्तू म्हणजे बर्फाची आगगाडी. जुन्या वाफेच्या इंजिनाची ही बर्फाची आगगाडी हुबेहूब खऱ्या आगगाडीसारखी दिसते. मुले त्या गाडीत बसतात. टेपरेकॉर्डरवर शिटी वाजते. मात्र ही गाडी बर्फाचीच असल्याने जागची हलत नाही. विविध प्रकारच्या बर्फाच्या १५० मूर्ती-साठी बारा हजार मालमोटारी भरून बर्फ वापरला जातो.

या महोत्सवाची मुख्य मूर्ती ऐझेन म्येयो ही सातशे वर्षांपूर्वीच्या मूळ मूर्ती-वरून घडवलेली असते. या देवीला सहा हात असतात. तिच्या दोन हातात चक्रे असतात. प्रेमिकांच्या मार्गात अडथळे आणणाऱ्यांवर ही सुदर्शनचक्रे सोडली जातात, अशी त्या चक्रांची पार्श्वभूमी आहे. या देवीच्या हातात घंटा असते. ही घंटा वाजवून प्रत्येकाचा या पृथ्वीवरचा काळ संपला याची तो खूण करतो. एका हातात शुचितेचे प्रतीक म्हणून कमळ असते. दुसऱ्या हातात धनुष्य व बाण असतात. महोत्सव संपल्यानंतर या मूर्तीच्या तोंडात पुन्हा साकी मद्याची बाटली ओततात आणि ही व इतर मूर्ती पाडून टाकतात. अतिशय परिश्रमाने तयार केलेल्या या मूर्तीवर बर्फ साचून त्या विद्रूप होऊ नयेत म्हणून त्या पाडून टाकल्या जातात. महोत्सव चालू असतो तेव्हा मात्र आकाशातून पडणारे बर्फ मूर्तीवरून वारंवार पुसून टाकले जाते. कडाक्याच्या थंडीत सर्वत्र पांढरे शुभ्र बर्फ पडत असताना कड्यासारख्या उंच उभ्या असलेल्या या बर्फाच्या मूर्ती पाहणे हा एक अगदी आगळा आनंद आहे.

जगातील सर्वच देश सुरुवातीला शेतीप्रधान असल्याने नव्या पिकाचे स्वागत

करण्यासाठी सण किंवा उत्सव करण्याची परंपरा प्रत्येक देशात असते. तांदूळ हे जपानचे मुख्य अन्न असल्याने तेथेही भाताची रोपे लावण्याचा महोत्सव मोठ्या प्रमाणावर होतो. दक्षिण जपानमधील चियोडा येथे हा महोत्सव विशेष प्रकाराने साजरा केला जातो. शिंटो धर्मात तांदळाची खास देवता आहे. भाताच्या पिकाला जपानमध्ये एवढे महत्त्व आहे की भाताची रोपे लावण्याचा दिवस हा जपान सरकारने ' लोक संस्कृती दिन ' म्हणून जाहीर केला आहे. त्या दिवशी सामुदायिक नृत्ये होतात. मिरवणुका काढण्यात येतात आणि भाताचे नवे पीक उत्कृष्ट येण्यासाठी प्रार्थना म्हटल्या जातात ' फ्लॉवर हॅट ' नृत्य हा या दिवसाचा खास नाच असतो. या नृत्याला शेकडो वर्षांची परंपरा आहे. या नृत्यात तोंडावर बुरखे व मुखवटे घालून नर्तक व नर्तिका पांढऱ्या शुभ्र फुलांच्या, पायापर्यंत येणाऱ्या डहाळ्यांच्या टोप्या डोक्यावर घालून नृत्य करीत मिरवणूक काढतात. सहाशे वर्षांपूर्वी सामुराई योद्ध्यांनी अशाच फुलांच्या आवरणाखालील नर्तकांच्या रूपाने शत्रूच्या शिबिरात प्रवेश केला होता. आणि तेथे गेल्यावर त्यांनी अचानकपणे आपल्या लांब झग्यात लपविलेल्या तलवारी बाहेर काढून शत्रूचा निःपात केला होता. त्या विजयाचे स्मरण म्हणून हा ' फ्लॉवर हॅट ' नृत्याचा कार्यक्रम या सणात होतो.

आपल्याकडे खेड्यात साजरा होणारा बेंदूर सणही याच दिवशी जपानमध्ये साजरा केला जातो. या दिवशी बैलांना शृंगारण्यात येते. त्यांच्यावर जरतारी झुली घालण्यात येतात. त्यांना माळा घालण्यात येतात. बैलांच्या मालकांच्या घराण्याच्या पताका बैलांच्या पाठीवर लावण्यात येतात आणि अशा शेकडो बैलांची मिरवणूक वाजत गाजत चियोडोच्या राजमार्गावरून जाते. हा सण दरसाल जून महिन्याच्या पहिल्या रविवारी साजरा केला जातो. आठशे वर्षांपूर्वी क्योटो येथे या सणाचा प्रारंभ झाला. पण नंतर शोगूनांनी जाहीर केले की नव्या भाताची रोपे लावून दमल्याभागलेल्या शेतकऱ्यांनी हा दिवस संगीत नृत्यात समारोह म्हणून साजरा करावा ! तेव्हापासून चियाडो व आसपासच्या खोऱ्यात हा सण सुरू झाला. देवाची प्रार्थना करून या दिवशी शेतकरी व त्यांच्या स्त्रिया नवे कपडे घालून भाताची रोपे लावतात. याच दिवशी मुलांचाही खास सण असतो. कागुटा नावाचे नृत्य मुले करतात. शिंटो मंदिरात भुताखेतांना शमविण्यासाठी शेकडो वर्षांपूर्वी या कागुटा नृत्याचा प्रारंभ झाला. भाताची रोपे लावण्यापूर्वी गावाचा नेता शेतात उभ्या असलेल्या शेतकऱ्यांना विचारतो, " या शेतात कोणती फुले उमलणार आहेत ?" शेतकरी सांगतात, " शुभ्र भाताची, पैशाची, सद्गुणांची लक्षावधी फुले या शेतात उमलणार आहेत." मग नेता वर हात करून रोपे लावण्याची आज्ञा देतो. शेकडो बासऱ्या आणि पडघम यांचा आवाज आकाशात घुमतो व नव्या भाताची लागवड समारंभपूर्वक सुरू होते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६३९

इसवी सनापूर्वी तिसऱ्या शतकापासून जपानमध्ये भाताची लागवड होत आहे. भाताची रोपे लावण्याच्या दिवशी भाताची देवता पर्वतातून शेतात येते आणि संध्याकाळी पुन: पर्वतात जाऊन पर्वतांची देवता होते असे जपानी शेतकरी मानतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१६

# प्रेक्षणीय जपान

जपान हा आकाराने लहान असला, तरी जगातील एक अत्यंत प्रेक्षणीय असा देश आहे. जपानची वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थिती, हजारो वर्षांची सांस्कृतिक परंपरा आणि जपानी लोकांचे अपूर्व कलाप्रेम यामुळे नैसर्गिक आणि मानवनिर्मित, अशी दोन्ही प्रकारची प्रेक्षणीय स्थळे या देशात अमाप आहेत. जपानची राजधानी टोकियो ही तर अशा देखण्या स्थळांचे आगरच आहे. टोकियो हे जगातील सर्वांत अधिक लोकसंख्येचे शहर. त्याची दिवसाची लोकसंख्या एक कोटी पंधरा लक्ष आणि रात्रीची एक कोटी अकरा लक्ष आहे. या दोन लोकसंख्येत एवढा मोठा फरक असल्याचे कारण असे की, दिवसा आजूबाजूच्या भागातून चाळीस लक्ष अधिक लोक टोकियोत कामासाठी येतात. या प्रचंड लोकसंख्येचे वाहतुकीचे प्रमुख साधन म्हणजे आगगाडी. टोकियोत भुयारी आणि जमिनीवरील अशा दोन्ही प्रकारच्या अत्यंत अद्ययावत् अशा आगगाड्यांचे जाळे आहे. शिवाय मोनोरेल नावाची जमिनीपासून उंच तारेच्या किंवा रुळाच्या साहाय्याने जाणारी रेल्वेही आहे. त्याशिवाय लक्षावधी मोटारी, बसेस, विमाने, स्कूटर्स, आगबोटी अशा इतर वाहनांतून लोकांची आवकजावक होत असतेच. बुलेट ट्रेनसारखी जगातील सर्वांत अधिक वेगाची आगगाडीही टोकियोत आहे.

टोकियो शहराची दिवसाची सफर करताना प्रथम आपल्याला टोकियो टॉवरवर नेतात. पॅरीसमधील इफेल टॉवरच्या धर्तीचा हा पोलादाचा टॉवर आहे. १९५८ साली हा पूर्ण झाला. आशियातील सर्वांत उंच असा हा टोकियो टॉवर तीनशे तेहतीस मीटर्स उंच आहे. त्याच्या अफाट उंचीमुळे वाऱ्याचा प्रचंड झोत आला, तर हा झुकतो. टोकियोत नेहमी वादळे होतात. पण तसा टॉवर अत्यंत सुरक्षित आहे. अत्यंत मोठ्या वेगाच्या वाऱ्याने हा टॉवर वरच्या टोकाला जास्तीत

जास्त बत्तीस इंच झुकतो. चार हजार टन पोलाद या टॉवरच्या उभारणीसाठी लागले. या टॉवरला भगवा आणि पांढरा रंग दिला आहे. टॉवरवर दोन उपाहार गृहे, वेधशाळा, टेलिव्हिजन व रेडिओ केंद्रांची प्रक्षेपण व्यवस्था, मत्स्यालय वगैरे अनेक विभाग असून त्यामुळे प्रेक्षकांचा वेळ फारच चांगला जातो. या टॉवरवरून टोकियोचे विहंगम दृश्य दिसते म्हणून प्रवाशांना प्रथम येथे आणण्यात येते. न्यूयॉर्क-प्रमाणे टोकियोत गगनभेदी इमारती नाहीत. यांचे कारण असे की या शहरात दरसाल साडेतीनशे ते चारशे भूकंप होत असल्याने फार उंच इमारती बांधणे धोक्याचे असते. आकाश स्वच्छ असेल व पाऊस, धुके वगैरेचा अडथळा नसेल तर या टॉवरवरून जपानचा सुप्रसिद्ध फुजीयामा हा पर्वत दिसतो.

जपानच्या सम्राटांचा राजवाडा हे सर्वांत महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ आहे. जगात आता फारच थोडी सम्राटांची घराणी उरली आहेत. पण जपानच्या सम्राटांचे घराणे त्यांपैकी सर्वांत जुने आहे. जपानी लोक त्याच्यावर अक्षरशः जिवापलीकडे प्रेम करतात. जपानचे सम्राट हे सूर्याचे अवतार आहेत असे जनता मानते. त्यामुळे सम्राटांच्याकडे पाहवयाचे नाही, ते जेव्हा भाषण करतात, तेव्हा मान खाली घालून उभे राहून ते भाषण ऐकायचे अशी जपानची पद्धत आहे. सम्राटांचा हा प्रासाद साधा आहे व त्याच्या आवारातील उद्यानच प्रवाशांना पहायला मिळते. या जागी १४५६ साली सम्राटांनी पहिला राजवाडा बांधला. पूर्वी क्योटो येथे जपानची राजधानी होती. ती १८६८ साली टोकियो येथे आणण्यात आली. टोकियोचे मूळनाव इडो असे असून त्याचा अर्थ पूर्वेकडील राजधानी असा होतो. २१ एप्रिल हा जपानचे सध्याचे सम्राट हिरोहिटो यांचा वाढदिवस आहे. त्या दिवशी हजारो जपानी लोक या आवारात जमतात आणि जपानचे सम्राट सहकुटुंब बाल्कनी तयेऊन प्रजाजनांना आशीर्वाद देतात. सम्राटांच्या वाड्याचा परिसर अत्यंत निवांत आणि वनश्रीने नटलेला, रमणीय असा आहे.

टोकियोत अनेक बुद्धमंदिरे आहेत पण त्यांपैकी जी काही जगप्रसिद्ध आहेत, त्यांत असाकुसा कॅनन मंदिराचा समावेश होतो. हे तेराशे वर्षांचे जुने आहे. पण १९४३ साली बाँबहल्ल्यात त्याची प्रचंड हानी झाल्याने त्याचे पुनरुज्जीवन करण्यात आले. या मंदिरातील व आसपासचे वातावरण अति उत्साहाचे व जत्रेसारखे असते. मंदिरापर्यंत जाण्याच्या लांब मार्गावर दोन्ही बाजूंना खेळण्यांची, कपड्यांची व इतर वस्तूंची दुकाने आहेत. मंदिरासमोर एक मोठी जुनी विहीर आहे. भक्त लोक मंदिरात जाण्यापूर्वी या विहिरीच्या थंड पाण्याने हातपाय धुतात. मंदिरापुढे एका चौकात मोठ्या ब्राँझच्या पात्रात अग्निकुंड आहे. त्याचा पवित्र धूर जपानी लोक तोंडावर व अंगावर घेतात. या धुरामुळे व्याधी नाश पावतात असे जपानी भक्त मानतात.

मेईजी उद्यान आणि मेईजी मंदिर हे टोकियोचे आणखी एक विलोभनीय ठिकाण आहे. सम्राट मेईजी हे जपानवर १८६८ ते १९१२ पर्यंत राज्य करीत होते. ते अत्यंत पराक्रमी व प्रजाहितदक्ष होते. त्यांनीच आधुनिक जपानचा पाया घातला. त्यांच्या स्मरणार्थ टोकियोसारख्या गजबजलेल्या शहरात पंचाहत्तर एकरावर नितांत सुंदर उद्यान तयार केले आहे. हजारो प्रकारांची वृक्ष वेली, फुलझाडे येथे पहायला मिळतात. मेईजी मंदिर हे पॅगोडा पद्धतीचे, भव्य पण साधे आहे. त्याचा रंग विरक्तीचा भगवा आहे. नवजात मुलांना जपानमध्ये प्रथम घरातून बाहेर नेतात, ते बुद्धमंदिरात. तेथेच त्याचा नामकरणासारखा समारंभ होतो. अशी शेकडो अर्भके घेऊन आई, बाप, आजी, आजोबा व इतर नातेवाईक आलेले मेईजी मंदिरात रोज दिसतात ते दृश्य अत्यंत लोभसवाणे असते.

न्यूयॉर्कचे मॅनहॅटन, लंडनची पिकॅडिली सर्कस, मुंबईचे फ्लोरा फौंटन तसा टोकियोचा सर्वांत गजबजलेला आणि चैतन्यमय भाग कोणता असेल तर तो गिंझा. एरवी तो झळाळत असतोच पण दर रविवारी त्याची शोभा आणि वैभव विशेष खुलते. कारण रविवारी हा भाग वाहनांना पूर्णपणे बंद असतो. त्यामुळे हजारो लोक रविवारी गिंझा भागात मुक्त संचार करतात. दुकाने, उपाहारगृहे, मद्यपानगृहे, फुलांची दुकाने, उघड्यावर खाद्यपदार्थ विकणाऱ्यांचे स्टॉल्स, अनेक देशांतील चित्र-विचित्र पोषाखांचे आणि विविध देशांचे परकीय प्रवासी, खेळांचे स्टॉल्स, इत्यादींनी हा भाग रविवारी अगदी खच्चून भरलेला असतो. जपानी भाषेत गिंझा म्हणजे चांदी. एकेकाळी या भागात चांदी गाळणाऱ्यांची व चांदीचे दागिने करणाऱ्यांची दुकाने होती. त्यावरून या भागाला गिंझा हे नाव पडले आहे. या गजबजलेल्या भागात बाळ देशमुख या मराठी तरुणाने 'गंगा' आणि 'जमुना ही दोन भारतीय खाद्यपदार्थांची रेस्टॉरंट्स काढली आहेत. गिंझा या भुयारी स्टेशनसमोरच ती आहेत. श्री. देशमुख हे गेली सतरा वर्षे जपानमध्ये या व्यवसायात आहेत. गिंझाचे मध्यवर्ती केंद्र म्हणजे मित्सुबिझीची अलिशान, गोल, काचेची इमारत. ही मित्सुबिशी ही जपानची औद्योगिक व व्यापारी कंपनी. ही जगातील सर्वांत मोठी कंपनी आहे. या कंपनीच्या इमारतीचे नाव 'सॅन् ते' म्हणजे तीन हिरे हे आहे. तीन हिरे हे या कंपनीचे बोधचिन्ह आहे. या पंधरा मजली गोल इमारतीच्या भिंती काचेच्या असल्याने आतील सर्व दुकाने चोवीस तास बाहेरून दिसू शकतात. मित्सुबिशी इलेक्ट्रॉनिक्सतर्फे अनेक अद्ययावत् यंत्रे इथे पहायला मिळतात. उदाहरणार्थ, फोनवर बोलताना ज्यांच्याशी आपण बोलतो, त्यांचे चलत्‌चित्र शेजारच्या तबकडी-वर दिसते. टी. व्ही. व फोनचे हे नवे मिश्रण आहे. अत्यंत अवघड गणिताचे उत्तर सांगणारा 'बोलका' कॉम्प्युटरही येथे आहे. इंग्रजी, फ्रेंच, इटालियन वगैरे सहा भाषांतून एखादे वाक्य उच्चारले तर त्याचे जपानीत भाषांतर करून सांगणारे

गणकयंत्रही या शोरूममध्ये याहे. पचिन्को नावाच्या जपानी खेळाचे अवाढव्य हॉल्स या गिंझा भागात आहेत. बटन दाबल्यावर पोलादाचे गोळे या यंत्रात पडतात व त्यांच्या साहाय्याने खेळायचा हा पचिन्को जपानमधील सर्वांत लोकप्रिय खेळ आहे.

'कबुकी झा' हे जपानच्या पारंपरिक नाटकांचे नाट्यगृह गिन्झा भागातच आहे. ही नाटके दहा ते अकरा तास चालतात आणि त्यांना तीन मध्यंतरे असतात. कबुकीत स्त्रियांच्या भूमिकाही पुरुषच करतात. प्राचीन जपानी योद्धे, त्यांचे पराक्रम, सम्राटांच्याविषयीची निष्ठा, पारंपारिक जपानी संगीत व नृत्य यांचा या नाटकात समावेश असतो. एका वेळच्या कार्यक्रमात चार पाच नाटके दाखविण्यात येतात. कबुकी झा हे पाच मजली नाटचगृह अत्यंत भव्य आणि बादशाही आहे. त्याचा रंगमंच शंभर फूट रुंद आणि चाळीस फूट उंच असतो. एका वेळी शंभर कलाकार त्यावर काम करू शकतात. कबुकी नाटकाचे तिकीट पंच्याऐंशी रु. पासून अडीचशे रु. पर्यंत असते.

सुमो हा कुस्तीचा प्रकार जपानमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. भारतात गायकांची खानदानी घराणी असतात तशी जपानमध्ये सुमो कुस्तीगिरांची नामवंत घराणी आहेत. या कुस्तीगिरांचं वजन साधारण दोनशे पौंडापर्यंत असतं. सुमो या कुस्तीचं तिकीट चार माणसांचं एकत्र मिळतं. ते सुमारे आठशे रुपये असतं. चटईवर मांडी घालून बसून हजारो लोक पाच पाच सहा सहा तास या सुमो कुस्त्या पहातात. केन्दो हा जपानमधील आणखी एक लोकप्रिय खेळ. सर्व मुलामुलींना शाळेपासूनच हा खेळ खेळावा लागतो. तीन ते साडेतीन फूट लांब लाठीने प्रतिपक्षावर वार करायचा आणि त्याने आपल्या लाठीवर झेलून प्रतिवार करायचा असा हा खेळ असतो. गिर्यारोहण हा जपानमधील तसा सर्वत्र मान्यता पावलेला छंद आहे. उन्हाळा सुरू झाल्याबरोबर हजारो जपानी फुजीयामा आणि इतर पर्वतावर चढतात. ज्युडो आणि कराटे यांचेही शिक्षण प्रत्येक जपानी स्त्रीपुरुष घेतो. त्यामुळे जपानी लोकांचे आरोग्य उत्तम राहिले असून त्यांच्या अंगी काटकपणा आणि सहनशक्ती आली आहे. या व्यायामाबरोबरच पूजा, अर्चा, चिंतन, असे मनःशांतीचे मार्गही जपानी माणूस अनुसरत असल्याने त्याचे जीवन सर्व दृष्टींनी सुखी व संपन्न झाले आहे. जपानी माणूस घराबाहेर पडला की पाश्चात्य वेषात असतो पण घरात आल्याबरोबर तो जपानचा पारंपरिक वेष घालून पूर्णपणे राष्ट्रीय बनतो. पाश्चात्यांचे सर्व गुण जपानने उचलले असले तरी पाश्चात्यांच्या व्यसनापासून, अतिरेकापासून जपान यशस्वीपणे दूर राहू शकला आहे.

प्रवाशांना आकर्षित करून घेण्यासाठी अगदी अलीकडेच म्हणजे १९८३ साली टोकियोजवळच्या टोकियोबे या विभागात अमेरिकेतील लॉस एन्जेलिसच्या "डिस्ने लँड" च्या धर्तीवर अत्याधुनिक 'डिस्ने लँड' सुरू केले आहे. अमे-

रिकेतच ऑरलँडो येथेही " डिस्ने वर्ल्ड " आहे. पण टोकियो बे वरची ही डिस्नेनगरी ही जगातील सर्वांत मोठी अशा प्रकाराची अजब नगरी आहे. ओरिएन्टल लँड कंपनी या खाजगी संस्थेने एकोणीस वर्षांपूर्वी दोनशे दोन एकर जमीन खरेदी करून ही अद्भुत नगरी बांधण्यास सुरुवात केली. प्राथमिक तयारी करण्यात पहिली दहा वर्षे गेली. त्यानंतर मात्र डिस्नेलँडमध्ये काम करणाऱ्या दोनशे अमेरिकन तंत्रज्ञ व कलावंत यांना बोलावून या नगरीच्या उभारणीस जोरात सुरुवात झाली. मूळ डिस्नेलँडप्रमाणे इथेही मिकी माऊस, फॅन्टसी लँड, साहस नगरी, स्नोव्हाईट, सिंड्रेला, डोनाल्ड डक, मार्कट्वेनच्या काळातील वाफेवर चालणारी बोट, भूतनगरी, लांब नाकाचा पिनेचिओ, उद्याचे जग, चंद्रावरचा प्रवास वगैरे सर्व भाग आहेत. या डिस्नेनगरीत तीसवर उपाहारगृहे असून त्यात जपानी, अमेरिकन, चिनी खाद्यपदार्थ देण्याची व्यवस्था आहे. दररोज चाळीस ते पन्नास हजार लोक या डिस्नेनगरीला भेट देतात. ज्या आंतरराष्ट्रीय प्रवाशांना टोकियोच्या नगरीत विमानतळावर चारसहा तास पुढच्या विमानासाठी थांबावे लागते त्यांना या डिस्नेनगरीची भेट घडवून आणून परत वेळेवर विमानतळावर सोडण्याची व्यवस्थाही आहे. जपानी लोकांना डिस्नेनगरीबद्दल आपुलकी वाटावी म्हणून कित्येक बाहुल्या व मिकी माऊससारखे प्राणी यांना जपानी पेहराव दिलेला आहे. जपानचा दोन हजार वर्षांचा इतिहास दाखविणारे एक गोल पडद्याचे चित्रपटगृह येथे आहे. या डिस्नेनगरीला जपानी संस्थेने ६५० कोटी रुपये खर्च केले आहेत. दर साल एक कोटी लोक ही नगरी पाहतील व एकशे वीस कोटी रुपये उत्पन्न होईल अशी संयोजकांची अपेक्षा आहे. पौर्वात्य देशातील हे सर्वांत मोठे प्रवासी आकर्षण ठरले आहे.

बुद्धमंदिरे आणि वास्तुसंग्रहालये यांचे टोकियोत वैपुल्य आहे. पण खास धार्मिक हेतू नसेल, तर आपल्यासारख्या सर्वसामान्य मुशाफिराला मेईजी आणि कॅनन या दोन मंदिरांना नमुन्यादाखल भेटी दिल्या तरी इतर मंदिरांची कल्पना येते. जेथे पूर्वी इम्पीरियल हाऊस होल्ड म्युझियम हे सम्राटांच्या खाजगी मालकीचे वस्तुसंग्रहालय होते, तेथे १९३७ साली 'नॅशनल म्युझियम' सुरू करण्यात आले आहे. त्यात आठव्या शतकातील जपानी कपडे, चिलखते, शस्त्रे, तैलचित्रे, कापडावर काढलेली चित्रे, बुद्धमंदिरात धूप घालण्याची मोठी नक्षीची पात्रे, पुष्परचनांचे नमुने, प्राचीन जपानी भांडी वगैरे शेकडो कलात्मक वस्तू पहावयास मिळतात. जुन्या सामुराई योद्ध्यांच्या कथा रंगविणारी चित्रे मोठमोठ्या कापडी पट्ट्यांवर येथे काढलेली आहेत. या वस्तुसंग्रहालयाच्या मागे उत्कृष्ट जपानी उद्यान व रमणीय जलाशय आहे. 'म्युझियम ऑफ मॉडर्न आर्ट'मध्ये आधुनिक कलेचे आविष्कार पहावयास मिळतात. त्याशिवाय पेपर म्युझियम, इशिबाशी यांचे खाजगी वस्तुसंग्रहालय, इत्यादी अनेक ठिकाणांना भेटी देणे मनोरंजक आणि ज्ञानवर्धक ठरेल,

विशेषत: किटाकू भागातील ‘ पेपर म्मुझियम’मध्ये हॅट्सपासून पुष्पपात्रापर्यंत शेकडो वस्तू कागदाच्याच केल्या आहेत त्या अतिशय प्रेक्षणीय आहेत. अरिगॉमी ही कागद कापून विविध वस्तू करण्याची जपानची कलाही येथे प्रकर्षाने दिसते. कोराकुवेन हे जपानी पद्धतीचे विशाल उद्यान उत्तम सौंदर्याचा नमुना म्हणून लक्षात राहण्यासारखे आहे. त्याजवळच कोडोकाम या इमारतीत ज्युडो या जपानी युद्धकलेची जागतिक कचेरी आहे. ज्युडोचे शिक्षण कसे देण्यात येते याचे प्रात्यक्षिक मोफत दाखविण्याची येथे सोय आहे. १९५८ साली पन्नास लक्ष रुपये खर्च करून हे भव्य ज्युडो केंद्र बांधण्यात आले. हिबिया पार्कमध्ये ‘ ड्रीम गार्डन ’ नावाचे रमणीय स्वप्न उद्यान आहे. तेथील उडत्या कारंजाजवळ उभे राहणाऱ्यांचे छायाचित्र काढून लगेच त्याला ते माफक किमतीत देणारे छायाचित्रकार सज्ज असतात. टोकियोला गेल्यावर शिबुया स्टेशनवर अवश्य जा. या स्टेशनच्या आवारात एका इमानी कुत्र्याचा पुतळा आहे. हा कुत्रा गेल्या महायुद्धाच्या काळात रोज सकाळी आपल्या मालकाबरोबर घरातून या स्टेशनपर्यंत येत असे. संध्याकाळी मालक परत येण्याच्या वेळी कुत्रा त्याला नेण्यासाठी या ठिकाणी हजर होत असे. एकदा त्याचा मालक शिबुया स्टेशनवरून कचेरीत गेला. पण तेथेच त्याला हृदय विकाराने मृत्यू आला. कुत्रा मात्र संध्याकाळी ठरल्याप्रमाणे मालकाची वाट पहात स्टेशनसमोर राहिला. मालक आला नाही, तेव्हा त्याने अन्नपाणी सोडले आणि झुरून तो याच ठिकाणी मरण पावला. या इमानी कुत्र्याचे स्मारक नंतर लोकांनी त्याचा इथे पुतळा उभारून केले आहे. या कुत्र्याचे नाव हचिन्को. टोकियोतील प्रेमिकांचे आणि स्नेह्यांचे एकमेकांना भेटण्याचे हे संकेत स्थळ आहे. नगरपालिकेने या प्रशस्त आवारात केवळ वाट पाहणाऱ्यांच्यासाठी अनेक बाके व खुर्च्या टाकल्या आहेत आणि फुलझाडे लावली आहेत. हॅपोटन येथील बोन्साई प्रात्यक्षिक आणि जपानी चहापानाचा सोहळा, तसाकी पर्लमध्ये मोती कसे तयार होतात याचे प्रात्यक्षिक, शिझॅन्सो उद्यानात जपानी जेवणाची मेजवानी, जपानचे पार्लमेंट डिएटची इमारत, कोटो संगीताचा कार्यक्रम, जपानमधील टॅक्स फ्री मालाचे केन्द्र, जपानी हस्तकला व्यवसाय आणि ग्रामीण जीवन यांची सफर, कॅनन कॅमेऱ्याचा कारखाना, कांडा फ्री मार्केट, फुजुटस कॉम्प्युटर निर्माण केन्द्र, जपानी बाहुल्यांचे प्रदर्शन, सोजिजी झेन बुद्ध मंदिर, जपानी वुडकटच्या कलात्मक वस्तू (गिंझा), शोफू स्कूल ऑफ फ्लॉवर अरेंजमेन्ट, किमोनो या जपानी महिलांच्या वस्त्रांची निर्मिती कशी होते हे दाखविणारे केन्द्र, संतुरी व्हिस्कीचा कारखाना अशी अनेक आकर्षक ठिकाणे टोकियोत किंवा आसपास आहेत. त्यांपैकी बहुतेक ठिकाणी नेण्यासाठी हतो बस आणि इतर प्रवासी कंपन्यांची गाईडसह व्यवस्था असते. या सफरींचे दर तीन हजारपासून अकरा हजार येनपर्यंत असतात. टोकियोतील कोणत्याही मोठ्या

हॉटेलच्या लॉबीत या प्रवासी कंपन्यांचे कौंटर असतात. शिवाय "This week in Tokeyo" अशा धर्तीवरच्या मोफत पुस्तिकाही या मोठ्या हॉटेलच्या लॉबीत मिळतात. अशांपैकी काही हॉटेलांची नावे: १. ग्रँड पॅलेस, २. इंपीरियल ३. ओकुरा ४. दाई इचि. ५. न्यू जपान. ६. गिंझा टोकियो. ७. हिवटन. ८. टोकियो प्रिन्स. ९. किओ प्लाझा. १०. सेंचरी हियाटा.

टोकियोत अत्यंत रोमहर्षक असे रात्रीचे जीवन (नाईट लाईफ) आहे. या बाबतीत पॅरीस, न्यूयॉर्क, बँकॉक, टोकियो आणि हँबुर्ग ही जगप्रसिद्ध शहरे आहेत. हतोबस किंवा इतर प्रवासी कंपन्या रात्री नऊ ते एकपर्यंत हे रात्रीचे जीवन दाखवितात. त्यात नाईट क्लब, नाटचगृह, रात्रीचे मद्य व जेवण, गिंझा या झगझगीत विभागाची सफर आणि गैशागृहाला भेट यांचा समावेश असतो. 'निचिजेधी म्युजिक हॉल' हे गिंझामधील प्रेक्षागृह महशूर आहे. या प्रेक्षागृहात सुमारे पाचशे लोक एका वेळी बसू शकतात. ते आलिशान असून त्यात शिरल्याबरोबर लाल मऊ गालिचे, मंद जपानी अत्तरांचा सुगंध आणि स्वागत करण्यासाठी दरवाज्यातच उभ्या असलेल्या नाजूक सुंदर जपानी तरुणींनी कमर वाकवून केलेले पारंपरिक पद्धतीचे अभिवादन यांची प्रथमच आपल्यावर छाप पडते. या कार्यक्रमात अर्धनग्न जपानी मदमस्त तरुणींचे नृत्य, गायन, नाट्यप्रवेश इत्यादींची रेलचेल असते. बहुतेक नर्तकींच्या अंगावर म्हणजे कमरेच्या आसपास वीतभर लंगोटीशिवाय काही नसते. जादूचे काही प्रवेशही दाखविण्यात येतात. टोकियोच्या रात्रीच्या सफरीतील सर्वांत अविस्मरणीय स्थळ म्हणजे मिकॅडो हा नाईट क्लब. हा जगातील सर्वांत मोठा आणि सर्वांत बादशाही नाईट क्लब. इथे एकाच वेळी अडीच हजार लोक बसू शकतात. इथे येणाऱ्या प्रत्येकाला 'होस्टेस' किंवा काही वेळांची मैत्रीण घ्यावीच लागते. तिचा आणि एका पाहुण्याचा एका रात्रीचा खर्च सुमारे पाच हजार रुपये असतो. ही मैत्रीण पाहुण्याबरोबर गप्पा मारते, मद्यपान करते आणि त्याला आपल्याबरोबर नर्मप्रणय करू देते, एवढेच. जपानमधील बरेच औद्योगिक व व्यापारी व्यवहार याच मिकॅडो क्लबमध्ये होतात. त्यासाठी आपल्या प्रतिनिधींचा खर्च त्या त्या व्यापारी किंवा औद्योगिक कंपन्या करतात. परदेशातून येणाऱ्या पाहुण्यांना कमी खर्चात हा क्लब पाहता यावा म्हणून केवळ अडीचशे रुपयांत बाल्कनीत बसून एक मद्य मोफत पिता येते. मिकॅडोमधील भव्य रंगमंचावर सर्वोत्कृष्ट जपानी अर्धनग्न युवती नृत्ये व संगीतांचे कार्यक्रम करीत असतातच. पण या क्लबचा विशेष म्हणजे जमिनीपासून पंचवीस फूट आणि बाल्कनीशी समांतर असा अधांतरी एक रूळ ठेवला असून त्या रुळावरूनही या तरुणींची नृत्ये चाललेली असतात. मिकॅडोचं सर्वच वातावरण अद्भुतता आणि बादशाही विलास यांनी भरलेलं असतं.

गिंझा या दुकाने, उपाहारगृहे, विलासी अत्तरे इत्यादींनी खच्चून भरलेल्या भागातील रात्रीची सफर हाही एक अत्यंत सुखद अनुभव आहे. विशेषतः रस्त्यावरच्या छोट्या, उघड्या दुकानात मिळणारी बियर आणि टॉपुटा नावाची मासे तळून केलेली भजी फारच रुचकर असतात. खरेदी करणाऱ्यांचा हा स्वर्गच आहे--अर्थात त्यासाठी खिसे चांगलेच गरम असायला हवेत. या रात्रीच्या सफरीतील एक भाग म्हणजे उत्तम पंचतारांकित हॉटेलातील जेवण, त्यात साकी नावाचे जपानी मद्य किंवा स्कॉच व्हिस्की, सूप, स्टीक, मासे, भात, जपानी पद्धतीच्या भाज्या, पुडिंग, कॉफी अशी रेलचेल असते. त्यानंतर गैशागृहाला भेट हा खास जपानी वैशिष्ट्यांचा आणि या रात्रीच्या सफरीतील शेवटचा कार्यक्रम असतो. गैशा म्हणजे वेश्या नव्हेत. गैशा ही खास जपानी संस्था आहे. नृत्य, संगीत, चतुर भाषण आणि सहानुभूतीपूर्वक लाघवी गप्पा यांनी धनाढ्य लोकांचे मनोरंजन करून त्यांना जीवनात नवा उत्साह देणे हा गैशांचा उद्देश असतो. काही श्रीमंत कायमच्या गैशा ठेवतात तर काही जण अधूनमधून गैशागृहाला भेटी देतात. टोकियोच्या या रात्रीच्या सफरीत गैशांच्या जीवनांची तासभर झलक दाखविण्यात येते. यावेळी गैशाबरोबर साकी हे मद्य पिता येते, तिचे नृत्य पाहता येते आणि तिच्याबरोबर काही वेळ गप्पागोष्टीही करता येतात. टोकियोतील निशाजीवन बँकॉकच्या रात्रीच्या जीवनाइतके ‘ धाडसी ’ नसले तरी टोकियोला एक प्रकारची खानदानी नजाकत आहे, ती इतर कोणत्याही शहराच्या रात्रीच्या जीवनाला नाही. रात्रीच्या या सफरीला दहा हजार ते बारा हजार येन पडतात. हतोबसचा फोन क्रमांक ४३५–६०८१ असा आहे.

टोकीयोजवळ एक तासाच्या रेल्वेच्या किंवा बसच्या रस्त्यावर कामाकुरा हे अत्यंत प्रेक्षणीय स्थळ आहे. ११९२ पासून १३१३ पर्यंत कामाकुरा ही जपानची राजधानी होती. तेव्हा मिनामाटो घराण्याचं जपानवर वर्चस्व होतं या काळात अर्थातच कामाकुरा हे व्यापार, उद्योगधंदे, राजकारण आणि संरक्षण या सर्वच क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचं शहर होते. पण १३१३ मध्ये राजधानी अन्यत्र गेल्यावर हे महत्त्व लयाला गेलं. येथील ‘ कामाकुरा दाईबात्सु ’ म्हणजे महान् बुद्ध ही मूर्ती जगप्रसिद्ध आहे. ही प्रचंड बुद्ध मूर्ती १२५२ साली ओनो गोरोमन यानी ब्राँझपासून तयार केली. तिचे वजन १०३ टन असून उंची ४४ फूट आहे. ही मूर्ती एवढी भव्य आहे की, तिच्या एका डोळ्याची लांबी तीन फूट आहे. या मूर्तीचे डोळे अर्धोन्मीलित आहेत. पूर्वी मूर्तीभोवती मंदिर होतं. पण १४९५ साली जवळच्या समुद्रावर तुफान झालं आणि प्रचंड वाऱ्याच्या आणि लाटांच्या तडाख्यात ते मंदिर वाहून गेले. तेव्हापासून ही मूर्ती उघड्यावरच आहे. पण सभोवती सुंदर झाडे असल्याने निसर्गाच्या पार्श्वभूमीवरची ही मूर्ती अधिकच देखणी दिसते. मूर्तीच्या

आतून वरपर्यंत चढून खिडकीतून बाहेर पाहण्याचीही सोय आहे. जपानमधील बुद्ध मंदिराच्या आवारातील झाडांना शेकडो चिठ्ठ्या बांधलेल्या आढळतात. तशा त्या इथेही असतात. बुद्धाकडे आपण जे मागतो ते त्याच्या लक्षात राहावे म्हणून भक्त अशा लहान चिठ्ठ्यांवर आपले मनोगत लिहितात आणि आठवणीसाठी ते झाडांच्या फांद्यांना दोऱ्याने बांधून ठेवतात. त्यासाठी बुद्ध मंदिरांच्या आवारातील दुकानात कोऱ्या चिठ्ठ्या, पेन्सिली आणि दोरे यांचे संच विक्रीलाही ठेवण्यात येतात. एकीकडे विज्ञानाच्या क्षेत्रात जगात पहिला क्रम मिळविणाऱ्या देशाचे नागरिक दुसरीकडे किती धार्मिक असतात हे पाहणे मनोरंजक आहे.

जगातील सर्वांत मोठे जहाज बांधणीचे केंद्र म्हणजे टोकियोपासून फक्त वीस किलोमीटर्स अंतरावर असलेले याकोहामा बंदर. हे बंदर कामाकुटाच्या वाटेवरच आहे. १८५० नंतर जपानमधील जी सहा बंदरे आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी खुली करण्यात आली, त्यांपैकी याकोहामा हे एक होते. त्यानंतर त्याची झपाट्याने वाढ झाली. येथील बंदरात अनेक राष्ट्रांच्या अवाढव्य बोटींची बांधकामे चालू असतात. त्याशिवाय उतारू व माल यांच्या आंतरराष्ट्रीय वाहतुकीचे हे प्रमुख केंद्र आहे. बंदरावर यामाशिरा पार्क आणि मरीन टॉवर हे विशेष लक्षणीय आहेत. मरीन टॉवरवरून बंदराचे मनोरम विहंगम दृश्य दिसते. हवा स्वच्छ असेल तर दूरवरचा फुजियामा पर्वतही येथून दिसतो. सितक सेंटर हे याकोहामाचे प्रमुख केंद्र आहे. या ठिकाणी रेशमाचे कापड व तयार कपडे मिळतात. शिवाय रेशमाच्या किड्यापासून रेशीम कसे तयार होते याचे प्रात्यक्षिकही सिल्क सेंटरमध्ये दाखविण्यात येते. चायनाटाऊन आणि शांकियेम पार्क ही याकोहामाची आणखी दोन प्रेक्षणीय स्थळे. या उद्यानात पंधराव्या शतकातील पॅगोडा आहे. सकाळी टोकियोहून निघून याकोहामाची सफर करून संध्याकाळपर्यंत परतता येते.

जपानमध्ये सांस्कृतिक परंपरेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी दोन स्थळे म्हणजे क्योटो आणि नारा. क्योटो हे टोकियोपासून सुमारे तीन तासांच्या आगगाडीच्या रस्त्यावर असून या गाडीचा वेग ताशी २१० किलोमीटर्स असतो. क्योटो या शब्दाचा अर्थ 'राजधानी' असा आहे- एक हजार वर्षे जपानची राजधानी याच शहरात होती. (इ. स. ७८४ ते १८६८). यामुळे जपानच्या सांस्कृतिक परंपरेचे उत्कृष्ट दर्शन या शहरात घडते. 'जपानचे हृदय' या नावाने जपानी लोक या शहराचा उल्लेख करतात. क्योटो ओशो पॅलेस हा जपानच्या सम्राटांचा पुरातन राजवाडा आहे. या ठिकाणी इंपिरीयल हाऊसहोल्डची कचेरी असून प्रवाशांनी तेथे जाऊन अर्ज केल्यास त्यांना राजवाड्याचे काही भाग पाहता येतात. जपानी लोकांना मात्र ही परवानगी मिळत नाही. परकीय प्रवाशांना येथे आपले पासपोर्ट दाखवावे लागतात. कस्तुरा इंपीरीयल व्हिला आणि सेन्टो इंपीरीयल पॅलेस हे सम्राटांचे

वाडे हा अर्ज करून पहावयास मिळतात. हे तीन राजवाडे जुन्या जपानी वास्तुशिल्प-कलेचे सर्वोत्कृष्ट नमुने आहेत. १६०३ साली बांधण्यात आलेला निन्डों कॅसल हे सम्राटांचेच एक निवासस्थान होते. टोकुगवा शोगुनांच्या कारकिर्दीत हा किल्ला बांधण्यात आला, शिन्सेन उद्यान हे क्योटोमधील एक अत्यंत सुंदर उद्यान आहे. हे ७०० वर्षांचे जुने आहे. या उद्यानात जपानी खाद्यपदार्थ देणारे उत्तम उपाहारगृह आहे. निजो जिजा हा जुन्या सरदारांचा वाडाही प्रेक्षणीय स्थळांच्या सफरीत दाखविण्यात येतो. गो जिन्हा हे रमणीय आणि छोटेखानी बुद्धमंदिरही पाहण्यासारखे आहे.

क्योटोमधील 'कॉस्चूम म्युझियम' मध्ये जपानच्या इतिहासात स्त्रियांचे, पुरुषांचे व मुलांचे कपडे कसे बदलत गेले याचे मनोरंजक दर्शन घडते. दोन हजार वर्षांचा जपानी वस्त्रांचा हा इतिहास आहे. टोजी मंदिरात ५५ मीटर्स उंचीचा पॅगोडा असून हा जपानमधील सर्वांत उंच पॅगोडा आहे, हा १६४४ साली बांधण्यात आला. या मंदिराच्या सभागृहात दयेच्या देवतेचे (कॅनन) एक हजार एक पुतळे आहेत. हिताशी होंगांजी मंदिरात क्योटोमधील सर्वांत मोठी लाकडी इमारत आहे. क्योटोमधील नॅशनल म्युझियम हे जपानची संस्कृती, कला व परंपरा यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यात इ. स. पूर्व २००० वर्षांपूर्वीच्या मातकामाचे काही दुर्मिळ नमुने आहेत. तसेच आधुनिक जपानची चित्रकला, हस्तकला इत्यादींचेही निवडक नमुने आहेत. कवाई कांजिरो मातकामाचा कारखानाही प्रेक्षणीय आहे. रोझन कॅनन मंदिरात कॅनन देवीची बसलेली मूर्ती असून जपानच्या जगप्रसिद्ध कॅनन कॅमेऱ्याचे नाव याच देवतेवरून घेतले आहे. क्योटोमध्ये कियोमुअु, यसाका–जिजा शियॉन अशी अनेक बुद्धमंदिरे आहेत. पण खास धार्मिक हेतू नसेल तर नमुन्यादाखल दोन तीन मंदिरे पाहून परकीय प्रवाशाला मंदिराची कल्पना येते. बँकॉकप्रमाणे जपानमध्येही प्रवासी कंपन्या कधी कधी आपल्या सफरीत वाजवीपेक्षा अधिक मंदिरांचा समावेश करतात. त्यापेक्षा क्योटो सेंटर ऑफ ट्रॅडिशनल इंडस्ट्रीसारख्या कलात्मक केंद्रांना भेट देणे अधिक उपयुक्त ठरते. या ठिकाणी जपानच्या नृत्यास व नाटकास वापरल्या जाणाऱ्या हजारो प्रकारच्या मुखवट्यांची निर्मिती होते. क्योटो हँडीक्रॅफ्ट सेंटरमध्ये खास जपानी पद्धतीच्या हस्तकला व्यवसायांचे उत्तमोत्तम नमुने पहायला मिळतात. क्योटोमधील शेकडो मंदिरांपैकी किंकाकूजी हे मंदिर मात्र पाहिलेच पाहिजे. हे अत्यंत कलात्मक असून त्याच्या प्राकारात सुवर्णाची पाने लावली आहेत. मूळ मंदिर १३९७ मधील होते. पण १९५० साली ते आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आणि १९५५ मध्ये ते पुनः बांधण्यात आले. या मंदिरातील तळ्यात अत्यंत सुंदर वेली असून नोव्हेंबरमध्ये त्यांच्या पानांचा रंग बदलतो. क्योटोमध्ये कबुकी, बंकुरा, नोह

या जपानी नाटकांची अनेक नाटचगृहे आहेत. त्याशिवाय जपानी परंपरागत नृत्य व संगीत यांचेही कार्यक्रम वर्षभर चाललेले असतात. त्यात गैशांच्या नृत्यांचे खास नाटचगृह आहे, ते विशेष संस्मरणीय आहे. वर्षातून एकदा क्योटोमध्ये नृत्य व संगीताचा महोत्सव होतो. एप्रिलमध्ये चेरीच्या मोसमाच्या निमित्त खास कार्यक्रम होतात. मे महिन्यात गैशांच्या नृत्याचा महोत्सव असतो. १६ व १७ जुलै रोजी होणारा गिऑन माटसुरी हा सण क्योटोमध्ये अत्यंत भव्य प्रमाणावर साजरा केला जातो. क्योटोची भेट ही एकाद्या भौगोलिक प्रदेशाची भेट नसून जपानच्या गतकालाची सफरच आहे.

जपानचा सांस्कृतिक मागोवा घेण्याच्या दृष्टीने क्योटोप्रमाणेच नाटा हे शहरही अत्यंत महत्त्वाचे आहे. क्योटोपासून हे फक्त ४२ किलोमीटर्सवर आहे. नाटा ही आठव्या शतकातील जपानची पहिली कायमची राजधानी होती. विशाल उद्याने आणि कलात्मक मंदिरे हे नाटाचे वैशिष्टच आहे. नाटा कोअेन उद्यान हे जपानमधील सर्वांत मोठे उद्यान असून त्याचा विस्तार तेराशे एकर आहे. या उद्यानात अनेक हरणे मुक्तपणे हिंडताना दिसतात. प्राचीन काळी एक देव हरणावर बसून या उद्यानात आला होता अशी लोककथा आहे. म्हणून या उद्यानात हरणांना फार मोठा मान आहे. सध्या येथे एक हजार हरणे आहेत. शिवाय शेकडो प्रकारचे विशाल वृक्ष, वेली, फुलझाडे आणि जलाशय यांनी हे उद्यान अतिशय रमणीय झाले आहे. शहराच्या पश्चिम भागात नाटा नॅशनल म्युझियममध्ये जपानच्या पारंपरिक व आधुनिक कलांचे मनोज्ञ दर्शन घडते. तोडाजी मंदिर हे एका टेकडीवर असून तेथील बुद्धाची मूर्ती आणि मंदिर भव्य आहेत. विशेष म्हणजे तोडाजी मंदिराची इमारत ही सर्वांत मोठी लाकडी इमारत आहे. तिचा काही भाग बाराव्या शतकातील आहे. दाईबुटसुची (महान बुद्ध) ब्राँझ मूर्ती १७०९ सालची आहे. मूळ मूर्ती ७४९ सालची होती. या मूर्तीची उंची १६ मीटर्स असून ती ४३७ टनांची आहे. ज्ञान आणि सुख यांच्या देवतांच्या मूर्ती बुद्धासमोर असून जपानी लोक या दोन्हींच्या प्राप्तीसाठी या देवतांचे आशीर्वाद मागतात. जवळच्याच काईडेन मंदिरात बुद्धाच्या चार रक्षकांच्या मूर्ती आहेत.

कासुगा–तैशा मंदिर हे जपानी दिव्यांबद्दल प्रसिद्ध आहे. या मंदिरात विविध प्रकाराचे तीन हजार कंदील, समया, दिवे आहेत. काही दगडांचे, काही ब्राँझचे, काही तांब्याचे तर काही इतर धातूंचे आहेत. त्यांच्या रचनेतील कलात्मक विविधता मनावर छाप पाडणारी आहे. फेब्रुवारी व ऑगस्टमध्ये दिव्यांचा महोत्स- एक होतो, त्यावेळी हे सर्व तीन हजार दिवे लावण्यात येतात. इसिएन उद्यान हे ...त भरले कोलन उद्यानाएवढे विशाल नसले तरी टुमदार पण टवटवीत आहे. ...तांच्या विराट व चीनमधील कलात्मक वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. शिन ...डेनमध्ये पाच हजार

एक मध्यवर्ती मूर्ती असून युद्धनेत्यांच्या १२ मूर्तीही आहेत. होयुजी मंदिर हे जपान-
मधील एक अत्यंत महत्त्वाचे मंदिर आहे. सम्राटांचे पुत्र शोट्टुकु यांनी इ. स. ६०७
साली हे मंदिर बांधण्यास सुरुवात केली. आजही जपानच्या दहा हजार येनच्या
नोटेवर याच राजपुत्र शोट्टुकु यांचे रेखाचित्र असते. प्राचीन जपानी वास्तुशिल्प-
कलेच्या अभ्यासकांना होयुझी मंदिराची रचना विशेष उद्‌बोधक वाटेल. 'नाटाके
म्युझियम ऑफ एथ्नॉलॉजी' मध्ये जपानच्या जुन्या शेतीवाडीत घरांचे व संस्कृतीचे
उत्तम दर्शन घडते. याशिवाय नाटाच्या आसपास याकुशीजी, तोशिदाईजी अशी
अनेक वैशिष्टयपूर्ण जपानी बुद्धमंदिरे आहेत.

उद्योगधंदे आणि व्यापार यांच्या दृष्टीने टोकियोच्या खालोखाल जपानमधे
ओसाका शहराचा मान आहे. गेली दोन हजार वर्षे हे आंतरराष्ट्रीय व्यापारा
एक प्रमुख केंद्र आहे. गेल्या महायुद्धात या शहराचे बाँब हल्ल्यामुळे अपरंपा
नुकसान झाले होते. पण थोडयाच काळात जपानने या औद्योगिक शहराची पु
उभारणी केली. विमान, आगबोटी, रेल्वे व मोटारी अशा सर्व सोयी या बंदरा
असल्याने व्यापाराच्या दृष्टीने याचे महत्त्व विशेष आहे. येथे ७० साली जागति
औद्योगिक प्रदर्शनही भरले होते. ओसाका किल्ला या नावाने आता विख्यात असले
किल्ला म्हणजे त्या ठिकाणी असलेल्या प्राचीन किल्ल्यांची सिमेंट काँक्रीट
प्रतिकृती आहे. मूळ किल्ला आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. ओसाका येथील सुमियो
तायशा मंदिर हे इ. स. २०२ मधील असून जगातील एक अत्यंत जुने असे धर्मस्थ
आहे. गेल्या दोन महायुद्धात शेकडो वेळा ओसाकावर हल्ले होऊनही हे प्राच
मंदिर बचावले आहे हा एक चमत्कारच आहे. कैटाकुटान उद्यान आणि त्या
म्युनिसिपल आर्ट म्युझियम ही दोन्ही प्रेक्षणीय आहेत. मिंट (टांकसाळीचे) म
जगातील देशांच्या नाण्यांचे प्रदर्शन आहे ते विशेष लक्षणीय आहे. शितेनोजी मं
प्रवाशांना दाखविण्यात येते. पण मूळ मंदिर युद्धात नष्ट झाले असून सध्या त्य
प्रतिकृतीच पहावयास मिळते. ओसाकात जपानचे शेकडो जगप्रसिद्ध कारखाने अ
त्यांपैकी अनेकांना आधी योजना केली तर प्रवासी भेट देऊ शकतात.

नागासाकी आणि हिरोशिमा ही जपानमधील शहरे सुंदर म्हणून प्र
नसली तरी जगाच्या इतिहासातील यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण असल्याने शे
प्रवासी या शहरांना भेटी देतात. ६ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकन विमा
हिरोशिमावर पहिला अणुबाँब टाकला आणि त्याचा परिणाम म्हणजे पंचा
हजार लोक मरण पावले आणि एक लाखावर लोक जखमी किंवा कायमचे
झाले. ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने नागासाकीवर दुसरा अणुबाँब टा
आणि ३९ हजार लोक ठार व ३५ हजार लोक जखमी केले. या दोन्ही शहर
मालमत्तेचेही अपरिमित नुकसान झाले. अणुबाँबच्या प्रलयंकारी संहाराच्या द

मुळे जपानने महायुद्धात शरणागती पत्करली. हिरोशिमामधील ज्या इन्डस्ट्रियल प्रमोशनल हॉल या इमारतीवर अणुबाँब पडला, त्या उद्ध्वस्त इमारतीचा काही भाग अजूनही तसाच ठेवण्यात आला असून त्या भोवती पीस पार्क नावाचे उद्यान आणि शांतीचे स्मारक उभारण्यात आले आहे. तसेच पीस मेमोरियल म्युझियम-मध्ये अणुबाँबच्या संहाराची छायाचित्रे, उद्ध्वस्त वस्तू, त्याकाळचे चित्रपट वगैरे पहायला मिळतात. नागासाकीमध्येही असेच स्मारक, वस्तुसंग्रहालय आणि चित्रपट आहेत. हिरोशिमा आणि नागासाकी ही शहरे टोकियोपासून बरीच दूर असून टोकियोपासून हिरोशिमाचे आगगाडीचे तिकीट पंधरा हजार येन आहे.

असामी हे माथेरान– महाबळेश्वरसारखे शनिवार– रविवार सुखात घालविण्याचे ठिकाण आहे. मधुचंद्रासाठी या ठिकाणाची खास निवड केली जाते. येथील कला वस्तुसंग्रहालयात जपानी कलांचे उत्तम नमुने आहेत. निक्को हे जपानमधील एक अत्यंत सुंदर गाव असून टोकियोहून या गावी सकाळी जाऊन रात्रीपर्यंत परतता येते. येथील टोझुगु मंदिर विशेष प्रसिद्ध आहे. जपानचे एकत्रीकरण करणाऱ्या टोकुगवा घराण्याचे स्मारक म्हणून हे मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिराभोवती सुंदर वृक्ष असून निवांत सौंदर्यासाठी या मंदिराला भेट देणे फलदायी ठरेल. या मंदिराला लागून आपलीही अनेक मंदिरे आहेत. त्यांचे शिल्प लक्षणीय आहे. या मंदिरासमोर एकशे पाच फूट उंच पाच मजली पॅगोडा आहे. निक्को मधील ट्रेझर म्युझियममध्ये जुन्या जपानी तलवारी, चिलखते, तोफा, बंदुका, चित्रे इत्यादींचा संग्रह आहे. निक्को येथील शुझेन्जी सरोवर आणि केगॉन धबधबा हे इतके सुंदर आहेत की ‘ निक्को पाहिल्याशिवाय कशालाही केक्को (सुंदर) म्हणून नये ’ अशी जपानमध्ये म्हणच पडली आहे. सॅपोरो हे शहर १८६९ सालचे म्हणजे अगदी अलीकडे वसलेले असल्याने त्याची रचना शिस्तबद्ध आहे. होकाइडो भागाची ही राजधानी आहे. या शहराचा मुख्य रस्ता ओडोरी हा १०५ मीटर्स रुंद आहे. टोकियोच्या खालोखाल सपोरो येथे उत्कृष्ट रात्रीचे जीवन आहे. या शहरात तीन हजार मद्यपानगृहे आणि नाईट क्लब्स आहेत. बॅचलर म्युझियम हे एका इंग्रज धर्मोपदेशकाच्या स्मरणार्थ तयार करण्यात आले असून जपानमध्ये स्थायिक झालेल्या परकीयांच्या जीवनाची झलक त्यात दिसते. क्लॉक टॉवर ही रशियन धर्तीची इमारत प्रसिद्ध आहे. मौरुयामा उद्यान व जंगल, हिवाळ्यात बर्फावरून घसरण्याच्या खेळाबद्दल प्रसिद्ध आहे. सपोरो हे हिवाळी खेळांचे जगातील एक अत्यंत मोठे केंद्र असून येथे ऑलिंपिक हिवाळी खेळांचे सामनेही या शहरात भरले होते. दरसाल येथे बर्फाचा महोत्सव होतो आणि जपानी देवदेवतांच्या विराट बर्फाच्या मूर्ती तयार करण्यात येतात. येथील बोटॅनिकल गार्डनमध्ये पाच हजार

प्रकारच्या वनस्पती आहेत. नागोया हे मध्यवर्ती शहर व्यापार व उद्योगधंदे यासाठी प्रसिद्ध असून बुलेट ट्रेन येथे थांबते. जपानमध्ये स्वतःच्या हिमतीवर प्रवास करणाऱ्यांनी जपान नॅशनल टूरिस्ट ऑर्गनिझेशनचे मार्गदर्शन घ्यावे. या निम-सरकारी संस्थेच्या कचेऱ्या जपानमधील सर्व प्रमुख शहरी विमानतळ, आगगाड्यांची स्टेशने, बस स्थानके व जहाजांचे धक्के यांवर असतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0024056
REFBK-0024056